म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क.
REFBK-0000302

# लो० बाळ गंगाधर टिळक

## यांचें

# ५० वर्षांचें चरित्र

## भाग पहिला.

(प

REFBK-0000302

रा. रा. कृष्णाजी आबाजी गुरुजी यांनीं लिहिलें

तें

रा. रा. गणेश रामचंद्र कशाळकर यांनीं

पुणें येथें रु० ना० कवडे यांचे

शारदा छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

शके १८२८.

सन १९०६.

किं० १२ आणे.

हें चरित्र सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदवून भाषांतरासेरीज सर्व प्रकारचे हक्क प्रकाशकानें आपल्या स्वाधीन ठेविले आहेत.

चरित्र
१८

# प्रकाशकाची विनंति.

लोकमान्य **बाळ गंगाधर टिळक** यांचे चरित्रापैकीं प्रथमभाग आज वाचकांस सादर केला आहे. वास्तविक रीतीनें पाहिलें असतां हें काम आमचे स्वतःचे कारखान्यांत व स्वतःचे देखरेखी खालीं झालें पाहिजे होतें. परंतु ज्या सोई पुणें, मुंबईसारख्या शहरांतून असतात तशा सोई तालुक्याच्या ठिकाणीं असणें शक्य नसते, यामुळें प्रत्येक गोष्टीकरितां पुण्यास धांव मारावी लागते. त्यांतून मजसारख्या अनभ्यस्तास श्रम, वेळ आणि पैसा अधिक खर्च होऊनही कार्य लोकप्रिय होईल किंवा नाहीं याची काळजी असते. तथापि "केल्याखेरीज होत नाहीं." या म्हणीकडे लक्ष देऊन आम्हीं हें काम हातीं घेतलें व यास 'शारदा छापखान्या'च्या मालकांनीं मोठ्या हौसेनें आणि उमेदीनें साह्य दिलें, यामुळें हा भाग इतक्या लौकर वाचकांच्या हातीं देण्याचा योग आला आहे.

ह्या चरित्राचे लेखक टिळकाईस्ट आहेत हें कोणास सांगण्याची अवश्यकता नाहीं व जीं खरीं **टिळकाईस्ट** माणसें आहेत तीं विषयवादी, उघड्या अंतःकरणाचीं आणि स्पष्ट बोलणारीं असल्यामुळें त्यांच्यासंबंधानें कोणास संशय घेण्यास जागा रहात नाहीं. हे जसें कै० **विष्णुशास्त्री चिपळुणकरास** मान देतात तसाच कै० **माधवरावजी रानडे, आगरकर,** वगैरे मंडळीसही देतात. यांची जशी लो० **टिळकांचे** ठिकाणीं भक्ति आहे तशीच राजमान्य **गोखले, भानु, साने** प्रभृति मंडळीच्यासंबंधानेंही आहे तथापि ज्या विषयांत ज्यांच्या संबंधानें यांचें मत विरुद्ध असेल तेथें तें आपलें मत देण्यास मागें पुढें पहात नाहींत, मग त्या सपाट्यांत डा० **भांडारकर** येवोत **रानडे** येवोत वा **टिळक** येवोत. यांच्या ह्या पद्धतीमुळें या

चरित्राचे पुढील भागांत ब-याच विचारणीय गोष्टी येतील यांत संशय नाहीं.

चरित्र लेखकांनीं या चरित्राचे तीन भाग कां केले, यांचीं कारणें त्यांनीं प्रस्तावनेंत दिलीं आहेत, तेव्हां याच्या संबंधानें येथें आणखी लिहिण्याची अवश्यकता नाहीं. या भागांत प्रसंगानुसार जशीं चित्रें आलीं आहेत तशीच पुढील भागांतही प्रो॰ **जिनसीवाले** डा॰ **भांडारकर** जस्टिस **रानडे** प्रो॰ **आपटे** वगैरेंचीं बरींच चित्रें घालण्याचा विचार आहे. मे॰ **स्ट्राची** व **अस्टन** साहेबांचे फोटो मिळविण्याचा उद्योग करीत आहोंत व दीर्घ प्रयत्नांनीं ते मिळतीलही; पण त्याचे पूर्वीं " **जस्टिसचा** " फोटो मिळाला असता तर चरित्रांतील मजकुरापेक्षां या महात्म्याच्या दर्शनानेंच लोक अधिक संतोषित झाले असते; पण तो चेहराच गुप्त असल्यामुळें व ज्यांच्याजवळ तो गुप्तपणानेंच खुलला होता तेथपर्यंत आमचा पल्ला पोंहचण्याचा संभव नसल्यामुळें तो तसाच अंधेरांत पडूं देणें भाग आहे. जर आमच्यांतील एखाद्याच्या नजरेस तो पडला असेल व जर ते आह्मांस तो देतील तर आह्मी तर त्याचे आभार मानूच मानूं; पण आनंदें वाचकही खात्रीनें त्याचे आभार मानतील.

असो; चरित्र लेखकांनीं, छापखानेवाल्यांनीं आणि चित्रें छापून देणारांनीं किफायतीकडे विशेषसें लक्ष न देतां वाचकांचे हेतूकडे लक्ष पुरविलें असल्यामुळें थोडक्या किंमतींत हा भाग ग्राहकांस देतां आला. त्याप्रमाणेंच त्यांनीं पुढेंही आश्रय दिल्यास पुढील भागही पृष्ठसंख्येचे मानाप्रमाणेंच लोकांस देण्याचा आमचा विचार आहे. सिद्धिदाता जगदीश आहे.

**गणेश रामचंद्र कशाळकर,**

संपादक ' प्रतोद '

इसलामपूर ( सातारा )

# प्रस्तावना.

एकाद्याचे जन्म काळास शांत, आनंदाची व शुद्ध वेळ लागली म्हणजे त्याचे आयुष्यांतील सर्व कार्यें शांतपणानें व आनंदानें होत असतात. एकाद्याचे जन्मकाळीं जड वेळ लागली ह्मणजे त्याच्या अयुष्यांतील कामगिरी [illegible]ही हलकी, सहजासहजी होणारी असली तरी ती वडार लोकांच्या दगड भरलेल्या गाड्या-प्रमाणें रे रे, रे रे, करीत व्हावयाची, असा वृद्धांचा अनुभव आहे. तसाच एकाद्याचा जन्मकाल तारांबळीचा असला ह्मणजे त्याचे जन्मभर तारांबळच असावयाची. मग त्याचे आयुष्यांतील काम-गिरी लहान असो, मोठी असो, सुखाची असो, संकटाची असो, नजीकची असो, दूरची असो, सहज होणारी असो अथवा श्रमानें होणारी असो, त्याची ह्मणून कुतरओढ असावयाचीच. हें असो, पण आशाच्या संबंधानें एकाद्यानें कांहीं काम हातीं घेण्याचें मनांत आणिलें तर त्याची सुद्धा तशीच अवस्था होत असते, असाही पण आनुभव आहे आणि तो सर्वथैव चुकीचा आहे असेंही पण ह्मणतां यावयाचें नाहीं. माझे चरित्रनायक वरील तीन प्रकारां-पैकीं अखेरच्या प्रकारचे होत. यांची आपली नेहमीं तारांबळ आहेच. जिचें नांव पाण्यांतील रत्नागिरी, अशा कोंकणीं गांवीं जन्म, त्यांत आषाढाचा महिना म्हणजे पर्जन्याच्या मुसळधारांचा, कोंकणच्या रिवाजाप्रमाणें तुटक घरें असल्यामुळें नाहीं नजीक पोक्त मनुष्य, त्यांत मातुश्री अशक्त, ती इतकी कीं, वर्ष दोन वर्षें तरी लोटतील किंवा नाहीं ही काळजी, सामानसुमानाची पूर्व तयारी असेल तर ती बेताचीच! अशा तारांबळींत जन्मास आलेल्या बाळाची सदोदित ओढाताण असावयाची व त्याप्रमाणें आहे याचा अनुभव हजारों लोकांस येत आहे. तशीच हयेलंडी हा भाग लिहिणाराची, तो छापविणाराची व ज्या छापखान्यांत छापला त्या छापखानेवाल्याचीही उडाली आहे! असो, यांचें सुंदर चरित्र

आपल्या सारख्याच्या हातून होणें अशक्य असलें तरी हल्लींच्या अथवा भावी लेखकांस सामुग्री तयार करून ठेवावी या इच्छेनें यांची आका, काका, वगैरे मंडळी असतांच यांच्या पूर्वजांपासूनची माहिती, जन्मटिपणें, यांचे खेळ, अभ्यास वगैरेंची माहिती घेऊन ठेविली होती. यांचे काका स्मरणाचे धड, विनोदि आणि बहुभाष असून त्यांचें पूर्ण लक्ष यांजवर असल्यामुळें या चरित्रास लागणाऱ्या सामुग्रीचा बहुतेक भाग काकांनींच पुरविला असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. काकांच्या समोर झालेलें चरित्र त्यांच्या समोर छापलें जावें अशी त्यांची फार इच्छा होती परंतु योगायोग या वेळचा होता आणि तोही पण यांच्या ५० वे वर्षाचे वाढदिवसाचे हुल्लडींत उरकून घ्यावयाचा होता; ह्मणून तसाच तो योग घडून आला आहे. यांच्या अभ्यासाच्या वह्या व आणखी कांहीं अवांतर माहिती, यांचे चि. कै. **विश्वनाथराव** यांच्याकडून मिळाली व यांच्या कालेज मित्रांकडूनही तेथील कांहीं माहिति मिळाली आहे, ती यांत शक्य तितकी दाखल केली आहे. हा सर्व प्रकार स्मरणाचाच असल्यामुळें कांहीं कालांत, स्थलांत अथवा नांवांत फरक असण्याचा संभव आहे हा दोष महाराष्ट्राचा इतिहास तयार करणारा कोणी हरीचा लाल भेटल्यास काढून टाकील, असा मला भरंवसा आहे. खेरीज गमावलेलें राष्ट्रीयत्व कमाविण्याच्या उद्योगाचें पूर्ण विस्मरण झालें असतां त्या असभ्य अपराधाबद्दल जर क्षमा होत आहे तर एकाद्याच्या चरित्रांत क्षुद्र दोष राहिल्यास त्याची क्षमा होणार नाहीं असें मला वाटत नाहीं. असो, यांचें चरित्र छापण्याबद्दल इतकी तारांबळ कशासाठीं ? यांची ज्युबिली तरी काय म्हणून ? त्यांनीं अशी कोठें तलवार गाजविली आहे कीं, ज्यांची ज्युबिली अथवा वाढ दिवस सर्वांनीं केलाच पाहिजे ! असें कोणतें किल्लेसर केले आहेत कीं, ज्याकरितां यांचा वाढदिवस करणें लोकांस इष्ट वाटावें ! आज पुण्यास असें कांहीं गृहस्थ आढळतील

कीं, ज्यांनीं यांच्यापेक्षां पुष्कळ परिश्रम करून मोठ्या मानाच्या पदव्या संपादन केल्या आहेत; मातृभाषेची सेवा करण्यांत रिमेच्या-रिमे कागद खर्ची घालून रिकामे वेळेचा उपयोग केला आहे; समाजाची उलथापालथ करतां करतां काया शिणविली आहे; पन्नाशी गेली, पंचावन्नावी गेली, साठी परतली, तरी चष्म्यावर चष्मे चढवून, टाईम्स व बॉम्बे ग्याझेटाचा कानाकोपरा धुंडाळींत पुस्तकालयांत पडून राहिले आहेत; फार तर काय पण कोणी नेमील तर एकाद्या म्यु० कमेटीची चेअरमनशिप अथवा सेक्रेटरीशिप, एकाद्या कॉलेजची प्रोफेसरी, एकाद्या ठिकाणची मॅजिस्ट्रेटी अथवा एकाद्या समाजांत समाजिष्ठाची सेक्रेटरीशिप अल्प वेतनावर पत्करण्याची उमेद, हौस अथवा लालसा अद्याप आहे. अशांची ज्युबिली कां करीत नाहीं ? असे अनेक प्रश्न पुढें येतात. याचें थोडक्यांत उत्तर द्यावयाचें झाल्यास ' तुका ह्मणे तेथें पाहिजे जातीचे, येरा गबाळाचें काम नोहे " असें देतां येईल; पण या उत्तरानें सर्वांचें समाधान होईल असें मला वाटत नाहीं. वर ज्या प्रकारच्या मंडळीचें वर्णन केलें आहे ती मंडळी अगदीं नादान, टाकाऊ, निर्माल्य आहेत असें माझे म्हणणें नाहीं. या मंडळींत आमच्या चरित्रनायकाच्या इतके, कदाचित् चरित्रनायकापेक्षां कांकणभर जास्त विद्वान्, बहुश्रुत, अनुभवी आणि मेहनतीही कांहीं असतील, नाहीं असें नाहीं. पण त्यांच्या व यांच्या क्रियेंत जें अंतर आहे तें अंतर एकाची ज्युबिली करण्यास प्रोत्साहन देते आणि दुसऱ्यांच्या वयाचीं कितीही वर्षें गेलीं तरी त्यांचें स्मरणही होऊं देत नाहीं, याला काय करावें ?

मागील तीन चार पिढ्यांतील लोकांच्या कृतीकडे लक्ष दिल्यास आपणास काय आढळेल बरें ? कांहीं पारशी, कांहीं भाटये, कांहीं गुजर यांनीं आपल्या औदार्याच्या निशाण्या अजरामर करून ठेवण्याकरितां मोठमोठे दवाखाने बांधून ठेवून त्यांत हजारों लोकांचे प्राण संरक्षणाची तजवीज लाविली आहे, कोणी कापडाच्या

गिरण्या उभारून कोट्यवधि रुपयांचे कापड तयार करित आहेत, कोणी विलायतेशीं आडत ठेवून त्यावर लक्षाधीश झाले आहेत, कोणी कॉलेजांस, कोणी हायस्कुलांस, कोणी मुलींच्या शाळांस द्रव्यसाह्य देऊन सरकाराकडून मोठमोठे किताब मिळविले आहेत. कोणी जास्टिस आफ दि पीस झाले आहेत तर कोणी म्यु० कार्पोरेशनचे अध्यक्षाचा मान मिळवून त्याचा सुखानें अनुभव घेत आहेत ! या वर्गापेक्षां कमी श्रीमंत पण अधिक विद्वान्वर्गांतील कोणी रानावनांत हिंडून वनस्पतींचा शोध करतां करतां थकून मार्गस्थ झाले आहेत तर कोणी उंचातील उंच मान जो हायकोर्टाचे जज्जाचा, तो पटकविण्याच्या उद्योगांत मग्न झाले आहेत ! कोणी बॅरिष्टर, कोणी डि० डे० कलेक्टर, कोणी सेशन जज्ज, कोणी फर्स्टक्लास सब जज्ज होतां होतां अंधपंगू बनून निजधामाचा रस्ता सुधारित आहेत, कोणी पूल, व इमारतींच्या कारखान्यांत पोट भरीत आहेत तर कोणी विद्यार्थी पढविण्याच्या कारखान्यांत आपल्या आयुष्याचा काळ कंठित आहेत, कोणी सामाजिक विषयांत अध्यक्ष होण्याचा धंदा पतकरीत आहेत तर कोणी सरकारी अम्मलदारांस मानपत्रें देण्याची संधी साधण्यांत गुंतले आहेत ! एकंदरींत गेल्या पाऊणशें वर्षांत जन्मलेल्या आणि निजधामास गेलेल्या अथवा हल्लीं दुसऱ्या पंथांत असलेल्या लक्ष्मीपुत्रांनीं आणि आँग्लविद्याविशारदांनीं जर कांहीं केलें असले अथवा शिल्लक ठेवलं असले तर आपण जगण्याकरितां खाल्लें नाहीं, तर खाण्याकरितां जगलों व इतका सारा व्याप श्रीमंत बनून खाण्याकरितां केला आहे असें आपल्या कृतीनें दाखविलें असें म्हणण्यास हरकत आहे काय ! हें माझें विधान समाज सुधारकांत गोवून घेणाऱ्या कित्येकांस आवडणार नाहीं हें खरें, पण ते अम्मळ विचार करून पहातील तर त्यांच्या लक्षांत इतकें तरी आल्यावांचून राहणार नाहीं कीं, त्यांच्या समाज सुधारण्याच्या क्रियेंत परराष्ट्रसत्तेच्या खोल खोल जाणाऱ्या मुळांस प्रतिबंध करणारी अशी एकही

क्रिया नव्हती व नाहीं इतकेंच नाहीं पण या सुधारणेच्या नादान या मुळांस दिवसेंदिवस ऐसपैस मैदान मात्र मिळून तीं खोलखोलच गेलीं आहेत.

यास प्रतिबंधकारक दिशा दाखविण्याची आखणी करण्याचा उद्योग प्रथम जर कोणी केला असेल तर तो कै० **गणेश वासुदेव जोशी** यांनीं अंशतः केला. परंतु तीच आखणी तितकीच रद्द झाल्यामुळें तिचा उपयोग तावइतोच झाला नाहीं. पूर्वीची सर्व दिशा बदलून राष्ट्रीय अवनतीचा भाग माजी पाडण्यास लोकांची जी तयारी हवी असते ती तयारी करण्याचा विडा कै० **विष्णुशास्त्री चिपळुणकर** यांनीं उचलला आणि त्यास योग्य साह्य अथवा पांच पावलें पुढें जाण्याचें साहस मोठ्या धैर्यानें, आस्थेनें, कळकळीनें, श्रमानें आणि स्वार्थत्यागानें या चरित्रनायकांनीं करून दाखविलें—नव्हे अनुभवास आणून दिलें—आणि पुढें कितपत कसा मार्ग आक्रमावयाचा याचा राजरस्ता करून दिला. हें राष्ट्रीय वळणाचें काम भिक्षेनें होणारें नाहीं. याला दीक्षाच घेतली पाहिजे. आणि तीही पण 'चणे खावे लोखंडाचे मग ब्रह्मपदीं नाचे' या म्हणीप्रमाणें तरी पाहिजे आहे. ती दीक्षा म्हणजे आर्थातच राष्ट्रीय कर्तव्याकरतां जगावयाचें आहे आणि जगण्याकरितां खावयाचें आहे अशा बाण्याची आहे. अशाबाण्यानें जे राष्ट्राची बाणी संपादन करतात व राखतात तेच सत्पुरूष होत, त्यांचीच गणना जिवंत आणि जातिवंत पुरुषांत करावी लागते. अशीं माणसें आपले समाजांत उत्पन्न व्हावींत आणि असलेलीं वाढावीत म्हणून वाढदिवस करावयाचा आहे. मोदीखान्यांतील हत्तीनें आपल्या लंबायमान शुंडादंडानें लोकांच्या मळ्यांतील व रानांतील वृक्षांचा पार फडशा उडवून एकशें एक वर्षें जगला म्हणून त्याचा वाढदिवस करावयाचा नाहीं. फकीर आपाच्या बैलानें अवघ्या पेंडेच्या खड्यावर रात्रंदिवस घाणा गाळून विसाची तीस

श्री रामचंद्राय नमः

# लो. बाळ गंगाधर टिळक.

यांचें

## ५० वर्षांचें चरित्र.

२०७

उपजला तरि तोचि मला गमे।
कुलसमुन्नति यास्तव जे रमे॥

वामन.

पुत्र व्हावा ऐसा गुंडा। ज्याचा तिहीं लोकीं झेंडा॥

तुकाराम.

जगांत कोट्यवधि मानवांचा नित्य जन्म होतो आणि नित्य लक्षावधि मानव मृत्यु पावतात. परंतु ज्यांचा जन्म मानवकोटींतील थोर वर्गांत होतो, जे श्वानसूकरासारखे बापुडे जन्मत नाहींत, जे आपल्या जन्माचें कार्यकारणसंबंध थोर कृतींनें सिद्ध करून दाखवितात, त्यांसच योग्य मानव कोटींत गणून गुणज्ञ लोक त्यांचे गुण गातात, इतिहासज्ञ त्यांचीं चरित्रें तयार करतात, कवी त्यांचीं पुराणें बनवितात आणि शाहीर आपल्या वीर्योत्पादक पोंवाड्यांच्या छंदांत अशांस गोवून अनेक फंदीस ताल्यावर आणितात. रामायणाचे काळीं आणि त्यापूर्वीही लक्षावधि प्रजेंत हजारों राजे, हजारों प्रधान आणि हजारों उपाध्याय निर्माण झाले. पण त्यांत आपल्या कर्तृत्वशक्तीनें, बुद्धिमत्तेनें, विद्वत्तेनें, करारीपणानें ज्ञात्यांस आनंदांत डुलत ठेवणारे असे राजे अथवा उपाध्याय

वर्षे जगला किंवा कुलालाश्वानें मालकास तोशीस न लावतां गांवांतील उकीरडे फुंकून ओझीं वाहतां वाहतां पन्नास वर्षें पुरीं करून ५१ वें वर्ष जिंकलें म्हणून वाढदिवस कोणी करावयाचे नाहींत; तद्वतच स्वोदर पोषणाच्या प्रधान हेतूच्या अंगभूत शेंकडों कामें जरी केलीं व तीं करतांना किती जरी देह झिजला असला, तरी यांत राष्ट्रहित साधणें, त्यांतून परकीय सत्तेपासून साधणें अशक्य असतें. हीं अशक्यता स्वार्थत्याग, बुद्धिमत्ता, कष्ट, धैर्यादिगुणाखेरीज नाहींशीं होत नाहीं म्हणून या वाढदिवसाचें महात्म्य विशेष आहे व या चरित्राचे भागाची इतकी तारांबळ केली ती तरी अशा महोत्सहाची संधी साधण्याकारितांच होय. असो.

यांच्या चरित्राचे तीन भाग करण्याचें योजिलें आहे. कारण यांच्या कर्तृत्वाच्या दिशाच तितक्या आहेत. पहिल्यांत जन्मापासून अभ्यासक्रम संपेपर्यंतची माहिती आली आहे. विचारस्वातंत्र्य आणि आचारस्वातंत्र्य यांजवर एकप्रकारचें वेष्टन असल्यामुळें यांच्या आंगच्या खऱ्या कर्तृत्वाचें दर्शन होण्यास बरेंच श्रम पडत असत. ते श्रम यांचें आणि यांनीं उभारलेल्या संस्थांची फारकत झाल्यानंतर वाचले. या दहा वर्षांचे कालांत ज्या कांहीं गोष्टी घडल्या त्यांचा समावेश दुसरे भागांत करावयाचा आहे आणि तिसरे भागांत त्यानंतरच्या पंधरा वर्षांचें आयुष्यक्रमांत ज्या राष्ट्रीय-सामाजिक उलाढाली केल्या त्यांचें शक्य तितकें टिपण देण्याचें योजिलें आहे. हे भाग निरनिराळे न करतां एकाच भागांत सर्व काम उरकण्यारा नड नव्हती, पण असें करण्यांत पुष्कळांस निराश व्हावें लागलें असतें. साधु तुकाराम महाराज यांच्या भक्तमंडळांत; पदरांत लाह्याचें पीठ, खांद्यावर पताका, आणि हातांत टाळ घेऊन ' ज्ञानदेव, तुकाराम ! ' नांवाचा गजर करीत आळंदी, देहु, पंढरीच्या वाऱ्या करणारांची संख्या मोठी असावयाची; श्री समर्थ रामदास यांच्या सांप्रदायिकांत कुबडी व झोळी आडकवून " मना वासना दुष्ट कामा नये रे " इत्यादि



श्री कृष्णानंद सरस्वती

किती निघतील ? रघु, हरिश्चंद्र, दशरथ, वाल्मिक, श्रीरामचंद्र, वशिष्ठ इत्यादि थोडींच नावें आढळतात. सर्व भारतीयमंडळांत तरी भीष्म, द्रोण, कर्ण, कृष्ण, अर्जुन, धर्म इत्यादिकांसारखीं थोडींच नावें सांपडतात. यानंतर एकाद्या शतकांत एकादा योद्धा, एकादा मुत्सद्दी, एकादा साधु निपजावयाचा व इतरांनीं त्यांच्या कृतींचे पोंवाडे गावयाचे आणि अशा कर्त्या सत्पुरुषाचा लाभ आम्हांस देत जा, ह्मणून परमेश्वराची प्रार्थना करावयाची, असाच क्रम बहुधा आढळतो. मी ज्या गृहस्थाचें चरित्र लिहीत आहे, जो आपल्यापुढें आज मूर्तिमंत आहे, ज्याची बुद्धिमता, कार्यदक्षता, विद्वत्ता, परोपकारबुद्धि, स्वार्थत्यागवृत्ति आणि करारीपणा हीं आपल्या अनुभवास आलीं आहेत, येत आहेत व येतीलही, तो तरी अशाच मानवरत्नांपैकीं एक रत्न आहे; व ह्मणूनच अशाचें चरित्र लिहावयाचें आहे. अशाचें चरित्र सर्वांपुढें आणिल्यास अनेकांस अनेक गोष्टींचा विचार करतां येणार आहे, अनेकांज्वळ बऱ्याच गोष्टींचा संग्रह होणार आहे आणि अनेकांस आपल्या कार्यकर्तृत्वांत या चरित्रांतील बऱ्याच गोष्टीपासून मदत होणार आहे, असें मला वाटतें.

या विषयनायकाचें चरित्र आतांच लिहिण्याचें कारण काय; असा प्रश्न उत्पन्न होण्याचा संभव आहे. तो उत्पन्न होण्यापूर्वींच त्याचें उत्तर देणें मला प्रशस्त दिसतें. तें उत्तर हेंच कीं, आजच्या आमच्या समाजस्थितींत आणि उद्योगांत अद्याप बरीच शिथिलता असल्यामुळें, अल्पायासानें होईल तेवढें काम करावयाचें आणि त्यांसच देशसेवा, स्वभाषेची सेवा आणि स्वराष्ट्राची सेवा कल्पून स्वस्थ बसावयाचे असा प्रघात पडल्यामुळें, इंग्रजी तऱ्हेचीं कपाटें, इंग्रजी वर्तमानपत्रें आणि इंग्रजी ग्रंथकार यांच्या करामतींचे रुपांतरांपेक्षां जास्त मजल मारण्याकडे लोकांचें लक्ष अद्याप जात नाहीं. शिवाजी, बाळाजी विश्वनाथ, बाजीराव, परशुरामभाऊ पटवर्धन, बापू गोखले, लक्ष्मीबाई, अयोद्धेचा नबाब इत्यादि

थोर विभूतींचीं चरित्रें जरी अनेकांनीं लिहिलीं व जरी, अनेकांनीं आप ल्या भाषासौंदर्यानें त्यास मनोहरत्व आणिलें आहे तरी ते इंग्रजांचे बळावर ! हें करण्यास फार श्रम, काळ आणि बुद्धि खर्चावी लागत नाहीं. तेंच अलीकडील पुरुषांच्या चरित्रांसंबंधानें पहा. परशुरामपंत तात्या गडबोले, केरूनाना छत्रे, गणेश वासुदेव जोशी, विष्णुशास्त्री पंडित, कृष्णशास्त्री चिपळूणकर, महादेव बल्लाळ नामजोशी, नारायण बापूजी कानिटकर इत्यादि मंडळींच्या चरित्रांसंबंधानें कोठें अवाक्षर तरी आहे काय ? यांच्यांतील कित्येकांच्या नांवांचा मागमूसही याच पिढींतील लोकांस नसेल ! कित्येकांच्या ग्रंथांची वाण्याच्या दुकानीं वासलाद् लागून गेली असेल ! एखाद्या जुन्या पुस्तकालयाच्या एखाद्या कोपऱ्यांस एखाद्याचा कोलंबस आपल्या जहाजाचें शीड उशास घेऊन स्वस्थ घोरत पडला असल्यास त्याचें भाग्यच समजलें पाहिजे ! अवघ्या पंचवीस तीस वर्षांतील प्रसिद्ध पुरुषांची अशी अवहेलना कां व्हावी ? वर्तमानपत्रांतील मृत्युलेखापेक्षां अधिक योग्यतेचे हे पुरुष नव्हते काय ? यांनीं आपल्या देशाकरितां, आपल्या भाषेकरितां, आणि आपल्या लोकांकरितां कांहींच केलें नाहीं काय ? नाहीं, असें नाहीं. यांनीं त्या त्यावेळच्या परिस्थितीप्रमाणें अनेक उद्योग केले आहेत व ते त्यांचे उद्योग त्यावेळचें सुंदरचित्र दाखविण्यासारखें आहेत. या मंडळींतील कित्येक समकालीन आहेत, कित्येक एकपिढी अगोदर, तर कित्येक एकपिढी मागाहून असे आहेत. कोणी कवितावधूस दृढालिंगन दिलेलें आहे, तर कित्येकांनीं महाराष्ट्रभाषेस सजविली आहे. कोणी वक्तृत्वपटु झाले आहेत, तर कोणी अबलांस सबला करण्याकरितां कंबर बांधिली आहे. कोणी नभोमंडळांतील तारांगणावर आपली नजर कायम केली आहे, तर कोणी भूगर्भांतून रत्नें शोधण्यास सुरुवात केली आहे. कोणी घटोत्कचाच्या मायावी बाजारांत फसणाऱ्यांस मार्गे ओढण्यांत आयुष्य खर्च केलें आहे, तर कोणी आपल्यांतील प्रसिद्ध पुरुषांस रंगभूमीवर आणून

स्वाभिमान उज्वलीत करण्याचा उद्योग केला आहे. अशांचीं चरित्रें म्हणजे गेल्या पन्नास साठ वर्षांचा इतिहास आहे. तीं उपयुक्त होणार नाहींत असें कोण म्हणेल ? असें असतां, अशांचीं चरित्रें झालीं नाहींत. यांच्यांतील कित्येकांचे चिरंजीव आधुनिक विद्वन्मंडळांत आणि समाजसुधारकांत पुढारी असतांही तीं होत नाहींत ! याचें कारण इंग्रजांनीं तीं लिहिलीं नाहींत हें एक, व यांच्या चरित्रासंबंधानें पैसे मिळण्याचा संभव कमी हें भय, हें दुसरें ! रावराजे दिनकरराव यांचें चरित्र व्हावें आणि बाळाजीपंत दादा नातूंचें चरित्र कां होऊं नये ? बाळाजीपंत दादांचें चरित्र रावराजांपेक्षां कमी योग्यतेचें, नीरस, टाकाऊ, अगदीं चिळीस उत्पन्न करण्यासारखें होईल काय ! नाहीं, खचित नाहीं. एका राष्ट्राचा ऱ्हास आणि दुसऱ्याचा उदय होण्याच्या प्रसंगीं समाजांतील ज्ञाते पुरुष कसें वर्तन करतांत, याचें उत्कृष्ठ चित्र बाळाजीपंत दादांचें चरित्रांतच दिसणार आहे. असा च निरुत्साही प्रकार आपल्या चरित्रनायकाचे नशिबीं येण्याचा संभव आहे, म्हणून मी हा प्रयत्न करीत आहे.दुसरें,आमचा चरित्रनायक माझ्या समजुतीनें मोठा योद्धा आहे.हा जसा समाजयोद्धा आहे,तसाच राजयोद्धा आहे.राजा आणि समाज या दोघांबरोबर झगडून दोघांसही एका सूत्रांत ओढणारे पुरुष क्वचित् अथवा एकरकटेच असल्यामुळें, त्यास जसें मित्र पुष्कळ असतात तसेच शत्रूही पण पुष्कळ असतात. अशा मित्र-शत्रूंपुढें सूर्य व जयद्रथाप्रमाणें यांचें चरित्र आणिल्यास त्याची सुंदर निवड होण्यास जसी संधी सांपडते, तसी नंतर सांपडत नाहीं. छानून काढणारा झाऱ्या चांगला असल्यास तो सारे गदळ बाजूस काढून जशी चोख निवड करील व त्या निवडीनें जसें चरित्र बनवील,तसें यांचे पश्चात् लिहिलेल्या चरित्रांत करतां येणार नाहीं, म्हणून मी हें चरित्र लिहिण्यास आतांच प्रारंभ केला आहे. तिसरें अशा महात्म्याच्या चरित्रांत गोवून टाकण्यासारखें लहान-मोठे प्रसंग अनेक असतात व त्यांतील कित्येक यांच्या कांहीं संवग-

ड्यांस माहित असतात परंतु ते त्यांस प्रसंगानुसार स्मरतात अथवा अंशतः नष्टही होऊन जातात. जोंपर्यंत अशा सुंदर प्रसंगांचा सांठा सांठविण्याचीं साधनें तयार आहेत, तोंपर्यंत अशांचें चरित्र तयार झालें तर तें प्रथम अर्धेंवोबडें असलें, तरी त्यांत भर पडण्याचा आणि फिरून तें अधिक चांगलें होण्याचा संभव असतो. हे व आणखी कांहीं विचार मनांत आणून मी यांचे चरित्रास सुरवात करतों. यास परमेश्वर साह्य करो.

# पूर्वजवृत्त

पानपतच्या रणमैदानावर पाडलेल्या रक्ताची शिलकबाकी शत्रूच्या रक्तप्राशनानें पुरी करून व महाराष्ट्रीय घोड्यास अटकेचें पाणी पाजून, रघुनाथराव मराठ्यांची भरारी परत महाराष्ट्रांत आली. बाळाजी बाजीराव पर्वतीवर आणि माधवराव थेऊरास कलेवरें टेऊन ईशरूपांत मग्न झाले, तेव्हांच स्वराज्यरूपी सूर्य पूर्वदिशा सोडून पश्चिमेकडे वळावयास लागला होता. राघोबा दादा जितके शूर तितकेच विरुद्ध मुत्सद्दी अथवा धोरणी असल्यामुळें त्यांच्या हातून पुतण्याचा खून झाला. हा खून महाराष्ट्रराज्यरूपी सूर्यास खग्रास ग्रहणाप्रमाणें झाला, तरी तो इंग्रजांच्या पथ्यावर पडला होता, कारण राघोबांचें बिऱ्हाड बिनबोलतां इंग्रजांच्या गृहांत आलें. इकडे असा गृहकलह सुरू झाला आणि तिकडे खिजमतगारांचे सरदार बनविलेले शिंदे, होळकर, आपापला घोडा स्वतंत्र करण्याच्या हेतूनें, आपल्या हुतुतूच्या कलाटण्या कधीं पुण्याकडे, कधीं दिल्लीकडे, तर कधीं इंग्रजांकडे देऊन, आपला डाव जिंकूं लागले होते. फडणीसासारखा जबरा व संदा मुत्सद्दी पुढें सरून व स्वराज्यभक्ति व्यक्त करण्याच्या इराद्यानें सर्वांस दाबून धरून, सवाई माधवरावांच्या नांवानें पेशवाईचा गाडा चालवूं लागला. याचवेळीं इंग्रजांकडील तागडीतुकापा बाजूस होऊन वॉर्न होस्टिंग्जसारखे

दैवशाली पुढें सरले होते. त्यांनीं सुजाउद्दवल्यासारख्या अयोध्येच्या नबाबास मुठींत धरलें, दिल्लीपतीची किल्ली हातीं घेऊन त्यास आपले बिल्ली करून सोडिलें, शिंदे होळकरास चुचकारून चुचकारून आपले दोस्तींत आणण्याचा घाट घातला, आणि याच गर्दींत प्लॉसीचे लढाईनंतर हिंदुस्थानच्या राज्यलक्ष्मीलाही पश्चिमाभिमुख केलें ती अद्याप तिकडेंच वहात आहे.

असो; अशा भानगडीचे काळांत ह्मणजे सन १७७८ त सवाई माधवराव गर्भाशयांतून निघून खेळण्यांत आले आणि आमच्या चरित्र नायकाचे पणजोबा मात्रोदरांतून निघून पाळण्यांत आले. सवाईमाधवराव पुण्यांत खेळूं लागले आणि हे रत्नागिरी जिल्ह्या पैकीं दापोली तालुक्यांतील चिखल गांवीं जन्मून तेथेंच बोलूं लागले. यांचें नांव **केशव** असें होतें. हे या गांवचे खोत असल्यामुळें एक प्रकारचे मर्यादित राजेच होते, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. याच खोतांच्या त्यावेळच्या हक्कांशीं प्रस्तुतच्या हक्कांची तुलना केली असतां, राजा आणि गुलाम यांतील अंतराइतकें व यांतील अंतरासारखें अंतर दिसणार आहे. हें असामान्य अंतर आपपरभावामुळें पडलें आहे हें सांगणें नको. या अंतरामुळेंच त्यावेळच्या खोतांस राज्यस्तंभ ह्मणत असत. हल्लीं एकच विद्या सजीव असून तीच आमच्या जीवितसंरक्षणाचें साधन झाली आहे. ती विद्याही पण आमची स्वतःची नाहीं. सातासमुद्रापलीकडून आणून ती आमच्या राज्यकर्त्यांनीं आम्हांस दिली आहे. **केशवरावजी**चे वेळेस स्वराज्य असल्यामुळें व तेंही पण एकछत्री व गाढ शांततेचें नसल्यामुळें,त्यावेळीं स्वसंरक्षणार्थ चार पांच विद्या संपादन कराव्या लागत असत. लिहितां वाचतां येणें, घोड्यावर बसतां येणें, निशाण मारतां येणें, पोहतां येणें, आणि स्वयंपाक करतां येणें या स्वसंरक्षणाच्या विद्या ज्यानें संपादन केल्या तो कोठें व केव्हांही उपाशी मरावयाचा नाहीं असा अनुभव असल्यामुळें, या संपादन करण्याकडे त्यावेळीं पुष्कळांचा कल असे. हल्लीं

लिहिण्यावाचण्याचा गजगाजला आहे, आगगाड्यांचा घडघडाट चालल्या असून रस्ते सफा झाले आहेत. व संरक्षणाचा मक्ता सरकारनें आपण होऊनच घेतला असून त्यासंबंधाचा मंत्र पिनलकोडांत भरून तें भारून टाकलें आहे ! मग आम्हांला निशाण पाहिजे कशाला ? मोठमोठ्या नद्या पुलांच्या पोटांत साठविल्या आहेत व ज्या कांहीं थोड्या उघड्या आहेत त्यांवर नावांचा नाच चालू ठेविला आहे ! त्यांतूनही एखादे रावसाहेबांस प्रसंग आल्यास खुर्चीवर तंगड्या पसरून बसण्याची सोय होण्यास नड नाहीं ! मग पोहतां येणें हवें कशास ? जागोजाग खानावळी, हॉटेलें व दुकानें मांडलीं असून तीं सदा खुलीं असतात ! मग स्वयंपाकांत हात भाजून घेण्याचें तरी कारण काय ? अशीं सुखोपभोगाचीं आणि विलासांचीं साधनें एका पैशाशिवाय तयार असल्यामुळें, स्वसंरक्षण करणाऱ्या साधनांची हल्लीं गरज उरली नाहीं. पूर्वीच्या लोकांस मध्यान्हकाळ साधण्यास हीं साधनें संपादावीं लागत. हल्लीं तीं तयार आहेत, पण तीं मिळविण्याचें साधन मात्र नाहींसें झालें आहे. इतकाच काय तो फरक ! असो, **केशवराव** टांकाचे खंबीर, घोड्यावर बसण्यांत वस्ताद, निशाण मारण्यांत पटाईत, पोहण्यांत सराईत आणि स्वयंपाकांत तरबेज असल्यामुळें ते घरांत बसून राहिले नाहींत. त्यांनीं स्वराज्यधोरण बांधून आपल्या पराक्रमानें अंजनवेलची मामलत मिळविली.

**रक्षणीयं यशः कामं धिग्धनं यशसा विना ।**
**सर्वस्वं रघुणा पूर्वं दत्तं विप्राय कीर्तये ।**

हे कश्यप ब्राह्मणाचें वाक्य या वेळच्या अनेक ब्राम्हणांत जागरुक असल्यामुळें, त्यांच्यांत एक प्रकारचा जोम आणि करारीपणा असे. **केशवरावजींत**ही तो होता असें दिसतें. कारण ज्या वेळीं महाराष्ट्रावर कालचक्र फिरून तें राष्ट्र रसातळास मिळालें, तेव्हां **केशवराव** अंजनवेलच्या मामलतीवरच होते. हे जसे कलमबहाद्दर होते तसेच तलवारबहाद्दरही असत. हे

हजर जबाबी असत तसेच मुत्सद्दीही असत. यामुळें यत्चें वजन राजदरबारीं व लोकांवर सारखेंच असें. हें पाहून हीच मामलत इंग्रजांचे वतीनें त्यांनीं चालवावी असें कुंपिणी सरकारचे कामगार म्हणत होते. परंतु चाकरी करावयाची, तर स्वराजाची करावयाची, परकीय राजाची करावयाची नाहीं असें स्पष्ट सांगून, **केशवराव** घरीं आले आणि स्नानसंध्या करीत बसले, पुढें नातवानी आली तरी पुन्हां नोकरीकडे वळले नाहींत. यांना नातवानी येण्यास कारण यांचें अधिक औदार्य व संसारांतील गोंधळ हींच होत. या दोन गुणांचा फायदा भाऊबंदांनीं घेतला आणि हे तसेच राहिले असें असतांही त्याची परवा न करतां यांनीं वरीलप्रमाणें रोकडा जबाब दिला. हा स्वत्वाचा झरा आटला नाहीं. पण मध्यें खोळ पडून पुढें एकदम वाढला गेला असें पुढें दिसून येईल.

**केशवरावजीस** दोन कुटुंबें होतीं. यांतील पहिल्या कुटुंबाचें नांव **रुक्मिणीबाई** आणि दुसऱ्या कुटुंबाचें नांव **दुर्गाबाई. रुक्मिणीबाई** या फार साध्या भोळ्या असत. यांना " मामलेदारीण " ही किताबत मिळाली; पण ती भोगण्यास सांपडलें नाहीं. शके १७२४ अथवा सन १८०२ यावर्षी यांचे कुशीं **रामचंद्र** जन्मास आले. पण **रामचंद्रांचा** उदय यांच्यानें करवला नाहीं. यांच्या पाठीवर **काशीनाथ** नांवाचा मुलगा झाला आणि थोड्याच दिवसांनीं **रुक्मिणीबाईनीं** इहलोकचा संसार सोडून दिला. **दुर्गाबाई** जरी स्वभावाच्या चांगल्या आणि कर्त्या स्त्रियांपैकीं एक होत्या, तथापि रक्तमांसाचा संबंध नसल्यामुळें **रामचंद्रपंतांची** आबाळच झाली. पुरुषांची मुलांवर कितीही नजर असली,तरी त्यांच्यानें स्त्रियांइतकें व सारखें त्यांचें जोपासन होत नाहीं. यामुळें मुलांस ज्याप्रकारचें वळण लागलें पाहिजे त्याप्रकारचें वळण लागणें कठीण पडतें. मातेनें मारिलें, तिखट भाकरी खावयास दिली, आणि जमिनीवर निजविलें, तरी त्याबद्दल कोणास कांहीं


वाटावयाचें नाहीं. तेंच सापत्न मातेनें किती जरी कौतुक केलें, सुग्रास खावयास दिलें आणि मऊ बिछान्यावर निजविलें, तरी सापत्नभाव हा क्षुल्लक कृतींतही लोकोपवादाचा नमुना दिल्या-खेरीज सोडावयाचा नाहीं. त्यांतून सापत्न मातेची ओढ आपल्या संततीकडे ओढण्यास सुरुवात झाली, म्हणजे सख्खे व सावत्र यांतील अंतर स्पष्ट झाल्याखेरीज रहावयाचें नाहीं. याला अपवाद असेल, पण तो अपवादच.

हाच प्रकार **रामचंद्ररावजींचे** संबंधानेंही घडला. **रामचंद्ररावजींची** वाढ आणि पेशवाईचा क्षय ही बरोबरच वाढत चालली. **शिंद्यांचा** आणि **नानाफडणीसांचा** द्वेष पुरा होऊन **नानांनीं** इहलोकचा कारभार आटोंपून परलोक स्वीका-रिला, **रावबाजीच्या** अनिश्चित कारभारास स्फुरण चढलें, इंग्रजाकडील लॉर्ड **एलफिंस्टन** व त्यांच्यासारख्या दीर्घदृष्टि मुत्सद्यांस फावलें, पेंढाऱ्यांचे दंगे सुरू झाले, व दरोडेखोरांच्या टोळ्या जशा देशावर तशा कोंकणांतही धुडकूस घालूं लागल्या. **रावबाजीच्या** आणि **इंग्रजांच्या** तहनाम्यांत प्रांतचे प्रांत खमास होत चालले, **रायबाजी** आणि **इंग्रज** यांची पळपकड सुरू होण्यापूर्वीं पुणें दरबारांत स्त्रीराज्य अथवा चंगीभंगी लोकांचें प्राबल्य होऊन, कामगार लोकांची दाद मागण्याची मुष्किल झाली. त्यांतच **केशवरावजींची** मामलत असल्यामुळें त्यांचें मन तिकडेंच गढून गेलें व त्यांस **रामचंद्रपंताकडे** लक्ष देण्यास फारशी संधी सांपडली नाहीं. दुसरें, **दुर्गाबाईसही** **महादेव** नांवाचें पुत्ररत्न झाल्यामुळें, त्यांचें लक्ष्य तिकडे वेधलें. या दोन कारणांनीं **रामचंद्रपंताच्या** बुद्धिमतेचा व्यय झाला नाहीं व त्यास उर्जितावस्थाही प्राप्त झाली नाहीं.

**रामचंद्रपंतांचें** लग्न लहानपणीं केलें असल्यामुळें, त्यांस आपल्या संसाराचें जूं मानेवर घेणें भाग पडलें. ज्या वेळीं यांचेमागें संसार लागला, त्याचवेळीं महाराष्ट्र पूर्ण खमास होऊन

इंग्रजी अपक्यास सुरुवात झाली होती. वडील **केशवरावजी** घरीं येऊन ब्रह्मकर्मास लागले आणि **इंग्रजांची** शंकूसांखळी शेतकऱ्यांच्या शेतांत आली. त्यावेळीं मोजणीस लोक पाहिजे होते व अशा मोजणीवाल्यांस विशेष ज्ञानाची अथवा कुशाग्र-बुद्धीची गरज नव्हती. साधारण ज्ञानावर भागत असे. याचा फायदा **रामचंद्ररावजींनीं** घेतला.

**रामचंद्रराव** पैमाषी खात्यांत शिरलें यास फार महिने लोटले नाहींत तोंच त्यांस पुत्र झाला. त्या पुत्राचा जन्म शके १७४२ श्रावण शुद्ध ५ इंदुवासरे, घ. १४ प. ३८ चित्रा नक्षत्र घ. ४६।७ सूर्योदयांत घ. ४६।१० अथवा ता. १३ आगष्ट सन १८२० रोजीं झाला. त्याचें नांव **गंगाधर** असें ठेविलें. या **गंगाधराची** कुंडली मला मिळाली आहे ती ही.




या कुंडलींतील ग्रहांपैकीं कोणता ग्रह **गंगाधरपंताच्या** स्वाभावाच्या,बुद्धिमतेच्या,कर्तृत्वशक्तीच्या कोणत्या स्थानीं वसतो,तें ज्योतिषांनीं पहावें. **रामचंद्रपंत** अगोदर बरेंच स्वछंदवृत्तीचे, त्यांतून सदोदित फिरण्याचें काम मिळाल्यामुळें **गंगाधराची** सर्व सुश्रूषा त्यांची स्त्री **रमाबाई** यांचेकडेसच असे.तरी **गंगाधरास** आजोबाचा लळा बराच असल्यामुळें त्यांच्या बरोबर साथ देतां देतां कांहीं स्तोत्रें तोंडपाठ व कांहीं कानपाठ झाली होतीं व श्लोकहीं

बरेच येऊं लागले होते. याच सुमारास इंग्रजी व मराठी शाळांचा आखाडा बराच मोठा मांडण्याचा झपाटा चालू होता. हिंदुस्थानचे लोकांस शिक्षण द्यावें अथवा आहेत असेच आळणी उकडांबे ठेवावेत ? हा प्रश्न इंग्रज मुत्सद्यांचे खलांत असून, देशी भाषांतच त्यास शिक्षण द्यावें असें ह्मणणारे, शिक्षण द्यावें ह्मणणाऱ्या पक्षांत होते. इंग्रजी भाषेचें शिक्षण दिल्याखेरीज आपला कळप माजणार नाहीं या अंतस्थ हेतूनें मिशनरी मंडळी इंग्रजी द्वारा आम्हांस सर्व शिकवावें असें प्रतिपादन करीत असे. लार्ड मेकॉले साहेबांनीं तर शिक्षणासंबंधानें कंकणच बांधिलें होतें, यामुळें शाळा झपाट्यानें वाढत असत. हा झपाटा यांच्या चिखल गांवापर्यंत जरी आला नव्हता, तरी दाभोळापर्यंत आला होता. घरांत असतां लांकडी पाटी, शाडूची माती, विटकरीची धूळ आणि कामटीची लेखणी अथवा शाळूंखीच्या कांड्याची लेखणी घेऊन, धुळाक्षर, बाराखड्या, उजळणी, तोंडचे हिशेब, मोडीअक्षर, तिथी, वार, नक्षत्रें, महिने वगैरे तयार झाली. बिचवा लेखणी ( ज्या कामटीचे लेखणीचा टांक लांब करीत असत ती ) हातीं धरण्याचें कारण पडेनासें झालें. तेव्हां गंगाधरपंतांनीं घर सोडून, ते दाभोळास आले. यावेळीं पुणें मुंबईकडे शिक्षणाच्या संबंधानें मोठी चळवळ चालली होती. मोठमोठे बक्षीससमारंभ होत असत व विद्यार्थ्यांस पागोटीं, धोतरजोडे बक्षीस मिळत. साहेबलोकांचीं गोडगोड भाषणें चालत व त्यांचे ध्वनी कर्णोपकर्णी पसरत असत. यामुळें कोंकणांतून पुष्कळ विद्यार्थी विद्याभ्यासार्थ बाहेर पडत. हें पाहूनच **गंगाधरपंत** प्रथम दाभोळास आले. याच सुमारास अथवा आठचार महिन्याच्या आगेमागें ह्मणजे शके १७५७ च्या वैशाख अथवा १८३५ च्या मे महिन्यांत, यांस दुसरें भावंड झालें. त्याचें नांव **गोविंद** असें ठेविलें. पुत्र **गोविंद** माता **रमाबाईस** आनंदवीत आहे व आपण विद्यादेवीचे मंदिरांत प्रवेश केला असून तिला आळवित आहों, याचें **गंगाधरपंतास** समाधान

वाटे. यावेळचे अभ्यासांत गणित, व्याकरण आणि मोडी बालबोध अक्षर हे प्रधान विषय असल्यामुळें, सर्वांचाच कल तिकडे असे व तोच अभ्यास अधिक चाले.

वाटसरूंच्या गोष्टी, मराठी शाळा आणि पंतोजी, लिपीधारा, शाळापद्धति, उपयोगी ज्ञान, मुलांसाठीं लहान धडे वगैरे पुस्तकें नुकतींच बाहेर पडून, त्यांच्या दोन तीन प्रती प्रत्येक सरकारी आणि मोठमोठ्या गांवठी शाळेंतही पाठवित असत. त्याप्रमाणें **गंगाधरपंत** ज्या शाळेंत अभ्यास करीत असत, त्या शाळेंतही त्या आल्या होत्या. त्यावेळीं अभ्यासाकरितां स्वतन्त्र पुस्तकें तयार नव्हतीं आणि ठरलींही नव्हतीं. तथापि वरील प्रकारची नजर सरकारांतून आल्याचा मोठा अभिमान मास्तर लोकांस वाटत असे. **गंगाधरपंत** नेहमीं ह्मणत असत कीं, "छडीलागे छं छं, विद्या येई घं घं" ही म्हण शिक्षकांस मोठ्या भूषणाची वाटत असल्यामुळें ते क्षुल्लक बाबतींतही वेताच्या छड्यांनीं मारीत असत. उठबस करविणें, अंगठे धरविणें, खर्डे लिहितांना जरा वरमान केल्यास मानेवर गुंज अथवा खडा ठेवणें, कोलदांडा घालणें, भिंतीवरोंवर खुर्ची देणें, घोडीवर टांगणें, पाणमुत्री मारणें या शिक्षा शाळांतून सुरू नाहींत अशा शाळा अपवादादाखल असल्यास न जाणो. मी कांहीं दिवस म्हालचाट्या ( उपशिक्षक पण फुकटचा ) होतो. तथापि " शिष्यापराधे गुरोर्दंडः " हा न्याय मला सोसावा लागे. सकाळीं अथवा दोनप्रहरीं शाळा उघडून केर काढण्याचें काम पहिला विद्यार्थी करी. तथापि प्रथम कोण आला, नंतर कोण आला हे सुट्टीच्यावेळीं लक्षांत रहाण्याकरितां विद्यार्थ्यांचे हाताचे मनगटावर शाईनें एक, दोन, तीन असें अंक घालावयाचें, मुख्य गुरूजीस येण्यास अवकाश असल्यास, सकाळीं भूपाळ्या आणि दोन प्रहरीं कांहीं तरी श्लोक सांगण्यास सुरवात करावयाची, आणि गुरूजी आल्यानंतर ते सांगतील तितक्या विद्यार्थ्यांस धडे द्यावयाचे, परवचा घ्यावयाचा अथवा तोंडिहिशेब किंवा उजळणी विचाराव-

याची इत्यादि कामें महालाचाऱ्याकडे असत. ” हातावरील आंकड्या इतक्या छड्यांपासून कोलदांड्यापर्यंत पूर्वी शिक्षा मिळत असतांही गुरुशिष्यांतील प्रेमभाव जसा स्पष्ट दिसत असे तसा प्रेमभाव हल्लीं या शिक्षा रद्द झाल्या आहेत तरी दिसत नाहीं. तेव्हां आमच्या रामभाऊच्या छडींत आणि घोडींतच असें कांहीं विलक्षण प्रेम असें कीं, तें अद्याप ( रत्नागिरीस मास्तर असतां ) ही कमी होत नाहीं असें म्हणावें लागतें ? असो. अभ्यासाचा बराचभाग **दाभोळचे** शाळेंत संपादन करून अधिक अभ्यासाकरितां **गंगाधरपंत** पुण्यास आले. हौस व हौसेचीं साधनें सारखीं अनुकूल असलीं आणि त्यापासून एकादें कार्य झालें तर कोणास आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं; पण हौस उमेदीस येत आहे आणि तिचे मदतगार पाय गाळूं लागले आहेत इतकेंच नाहीं, तर त्या उमेदीचे पाय मोडण्यास लागले आहेत असें जेव्हां होतें तेव्हां अशास झुगारून देऊन जो पुढें सरून आपलें कार्य साधतो तोच खरा कर्ता समजला पाहिजे. हीच स्थिति **गंगाधरपंताची** होती. ज्ञानसंपादनाच्या यांच्या हौसेस वडिलांकडून मदत होण्याची फारशी आशा नव्हती व आजोबाकडूनही नव्हती. असें असतां हे हिय्या करून पुण्यास आले, तेव्हां **केशवराव भवाळकराची** शाळा विशेष भरभराटींत होती. त्या शाळेंत हे अभ्यासास गेले. तेथें अभ्यासक्रम चालून फार दिवस लोटले नाहींत तोंच म्हणजे शके १७५९ अथवा सन १८३७ सालीं मातोश्री **रमाबाई** नाशकास जात असतां मार्गांतच महामारीचे हल्ल्यांत सांपडून परलोकवासी झाली ! कुटुंबाच्या अकालीं मरणामुळें आणि पुत्र **गंगाधर** व **गोविंद**, आणि कन्या **द्वारका** यांच्या अल्पवयामुळें **रामचंद्ररावाची** एककल्ली वृत्ति अधिकच बावरून गेली. त्यांनीं आपलें अपत्याचें कसें होईल, काय होईल याची फिकिर न करतां आपल्या पेशाच्यांचे पत्त्यावर चित्रकोटचा रस्ता सुधारला. तेव्हां अर्थातच **गंगाधरपं-**

लागून इंग्रजीवरची उडी मागें घेऊन तत्कालिक सोईवर उडी मारावी लागली. सरकारास यावेळीं शिक्षकांची जरूर होती आणि गंगाधरपंतांस निर्वाहाची गरज होती. या दोन्ही गरजा भागण्यापुरतें सामर्थ्य आहे असें उभयतांसही वाटल्यावर सरकारनें त्यांना माळवणास शिक्षकाचे कामगिरीवर पाठविलें आणि हेही पण शिष्यांचे गुरु झाले.

स्वतःचा अभ्यास चालू असतां ज्या अडचणी वाटतात त्यापेक्षां तो दुसऱ्याकडून करवितांना निराळ्या रीतीनें अनुभवास येतात. हा अनुभव गंगाधरपंतांस जास्त येऊं लागला आणि त्या अडचणी काढवतील तितक्या काढण्याचा ते प्रयत्न करूं लागले. निर्वाहाची सोय हीच जन्म सार्थकता असें ज्यास वाटतें त्याचे हातून कोणतेंही अधिक कार्य होत नाहीं. त्याप्रमाणें गंगाधरपंतांस वाटत असो अथवा मिळालेल्या शिक्षगिरीच्या उत्पन्नांत प्रपंच भागावयाचा नाहीं तेव्हां आपणांस अधिक उद्योग केला पाहिजे असें वाटत असो, त्यांनीं स्वार्थ आणि परमार्थ साधण्यासारखा अभ्यास करण्यास सुरुवात केली. संस्कृत भाषेचा अभ्यास वाढविला, कविता करण्यासही प्रारंभ केला, व्याकरण आणि गणीत हीं वाढविण्यास सुरुवात केली. ती इतकी कीं, थोडेच दिवसांत त्यांनीं एक लघु व्याकरण तयार करून मुलांस पढविण्यास सुरुवात केली. गंगाधर शास्त्री जांभेकर व दादोबा पांडुरंग यांचीं व्याकरणें राजाश्रयांत असतांही यांच्या व्याकरणाच्या आवृत्ति यांच्या पश्चात् ( सन १८७७ सालपर्यंत ) निघत असून त्यांचा खपही होत असे हेंच त्याच्या चांगुलपणाचें दर्शक आहे. आज जरी अनेक व्याकरणें, अनेक नांवांनीं, अनेक इयत्तेंतील विद्यार्थ्यांकरितां तयार होत आहेत तथापि या भाराभर व्याकरणांपेक्षां या एकाच व्याकरणांत अधिक सुलभता व ग्राहकता आहे असें ह्मटल्यास मिथ्या स्तुति होणार नाहीं. गंगाधरपंतांनीं आपलें लघु व्याकरणावर दोन आर्या व एक श्लोक करून घातला आहे

( या कविता त्यांनीं केलेल्या नसून त्यांच्या एका स्नेह्यानें केल्या आहेत असें कोणी ह्मणतात पण त्यांची विद्वत्ता दर्शविणारें व्याकरण व मानी स्वभाव आपले कृतींत दुसऱ्याची उसनवार येऊं देईल असें ह्मणता येत नाहीं, असें मला वाटत असल्यावरून मी त्या कविता त्यांच्याच आहेत असें म्हणतों ) व एक लघु प्रस्तावनाही लिहिली आहे. ती जशीच्या तशीच खालीं देतो, ह्मणजे **गंगाधरपंतांची** कविताशक्ति आणि भाषापद्धति वाचकांच्या लक्षांत येईल.

## आर्या.

**व्याकरण थोर पाहूं जातां होतील फार आयास ॥**
**धनही लागेल बहुत, तैसा अभ्यास बहु करायास १**
**ह्यास्तव संक्षेपें हें, कथिलें व्याकरण लोकहित व्हाया ॥**
**थोड्या धनें श्रमानें, होईलचि योग्य तेंच फल द्याया २**

## श्लोक.

**भाषाख्य सिंधूंतिल शब्द रत्नें, लोकोपकारास्तव फार यत्नें ।**
**घेऊन गंगाधर बालकांसी, देतो अशा सुंदर भूषणांसी ॥ १ ॥**

या कविता मराठी शाळेंतील विद्यार्थ्यांस पाठ असत व शनिवारीं सुटीचे पूर्वी कविता ह्मणण्याचा सांप्रदाय असे तेव्हांही कोणी विद्यार्थी या ह्मणत असत. फार तर काय, पण यांतील पहिली आर्या शाळेंत जाणारे लहान विद्यार्थी, मोठमोठ्या भोजनसमारंभांचे पंक्तींत ह्मणत असत हें मला चांगलें स्मरतें. या व्याकरणावर परशुरामपंततात्या गोडबोल्यांचाही चांगला अभिप्राय असल्यामुळें मेजरक्यांडी साहेबांनीं यास आश्रय दिला होता.

# प्रस्तावना.

" व्याकरणाचा उपयोग सर्व मनुष्यांस आहे. स्वभाषेचें व्याकरण शिकल्यापासून आपल्या भाषेचें ज्ञान चांगलें होतें, आणि शुद्ध कोणतें व अशुद्ध कोणतें हें समजतें इतकेंच नव्हे, तर कोणतीही परभाषा शिकणें सुलभ पडतें. ह्याजकरितां स्वभाषेच्या व्याकरणाचें ज्ञान करून घेणें हें सर्वांस योग्य आहे.

" सांप्रत थोडक्यांत व्याकरणाच्या मूळतत्वांचें ज्ञान होण्या सारखें बालव्याकरणाचें पुस्तक आहे; परंतु तें शिकल्यानें सर्वत्र निर्वाह होत नाहीं. ह्याकरितां गंगाधरशास्त्री, दादोबा, ह्यांच्या व्याकरणांतील कांहीं विषय पहावे, तर ते मोठ्या प्रौढ संस्कृत शब्दांनीं भरलेले असून फारच विस्तृत आहेत; ह्यामुळें शिकणारांच्या बुद्धीस समजत नाहींत व स्मरणांत ही राहत नाहींत; म्हणून ग्रंथावरून व्याकरण करण्यास अडचण न पडण्यासारखें लहानसें व्याकरण असावें अशी बहुतांची इच्छा पाहून हें पुस्तक केलें आहे. ह्याच्या जसजशा आवृत्ति खपत जातील तसतशी ह्याची अधिक अधिक सुधारणा होत जाईल. "

" हें पुस्तक व्याकरण शिकणाऱ्या बालकांचे पुष्कळ श्रम कमी होण्यास उपयोगीं पडावें, अशी जगन्नियंत्या परमेश्वराजवळ ग्रंथकर्त्यांची प्रार्थना आहे; ती त्यानें आशिर्वाद देऊन सिद्धीस नेल्याचें ग्रंथकर्ता श्रवण करील, तर त्याच्या सर्व श्रमांचा परिहार होईल. "

या प्रस्तावनेंत लिहिलेल्या कारणांचा अनुभव घेतलेले लोक अद्याप थोडे तरी आहेत व त्यास हीं कारणें बरोबर पटतील असें स्वानुभवावरूनही ह्मणण्यास हरकत नाहीं. असो. बालमित्र, वाचन पाठमाला, लघुहितोपदेश इत्यादि पुस्तकांची भाषा जशी साधी होती तशीच यांची लेखनशैलीही साधी व सरळ असे, असें वरील प्रस्तावनेवरून दिसतें. हे संस्कृतांत जसे निष्णात होते तसेंच गणितांतही पटाईत असत. स्वतः पटाईत असणें आणि तें दुसऱ्याचे मनांत उतरून देणें यांत अंतर आहे. तें अंतर त्यांनीं

काढून टाकल्याची प्रसिद्धि आहे. हे मालवणास असतां स्वतः विद्याव्यसनी बनल्यामुळें यांच्या घरीं दारीं शिष्य पसरले नव्हते; पण मालवणाहून चिपळूणास गेल्यानंतर यांचा शिष्यपरिवार वाढत चालला. तसाच घरप्रपंचही वाढत चालला. यांचें लग्न होऊन सरळ, सालस, पतीचे बोलास तोल देणारी आणि नजरेवर कदर ठेवणारी **पार्वतीबाई** संसारास लागली. सन १८४६ सालीं यांस कन्या झाली तिचें नांव **काशी*** असें ठेविलें. हे स्वभावतः ममताळू असत. त्यांतून परोपकारबुद्धि हा नैसर्गिक गुण त्यांच्या अंगीं असल्यामुळें पुष्कळ शिष्य त्यांच्याजवळ सदोदित असत. केव्हां केव्हां कांहीं शिष्यांचा खर्चही हे चालवीत असत. ही वेळ गुरूशिष्यांचे टाकभाड्याची होती तरी भाडोत्री प्रकारास प्रारंभच असल्यामुळें आणि खुळ्या स्वतंत्रतेचें बीजारोपण इतकें अनावर झालें नसल्यामुळें शिष्यावर गुरूप्रेम व गुरुच्या ठिकाणीं शिष्याची सादरभक्ति पूर्वसांप्रदायाप्रमाणेंच असे. आपला शिष्य चांगला व्हावा अशी सदिच्छा गुरूची व मी अमक्याचा शिष्य आहे हा अहंभाव शिष्याचे ठिकाणीं असे, ह्मणून त्यावेळीं अनेक चिपळूणकर उदयास आले.

हे मालवणास असतां यांना अवघे १० रुपये मिळत असत; तथापी पंचीस चारसाहा विद्यार्थी व एकाददुसरा पाहुणा असेच. त्यांना त्याची खातरीही वाटत नसे. याचें कारण त्यावेळीं इंग्रजी व्यापाऱ्यांचे प्रस्थ हल्लींप्रमाणें माजलें नव्हतें, व प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष करही नव्हते. यामुळें एक रुपयास बारा पायली ते मण-

---

***टिप**—बळवंतरावांचें जन्मवृत्त, बाळबाळंतिणीची स्थिति व यांच्या बाललीला यांनींच सांगितल्या. काशी बाईचें यांच्यावर अतिप्रेम असे. ता. २१ जून १९०२ इसवी रोजीं या परलोकवासी झाल्यामुळें त्यांची भाऊबीज संपली. आज मामाच्या व्यवहाराचा भार वाहून त्यास यथेच्छ रीतीनें राष्ट्रहित करण्यास मोकळेपणा देणारा धोंडोपंत विध्वंस हा याच काशीबाईचा पुत्र होय.

भर तांदूळ मिळत असत. आठ आण्यांचें मीठ घेतलें तरी त्यांचे घरचा रामरगडा त्यांत भागे. हे चिपळूणास १५ रुपयावर आले तों शिष्यवर्ग आणि पाहुणचारही वाढला. यांच्या घरीं आल्यागे-ल्याचा हिशेब नसे व भोजनाचें खरें फल भोजनदक्षिणेखेरीज नाहीं. असा यांचे तीर्थरूपांचा दृढसमज असे, ह्मणून त्यांनीं तो सुरू केला. तेव्हां असें दिसून आलें कीं, दीड वर्षांत सहस्रभोजन झालें. अनायासें भोजन होत आहे तर एका दक्षिणेच्या पैशानेंच काय कमी पडणार आहे? तर तो देऊन पुण्य पदरीं घे. असें **रामचंद्रपंतांनीं** सांगितल्यापासून **गंगाधरपंतांनीं** तोच परिपाठ चालू ठेविला.

हे चिपळूणास फार दिवस राहिले नाहींत. लौकरच तेथून बदलून रत्नागिरीस २५ रुपयावर आले. तथापि त्यांनीं आपल्या कर्तव्यापेक्षां किती तरी अधिकपट विद्यालूट वाटलें असल्यामुळें त्यांच्या सालस वर्तनाची, निर्मळ मनाची, व सोत्कंठ परोपकार-बुद्धीची कीर्ति अद्याप कमी झाली नव्हती. याचा अनुभव मला व माझे स्नेह्यांनीं सन १८८३ सालींही आला आहे. **गंगाधरपंत** रत्नागिरीस गेले तेव्हां त्यांचें गणित शून्यलब्धीपर्यंत तयार होतें. या वेळीं महाराष्ट्रभाषा जरी च्युत झाली नव्हती तरी इंग्रजी भाषे-ला जोराची मदत होती. ज्यास इंग्रजी भाषा संपादन करण्याचीं साधनें मिळालीं, ते पुढें सरसावण्यास अवकाश लागत नसे. **भास्करभाऊ पाळंदे, गोपाळराव हरी, केरूनाना** इत्यादि मंडळीस तीं साधनें होतीं आणि **गंगाधरपंतास** तीं नव्हतीं ह्मणून **गंगाधरपंत** हे वैभवानें त्यांच्या मालिकेंत आले नाहींत इतकेंच काय तें. बाकी ज्या विषयांत त्यांचा बाणा होता त्याच विषयांत हे हातखंडा होते असें म्हणण्यास हरकत नाहीं. दुसरें, **केरूनानादि** मंडळ इंग्रजीविद्यारूप वाघिणीचें दुग्ध प्राशनानें तयार झाले होते व हे संस्कृत विद्यारूप सिंहिणीचे दुग्धानें पोसले असल्यामुळें यांच्या अंगीं स्वाभिमान व स्पष्टपणा हा अ-

धिक गुण उत्पन्न झाला होता व या गुणाची चहा करणारा समाज निराळा होता, म्हणून यांच्या विद्वत्तेचें अधिकारदृष्टीनें व्हावें तसें चीज झालें नाहीं असें म्हणण्यास हरकत नाहीं. जें काम वडिलांचे हातून झालें नाहीं तें काम, वडिलांपेक्षां अधिक अडचणी असतांही चिरंजिवाकडून करविण्याचा ईश्वरीसंकेत असल्यामुळें असो, अथवा एकाच पिढींत व एकाच काळांत अधिक पुरुष पुढें आणण्यांत विशेष मजा नाहीं अशी त्याची इच्छा असल्यामुळें असो; किंवा बुद्धिमत्तेचा झरा गंगौघाप्रमाणें प्रथम लहान असून मध्यंतरी जड पदार्थांखालीं दडपल्यामुळें अधिक संचयानें जोरांत बाहेर पडल्यास लोकांना जास्त उपयोग होतो हें स्पष्ट करण्याकरितां असो; **गंगाधरपंतासारखे** उत्कृष्ट व्याकरणी व पटाईत गणिती सतरा वर्षें एका रत्नागिरींत खितपत राहिले असें ह्मणतां येईल. कारण कोणतें व कांहीं असो, **गंगाधरपंत** आपल्या मनगटाचे बळावर जितके पुढें आले तितके तत्कालिन शाहाण्या लोकांच्या परिक्षेनें पुढें आले नाहींत.

हे चिपळूणास असतां यांच्या अनेक शिष्यांत **पुरुषोत्तम कानें** या नांवाचा एक शिष्य होता. याचा तेथील अभ्यास संपल्यावर-हा इंग्रजी शिकण्याकरितां **दादोबा पांडुरंग** यांच्याकडे गेला. त्यावेळीं पुणें मुंबईकडे स्वलोक, स्वपूर्वज व स्वधर्म यांचे संबंधानें मोठी चळवळ चालली होती " अंधळ्यांत पांगळा राजा " याप्रमाणें ज्ञानोदयासारखीं पत्रें हिंदु समाजाच्यामागें लागलीं होतीं; आणि अशांचेंच तुणतुणें धरून अथवा अशांचाच सूर धरून आमच्यांतीलच कांहीं लेखकांच्या लेखण्या सैरावैरा धांवत सुटल्या होत्या. प्रभाकर, वृत्तवैभव, ज्ञानप्रकाश, धूमकेतु इत्यादि पत्रांतूनही स्वसमाजावर वारंवार हल्ले होत असत. लोकहितवादींनीं तर आमच्या शास्त्र्यांच्या आणि भटभिक्षुकांच्या काळजास हात घालून त्यांच्या आंतड्यांच्या माळा पुनर्विवाहादी अनेक विषयांनीं गुंफून गळ्यांत घालण्याकरितां कंबर बांधली होती. " ज्यांचें मन मुळापासून

संस्कृत भार्षेतील ग्रंथ वाचून विपरीत ज्ञानानें भरलें आहे ते लोक तर शिक्षकाचें कामास अगदींच उपयोगी नाहींत, त्यांचे हातून फारच हानी होईल, एकदा या विपरीत ज्ञानाची प्रथम समजूत झाली ह्मणजे मन बिघडून जातें, मग ताळ्यावर येणें कठिण पडतें, यास्तव त्यापेक्षां अडाणी मनुष्य बरा; म्हणून प्रथम इंग्रजी शिकलेला असा जो विद्यार्थी असेल तोच पंतोजीच्या उपयोगीं पडेल." इत्यादि प्रकारचे केलेले विलाप ऐकूं येत. स्वराज्यांतही ज्यांच्या दोनदोन पिढ्या घागरगडच्या सुभेदारींत गेल्या,पन्नास पन्नास रुपयांचे धोतरजोडे पायावर फाडण्यांत ज्यांचे कांहीं पुरुष खपले, घंटा नादं कुर्यात् करणेंच ज्यांच्या अंगवळणीं पडल्यासारखें झालें, चाटूंनीं अथवा पळ्यांनीं ज्यांस कधींच विसंबिले नाहीं,अशा थोर व कर्त्या पुरुषांचीं मुलें आपापल्या अंमलदारीचा पेशा सोडून एकदम वसंतसेनेच्या वाड्यांतील भटाप्रमाणें विद्यादेवीच्या नवीन मंदिरांत आलीं आणि त्यांनीं भारत भागवताचे भारुड रचणाऱ्या व्यासास गारुडी म्हटलें, पतंजलीं, पाणिनी सारख्यांस शुंभ बनविलें, मनु, याज्ञवल्की सारख्यांस व्यवहारशून्य केलें, कालिदास भवभूति सारख्यांस अचरटांत अथवा नीतिविघातकांत ओढिलें आणि अशांच्या कृतीस मान देणाऱ्यास अथवा ज्या संस्कृत भार्षेत हे ग्रंथ आहेत त्या भाषेसह सर्वांसच अर्धचंद्र देण्याबद्दल शिफारशी केल्या तर त्यांत नवल तें कोणतें ? अशांचे मुखांतून अथवा र, ट, फ करणाऱ्यांच्या लेखणींतून—नव्हे पेनांतून—अशा अर्थाच्या एकापेक्षां एक जबर विचारलहरींच्या लाटांवर लाटा उसळून त्या सर्व महाराष्ट्रभर पसरणेंच त्यावेळीं योग्य होतें. त्यांत आगगाडीच्या इंजिनांतील धुराचा सों सों आवाज, गाडीचे वेगाचा सुसाट आणि तारेचा झणझणाट सामील झाल्यामुळें आमच्या लोकांस आह्मी व आमचे बच्च्यावत् पूर्वज क्षुद्र, केवळ कीटक, असें वाटणें व त्यांचा असा ग्रह होणें सहज होतें. अशा देवदूतांच्या शिक्षणांत मकलाकचीं दोन चार पुस्तकें घोकून तयार झालेल्या, वरील विचाराचे

गारें मस्तकांत शिरलेल्या आणि सुधारणादेवीच्या दर्शनानें भांबा-
चलेल्या लोकांप्रमाणें पुरुषोत्तमपंत कांहींसे ढिलेपणें वागल्यास
आश्चर्य नाहीं.पुरुषोत्तमपंताची नेमणूक रत्नागिरीस **गंगाधरपंतां-**
चे हाताखालीं झाली. त्यावेळीं त्यांचे वृत्तींत पहिलें प्रेम राहिलें न-
व्हतें, तरी **गंगाधरपंतांचे** विद्वत्तेपुढें व निस्पृहतेपुढें यांचें नूतन
शिक्षणाचा प्रकाश पडत नसे. यावेळीं **गंगाधरपंतांचे** वडील
**रामचंद्रपंत** चित्रकुटाहून निघून संन्यासग्रहणाचे इच्छेनें काशीस
गेले असल्यामुळें **गंगाधरपंत** त्यास खर्चावयास पाठवीत असत.
**काशीताई** लग्नायोग्य झाली असल्यामुळें तिची योजना त्याच
जिल्ह्यांतील केळशी गांवच्या विध्वंसाचे घरीं करून शके १७७३
फाल्गुन शुद्ध अष्टमीस इच्या लग्नाचें एक ओझें हलकें केलें,यामुळें यांची
चित्तवृत्ति स्थिर झाली होती. **अंबूताई** आणि तिसरी **आवडा**
आक्का यावेळीं लहान असल्यामुळें काळजीचें आगत्य नव्हतें. तेव्हां
शाळेचें काम व शिष्य पढविण्याचे काम आवरून राहिले वेळांत
त्रिकोणमितीचें पुस्तक तयार करण्याचें काम त्यांनीं हातीं घेतलें.
ते त्या कामास मधून मधून **पुरुषोत्तमपंताची** मदत घेत असत
याप्रमाणें कांहीं दिवस श्रम करून पुस्तक तयार केलें. तें मे. डा-
यरेक्टरसाहेबांकडे पाठविलें. तिकडून तें पसंत झालें व दोनशें रुपये
बक्षीस देण्याचा आणि अडीचशें प्रती सरकारांत विकत घेण्याचा
साहेबांनीं ठराव केला. हा ठराव होतांच **पुरषोत्तमपंताच्या**
अभिलाषबुद्धीनें उचल घेऊन पहिलें गुरुशिष्यत्वाचें नातें **रद्द**
केलें. त्यास या बक्षीसाचा असंतोष वाटला व त्यानें लागलीच
एक अर्ज मे० डायरेक्टरसाहेबांकडे पाठविला. त्यांत असें लिहिलें
कीं, हें पुस्तक इंग्रजीवरून तयार केलें आहे व तें भाषांतर आपण
केलें आहे सबब तें बक्षीस **गंगाधरपंतांस** न मिळतां आपणा
स मिळावें अशा आशयाचे अर्जावरून बक्षिसाचे पैशास तूर्त तरी
खो बसला. परंतु कान्यांची विद्वत्ता माहित असल्यामुळें ती रक्कम
**गंगाधरपंतांस**च मिळाली. याच सुमारास **गंगाधरपंतांस**

आणखी एक लाभ झाला. त्या लाभाचा आनंद **गंगाधरपंतांस** तर झालाच, पण **गंगाधरपंतांपेक्षां पार्वतीबाईस** अधिक झाला कारण गेल्या तीन खेपा देण्याच्याच झाल्या, येणीची खेप झाली नाहीं; तेव्हां ती एक हुरहुर **पार्वतीबाईस** होती. दुसरी, पुरुषोत्तमानें नसती हुरहुर उत्पन्न केली होती. पैशासंबंधानें **गंगाधरपंतांस** विशेष कांहीं वाटत नसे पण आपले श्रम खरे असतां ते व्यर्थ जाऊन अपमान पदरीं घेण्याचा समय आला होता. शिवाय, याच वेळापूर्वीं थोडे दिवस आजोबा परलोकवासी झाले असल्यामुळें बरीच दगदग पडली होती. तेव्हां हा कालच संकटाचा आहे असें उभयतांसही वाटे. परंतु सुखदुःखाचें रहाटगाडगें सदोदित चाललें असतें. त्याप्रमाणें यांच्या आयुष्याचे रहाटखाडग्यांतील दुःखाचें गाडगें रितें होऊन सुखाचें भरण्यास प्रारंभ झाला असल्यामुळें त्यांना यावेळीं पुत्र झाला. हा पुत्र शके १७७८ आषाढ कृष्ण षष्ठी सोमवार, उत्तराभाद्रपदा नक्षत्रीं रत्नागिरीस सदोबा गोरे ह्यांच्या वाड्यांत झाला. जन्मतांच बाळाचे ग्रह वर्णावयाचे नसल्यामुळें **गंगाधरपंतांनीं** वेळ चांगली आहे, नक्षत्र उत्तम आहे इतकेंच टिपण या वेळीं म्हणजे ता. २३ जुलै सन १८५६ रोजीं टांचून ठेविलें, पण तें निराळ्या प्रसंगानें ठेविलें. तें वृत्त असें.

## जन्मवृत्त.

**गंगाधरपंतांच्या** आनंदाप्रमाणेंच आमच्या चरित्रवाचकांस आनंद होणें साहजिक आहे; पण खरा आनंद हा नव्हे. तो आनंद ही स्वारी मातोश्रीच्या गर्भांत येण्याच्याही पूर्ववृत्तांत आहे अशी माझी समजूत आहे. पूर्वीं एका पाठोपाठ एक येनवाच झाल्यामुळें आणि **पार्वतीबाईची** प्रकृती फार अशक्त झाली असल्यामुळें त्यांना वत्साची आशा फार थोडी होती. या बाया आपापल्या गृहीं जातील मग आपणास पाणी कोण देईल ? ही काळजी रात्रंदिवस त्यांना टोचीत असे. अमकी तमकी बाळ-

र्णाण झाली आणि तिला मुलगा झाला असें त्यांना समजलें म्हणजे आपण अशी पुत्रवती होऊं का ? असें त्यांच्या मनांत येई. अमक्या तमकीला पांच मुलीवर मुलगा झाला असें यांनीं ऐकिलें म्हणजे यांचा आशांकूर जोरावे. अमकी तमकीच्या थोरले मुलीला शनतारका लागल्या होत्या म्हणून सात मुली झाल्या, असें ऐकिलें म्हणजे आपल्या मुलींपैकीं कोणास शनतारका तर नसतील ना ? असें मनांत येऊन त्यांनीं वारंवार चौकशी करावी, आपल्या हितगुजांतील मैत्रिणींना व्रताचरणाचें संबंधानें विचारावें आणि त्या सांगतील तसा नवस करावा; असे कांहीं महिने गेले. **पार्वतीबाईचे** परिचयापैकींच **नर्मदाबाई सोमण** या एक होत्या. यांना सूर्याची कहाणी येत असे. एके दिवशीं इकडच्या तिकडच्या गोष्टी चालतां चालतां सूर्याचें व्रत कराल तर तुम्हाला मुलगा होईल, असें **नर्मदाबाई** म्हणाल्या. पण या व्रताला निश्चक उपोषण असतें तें केलें पाहिजे. तें तुमचें हातून होत असल्यास करा असेंही ह्यांनीं सांगितलें. पुत्राशा मोठी कठिण आहे ! ती पुढील कालाकडे अथवा स्वतःचे स्थिती कडे पाहूं देत नाहीं म्हणतात ते कांहीं खोटें नाहीं, खरें आहे **पार्वतीबाई** तरी याच अंशांत गुंतल्या असल्यामुळें त्यांनीं आपल्या अशक्ततेकडे लक्ष्य दिलें नाहीं, अथवा पुढें परिणाम काय होईल याचाही विचार त्यांनीं केला नाहीं. श्रावणमासीं व्रत घेण्याचें ठरलें पण सूर्याचे व्रतास अ-श्विनमास पाहिजे म्हणून त्यांनीं पहिले आदित्यवारीच सूर्याचे कहाणीस सुरवात केली. "निश्चयाचें बळ तुका म्हणे तेंचि फळ" या वाक्याप्रमाणें दुसरेच श्रावणांत पार्वतीबाईस डोहळे सुरू झाले, तथापि त्यांची धुगधुग कमी झाली नव्हती. उपोषण, कहाणी, पूजा वगैरे सर्व विधी यथास्थित चालले आहेत खरें पण पूर्व जन्मीच्या पातकामुळें मुलगी झाली तर ? असें विचार वारंवार उत्पन्न होत असत. व सूर्यनारायण आपला अंत पाहील इतकें

आपण त्याचें काय केलें आहे ? या विचारांनीं पहिले विचार मार्गे पडत. अशा आशेच्या व निराशेच्या घोटाळ्यांत मासपूर्ति झाली. तथापि अशक्तता फारच वाढली होती. प्रसूतीचे वेळीं तर त्या अगदीं बेशुद्धच होत्या. इतकेंच नाहीं तर जन्मलेलें मूल तरी सजीव आहे अथवा नाहीं याची भ्रांत होती. बाळ जन्मल्यापासून पंधरा-वीस मिनीटांनीं जरा कोठे थोडे रडूं लागलें व बाळंतीणही अनेक उपचारांनीं सावध झाली. अगोदर प्रकृति अशक्त त्यांत अनेक उपोषणें झालेलीं, शिवाय स्वभाव तापट, ह्यामुळें हा समय सर्वांस मोठे संकटाचा वाटला. या मायलेकरांतून कोण बचावतें व कोण दगावतें हें कोणास सांगतां येईना, ह्मणून मुलगा झाला असे तूर्त कोणासच सांगू नका. असे भोंवतीच्या बायांनीं ठरविलें. मुलाचा स्वर ऐकिल्यावर **गंगाधरपंतांनीं**, काय झाले ? म्हणून विचारलें असतां मुलगी झाली असेंच सांगितलें. तेव्हां त्यांस इतकें वाईट वाटलें व राग आला कीं, ते त्या सरसे म्हणाले, "मुलगी झाली आहे तर या उकीरड्यावर फेंकून !" ही आंतील दाबादाबी काशीआक्कास ठाऊक होती. तेव्हां **नानांचा** हा राग पाहून तिला कड आला. तिनें हळूच जाऊन त्यांचे कानांत सांगितलें कीं, मुलगा झाला आहे पण सहावी पूजेपर्यंत बाहेर कळवावयाचें नाहीं. हें ऐकून **नाना** हांसले आणि शांत झाले. ज्यावेळीं आमचे चरित्रनायकाचा जन्म झाला त्यावेळीं त्याच्या हातापायांत बिलकूल शक्ति नव्हती, डोकें अगदीं बिलबिलीत होतें आणि नेत्र झांकलेले होते. जणों हे आपल्या मस्तकांत बुद्धिमतेचें, दृढनिश्चयाचे, सरलतेचें आणि परोपकारबुद्धीचें भरण एकाग्र चित्तानें सारखें बसवित आहेत ! व आपल्या पूर्वजांनीं संपादन केलेला सुंदर देश एकदां घालविला असतां त्यांच्याच पुढील संततीनें कमावला; तो पुन्हां गमावला आहे तो फिरून कसा कमवता येईल या विचारांत त्यांची तंद्री लागली आहे ! अथवा "सोहंचे कोहं" म्हणण्यासारखी कृती केली तर जन्मास आल्याचें सार्थक आहे ते कशानें

पूर्ण होईल या विचारांत दंग झाल्यामुळें या **बाळाच्या** या चिलचि-लित मस्तकास कांहीं महिने तूप चोळलें तेव्हां त्यास टणकपणा येत चा-लला. जन्मानंतर सहावे दिवशीं सटवाईपूजन केलें त्या दिवशीं मुलगा झाला आहे असें लोकांस कळवून पेढे वाटले. राष्ट्राचे ग्रह जरी बंदीखा-न्यांत गेले असले तरी पुत्राचे ग्रह बरेसें असल्यास सुजाण पित्यास आनंद झाल्यावांचून रहात नाहीं व त्याचे आशेचा अंकुरही कमी जोरांत असत नाहीं. त्याला वाटतें याच ग्रहबलाचे दहापांच असामी एकत्र जुळल्यास श्रीरामचंद्रासारखे, शिवाजीसारखे, वासिंगटनसारखे, बाजीरावासारखे अथवा नानाफडणीसासारखे कर्ते पुरुष सर्व राष्ट्राचे ग्रह बदलून सोडतील. यदाकदाचित् कर्ता एकटाच असल्यास काल प्रतिकूल असला तरी राष्ट्रीय अनिष्ट ग्रह बदलण्याचा पाया घालण्यास तरी तो चुकणार नाहीं. त्याच प्रमाणें **गंगाधरपंतांचें** झाले. पुत्रजन्मास सुवेळा लागली असल्यामुळें **गंगाधरपंतांस** संतोष वाटें हें तर खरेंच, पण तिघी मुलींच्या पाठींवर झालेल्या मुलास चांगली वेळ लागली आहे हे शब्द कानावर येतांच **पार्वतीबाईच्या** बाळंतपणाच्या पहिल्या सर्व वेदना नाहींशा झाल्यास कौतुक मानण्याचें कारण नाहीं ! यावेळीं **काश्याक्कास** बरेंच समजूं लागलें असल्यामुळें आणि आईचे हाताखालीं काम करावें लागत असल्यामुळें ती या वेळीं बरीच तरबेज झाली होती. आपणाला भाऊ मिळाला स्थळ झालें या आनंदांत तिचें लक्ष **बाळाच्या** बारशाकडे लागलें होतें. ती आपापसांत अनेक नांवें योजी आणि पुन्हां त्यांत कांहीं तरी खोड काढून नाक मुरडी. असें तिनें अनेक वेळ केलें आणि अखेर बारशाचा दिवस आला तेव्हां तिनें **नानास, बाळाचें** नांव काय ठेवावयाचें ? ह्मणून विचारलें असतां त्यांनीं जरा विचार करून "**केशव**" नांव ठेवण्यास सांगितलें. हें ऐकतांच **काश्याक्कास** पंजोबाचें स्मरण झालें. ते याच वर्षी निवर्तले होते. त्यांचें नांव ठेवल्यास माझा बाळ मोठा झाल्यावर मामलत-

दार होईल, आणि मग सारे लोक त्याचीं आर्जवें करतील इत्यादि अनेक विचार तिचे मनांत येऊन ती आनंदानें नाचूं बागडूं लागली होती. हें तरी तिच्या वयास व आनंदास शोभण्यासारखेंच होतें. पंजोबांची मामलत जरी यांनीं कोणी पाहिली नव्हती तरी त्यावेळचे मामलेदार, हल्लींच्या मामलेदार लोकांप्रमाणें पोतेरें झालें नसल्यामुळें त्यांचा इतमाम आणि दरारा लोकांस मोठ्या वैभवाचा वाटत असे. यामुळें **बाळास** बाळलेणें घालून **गोविंद** घ्या, **गोपाळ** घ्या, **त्रिविक्रम** घ्या, "**केशव**" घ्या, ह्मणत **केशवास त्रिविक्रमासह** ( नारळास त्रिविक्रम ह्मणण्याची स्त्रियांची चाल आहे. ) पाळण्यांत घातलें, तथापि हा **अंबुताईचा** व **आवडाबाईचा बाळ, बाळा,** ह्मणून चुचकारण्यानें, चुटक्या वाजविण्यानें, **बाळा** जो जो करीत पाळण्यास लोंबकळण्यानें, आणि सर्व विद्यार्थीगणांचा हा बाळच असल्यामुळें याचें नांव जें **बाळ, बाळ** ह्मणून पडलें तें त्रिविक्रमाप्रमाणं तिहींलोकीं अजरामर होऊन गेलें ! ! हाच **बाळ** या चरित्राचा नायक होय.

## बालपण.

**बाळ** दोन अडीच महिन्यांचा झाला तों **काश्याक्कास** सासरचें बोलावणें आलें. **पार्वतीबाई** इतक्या अशक्त व वारंवार बेशुद्ध होत असत तथापि त्यांनीं उपोषण सोडलें नव्हतें. रविवार आला कीं, ती कहाणी, ती पूजा, तें उपोषण चालूच होतें. **नाना** रागें भरूं लागले म्हणजे 'होय' म्हणावें आणि पुन्हां आपलें येरे माझ्या मागल्या आहेच ! **बाळाला** तिसरा महिना लागला आणि **काश्याक्का** सासरीं जाणार हें खास ठरलें, तेव्हां व्रत उद्यापनाकरितां रुप्याचें आकाश, सोन्याचा सूर्य, बारा लाडू, बारा गडू, बारा यज्ञोपवितें आणि चार चार आणे दक्षिणा ब्राह्मणांस दिली आणि व्रताचें उद्यापन केलें. अवघ्या दोन वर्षांतील

सूर्योपासनेचा पुत्र जर इतका प्रकाशमान झाला आहे तर बारा वर्षें उपासना केली असती तर मुलानें प्रत्यक्ष सूर्यासच वेजीं उतरले असतें यांत संशय नाहीं ! असो. **पार्वतीबाई** अशक्त, आका चौथे महिन्यांत सासरीं गेली तेव्हां या **बाळाला रुक्मिणी** कुणबिणीचे स्वाधीन केलें. तिनें त्यांचा पाळणा बनविला, त्यांत नारळीच्या फड्याची मऊशी गादी, त्यावर वाकळेच्या तुकड्यांचा सरपोस आणि जुन्हेराची दुलई करून " बाळा जोजोरे कुळभूषणा गंगाधरनंदना, बाळा जोजोरे " करण्यास प्रारंभ केला.

हा बाळ कधीं घरच्या, कधीं रुक्मिणी कुणबिणीच्या पाळण्यांत आहे, मुठी चळून मुखांत घालीत आहे, पायाचे आंगठे मुखांत घालून या कुशीवरून त्या कुशीवर होत आहे तों उत्तरेस शिपाई लोकांनीं कुंपनी सरकारच्या जातभाई नोकरांवर संगीन धरली. याचें कारण काडतुसांत असो, मुसलमानांनीं हिंदूस चिडविण्यांत असो, अथवा लार्ड डलहौसीच्या रीजेरजवाड्यांच्या, संस्थानिकांच्या आणि जाहागिरदारांच्या जाहागिरी गिळंकृत करण्यांत असो, त्याचा खुलासा करण्याचें हें स्थळ नाहीं. येथें इतकेंच सांगावयाचें आहे कीं, हल्लीं राजा शब्दाची व्याप्ती खुद्द राजापासून सात रुपयांच्या शिपायापर्यंत पोंहचण्यास नड पडत नाहीं. तद्वत त्या वेळीं बंडखोर शब्दाच्या बंडाळीनें सर्व प्रांत गजबजून गेला होता. दिल्लीचा राजा बंडखोर, अयोध्येचा मोडका नबाब बंडखोर, लखनौचा तुटका नबाब बंडखोर, सातारचा काशिकर बंडखोर, त्याचा सेनापती बंडखोर, झांशीची विधवा बंडखोर, नानासाहेब, तात्या टोपे बंडखोर, रोहिल्यांचा तुराबाजखान, नासिकचा भागुजी नाईक, फरकाबादचा नबाब, पिरझुरअल्ली, राधागोविंद, वेणीमाधव इत्यादि चटसारी मंडळी आणि त्यांचे शागिर्दही बंडखोरांच्या सदरांत आल्यामुळें सर्व देशभर गोंधळ झाला होता. इंग्रजी वर्तमानपत्रकारांनीं ज्यांना बंडखोर ह्मटलें ते

सारे बंडखोर, ज्यांना दरोडेखोर ह्मटलें ते सारे दरोडेखोर, ज्यांना ठग ह्मटलें ते ठगी, ज्यांना राजद्रोही ह्मटलें ते तेच असें ह्मणण्याचा परिपाठ पडल्यामुळें अशांची संख्या अशी कांहीं फुगते कीं, इतर राष्ट्रांचे तर असोच पण या देशांतील राज्यकर्ते जे विलायतेस असतात त्यांनासुद्धां हा सारादेशच बंडखोरमय दिसूं लागतो व या देशावर राज्य करणें ह्मणजे तरवारीचे धारेवर राज्यकरणें, या देशावर स्वामित्व राखणें ह्मणजे बंडखोर, दरोडेखोरावर स्वामित्व राखणें होय असें त्यांस वाटूं लागतें.

अशा बंडखोरांच्या शस्त्रांचे हुतुतूंस इंग्रजी भाषेच्या पहिल्या साडेतीन कांडांच्या अध्ययनानें शास्त्री बनलेल्यांचें शास्त्र काय करील ! इतकें व्यवहारज्ञान त्यावेळीं नसल्यामुळें असो अथवा प्रतिदेवदूत भासणाऱ्या इंग्रजांवर शस्त्र धरणें हें महत्पाप होय, या पापाला त्रिभुवनांतील नर्ककुंडांतही जागा नाहीं अशी कांहीं लोकांची भावना झाल्यामुळें असो; किंवा अशा वेळीं चुगलखोरासही ऊत येऊन त्यांचें कार्य साधतें तर आपणासारख्या आधुनिक विद्वानांनीं आपल्या परदेशरूपी अस्त्रानें साऱ्या मूर्खांतील मूर्ख क्रूरांतील क्रूर, आणि रानटींतील रानटी चीत केल्यास आपण अ० मास्तरीवरून एकदम एज्युकेशनल इन्स्पेक्टरीवर उडी मारून चर्वे, पटवर्धन कोल्हटकरादि मंडळीस दिपवून सोडूं, या अथवा अशा प्रकारच्या आशेनें बद्ध झाल्यामुळें असो, **गंगाधरपंतांवर** रुसलेल्या **पुरुषोत्तमपंत कान्यानीं नानासाहेबांस** जगन्मित्राचे द्वारें सणसणीत पत्र लिहिलें. हा उपदेशाचा मारा भला सपाटून केला असला तरी जगन्मित्र पडला रत्नागिरीच्या एका कोपऱ्यांत ! आणि **नानासाहेबांचा** धुडकूस चालला होता कानपूर, दिल्ली, झांशी वगैरेंकडे ! मध्यें विंध्याद्रि, सह्याद्रिसारखे अगडबंब पर्वत; गंगा, यमुना, गोदासारख्या अफाट नद्या व नद असतां ते ओलांडून इतक्या लांब याचा जगन्मित्र नानासाहेब, तात्या टोपी इत्यादिकांपर्यंत जाणार कसा ! बरें, पूर्वींच्या

त्या मूर्खत्वाच्या व अज्ञानांधःकाराच्या युगांत नसणाऱ्या व इंग्रजाखेरीज कोणास कधींही अनुकूल न होणाऱ्या पंचमहाभूतांची गति तरी त्यावेळीं आगगाडीच्या सोंगानें मुंबई आणि कल्याणच्या दरम्यानच खुंटली होती ! खेरीज बंडवाल्यांच्या घोड्यांच्या धिंगाण्यानें उत्तरेचा सर्व भाग गोंधळून सोडला असल्यामुळें सर्व लोकांस दे माय धरणी ठाय अशी स्थिति झाली होती. अशा समयांत याच्या कागदी घोड्यास कोण विचारतो ? तेव्हां अर्थातच काऱ्यांचें ऊग्र अस्त्र रत्नागिरीपासून फार लांब गेलें नाहीं. तथापि त्यावेळचे इंग्रज स्वप्राणत्राणार्थ फार तत्पर असल्यामुळें त्यांचे कान खेड्यापड्यांतील कोपऱ्यांतही घुसत असत. **नानासाहेब** या शद्वांत इतकी कांहीं विलक्षण जादू भरली होती कीं, ' **नाना** ' हा शब्द कानीं पडतांच प्रत्येक इंग्रजाची तारंबळ उडून जात असे. मग तो **नाना** कोणीही असो ! अशा समयांत **काऱ्यानीं** आपलें जाज्वल्य हत्यार **नानासाहेबांवर** सोडिलें होतें; तेव्हां अर्थातच **नानासाहेबांवर** सोडलेलें हें आमोघ अस्त्र फार विलंब न लागतां तेथील कलेक्टरचे कानांत घुसलें. कलेक्टर साहेबांचे कानांत " **नानासाहेब** " हे शब्द उतरतांच त्यांनीं विशेष चौकशीची खटपट न करतां **पुरुषोत्तमपंतास** त्यांच्या व्यवसायांतून जे उचलले ते अचानक ज्ञानमंडपीं आणून ठेविले ! **पुरुषोत्तमपंत** ज्ञानमंडपांत जातांच सगळ्या रत्नागिरींत पुरुषोत्तमपंताचाच विषय पण आळीमेळी घालीत घालीत पसरला. **गंगाधरपंतांस** ही खबर समजली, तेव्हां ते त्याचें मधलें स्वरूप विसरून आपण गुरु व तो शिष्य या नात्यानें त्याजकडे पाहूं लागले. **गंगाधरपंत** विद्वान चतुर, निस्पृही आणि निग्रही आहेत हे रत्नागिरिच्या कलेक्टरास माहीत असल्यामुळें तो त्यांस चांगलें मानीत असे. दुसरें, रेव्हिन्यू खात्यांतील कामाकरितां लागलेल्या लोकांत पुष्कळ लोक यांच्या शिष्यवर्गांपैकीं व यांच्याच शिफारसीनें लागले असून ते गुरूचें नांव गाजविण्या-

सारखे आहेत अशी कलेक्टरसाहेबांची दृढ समजूत असल्यामुळें **गंगाधरपंतांचें** वजन त्यांच्याजवळ चांगलें होतें. **पुरुषोत्तमपंताचें** शिष्यरूप आणि त्याच्यावर आलेला प्रसंग मनांत घेतांच यांच्या अंतःकरणांत दयेचा पाझर फुटून तो नेत्रावाटें स्वच्छपणें बाहेर पडूं लागला. फार वेळ न दवडतां हे कलेक्टरसाहेबांकडे गेले व यांनीं त्यास कान्याचें वय, ज्ञान व विचार करण्याची ऐपत समजाऊन सांगितली, आणि त्यास शांत करून त्याजकडून **पुरुषोतमरावाची** सुटका करविली. **गंगाधरपंतांनीं** आपली सुटका केली हें **पुरुषोत्तमपंतास** समजतांच त्यांच्या अंतःकरणांत उद्भवलेला अप्रयोजक द्वेषांकूर जळून खाक झाला. तोही तेथून सुटतांच प्रथम आपल्या घरीं न येतां **गंगाधरपंतांकडे** गेला आणि कृतापराधाची क्षमा मागून त्यानें त्यांच्यासमोर साष्टांग नमस्कार घातला ! ! ज्या कलेक्टर साहेबांनीं **पुरुषोत्तमपंताची** सुटका केली ते कलेक्टर सा॰ **गंगाधरपंतांस** ' कारकुनांचा खजिना ' म्हणत असत. त्याच जिल्ह्यांतील हें सोनें नव्या हवेनें मळकटून गेलें होतें, पण **गंगाधरपंतांच्या** कृपाप्रसादानें तावून सुलाखून तें शुद्ध झालें, असें सर्व म्हणूं लागले.

आतां हें चरित्र वाचणाऱ्यांस काशीस नेऊन परत आणावयाचे आहे. परंतु याच्याच आगेमागें घडलेली एक गोष्ट कळवून नंतर वाचकांकडून काशीयात्रा करवावी हें मला बरें दिसतें. ती गोष्ट अशी कीं, या वेळीं कै. **माधवराव बर्वे** हे याच भागाकडे डे॰ एज्युकेशनल इन्स्पेक्टर होते. ते इंग्रजी भाषेच्या मोडक्या तोडक्या इमारतींतून खुरडत खुरडत बाहेर आले होते, तरी कानडी मंडळींच्या मानेवर इंग्रजी भाषेचे जोखड ठेवण्यांत त्यांनीं आपली अक्कलहुषारी दाखविली असल्यामुळे सरकारी कामगारांनीं त्यांस तत्कालीन विद्वानांत ओढिलें होतें हें एक, व इंग्रजी विद्येचा अपवित्र पवित्रा झाला तरी तो विद्वान्, सुशिक्षित, सुधारक

आणि समाजधुरीण झाला असें समजण्याचा परिपाठ पडला होता हें दुसरें, या दोन कारणांनीं रावबर्व्यांच्या अंगीं कडकपणा हा गुण बराच जोरावला होता. त्याचा प्रयोग ते हाताखालील लोकांवर करीत असत. **गंगाधरपंतांचें** पाणी मसूरच्या ओढ्याच्या पाण्याप्रमाणें तीव्र, त्यांत स्वभावेच्या उत्कृष्ट तत्त्वांचें मूळचें साह्य झालें असल्यामुळें दांडेघरच्या औदुंबराच्या मुळ्यांतून निघणाऱ्या पाण्याप्रमाणें पाचक, व कसलाही अजीर्णांश झाला असला तरी असीड आणि सोड्याप्रमाणें खाक करणारें असल्यामुळें, डे. ए. इन्स्पेक्टर साहेबांच्या पाण्यांतील कडकपणाचा **गंगाधरपंतांजवळ** कांहीं उपयोग होत नसे. अधिकाऱ्यांकडून केवळ अधिकाराचे जोरावर कांहीं लिहून आलें कीं, त्यांनीं त्याची वावडी केलीच. परिक्षेकरितां आले आणि ती घेत असतां विनाकारण ढवळाढवळ करूं लागले कीं, खडाजंगी उडालीच. अशी उभयतांमध्यें वारंवार खडाजंगी होऊन हा प्रकार वाढतां वाढतां इतका वाढत चालला कीं, या उभयतांमधून अग्नि जाण्याचीसुद्धां सोय राहिली नाहीं. हा बाणा त्यांच्या पुरतांच होता असें नाहीं व त्यांच्याकरितांच तो त्यांनीं पत्करला होता असेंही नाहीं. आपल्या स्वतंत्र विचारांत जेथें कमतरता पडेल, तेथें पंतांचा हाच बाणा असे. त्यांचा हा स्वभाव त्यांच्यानंतर लागलेल्या शिक्षकें लोकांस फायदेशीर होई. कारण त्यांच्या या स्वभावामुळें अ. डे. ची जागा रिकामी झाली कीं तिसराच पुढें सरे व ते रत्नागिरिस मास्तरचे मास्तरच कायम रहात. तथापि त्याची यांना कधीं परवा नव्हती. स्वतःचा बडेजाव दाखविण्यांत व स्वतःची स्तुति आणि दुसऱ्याची निंदा करण्यांत इंग्रज जितके तरबेज आहेत तितके अन्यराष्ट्रांतील लोक नाहींत, असें आतां जितकें लोकांस समजूं लागलें आहे तितकें त्यावेळीं समजत नसें. इंग्रज बोलला तर त्यांत बाद्री अंक असतो, हें हल्लीं लहान मूलही जसें सांगूं शकतें, तसें त्यावेळीं मोठ्या शहाण्यांसही सांगतां येत नसे. यामुळें गुला-

सारखे आहेत अशी कलेक्टरसाहेबांची दृढ समजूत असल्यामुळें **गंगाधरपंतांचें** वजन त्यांच्याजवळ चांगलें होतें. **पुरुषोत्तमपंताचें** शिष्यरूप आणि त्याच्यावर आलेला प्रसंग मनांत येतांच यांच्या अंतःकरणांत दयेचा पाझर फुटून तो नेत्रावाटें स्पष्टपणें बाहेर पडूं लागला. फार वेळ न दवडतां हे कलेक्टरसाहेबांकडे गेले व यांनीं त्यास कान्याचें वय, ज्ञान व विचार करण्याची ऐपत समजाऊन सांगितली, आणि त्यास शांत करून त्याजकडून **पुरुषोतमरावाची** सुटका करविली. **गंगाधरपंतांनीं** आपली सुटका केली हें **पुरुषोत्तमपंतास** समजतांच त्यांच्या अंतःकरणांत उद्भवलेला अप्रयोजक द्वेषांकूर जळून खाक झाला. तोही तेथून सुटतांच प्रथम आपल्या घरीं न येतां **गंगाधरपंतांकडे** गेला आणि कृतापराधाची क्षमा मागून त्यानें त्यांच्यासमोर साष्टांग नमस्कार घातला ! ! ज्या कलेक्टर साहेबांनीं **पुरुषोत्तमपंताची** सुटका केली ते कलेक्टर सा॰ **गंगाधरपंतांस** ‘ कारकुनांचा खजिना ’ म्हणत असत. त्याच जिल्ह्यांतील हें सोनें नव्या हवेनें मळकटून गेलें होतें, पण **गंगाधरपंतांच्या** कृपाप्रसादानें तावून सुलाखून तें शुद्ध झालें, असें सर्व म्हणूं लागले.

आतां हें चरित्र वाचणाऱ्यांस काशीस नेऊन परत आणावयाचें आहे. परंतु याच्याच आगेमागें घडलेली एक गोष्ट कळवून नंतर वाचकांकडून काशीयात्रा करवावी हें मला बरें दिसतें. ती गोष्ट अशी कीं, या वेळीं कै. **माधवराव बर्वे** हे याच भागाकडे डे॰ एज्युकेशनल इन्स्पेक्टर होते. ते इंग्रजी भाषेच्या मोडक्या तोडक्या इमारतींतून खुरडत खुरडत बाहेर आले होते, तरी कानडी मंडळीच्या मानेवर इंग्रजी भाषेचें जोखड ठेवण्यांत त्यांनीं आपली अक्कलहुषारी दाखविली असल्यामुळे सरकारी कामगारांनीं त्यांस तत्कालीन विद्वानांत ओढिलें होतें हें एक, व इंग्रजी विद्येचा अपवित्रःपवित्रोवा झाला तरी तो विद्वान्, सुशिक्षित, सुधारक

आणि समाजधुरीण झाला असें समजण्याचा परिपाठ पडला होता हें दुसरें, या दोन कारणांनीं रावचर्व्यांच्या अंगीं कडकपणा हा गुण बराच जोरावला होता. त्याचा प्रयोग ते हाताखालील लोकांवर करीत असत. **गंगाधरपंतांचें** पाणी मसूरच्या ओढ्याच्या पाण्याप्रमाणें तीव्र, त्यांत स्वभावेच्या उत्कृष्ट तत्त्वांचें मूळचें साह्य झालें असल्यामुळें दांडेघरच्या औदुंबराच्या मुळ्यांतून निघणाऱ्या पाण्याप्रमाणें पाचक, व कसलाही अजीर्णांश झाला असला तरी असीड आणि सोड्याप्रमाणें खाक करणारें असल्यामुळें, डे. ए. इन्स्पेक्टर साहेबांच्या पाण्यांतील कडकपणाचा **गंगाधरपंतांजवळ** कांहीं उपयोग होत नसे. अधिकाऱ्यांकडून केवळ अधिकाराचे जोरावर कांहीं लिहून आलें कीं, त्यांनीं त्याची वावडी केलीच. परिक्षेकरितां आले आणि ती घेत असतां विनाकारण ढवळाढवळ करूं लागले कीं, खडाजंगी उडालीच. अशी उभयतांमध्यें वारंवार खडाजंगी होऊन हा प्रकार वाढतां वाढतां इतका वाढत चालला कीं, या उभयतांमधून अग्नि जाण्याची सुद्धां सोय राहिली नाहीं. हा बाणा त्यांच्या पुरतांच होता असें नाहीं व त्यांच्याकरितांच तो त्यांनीं पत्करला होता असेंही नाहीं. आपल्या स्वतंत्र विचारांत जेथें कमतरता पडेल, तेथें पंतांचा हाच बाणा असे. त्यांचा हा स्वभाव त्यांच्यानंतर लागलेल्या शिक्षकें लोकांस फायदेशीर होई. कारण त्यांच्या या स्वभावामुळें अ. डे. ची जागा रिकामी झाली कीं तिसराच पुढें सरे व ते रत्नागिरिस मास्तरचे मास्तरच कायम रहात. तथापि त्याची यांना कधीं परवा नव्हती. स्वतःचा बडेजाव दाखविण्यांत व स्वतःची स्तुति आणि दुसऱ्याची निंदा करण्यांत इंग्रज जितके तरबेज आहेत तितके अन्यराष्ट्रांतील लोक नाहींत, असें आतां जितकें लोकांस समजूं लागलें आहे तितकें त्यावेळीं समजत नसें. इंग्रज बोलला तर त्यांत बादी अंक असतो, हें हल्लीं लहान मूलही जसें सांगूं शकतें, तसें त्यावेळीं मोठ्या शहाण्यांसही सांगतां येत नसे. यामुळें गुला-

मांचा व्यापार बंद केल्याचे पोवाडे ते स्वतः जसे गात असत तसेंच त्यांचा सूर धरून आमचे लोकही ते गात. परंतु आफ्रिकें-तील गुलांमाचा व्यापार बंद करण्यापूर्वी हिंदुस्थानांत गुलाम करण्याचा कारखाना सुरू करून त्यांच्या भट्या उतरल्या होत्या. हें **गंगाधरपंत, सारख्या** थोड्यांच्याच लक्षांत येऊन चुकलें होतें. याच भट्यांपैकीं अ० मास्तरचे करारनामे घेणें ही एक लहानशी भट्टी होय. आपण नोकरी सोडणार नाहीं असे करार अ० मास्तर लोकांकडून करून घ्यावेत असे हुकम सर्व शाळांमास्त-रांस गेले होते, तसाच एक हुकूम **गंगाधरपंतांकडे** त्यांचे हाताखालील शिक्षकांच्या संबंधानें आला होता. त्या वेळच्या शिक्षकांच्या पगाराचा प्रारंभ सबंध सुर्ती तीन रुपयांपासून असे ! इतका दांडगा पगार कोणत्याही खात्यांतलि लोकांस नव्हता. शिपाईप्यादे तर असोतच, पण इंजिनियर खात्याच्या सडकांवरून पाट्या टाकणारांस सुद्धां चार रुपये पगार मिळत असे. असें असतां शिक्षकांच्या या पगाराबद्दल असा हुकूम आला, हें **गंगाधरपंतांस** बरें वाटलें नाहीं. तथापि हुकुमाप्रमाणें **गंगा-धरपंतांनीं** करारनामे लिहून घेतले. पण ते पाठवितांना त्यांनीं जो रिपोर्ट केला त्यांत एक कलम अशा अर्थाचें घातलें कीं, अफ्रिकेंतील गुलामास जितकी किम्मत आहे तितकी इंग्रजींतील शिक्षकांस नाहीं असें त्यांच्या पगाराच्या आंकड्यावरून आणि करार लिहून घेण्याच्या पद्धतीवरून स्पष्ट दिसत आहे. हें कलम **गंगाधरपंतांच्या** वरिष्ठांस झोंबलें. त्याचें कारण तें **गंगाधर-पंतांकडून** आलें हें होय. असें कलम वरिष्ठांच्या ताटा खालील मांजरांकडून येण्याचा संभवच नव्हता. यदाकदाचित् एखाद्या-कडून आलें असतें, तरी तें प्रकरण ताकिदीवर भागलें असतें. परंतु हें **गंगाधरपंतांकडून** आलें असल्यामुळें त्याचा परगणा वाढला. अथवा हे असल्या ताकिदीस भीक घालणारे नाहींत तेव्हां त्यांची खोड काढावी ह्मणून तो वाढविला असेंही म्हणतां

येईल. जेव्हां हें प्रकरण थेटपर्यंत गेलें आणि तेथें **गंगाधरपंतांचें** म्हणणें अयोग्य नाहीं असें ठरलें, तेव्हां हें प्रकरण विल्हेस लागून नजीकचें सरकार स्वस्थ बसलें.

चला, आतां आपण काशीला जाऊं. **गंगाधरपंतांची** धाकटी बहीण **द्वारका** दापोली तालुक्यांतील करंजणी गांवच्या जोगळेकरांचे घरीं दिल्यावर, **रामचंद्रपंत** चित्रकोटास पेशव्याकडे गेले. तेथील कोठीवर कांहीं दिवस राहून ते काशीस संन्यासगृहण करण्याच्या इराद्यानें गेले व ते तेथें होते तोंपर्यंत **गंगाधरपंतांकडून** त्यास खर्चावयास जात असे. परंतु या वेळीं **रामचंद्रपंतांस** संन्यास न घेतां परतावें लागलें. कारण सत्तावन सालचा कंठस्नानविधि, अठ्ठावन सालचा जाहिरनामा लागला तरी पुरा झाला नव्हता. अवभृतस्नान व्हावयाचें होतें. म्हणून न्यायाचीं कोर्टें बसूवून न्यायाचा फार्स चालू झाला होता. ज्यांच्याबरोबर कटकट होऊंन झटपट उडाली आणि हजारों रुपयांचा आणि प्राणांचा चुराडा झाला, त्यांतीलच विजयी बाजूचे जातभाई, सगेसोयरे, न्यायाधीश बनून कोणास फांसावर चढीव व कोणास तोफेच्या तोंडीं दे, तर कोणास काळे पाण्यावर पाठीव, किंवा कोणास दहा पांच वर्षें कारागृहांत खितपत ठेव, असा तडाखा सुरू झाला. या रामरगड्यांत बैरागी, वैरागी व संन्याशीही सांपडत. अशा बैराग्यांच्या वगैरे चौकशींत त्यांच्या गुरुनांही धक्काबुक्क्यांची गुरुदक्षिणा मिळे. तेव्हां अशा पंचायतींत पडण्यापेक्षां दाखला घेऊन संन्यास देण्याचा काशींतील सन्याशांनीं नियम केला होता. त्याप्रमाणें दाखला **रामचंद्रपंताजवळ** नव्हता तो आणण्याकरितां आणि **गंगाधरपंतास** पुत्र झाला आ तो पहाण्याकरितां **रामचंद्रपंत** परत रत्नागिरीस आले.

ज्यावेळीं **रामचंद्रपंत** रत्नागिरीस आले त्यावेळीं **काश्याक्का** विध्वंसाचा संसार सावरण्याकरितां केळशीस गेली होती. **अंबुताईनें** याच जिल्ह्यांतील पुर्मेडी गांवच्या पटवर्धनांचें घर

आपलेसें केलें होतें, तरी घरींच होती. आपण संसार कसा थाटणार, उतरंड कशी मांडणार, चूल कोठें, सोंवळ्याचें कोठें, त्यांत लोणच्यापापडांचें सोंवळें कोठें, ओंवळ्याचें कोठें, पारोशाआरोशाचे पदार्थ कोठें ठेवणार, हें आपल्या माकुल्या घरकुलानें; चिमुकल्या भांड्यानें आणि इवल्याशा भातुकलीनें आवडी दाखवूं लागली होती. अंगलट सडसडीत व अशक्त, रंग सावळा व निस्तेज, मुद्रा बावळी पण तीव्र, शब्द बोबडा पण मधुर, स्वभाव मोकळा पण तेव्हांच फुरंगटणारा व आडेल, असा **बाळ** ( आमचा चरित्र नायक ) घरांत रात्रंदिवस अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांची पुस्तकें ओढ, कागद फाड, पाटीवर लघुशंका कर, तर कोणाजवळ बाहेर नेण्याकरितां हट्ट धर, अशा स्थितींत अवघ्या दोन वर्षांचा वावरत असे.

काशीहून निघतांना पुन्हां लौकरच परत जाण्याचा **रामचंद्रपंतांचा** संकेत होता. पण तो लवकर सिद्धीस गेला नाहीं **बलवंतानें रुक्मिणसि** सोडून आपल्या बाललीलेच्या पाशांत आजोबास गुंतवून टाकिलें. त्याचें अदोबा, अदोबा ह्मणून हांका मारणें, त्यांच्या बरोबर स्नान करणें, भस्म फासून त्यांच्या मांडीसारखी मांडी, संध्येप्रमाणें संध्या, प्राणायामाप्रमाणें प्राणायाम, स्तोत्रपाठाबरोबर स्तोत्रपाठाची साथ देतां देतां घडघड म्हणूं लागणें, हें आजोबांच्या पूर्वसंकेतास मागें सारू लागलें. इतकेंच नाहीं, तर **नानांचें ( गंगाधरपंतांस** म्हणत ) लक्ष्य याच्या बुद्धिमत्तेकडे लागून, तेही आपल्या **बाळास** हांसतखेळत संस्कृत श्लोक, जे त्यास पुढें उपयोगी पडतील असें वाटलें, ते सांगूं लागले.

**बळवंताचें** आग्रही वृत्तीचें दर्शन तिसऱ्या वर्षींच झालें होतें. हा तीन वर्षांचा असतां श्रावणीचे दिवशीं सर्वांनीं यज्ञोपवितें धारण केलीं, तेव्हां याच्या गळ्यांतही आजोबांनीं एक जानवें अडकविलें होतें. मौंजीबंधन झालेल्या लोकांच्या गळ्यांतील



कै. रामचंद्र केशव टिळक.

जन्म सन १८०२ समाधी १८७२

यज्ञोपवित समंत्र, सप्रयोग असल्यामुळें ते त्यांस काढतां येत नाहीं तसा प्रकार याच्या जानव्याचा नव्हता. याचें जानवें दोऱ्याप्रमाणें असल्यामुळें ते भोजनाचे वेळीं काढलें पाहिजे होतें. **बाळ** आजोबाशिवाय दुसऱ्याजवळ भोजनास बसेना. जानवें काढून ठेवून ये, असें अजोबा ह्मणतांच तूं जानवें काढ म्हणजे मी काढतों हा हट्ट धरला, तेव्हां ते जबरीनें काढूं लागले परंतु तो काढू देईना. **नाना** सोवळे, आजोबा सोवळे, थोर कोणी ओवळ्यांत नाहीं आणि हा तर हात लावूं देत नाहीं. ! **अप्पांनीं** ( आजोबांनीं ) समजावून पाहिलें, पण समजेना; खाऊची आशा दाखवून पाहिली, ऐकेना; माराचा धाक दाखविला, बधेना; अशाखालीं पुष्कळ वेळ गेला तरी ऐकत नाहीं असें पाहून, **नानांनीं** आपलें विश्वरूप प्रगट केलें आणि जेव्हां दोन श्रीमुखांत भडकविल्या, तेव्हां तें जानवें पळालें, तरी **बाळाचा** हुंदुका दोन अडीच तास जिरला नाहीं.

# अभ्यासक्रम.

पूर्वींच्या गृहशिक्षणांत एक गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी असें ती ही कीं, भोजनाच्या पंक्तींत आर्या व श्लोक म्हणतां येण्याकरितां मुलांस त्या शिकविण्यास साधारण वाचा फुटल्यापासून प्रारंभ करीत असत. " गंगे गोदे यमुने, गोविंदा गोपाळा, श्रीरामाच्या मूर्ती," इत्यादि आर्या बोबड्या भाषेंत न म्हणणारीं ब्राम्हणांचीं मुलें क्वचितच आढळत. फार तर काय, पण " हरीच्या घरीं शेवया तूप पोळ्या, " ऊठ मर्कटा चाल लौकरी " इत्यादि श्लोक म्हणणारीं मराठ्यांचीं मुलेंही कांहीं कमी नसत. सायंकाळचें " शुभं करोति कल्याणं " झालें कीं, श्री, ग पासून स्वर, मुळाक्षरें, अंक, पाडे, तिथी, वार, महिने नक्षत्रें, ऋतु इत्यादि मुखानें तोंडपाठ ह्मणवून घेत असत. यामुळें पांचवें वर्षी मुलगा शाळेंत गेला म्हणजे त्यांस फक्त हातानें लिहावयाचें काम राही.

**बळवंत** लहान असतां त्यास दर श्लोकास एक पै खाऊ करितां देण्याची लालुच लाविली होती. ही एक पै हा अवघा तीन साडेतीन वर्षांचा असतांच सुरू केली असल्यामुळें, शाळेला जाण्यायोग्य होई-पर्यंत याचें बरेंच अध्ययन झाले होतें. **नाना** शाळेंतून आले म्हणजे शौचास जात असत; तेव्हां यानें शौचकूपाचे बाहेर त्यांना ऐकूं जाईल इतके अंतरावर उभें राहून रूपावळीपासून म्हण-ण्यास सुरवात करावी, ती त्याचें भोजन उरकेपर्यंत त्यांच्या आजबाजूस राहून आपलें म्हणणें चालूं ठेवावें. त्यांचें भोजन होऊन ते आंचवण्यास गेले कीं, " यानें " ताई मला थंडी वाज-तेय ! कांहींतरी पांघरावयास दे " असें म्हणावें. कोणी जवळ नसले तर आपण दुडदुड धांवत जाऊन पांघरूण घ्यावें. यांतील मत-लब हा कीं, भोजनोत्तर नाना विश्रांतीस बसले म्हणजे एखादा नवा श्लोक सांगत असत व आदले दिवसांचा म्हणून घेत असत. तो चुकल्यास हिराची फोकाटी मारीत ती अंगावर लागूं नये म्हणून ही अगाऊ हिकमत **बाळ** करीत असे. अशी थंडी वाजूं लागली . कीं, **नानांनीं** समजावें कीं, राजश्री कालचा श्लोक विसरले अथवा त्याचा पहिला चरण तरी विस-रले असावेत. मग त्यानीं हांसून जाडीशी कळकाची फोकाटी जवळ घ्यावी. हा क्रम अवघा चौथ्या वर्षीं चालू होता.

**बळवंतास** भोजनाची खोडी नसे, याचें कारण तूपभात, आणि दहींभात यांच्याखेरीज जर तिसरा पदार्थ कधीं खाल्लाच नाहीं, तर खोडी येणार कोठून ! आणि कशाची येणार ! हा तुपभात आणि दहींभात कालेजांत गेल्यानंतर कमी होऊन, कोठें थोडी भाकरी, कधीं पोळी, भाजी, फोडणीचें वरण वगैरे ते खाऊं लागले. " जी खोड लागली बाळा, ती न सुटे जन्मकाळा. " या म्हणीची सत्यता वरील गोष्टींत जशी अद्यापही दृष्टीस पडते, तशीच यांच्या बालखोडयांतहीं दृष्टीस पडते. जातां जातां मातो-श्रींचें डोकें धरून हालवावयाचें, काशीताईचें डोक्यावर आपडी-

थापडी करावयाची, रुक्मिणी कुणबिणीचे गळ्यांत मिठ्या मारून लोंबकाळावयाचें, वासराचें शेंपटास ओढून धरून त्यास पळवावयाचें इत्यादि बाललीला आतां नाहींत. कारण ती माता आतां नाहीं, ती आक्का आतां नाहीं, ती रुक्मिणीही आतां नाहीं. आतां आपलीं मुलें आणि नातवंडे आहेत, त्यांचें डोकें धरून गदागदां हालवावयाचें, त्यांचें दंड धरून त्यांना चक्राकार फिरवावयाचें, थोरला **विश्वनाथ** बेसावध आहे असें पाहून त्याच्या पाठीवर थाप मारावयाची इत्यादि लीला अद्याप (सन १९०२ चे मार्च) पर्यंत करतांना दृष्टीस पडत.

लहान मुलांस अक्षर ओळख करून देण्यास गंजिफा हें चांगलें साधन आहे, असें आतांच कळूं लागलें आहे असें नाहीं. **बळवंताच्या** बाळपणीं सांवतवाडीस या गंजिफा होत असत. गोकाक हें सुंदर प्रकारचीं फळफळावळ करण्यांत जसें प्रसिद्ध आहे तसेंच दशावतारी गंजिफा, चंकांचनी गंजिफा, मुळाक्षरांच्या गंजिफा इत्यादि बनविण्यांत सांवतवाडी प्रसिद्ध असे. **नानांनीं** तीन रुपये देऊन **बाळा**करितां गंजिफा आणविल्या होत्या. त्या गंजिफावरून अक्षर ओळखण्याची रीत अशी कीं, **क, फ; ब, व; प, ष; भ, म; ङ, ड**; इत्यादि थोडक्या फरकाचीं अक्षरें परस्पर विरोधी आहेत अशी मुलांची समजूत घालीत असत. जसें; एकानें 'क' टाकिला असतां 'फ' टाकून तो डाव जिंकला, असें समजत असत. याच व्यवस्थेमुळें **बळवंतास** अक्षरओळख लवकर झाली असें ह्मणण्यास हरकत नाहीं. **गंगाधरपंतांचा बाळ** १८६१ सालीं विजयादशमीचे मुहूर्तावर शाळेंत गेला. पण त्यापूर्वी त्याची बहुतेक तयारी घरींच झाली होती. माधवराव घाणेकर, हरिपंत फाटक, भाऊ माजगांवकर वगैरेंच्या शिक्षणाच्या व **गंगाधरपंतांचे** शिक्षणाचा प्रकार भिन्न नव्हता. विद्यार्थ्यानें परीक्षा जिंकली नाहीं तरी विशेष फिकीर नाहीं पण विषय जिंकलाच पाहिजे, असा त्यांच्या शिकविण्याचा बाणा

असल्यामुळें, ते बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार इत्यादि विषय गोष्टींची माळ करून शिकवित असत. व प्रत्येक विषयाची उपपत्ति मुखोद्गत करवित असत. यामुळें कोणताही प्रश्न विद्यार्थ्यांस केला असतां त्यास त्याचें उत्तर देणें कठिण वाटत नसे. **बाळाचे** बाळपणीं **भिकाजी कृष्ण पटवर्धन** ह्मणून एक उपशिक्षक **गंगाधरपंतांचे** हाताखालीं असत; ते याचे पहिले गुरु होत. घरांत गडी होता व शाळा बरीच लांब होती, तरी गड्यानें फक्त याची पाटी घ्यावी, याला कडेवर घेऊं नये, अशी **नानांची** कदर होती. यामुळें हा वाटेनें थकला, अथवा घरांत खळीस आला, तरी गड्याचा अधिक उपयोग होत नसे. लहान मुलांस लागोपाठ दोन सुट्या आल्या आणि तिसरे दिवशीं शाळा असली, म्हणजे तो दिवसही पदरीं पाडण्याची लहर त्यांना येते, असा अनुभव मुलांच्या आईबापांना आहेच. त्याप्रमाणें **बाळाला** दोन सुट्या मिळतांचे तिसरें दिवशीं "आळस आला. मी गडे आतां जात नाहीं, दुपारीं जाईन. राहूं का ?" अशी आळ यानें आईजवळ एकदां घेतली होती. माताच ती! आपल्या बाळाचे आळ पुरविणार नाहीं तर कोण पुरविणार ? तिनें 'दोनप्रहरीं शाळेला जाशीलना खचित ?' असा प्रश्न करतांच, ' आई, खचित खचित जाईन ' असें उत्तर दिलें. तों, ' न गेलास तर मारीन बघ !' असें आईनें सांगितलें. तेंही कबूल केलें व त्याप्रमाणें दोन प्रहरीं बाळ शाळेंत गेला. पण **भिकाजीपंताला गंगाधरपंतांचें** भय ! त्यानें सकाळच्या गैरहजेरीचा वचपा दोनप्रहरीं इतका सुरेख काढला कीं, त्या दिवसापासून " मी नाहीं आतां जात " हे शब्द रत्नागिरी सुटेपर्यंत **बाळाचे** मुखांतून पुन्हां निघाले नाहीत ! धारवाडी पूर्णांक व अपूर्णांक प्रचारांत आले होते. तथापि **नानांस** डमार्गनच्या अंकगणिताची मूळपीठिका अधिक पसंत वाटत असल्यामुळें, ते सन १८५० सालीं प्रसिद्ध झालेल्या या मूळ

पीठिकेवरूनच विद्यार्थ्यांस सांगत असत. मुलांची स्मरणशक्ति आणि लक्ष्य लावण्यास हें चांगलें साधन आहे, असें आतां जरी कोणी पाहिलें तरी त्यास वाटणार आहे. बळवंताचे बुद्धिमत्तेस अधिक चळलंन करणारीं जीं दुसरीं कांहीं कारणें आहेत त्यांतील प्रधान कारण, शिक्षण पद्धतीची त्यांच्या वडिलांनीं घालून दिलेली मोड, हें एक होय. गणित विषयांत प्रोफेसराची प्रोफेसरी हालवून सोडण्याचें सामर्थ्य यांच्या अंगीं आलें, तें तरी याच गणिताच्या अध्ययनानें आलें असें म्हणण्यास हरकत नाहीं. या एका अंकगणितांत संख्यालेखनापासून समीकरणें उलगडणें आणि भूमितीला अंकगणित लावून ती प्रमाणें सिद्ध करणें इत्यादिकापर्यंत सर्व प्रकार आहेत. ही मूळ-पीठिका एकदां तयार झाली म्हणजे गणितांतील नड गेली, इतकेंच नाहीं तर विशेष बुद्धिमान् मुलगा असल्यास तो कोणत्याही प्रकारच्या अथवा कितीही मोठ्या संख्येच्या उदाहरणास पाटी पेन्सिल घेणार नाहीं. हेंच गणितज्ञान बळवंतास नानांनीं सांगितलें होतें, नाना व नानांच्या मागून झालेले कित्येक शिक्षक यांची शिक्षणपद्धति अशी असे कीं, तीमुळें विद्यार्थ्यांवर ताडपाठ करण्याचें ओझें फार थोडें पडे. त्यांच्या स्मरणशक्तीस अधिक काम क्वचित् लागत असे. व्याकरणाचे नियम, पुस्तकांतील धडे वाचतांना आणि कवितांचा अर्थ सांगतांना सांगत. भूगोल इतिहास आणि नकाशा ही एकदमच सांगत आणि गणिताचे नियम फळ्यावर उदाहरण करीत असतां सांगण्याची पद्धत असल्यामुळें, वाचनाखेरीज अन्य घोकंपट्टी करण्यांत विद्यार्थ्यांचें रक्त आटत नसे. हल्लीं हा प्रकार अगदीं उलटा झाला आहे याचा अनुभव घरोघर आहेच. ज्यांना बुद्धिवान् मुलांचा सहवास नाहीं, ज्यांच्या स्मरणांतून पूर्वींच्या व हल्लींच्या शिक्षणांतील फरक गेले आहेत, अथवा ज्यांना वारंवार मागें पाहून प्रस्तुतच्या स्थितीची तुलना करण्याची संवय नाहीं, ज्यांना, मौंजीबंधनापूर्वीं


**बळवंताच्या** बुद्धिबलानें पूर्णांक व अपूर्णांक पुरे केले होते, रूपावली, समासचक्र आणि निम्मा अधिक अमर आक्रमून सोडिला होता, आणि एका गायत्रीमंत्राखेरीज नित्य कर्मांतील प्रमुख ब्रह्मकर्म शिलक राहिलें नव्हतें, असें सांगितलें तर आश्चर्य वाटेल. कोणांस हा अतिशयोक्तीचा आणि कोणांस मिथ्यास्तुतीचा प्रकार वाटेल, परंतु तसें वाटण्याचें कांहींएक कारण नाहीं. कां तर आज हा **बाळ** जगमान्य झाला आहे, तो केवळ बुद्धीवर आणि या शिक्षणपद्धतीच्या बलावर झाला आहे. याची बाललीला, बालबुद्धि आणि बालखोडी सांगणारे काका आणि आका असून त्यांच्या स्मरणांत हें सर्व यथास्थित होते. सन १८६४ सालीं

# बळवंताची मुंज.

झाली. त्यावेळची हकीकत सन १९०० सालीं गणेश जोशी पराडकर या वृद्ध जोशीबोवांनीं काशींत सांगितली. त्यांतील मुख्य भाग असा होता कीं, याच्या मुंजीच्या वेळीं जेव्हां याचें अध्ययन पाहिलें तेव्हां हरशास्त्री साठे ह्मणाले. " हा गुरुचरित्रांत वर्णन केलेल्या मुलाप्रमाणें कारणिक होईल. " तेव्हां **नाना** तथास्तु ह्मणून ईश्वरास नमन केल्याप्रमाणें करून ह्मणाले. परमेश्वरानें उत्कृष्ट वनस्पती दिली आहे मग परमेश्वरी इच्छा काय आहे तें सांगतां येत नाहीं. ही खलांत घालून जितकी घोटीन तितकी सुंदर मात्रा तयार होईल यांत संशय नाहीं. **नानांचे** हेंच बोल **गोविंदराव** काकांच्या मुखांतूनही ऐकिले आहेत. ज्या मातेच्या उँदरीं असलें रत्न उपजलें, जिचे कानावर पुत्राची बुद्धिमता आणि विद्वत्ता वारंवार येऊं लागली, त्या मातेस मातृभोजनाचे वेळीं काय वाटलें असेल याचें वर्णन कल्पनेनें जितकें चांगलें होईल तितकें लेखनानें चांगलें होणार नाहीं. इतरांनीं केलेली स्तुति प्रिय असते खरी, तरी पण स्वपतीनें केलेल्या स्तुतीपुढें-

ती स्तुति खीस नीरसच दिसतें. हें स्त्रियांच्या मनोवृत्ति जाणणाऱ्यास सांगणें नलगे. मुंजीचा मुहूर्त साधण्याकडे भटजींचें लक्ष्य असल्यामुळें " आटपा लौकर, आटपा लौकर " म्हणणें व यानंतर **बाळास** आपल्या पुढें आतां भोजनास बसतां येणार नाहीं, म्हणून दोन घास जास्त खाऊं घालण्याकडे मातुश्रींचें लक्ष्य वेधणें यांत किती मोजेचें प्रेम असतें हें सांगून समजण्यासारखें नाहीं, हें लिहितां यावयाचें नाहीं, यदाकदाचित एखाद्या लेखनपटूनें लिहिलें तरी तें मनांत उतरावयाचें नाहीं. याला अनुभवच पाहिजे. या सुखापुढें इंद्रपदसुख तुच्छ आहे, या आनंदापुढें ब्रह्मानंद कमी आहे, व या प्रेमापुढें कैवल्य प्रेमही व्यर्थ आहे असें पहाणारांस वाटेल यांत संशय नाहीं. या मुंजीचे वेळीं ज्या जन्मपत्रिकेचें पूजन केलें ती जन्मपत्रिका अशी होती.

शके १७७८ आषाढमासे कृष्णपक्षे ६ तिथौ सौम्य वासरे घ. २१प.२५ उत्तराभाद्रपदा दिवस नक्षत्रे घ. ४ प.३३ सूर्योदयात् गतघटी २ प. ५ [ ह्मणजे ता. २३ जुलै सन १८५६. ]




**नानांस** शास्त्रीबोवा ह्मणत. हे मोठे नियमित व व्यवस्थेशीर असत. स्नानसंध्या देवदेवतार्चन झाल्याखेरीज अन्नग्रहण व्हावयाचें नाहीं असा त्यांचा नियम असे. विशेष कारण प्रसंगीं देवतार्चन एकादेवेळीं राही, पण त्यांचा नमस्काराचा नियम ते बिछान्यास खिळेपर्यंत कधींहि राहिला नव्हता. **बळवंत** हें सूर्योपा-

सनेचें फल आहे, तेव्हां त्यास तर नमस्कार अवश्य पाहिजेत असें बळवंताचे आईस वाटत असल्यामुळें, **बाळास** "मितलायनमः" ह्मणण्यास येऊं लागल्यापासून नमस्कार घालावयास लावण्याची सुरवात करविली होती. ती मुंज झाल्यानंर सूर्याचे आर्घे व गाईत्रीचे जपाप्रमाणें कायम झाली. मग तान्हनभर संध्येबरोबर नमस्कारासही खो दिल्यास तो उभयतांची नजर चुकवून द्यावा लागे.

या मुंजीचा समारंभ फार चांगला केला होता. यावेळीं सर्व गणगोत, आप्तइष्ट शास्त्रीबोवांनीं बोलाविलें होते. त्या सर्वांस आनंद झाला असेल यांत संशय नाहीं, व नवलही नाहीं. पण या वेळीं रुक्मिणी कुणबिणीचा आनंद आणि उल्हास वाखाणण्या सारखा होता. " ओल्या हाळदीचे दारीं वाळवण, घरीं केळवण बाळूरायाला " हें या बाईचे जात्यावरील पहिलें गाणें सुरू झाल्यापासून तों, मुंज लागे पर्यंत इचे गाण्यांतील " माझा बाळ ' हा शब्द कमी झाला नाहीं ! " आतां माझा लाडू **बाळ** बामन व्हनार, तवा त्येला दहीं भांत खाऊं घालत्यें. " ह्मणून मातृभोजना पूर्वीच इनें आपलें घरचें भोजन उरकून घेतलें ! घाणा भरण्याच्या वेळीं " घाणा भरीयेला, सवाखंडी सुपारी, मांडवी व्यापारी गणराय " " घाणा भरीयेला सव्वाखंडी भाताचा, उदंड गोताचा माझा **बाळ** " ह्मणून मुसळाला हात लावणाऱ्या बायकांत ही होतीच. रुक्मीणीचे प्रेमाचे बोल **बळवंतानें** फोल होऊं दिलें नाहींत. तिचे अंतःकरणांतील गोताचा उदंडपणा जरी अकुंचित होता तरी ज्या अमृतसिद्धि योगावर तिचे मुखांतून हे शब्द निघाले त्याचें फळ **बळवंतानें** आपणास राष्ट्रकुटुंबी ह्मणवून घेऊन खरें केलें. असें याचे पुढील चरित्रावरून दिसून येईल.

मोलकरीण खरी पण ती आपल्या बाळाची संरक्षक व प्रेमाची मोलकरीण असल्यामुळें **नानांनीं** सर्वांस पाठविणीचीं वस्त्रें दिलीं, तेव्हां इला सुंदर उंचीं लुगडें आणि चोळी देऊन खेरीज तिचे पांचही मुलांस धोतरें व थोरल्यास पागोटें दिलें.

मुंज झाल्यानंतर अवघ्या दोन वर्षांनीं ह्मणजे सन १८६६ या वर्षी शास्त्रीबोवा अ. डे. एज्युकेशनल इन्स्पेक्टर होऊन पुण्यास आले. सतरा वर्षे रत्नागिरीस काढिलीं असल्यामुळें हे हजारों लोकांच्या प्रेमपाशांत गुंतले होते. मे. कलेक्टर साहेबांनीं दिलेल्या विशेषणाप्रमाणें यांच्या स्टोअरांतून राजदरबारीं गेलेले अनेक विद्यार्थी तेथील कचेऱ्यांतून आणि तालुक्यांतून मोठमोठ्या दर्ज्यावर असत. यांच्या हाताखालून गेलेले अनेक विद्यार्थी पुणें, मुंबईस इंग्रजी अभ्यास करीत असत, व अनेक तेथील हाय स्कुलांत असत. **गंगांधरपतांची** बदली अधिक किफायतीच्या व अधिक योग्यतेच्या जाग्यावर झाल्यामुळें आनंद, पण असला अंतःकरणपूर्वक शिकविणारा, व परोपकारी शिक्षक रत्नागिरीस मिळणें अशक्य, याचें दुःखमिश्रित झाल्यामुळें कांहीं आठवडे तेथें दुसरा विषयच नव्हता. हे रत्नागिरी सोडून जाणार असल्यामुळें व पुन्हां भेटीची वानवाच असल्यामुळें कित्येक लोक त्यास भेटण्याकरितां रत्नागिरीस येत, कांहीं आपल्या घरीं भोजनास बोलावीत आणि भोजनास फुरसद नसल्यामुळें पानसुपारीस बोलावीत असत. कोणाच्याही आमंत्रणाचा अनादर करावयाचा नाहीं. आपणाकरितां कोणास नाखुष होऊं द्यावयाचे नाहीं, असा यांचा अंगस्वभावच असल्यामुळें यांस घरांतील व्यवस्था करण्यास अवसर सांपडेना. तीच स्थिति पार्वतीबाईची झाली. त्यांचा गोतावळाहि असाच वाढला होता. कांहीं ठिकाणीं दंपत्य तर कांहीं ठिकाणीं अलग. कोठें भोजन, कोठें फराळ, कोठें हळदकुंकू असें चाललेंच होतें. आतां जाण्याची मुदत ठेपलीच तेव्हां गांवच्या लोकांनीं यास सार्वजनिक पानसुपारीचा टोलेजंग समारंभ केला. त्या समारंभाचें अध्यक्षस्थान त्यावेळचे हायस्कूलचे हेडमास्तर पण आतांचे विद्वन्मणी डा. भांडारकर यांच्याकडे होतें. त्या वेळचें अध्यक्षांचें भाषणासह सर्व वर्णन जगान्मित्र, ज्ञानप्रकाशादि पत्रांत आले आहे. त्यावरून **नानां**ची योग्यता स्पष्ट होते.

ते म्हणाले "जुन्या शिक्षकवर्गाचे संबंधानें माझ्या व माझ्या मित्रमंडळींतील बहुतेकांच्या ज्या कल्पना होत्या त्या चुकीच्या होत्या, हे **गंगाधरपंतांनीं** आपल्या कृतीनेंसिद्ध करून दाखविलें आहे. हे जुन्या पद्धतीचे शिक्षक आहेत तथापि कोणी असें समजूं नये कीं, हे नवीन पद्धतीनें शिकलेल्या लोकांस हार जातील. यांची विद्वत्ता, कल्पकता, बुद्धिमत्ता, सदयता, निस्पृहता, परोपकारबुद्धी आणि निरालस्य वागणूक हीं अर्वाचीन मंडळीनें कित्ता घेण्यासारखीं आहेत यांत संशय नाहीं. आपले प्राचीन गुरु कसें असत? असा जर एखाद्यानें प्रश्न केला तर मी यांच्याकडे बोट करून सांगेन कीं, अशा साध्या वृत्तीचे, पण अपूर्वबुद्धीचे ते होते. यांचा खरा परीक्षक जर कोणी असतां तर हे कधींच हल्लींच्या अधिकारावर गेले असते. परंतु यांची खरी परीक्षा करणारा कोणी भेटला नाहीं आणि जे परीक्षक भेटले त्यास संतोष देणारा, पण सुज्ञांनीं त्याज्य मानलेला गुण यांच्यामध्यें नाहीं, म्हणून हे आज सतरा वर्षें येथेंच राहिले. आतां यांचें गमन यांच्या फायद्याच असल्यामुळें आपणास आनंददायक आहे खरें, तथापी आज आपले हातांतील गणिताचा ठेवा, व्याकरणाचा साठा, मराठी भाषेचा समुच्चय, गुरुशिष्यभक्तीचें दुर्मिळ होत चाललेलें भांडार, आपण सोडीत आहोंत असें मला वाटतें तसेंच आपणा सर्वांसही वाटत असेल यांत संशय नाहीं." इ. नव्या शिक्षणांत नवीन पद्धतीनें शिकलेल्या व उच्च पदावर चढलेल्या गृहस्थाकडून मराठी शाळेवरील एका जुन्या शिक्षकास हा मान मिळाला यावरूनच **गंगाधरपंतांची** योग्यता केवढी मोटी होती हें लक्षांत येण्यासारखें आहे.

**गंगाधरपंत** सहकुटुंब पुण्यास आले. या पूर्वींच **बाळाचे** "आदोबा" पुन्हां काशीस गेले. बाकीची मंडळी यांच्या बरोबरच होती. **बाळ** रत्नागिरींत असतां वडिलांची नजर सदोदित त्याज-



कै. गंगाधर रामचंद्र टिळक

जन्म स. १८२० मृ. १८७२

ते म्हणाले "जुन्या शिक्षकवर्गाचे संबंधानें माझ्या व माझ्या मित्र- मंडळींतील बहुतेकांच्या ज्या कल्पना होत्या त्या चुकीच्या होत्या, हे **गंगाधरपंतांनीं** आपल्या कृतीनेंसिद्ध करून दाखविलें आहे. हे जुन्या पद्धतीचे शिक्षक आहेत तथापि कोणी असें समजूं नये कीं, हे नवीन पद्धतीनें शिकलेल्या लोकांस हार जातील. यांची विद्वत्ता, कल्पकता, बुद्धिमता, सद्यता, निस्पृहता, परोपकारबुद्धी आणि निरालस्य वागणूक हीं अर्वाचीन मंडळींनं कित्ता घेण्या- सारखीं आहेत यांत संशय नाहीं. आपले प्राचीन गुरु कसें असत असा जर एखाद्यानें प्रश्न केला तर मी यांच्याकडे बोट करून सांगेन कीं, अशा साध्या वृत्तीचे, पण अपूर्वबुद्धीचे ते होते. यांचा खरा परीक्षक जर कोणी असतां तर हे कधींच हल्लींच्या अधि- कारावर गेले असते. परंतु यांची खरी परीक्षा करणारा कोणी भेटला नाहीं आणि जे परीक्षक भेटले त्यास संतोष देणारा, पण सुज्ञांनीं त्याज्य मानलेला गुण यांच्यामध्यें नाहीं, म्हणून हे आज सतरा वर्षें येथेंच राहिले. आतां यांचें गमन यांच्या फायद्याच असल्यामुळें आपणास आनंददायक आहे खरें, तथापी आज आपले हातांतील गणिताचा ठेवा, व्याकरणाचा साठा, मराठी भाषेचा समु- च्चय, गुरुशिष्यभक्तीचें दुर्मिळ होत चाललेलें भांडार, आपण सोडीत आहोंत असें मला वाटतें तसेंच आपणा सर्वांसही वाटत असेल यांत संशय नाहीं." इ. नव्या शिक्षणांत नवीन पद्धतीनें शिकलेल्या व उच्च पदावर चढलेल्या गृहस्थाकडून मराठी शाळेंवरील एका जुन्या शिक्षकास हा मान मिळाला यावरूनच **गंगाधरपंतांची** योग्यता केवढी मोठी होती हें लक्षांत येण्यासारखें आहे.

**गंगाधरपंत** सहकुटुंब पुण्यास आले. या पूर्वींच **बाळाचे** "आदोबा" पुन्हां काशीस गेले. बाकीची मंडळी यांच्या बरोबरच होती. **बाळ** रत्नागिरीत असतां वडिलांची नजर सदोदित त्याज-



कै. गंगाधर रामचंद्र टिळक

जन्म स. १८२० मृ. १८७२

ते म्हणाले "जुन्या शिक्षकवर्गाचे संबंधानें माझ्या व माझ्या मित्र-मंडळींतील बहुतेकांच्या ज्या कल्पना होत्या त्या चुकीच्या होत्या, हे **गंगाधरपंतांनीं** आपल्या कृतीनेंसिद्ध करून दाखविलें आहे. हे जुन्या पद्धतीचे शिक्षक आहेत तथापि कोणी असें समजूं नये कीं, हे नवीन पद्धतीनें शिकलेल्या लोकांस हार जातील. यांची विद्वत्ता, कल्पकता, बुद्धिमता, सद्यता, निस्पृहता, परोपकारबुद्धी आणि निरालस्य वागणूक हीं अर्वाचीन मंडळीनें कित्ता घेण्या-सारखीं आहेत यांत संशय नाहीं. आपले प्राचीन गुरु कसें असत? असा जर एखाद्यानें प्रश्न केला तर मी यांच्याकडे बोट करून सांगेन कीं, अशा साध्या वृत्तीचे, पण अपूर्वबुद्धीचे ते होते. यांचा खरा परीक्षक जर कोणी असतां तर हे कधींच हल्लींच्या अधि-कारावर गेले असते. परंतु यांची खरी परीक्षा करणारा कोणी भेटला नाहीं आणि जे परीक्षक भेटले त्यास संतोष देणारा, पण सुज्ञांनीं त्याज्य मानलेला गुण यांच्यामध्यें नाहीं, म्हणून हे आज सत्तरा वर्षें येथेंच राहिले. आतां यांचें गमन यांच्या फायद्याच असल्यामुळें आपणास आनंददायक आहे खरें, तथापी आज आपले हातांतील गणिताचा ठेवा, व्याकरणाचा साठा, मराठी भाषेचा समु-च्चय, गुरुशिष्यभक्तीचें दुर्मिळ होत चाललेलें भांडार, आपण सोडीत आहोंत असें मला वाटतें तसेंच आपणा सर्वांसही वाटत असेल यांत संशय नाहीं." इ. नव्या शिक्षणांत नवीन पद्धतीनें शिकलेल्या व उच्च पदावर चढलेल्या गृहस्थाकडून मराठी शाळेवरील एका जुन्या शिक्षकास हा मान मिळाला यावरूनच **गंगाधरपंतांची** योग्यता केवढी मोठी होती हें लक्षांत येण्यासारखें आहे.

**गंगाधरपंत** सहकुटुंब पुण्यास आले. या पूर्वींच **बाळाचे** "आदोबा" पुन्हां काशीस गेले. चाकीची मंडळी यांच्या बरोबरच होती. **बाळ** रत्नागिरीस असतां वडिलांची नजर सदोदित त्याज-



कै. गंगाधर रामचंद्र टिळक

जन्म स. १८२० मृ. १८७२

वर असल्यामुळें याच्या अंगच्या इतर गुणांचें चित्र रेखाटण्यास योग्य साधन नव्हतें तें पुण्यास आल्यानंतर मिळालें. सर्व विषयांचें अध्ययन स्वभाषेंत झाल्यास इंग्रजी शिकण्यास फार श्रम पडावयाचे नाहींत, असें **गंगाधरपंतांचें** मत असल्यामुळें त्यांनीं **बळवंतास** इंग्रजी शाळेंत न पाठवितां मराठी शाळेंत घातलें. तेथें दादोबांचें व्याकरण, केरुनानांचें अंकगणित, जेम्स हडन आणि ब्ल्यांडचे बीजगणित चालूं होतें. **बळवंतास** अंकगणित अथवा व्याकरण नजर टाकण्यापलीकडे जास्त करावें लागलें नाहीं. बीजगणिताची मूलतत्त्वें, आणि समीकरणें अंकगणित चांगलें तयार असल्यामुळें अल्पायासांत आलें व युक्लीडची दोन पुस्तकें तयार झालीं. मुंजी नंतर दोन वर्षांतच संस्कृत इतकें तयार झालें होतें कीं, बराचसा कठीण श्लोक **बाळ** अल्पावकाशांत लावूं लागला होता. या शाळेंत असतां याच्या अंगच्या आणखी कांहीं गुणांचे दर्शनास प्रारंभ झाला. तो असा.

एके दिवशीं शिक्षक शाळेंत नसतां कांहीं विद्यार्थ्यांनीं भुइमुगाच्या शेंगा आणिल्या आणि खाल्या, पण त्यांचीं फोलकटें भरून टाकण्याचें तसेंच राहिलें. मुलें शेंगा खात होतीं तेव्ह **बाळही** तेथेंच पण दुसरें नादांत होता. शिक्षक आल्यानंतर त्यानें हा कचरा कोणी केला.याची चौकशी केली. इतर मुलांबरोबरां याचेंही नांव आलें. शिक्षकानें, ज्यांनीं शेंगा खाल्या त्यांनीं फोलकटें भरूनें टाकावी असा हुकूम केला. तेव्हां इतर मुलें गेली आणि त्यांनीं कांहीं फोलकटें भरून टाकिलीं, व कांहीं **बाळा**करितां तशींच ठेवली. **बाळानें** शेंगा खाल्या नसल्यामुळें त्यानें फोलकटें काढिलीं नाहींत. सर्वांनीं फोलकटें काढिलीं आणि तूं काढिलीं नाहींस ? म्हणून विचारतां यानें मी शेंगाच खाल्या नाहींत सबब काढीत नाहीं असें सांगितलें. हा नजिक असल्यामुळें मुलें यानें शेंगा खाल्या म्हणत व हा नाहीं म्हणें. शिक्षकास इतर मुलांचें खरें वाटून त्यानें यास तीं काढावयास सांगितलीं. यानें

पुन्हा तेंच उत्तर दिलें. तेव्हां शिक्षकास राग येऊन दुसऱ्यानें फोंलकटें केली असलीं तरी तूं नजीक होतास तेव्हां तूं काढलीं पाहिजेत, असें सांगितलें. यानें मी काढणार नाहीं म्हणून साफ सांगितलें. तेव्हां शिक्षकानें छडी हातीं घेतली व यानें दप्तर गुंडाळलें. त्यावर शिक्षकानें **बाळाच्या** घरीं चिठ्ठी लिहून यास शेंगा दिल्या होत्या कीं काय ? ह्मणून विचारलें असतां, त्यांनीं उत्तर पाठविलें कीं, बाजारांतून जिन्नस घेऊन खाण्याची अथवा घरांतील पदार्थ बाहेर नेऊन खाण्याची आमचे मुलांस संवय नाहीं; व तो शाळेंत अथवा रस्त्यानें, किंवा हौदावर कधींही खावयाचा नाहीं. आम्हांला जे पदार्थ योग्य वाटतील तें आणून आम्ही घरीं देत असतो. खेरीज त्याचें लक्ष किरकोळ खाण्याकडे फारसें नाहीं. हें उत्तर आल्यानंतर शिक्षक थंड झाले.

सुखाचें मागें दुःख, व दुःखाचें मागें सुख हें रहाटगाडगें सदोदित चाललें आहेच. ज्या ठिकाणीं सुखवृद्धि झाली त्याच ठिकाणीं एकदम दुःख आलें म्हणजे त्यासारखें तापत्रय दुसरें नाहीं. **पार्वतीबाई** नुकतींच मास्तरणीची डेपुटीणबाई झालेली, व्याह्याविहिणीं पुढें घासलेल्या नाकाचें उसने **बाळाचें** लग्नांत काढून घेईन या हुरुपांत असलेली, आपण पुण्यासारख्या शहरांत आहोंत, मोठ्या लौकिकांत आणि श्रीमंतींत आहोत तेव्हां आपली सून डगडगीत दिसली पाहिजे म्हणून इकडें कसर कर, तिकडे काटकर आणि मोत्यांचें चार दाणेंच घे, बारिक सारिक सुवर्णरज एकत्र करून त्यांची पुडी करून ठेव, सुनेच्या श्रावणपाटीस लहानसान भांडी लागावयाचीं तीं जुन्या जुन्हेऱ्यांवर घेऊन ठेव, या व्यवधानांत दंग होती. पण परमेश्वरी संकेत तसा नव्हता **बळवंता**करिनां गौरिपूजन करित असलेल्या कन्येस सासूचा आणि या सासूस सुनेचा लाभ करून देण्याचें याचें मनांत नव्हतें. यानें याच वर्षांचे आषाढ वद्य ४ थीस **पार्वतीबाईस** या संसाराचे ऐन बहारीचे पसाऱ्यांतून काढून नेलें!

वृक्ष वाढिला लागला आहे, त्याची छाया दाट व शीतल झाली आहे, त्याचीं फुलें कांहीं पाडास आलीं असल्यामुळ त्यावर शुकसारिकादिपक्षी मोठ्या आनंदानें डुलत आहेत, कांहीं फळें फुलांतून नुकतींच बाहेर पडण्याचे रंगांत असल्यामुळें त्याच्या पक मकरंदास लुब्ध झालेले भ्रमर त्या भोंवती गुंजाराव करित आहेत, अशा बहारीचे वहरावर एकाकी वीज कडाडून पडली असतां तो वृक्ष जसा रुक्ष व दुःखास कारण होतो, तद्वत **गंगाधरपंतांचें** संसारवृक्षावर ही वीज पडून त्याचा नाश झाला ! ! हा प्रकार यांच्या पुरतांच झाला असें नाहीं. **गंगाधरपंत** अवघे सतरा वर्षांचे असतां तें मातृसुखास अंतरलें. **पंतांचे** वडिलासही, मातृसुख मिळालें नाहीं आणि **बळवंत** तर अवघ्या दहावें वर्षींच ( शके १७८८ अषाढ वद्य ७ ) स मातृछत्रांतून बाहेर पडला ! ! तेव्हा अर्थातच काकी, मामी या मातृस्थानीं आल्या ! !

मातृवियोगाचे दुःखांत चार सहा महिने गेले व मराठी शाळेंतील अभ्यासही पूर्ण झाला. तसेंच बी. ए. च्या परिक्षेपर्यंत पुरेल इतकें संस्कृतही झालें आहे असें वाटल्यावरून **गंगाधरपंतांनीं** यास सिटी स्कुलांत घातलें. तेथें दोन वर्षांत तीन इयत्ता पूर्ण केल्या. या शाळेंतही शिक्षकांचें व याचें पटत नसे. त्यानें गणित सांगितलें म्हणजे यानें तें तोंडानें करावें. त्यानें पाटीवर कर म्हटल्यास पाटी कशाला पाहिजे ? म्हणून याचा प्रश्न आहेच. त्यानें स्मरण वही आणावयास सांगितली तरी ती कशाला हवी ? हा याचा प्रश्न. त्यानें फळ्यावर उदाहरण करावयास सांगितलें म्हणजे खडूनें कोण हात खराब करतो, म्हणून तोंडानेंच सांगण्यास प्रारंभ करावा. असे कांहींना कांहीं प्रत्येक वेळीं यांचें तेढें असावयाचेच. एकदां शुद्ध लिहिणें सांगत असतां " संत " शब्द तीन चार वेळ आला. तो या विद्यार्थ्यानें एकसारखा न लिहितां एके ठिकाणीं ' संत ' दुसरीकडे

'सन्त' तिसरे जागीं 'सनूत' असें लिहून ठेविलें. शिक्षकानें पहिला शब्द कायम करून बाकीच्या चुका धरल्या. त्यावरून तंटा वाढला. तो इतका कीं अखेर तो हेडमास्तरपर्यंत जाऊन जेव्हां व्यवस्था लागली व ती आपल्या मनाप्रमाणें लागली तेव्हां स्वारी स्वस्थ झाली. अशा योग्य पण वरिष्ठांबरोबर तंटे करण्यामुळें याचें नांव हुषार पण तंटेखोर, बुद्धिमान पण हट्टी अशा सदरांत गेलें.

**बळवंताला** द्वैतभाव कसला तो माहीत नाहींच. जसा आईपाशीं हट्ट करी तसाच **काकी**जवळ; **काका**जवळ जो नामुना तोच **नाना**जवळ आणि तसाच शाळेंत ! **नाना, काका** हट्ट पुरवीत अथवा समजुतीचे अन्य मार्गानें कमी करीत असत. तसें दुसरें कोण ऐकतो ! याच शाळेंत असतां ह्मणजे अवध्या बारावें वर्षीं **बाळानें** बाणभट्टाची संस्कृत कादंबरी मागितली. त्यावेळीं त्याला तिची गरज नव्हती आणि ती कादंबरी वाचण्यासारखें अध्ययनही झालें नव्हतें. ह्मणून त्यांच्या मनांत ती यास द्याव-याची नव्हती. परंतु जे शहाणे बाप व उत्तम शिक्षक असतात ते आपल्या अधिकाराचा दुरुपयोग न करण्यांत मोठे दक्ष असतात. **नाना** हे यापैकींच एक असल्यामुळें त्यांनीं त्यास न सुटेल असें एक उदाहरण सांगितलें आणि म्हणालें, हें उदाहरण सोडीव ह्मणजे कादंबरी देतों. **बाळानें** तास दीड तास झटपट्या खाऊन अखेर उदाहरण सोडवून **नानास** दाखविलें. तें बरोबर आहे असें पहातांच त्यांनीं **बाळाची** पाठ थोपटली आणि लागलींच बाजारांत जाऊन कादंबरी आणून त्यास दिली. तेव्हां ह्मणालें "जर याच्या बुद्धीवर चालू कुसंगतीचें मलम आलें नाहीं तर हा टिळकांचे कुलास तिलक होईल यांत संशय नाहीं" वडिलांचा हा आशिर्वाद टिळकांचे कुळा पुरतांच होता पण यानें आपल्या बुद्धिवैभवानें राष्ट्रतिलक बनून वडिलाचे आशिर्वादकार्पण्य स्पष्ट केलें.

सिटिस्कुलांत तीन इयत्त झाल्या आणि चौथी शिकण्याकरितां हायस्कुलांत जावयाचें तों दिपवाळीची सुट्टी आली; ह्मणून त्या वेळीं शाळेंत न जातां १८६९ चे दिवाळीनंतर हायस्कुलांत गेला. गणित, व्याकरण, संस्कृत, हिंदुस्थान आणि इंग्लंदचा इतिहास मराठी मध्यें तयार झाला होता. हायस्कुलांत फक्त हेच विषय पण भिन्न भाषेंत तयार व्हावयाचे होते. तेवढ्याकरितां वर्ष कोण घालवितो असें योजून हा हायस्कुलांत पांचवें इयत्तेंत गेला.

वत्सलाहरणाचे प्रसंगीं घटोत्कचानें मायेचा बाजार भरवून त्यांत मोह उत्पन्न करण्यासारख्या अनेक चिजा मांडल्या होत्या, आणि त्याहीपण जुनें देऊन नवें घ्यावें अशा हेतूनें मांडल्या होत्या; तोच प्रकार इंग्रजी पदार्थांच्या मोहमायेंत असल्यामुळें आमची मंडळी आपलें जुनें देऊन नवें घेण्यांत दंग झाली होती. **बळवंत** इंग्रजी शिकावयास लागला तेव्हां अर्थातच त्यास इंग्रजी मायेनें मोह घातला. पण ही इंग्रजी माव आपणास घरचे मनुष्यांकडून काव काव करावयास लावील, ही कल्पनाही त्याचे मनांत नसल्यामुळें त्यानें एक सुंदरसा, उत्कृष्ट प्रकाश दाखविणारा कांचेचा दिवा विकत घेऊन आपला मिणमिणा दिवा बाजूस ठेवला! आठचार दिवस झाले, स्वारी स्वतः हातांत फडकें घेऊन दिवा साफ करावयास बसली. इकडून एक हात, तिकडून दुसरा हात फिरवितांना चिमणी हातांतून सटकन् निसटली आणि जमिनीवर आपटून फटकन् फुटली! ती सावरण्यास गेला तों खालचे भागास धक्का बसून तो पडला व त्यास भोंक पडून आंतील तेलाचा भळभळाट सुरूं झाला; कपडे, कागद व हात खराब झाले. मग स्वारी बोलते कशाला! सारा कारभार गपचुप आणि अंधेरांत करूं लागली! खोडी केली अंधेरांत पण ती आली उजेडांत! ' कारे **बाळा**, आज अभ्यास नाहीं कां तुला ?' म्हणून **नानांनीं** विचारिलें पण त्यांना उत्तर कोण देणार! **बाळ** इतके लौकर कां निजला? म्हणून **नाना**

तेथें येऊन पाहतात तों दिव्याच्या कांचा ज्ञानप्रकाश पत्राचे एके अंकावर भरून ठेविल्या आहेत, तेलानें बरबटलेल्या वह्या व कागद निरनिराळे पसरून ठेविले आहेत, आणि खराब झालेल्या बंडीचा आणि धोतराचा बोळा एका कोंपऱ्यांत ठेवून **बाळ** मुरगुस मारून एका बाजूस निजला आहे ! हें पाहून **नानास** रागाऐवजीं हसूं आलें. त्यांनीं **काकास** हांक मारिली आणि ते येतांच रागाचा आविर्भाव आणून ह्मणाले, आपले लाडांचा हा परिणाम पहा ! असले भिकार लाडानें मुलें मात्र बिघडतात ! इतकें बोलत **नाना** व **काका** बाहेर गेले. **बळवंताला** झोंप कसली ! तो मारांतून तूर्त तरी बचावलों याच आनंदांत सरळ निजला या वेळेपासून पुन्हां यानें या दिव्याचा नाद सोडला.

**बळवंतराया** पांचवे इयत्तेंत जाऊन त्याची स्थिरस्थावरता होते न होते तों **नानांची** पुण्याहून ठाण्यास बदली झाली. कारण पुण्यास रा. सा. सिताराम विश्वनाथ पटवर्धन हे डे. ए. इन्स्पेक्टर झाले. यांचें व त्यांचें पटेना. ( रा. साहेबांच्या अंगस्वभावाच्या संबंधानें येथें लिहिण्याचें आगत्य नाहीं. कारण त्यांचे कारकीर्दीचे पोंवाडे गाणारे अनेक शिक्षक या व वऱ्हाड प्रांतीं आहेत व ते आणखी एक दोन पिढ्या तरी त्यांचे गुण गातील यांत संशय नाहीं. हे वऱ्हाड प्रांताचे डायरेक्टर होते. यांनीं अंकलिपी, महाराष्ट्रभूगोल वगैरे धनोत्पादक ग्रंथही केले तथापि यांच्या स्वभावांत बदल झाला नाहीं असें ह्मणतात. ) या उभयतांची कागदोपत्रीं, समोरासमोर, नेहमीं हमरीतुमरी चाले. डायरेक्टरपर्यंत तक्रारी जात आणि गंगाधरपंतांची सरशी झाली ह्मणजे ते चुरमुरे खात बसत. अशा पांच चार खेपा झाल्या. तेव्हां **सितारामपंत** डायरेक्टर साहेबांकडे समक्ष गेले; आणि त्यांनीं आमची उभयतांतून एकाची तरी बदली करा असें मागणें मागितलें. तेव्हां **गंगाधरपंतांची** बदली ठाण्यास झाली. सन १८७० सालीं हे ठाण्यास गेले. या वेळीं यांची प्रकृति आजारी होती तथापि

पील साहेबांच्या हुकमाप्रमाणें प्रतिवर्षीं [illegible] शाळा तपासण्यास **नानांनीं** कमी केलें नाहीं.

वडिलांची आणि त्यांच्या वरिष्ठांची झटपट उडून वडिलांनीं पुणें सोडिलें; त्याचप्रमाणें चिरंजिवाची आणि हायस्कूलचे हेड-मास्तर मे. जेकब साहेब यांची लठ्ठालठ्ठी होऊन चिरंजिवांनीं हायस्कूल सोडलें; त्याचें कारण असें. त्यावेळीं हायस्कुलांत संस्कृत शिकविण्याकरितां स्वतंत्र शास्त्र्याची योजना केलेली असे. त्यांनीं नैषध काव्याचें भाषांतर घेण्यास सर्व विद्यार्थ्यांस सांगितलें यांना त्याची गरज नव्हती ह्मणून यांनीं तें घेतलें नाहीं. पुढें कांहीं दिवसांनीं चौकशी करितां यांनीं तें घेतलें नाहीं, असें समजलें; व त्याचें कारणही सांगितलें कीं, भाषांतर स्वतः कर-ण्यानें जितका फायदा होतो तितका भाषांतरावर अवलंबून राहि-ल्यानें होत नाहीं, सबब मी तें घेतलें नाहीं, व घेणारही नाहीं. शास्त्रीबोवास हें म्हणणें बरेंचसें रुचलें, पण आज्ञाभंगाचा राग आला व त्यांनीं तें घेतलें पाहिजे असें सांगितलें. तथापि **बळ-वंतरायानें** जो एकदां नकार घेतला तो फिरविला नाहीं. शेवटीं शिक्षेवर प्रकरण आलें. तेथेंही यांनीं हात पुढें केला नाहीं; म्हणून हा तंटा जेकबसाहेबांपर्यंत गेला. जेकब साहेबांना **बळवंताचें** उत्तर मानवलें, तरी त्यांनीं गुरुबरोबर दांडगाई केल्याचा आरोप कायम करून शिक्षा घ्यावी अगर शाळा सोडावी, असा हुकूम केला. तो ऐकतांच जुगदान बगलेंत मारून स्वारी घरीं आली आणि दुसरे दिवसापासून **बाबा गोखल्यांचे** शाळेंत जाऊं लागली. **बाबा गोखले** यांची शाळा या वेळीं भरभराटींत होती ती अभ्यासाचे चांगुलपणामुळें होती असें म्हणण्यापेक्षां फीचा दर कमी आणि उडाणटप्पू, खेळकर व चैनी मुलांस सोयीची होती असें ह्मणत असत. या शाळेच्यासंबंधानें कै. **विष्णुशास्त्री चिपळुणकर** यांच्या चरित्रांत बरेंच लिहिलें आहे सबब त्याचा अधिक विस्तार येथें करण्याचें कारण नाहीं. तरी इतकें सांगणें जरूर

आहे कीं, बाबांची शाळा **बळवंतरायास** आवडली नाहीं. जेकब साहेब जाऊन कै. **महादेव मोरेश्वर कुंटे** तेथें येतांच **बळवंत** पुन्हां हायस्कुलांत आला.

**नाना** ठाण्याहून पुण्यास आले असतां **बळवंताचे** अभ्यासस्थलीं त्यानें एक सुंदर नकशी काढलेली वही त्यांचे दृष्टीस पडली. ती हातीं घेऊन पाहिली तों, आंत " गतप्रत्यागतोपयोगी शब्दाः " या सदराखालीं "नयन, नर्तन, कनक, कटक, महिम, मरिम, करंक,कलंक,कालिका,कारिका," इत्यादि सुमारें शंभर शब्द, " हे लोक गणितविद्येंत फार प्रवीण आहेत, यांचा बादशहा विद्येचा मोठा पुरस्कर्ता आहे. " इत्यादि भाषांतराकरितां दिलेलीं वाक्यें, " कर्तृकर्मगुप्तकं " या सदराखालीं " मानकोपहृते पुंसि, शाश्वती स्थितिमाश्रयेत् " हा, " संबंधकूटं " या सदराखालीं " बालया पृथ्वीपाल " हा, "अर्धमात्राच्युतक" या खालीं "मर्ध्ये सूरिसभं भूरि स्वीकृतानगसंगमा ' हा, " पट्टिशबंधः " याचे खालीं " महेश ! ममताराम अव मामरोत्तम । महत्तम ! महोधाम ! मतिस्तोम ! मनोन्मे ! ' असा, " द्व्यक्षर " या सदराखालीं " नानानुमान मननानमनान्मुनिनां " असा " गौरंगौरी गुरोरंग, गरागारं, गुरूरगं " याचेच खालीं " सासुरासुर संसार सारा ! सरस सारसा । ससार सा रसासारा सासुरं सुरसा सरित् " असा साग्र व पदच्छेद केलेला श्लोक असून षोडशदलपद्म,अष्टदलपद्म इत्यादि अनेक चक्रें निरनिराळ्या श्लोकांनीं भरलीं आहेत, व अखेर शिशाचे लेखणीनें स्वरचित तीन श्लोक घातले आहेत, व ता० १३ जुलै सन १८७१ रोजीं केलेलें इंग्रजी भाषांतर आहे. हें सर्व पाहून याच्या उद्योगासंबंधानें **नानांस** समाधान वाटलें. **नानांनीं** वाचलेले श्लोक आणि पाहिलेलें इंग्रजी, पहाण्याची इच्छा वाचकांसहि होईल सबब यांनीं केले तेवढेच उतारे खालीं देतों.

सदागुणज्ञः सुपरीक्षणाय यं, कवींद्रकाव्यामृतकांचनस्य वै ॥ करोति लोके निकषं नु दुर्जनं, खलाय तस्मायहिताय मे नमः॥१॥ कृशानुतापः कुरुते यथामलं मलं गृहीत्वा वपनस्थजीवनं। । तथाकरोत्येव च यः सतोहितः, खलाय तस्मै प्रथमं नमोस्तु ते ॥२॥ यथा पयस्येव घृतं हि वर्तते, तथापि लोके सहतेऽतितप्ततां॥ प्रयाति शुध्दिं च तदा ततोमृतं, खलस्य तोषे कथिता तथा शुचिः ॥ ३ ॥

अगोदर कागद् फ्रेंच, त्यांत पाण्यानें भिजलेले आणि त्यांत शिशाचे लेखणीनें खरडलेलें असल्यामुळें कांहीं ठिकाणीं बरेंच अस्पष्ट झालें आहे. तसाच प्रकार पुढलि इंग्रजी भागाचाही झाला आहे.

13 July 1871.

Next day Vasumati came to her husband holding a child near her bosom; and she, being asked " when you have got him " spoke to the king; "In the last night a certain fair woman placing him before me and making me awake spoke that, she was the wife of Kamapal son of Dharmapal your minister, her name Taravati a daughter of Manibhadra, and she was formerly a wife of Yaksha. By the consent of the lord of Yakshas she has offered her son to serve my son Rajvahan, who is to be the lord of the earth bounded by oceans and whose fame is unpolluted.

आतां वर जे श्लोकांचे अर्धे चरण अथवा कांहीं स्थलीं कांहीं

शब्दच दिले आहेत तसे आणि तेवढेच शब्द आम्हांस मिळालेल्या बाडांत आहेत असें वाचकांनीं समजूं नये. ते श्लोक तेथें साद्यंत उतरलेले आहेत, इतकेंच नाहीं तर त्याचे संस्कृतांतच केलेले अर्थही त्यांत टिपून ठेविलें आहेत. तें सर्व प्रकरण दाखल केल्यास भाग फार वाढेल सबब थोडक्यांत घेतलें आहे. तसेंच यांनीं मूळ श्लोकावरून तयार केलेलीं चक्रें मासल्याकरितां कांहीं दिलीं आहेत. हें इतकें तरी घेण्याचें कारण हेंच कीं, अवघ्या १४।१५ ये वर्षी यांचें संस्कृत व इंग्रजी भाषेंत अध्ययन कितपत झालें होतें हें वाचकांस समजावें.

## बळवंताचें लग्न.

**नाना** ठाण्यास गेले, व **बळवंत** काकाजवळ होता. त्याचा अभ्यासक्रम सुरेख रीतीचा असल्यामुळें त्यास मुली सांगून येऊं लागल्या. एक रंगानें फारच काळी म्हणून, दुसरी अशक्त म्हणून, तिसरी दीपमाळ म्हणून, चौथीचे षडाष्टक म्हणून पटेना. असें होतां होतां लाडघर तालुके दापोली येथील **बल्लाळ बाळ** यांची कन्या **तापीबाई** रंगानें नेमस्त पण बहुगुणांनीं योग्य ठरल्यामुळें पसंत होऊन सन १८७१ चें वैशाखांत यांचे लग्न करण्याचा निश्चय झाला.

**बाळांचें** घराणें बालबोध व औदार्यांत प्रसिद्ध असे. आल्या अतिथीस अन्न मिळण्याची कधींही पंचाईत नव्हती. यांच्या धर्मौदार्यासंबंधानें अनेक गोष्टी ऐकण्यांत आहेत परंतु तितक्या येथें देणें अशक्य आहे. तथापि गरीब ब्राह्मणास घरें बांधून देऊन त्यास एक वर्षाचे चरितार्थाची सोय करून दिलेलीं घरें लाडघरीं अद्याप यांचें स्मरण करीत आहेत. कोंकणांत चोरट्यांचा उपद्रव फार असल्यामुळें लोकांस आपली चीजवस्त मोठ्या बंदोबस्तानें ठेवावी लागे, त्याप्रमाणें यांनीं आपले घरांतील दागिने तांदुळाच्या निरनिराळ्या भोतांत टाकून ठेविले होते.

एकदां असें झालें कीं, दारावर एक भिकारी आला. त्यास तांदुळ वाढण्याकरितां ओंजळ भरून बाहेर आणिली. तों तींत सोन्याचे सरीचें गुंडाळें केलेलें दृष्टीस पडलें. भिक्षा वाढतांना वाढणारा ती सरी काढून घेऊं लागला. तेव्हां **तापीबाई**च्या तीर्थरूपांनीं धर्मार्थ काढलेल्या तांदुळांत जरी सरी आली आहे तरी ती धर्मच झाली असें सांगून त्या सरीसह तांदुळ धर्म केले ! अशा औदार्य-शाली घराण्यांतील वधू **बळवंतरावास** नेमस्त झाल्यामुळें **नानांनीं** दुसरे कोणतेही गोष्टीकडें लक्ष दिलें नाहीं. लग्नाचे वेळीं **बळवंत**रावास मात्र छत्र नव्हतें तसेंच **तापीबाई**सही छत्र नव्हतें.

वैशाख महिना हा उन्हाळ्याचा होता. तरी शाळेच्या सुटीचा असल्यामुळें सोईस्कर होता. **नानांचे** आजोबापासून असा सांप्रदायच असे कीं, कोणतेंही मंगलकार्य करावयाचें असल्यास तें आपले गांवीं, आपले वास्तुखालीं करावयाचें. या सांप्रदा-याप्रमाणेंच **नानाही** वागत असत. त्यांनीं आपले आप्तसोयरे जसे जमा केले तसे वऱ्हाड्यांनींही आपले आप्तसंबंधी चिखल-गांवास आणिले. लग्नाचे वेळीं **तापीबाई** बऊ वर्षांच्या असून अंगलटानेंही चांगल्या असल्यामुळें ही राधाकृष्णाची जोडी ठीक आहे असें सर्वांस वाटलें. सुनमुखाचे वेळीं यांचें नांव ' **सत्य-भामा** '' असें ठेविलें कारण

**सत्यापरता नाहीं धर्म। सत्य तेंचि परब्रह्म।**
**सत्यापाशीं पुरुषोत्तम। सर्वकाळ तिष्ठत ॥**

सत्या परता धर्म नाहीं, सत्याखेरीज दुसरें परब्रह्म नाहीं, ह्मणूनच पुरुषोत्तम नेहमीं सत्याजवळ असतो असें ज्ञानेश्वरांनीं म्हटलें आहे. अशा थोर सत्याची शिक्षा व दीक्षा आपले **बळवं-तास** दिली आहे तेव्हां अशाची भामाही पण तशीच असली पाहिजे म्हणून, अथवा बळवंताकडून चुकून असत्याचरण होण्याचा समय आल्यास सत्यभामेनें आपल्या दर्शनानेंच

त्यास सावध करावें अशा हेतूनें **तापीबाईचें** नांव " **सत्य-भामा** " ठेविलें असावें असें दिसतें. **सत्यभामाबाई** तरी-नांव घेण्याचे प्रसंगीं उखाणें घेत, त्यांतही "नारळीचे बनांत स्वच्छ पाण्याचा झरा, आणि **सत्यभामेच्या** अंगठीवर **बळवंतराव** हिरा " असाच अर्थ नेहमीं असे. या लग्नाचे वेळीं **बळवं-तरावास** आईची आणि आजोबांची आठवण होणें साहजिक आहे. फार तर काय पण मातृभोजनाप्रमाणें सुनमुखाची साखर तिचे हातून सुनेचे मुखांत गेली असती तर चांगलें झालें असतें असे उद्गार **नानांचे** मुखांतूनही निघाले. मौंजिबंधनाचे वेळीं आजोबा होते तसेच यावेळीही यावयाचे, परंतु लग्ननिश्चया-पूर्वीं एक महिना सर्वसंगपरित्याग करून त्यांनीं संन्यासाश्रम धारण केला होता, यामुळें साराच ग्रंथ संपला. **नाना** मात्र त्यांच्या तेथील शुश्रूषेंत असलेल्या भटजीकडे खर्चाकरितां पैसे पाठवीत असत. वैशाखांत लग्न झालें, तेव्हां अर्थातच **बळवं-तास** प्रौढपणा आला. अंतःकरणाचे माये खेरीज " अरे, शब्द येणें कठीण आहे. ती मायेची माय पूर्वींच निघून गेली होती. **नाना, काका** व **आका** हीच कायतीं अरे म्हणणारीं काळ-जीचीं माणसें, तींही याजकडे अनेक विद्यार्थी गणिताची समजूत घेण्याकरितां येऊं लागले, कोणी संस्कृत समजून घेण्यास येऊं लागले, तेव्हां त्यांच्या समक्ष अरे म्हणण्यास संकोचूं लागून **बळवतराव** म्हणूं लागलीं. " **बळवंतराव** हा शब्द योज-ण्यास वयाची कबूली नसली तरी विद्वत्ता वयाचे पांचपटीपेक्षांही जास्त वाढली असल्यामुळें आतां यांस " राव " या सन्मा-नार्थी शब्दानें बोलावणेंच योग्य होतें.

रा. रा. **काशीनाथपंत दातार** हे हल्लीं बार्शीस मराठी शाळेवर मास्तर आहेत. हे याच ( १८७१ ) वर्षी पुण्यांतील ट्रेनिंग कालेजांत होते. हे पूर्वीं वेदाध्ययन करीत असल्यामुळें शाळेच्या अभ्यासास फारच उशीर झाला होता. हे ट्रेनिंग काले-

जांत असतां तेथें **निळकंठशास्त्री साठे** शिक्षक असत. दातारांना ग्रंथावरून व्याकरण लावण्याची पद्धत माहित नसल्यामुळें नडत असे. ते शिकण्याकरितां जमखिंडीकरांचे वाड्यासमोर त्याच कालेजांतील शिक्षक रहात असे त्याकडे जात असत. त्याच वाड्यांत टिळकही रहात असत. ज्या शिक्षकाकडे हे शिकावयास जात त्यानें **दातारांस** सांगितलें कीं, जर तुह्मास ग्रंथावरून व्याकरण शिकावयाचे आहे तर तुह्मी नानासाहेब टिळकांचे मुलाकडे जा. तो मजपेक्षां तें चांगलें सांगेल. या शिक्षकाचें हे सांगणें त्यास प्रथम खरें वाटलें नाहीं. कारण १४।१५ वर्षांचें मूल व्याकरण किती सांगू शकेल ? परंतु अनुभव पहावा ह्मणून हे त्याजकडे गेले. त्यानें पहिले दिवशीं ग्रंथावरून व्याकरण करण्याची रीत इतकी सुरेख सांगितली कीं, तशी फारच थोड्या शिक्षकांस सांगतां येईल. नंतर दातार सात आठ वेळ जाऊन ग्रंथावरून व्याकरण लावण्यास शिकले. अशास मूल समजून **बळवंत** ह्मणण्यापेक्षां विद्वान समजून **बळवंतराव** ह्मणणेंच चांगलें. दुसरें, " **राव** " हें पद **सत्यभामाबाईनीं** अनेक लोकांसमोर दिलेलें आहे तेव्हां तें न जुमानणें हें दांडगेपणाचें दिसेल सबब आपणही यांस यापुढें **बळवंतरावच** ह्मणूं या.

लग्न होऊन महिना दीड महिना झाला नाहीं, तोंच **काका** श्रावणपाटीचें सामान थोडथोडें घेऊं लागले तेव्हां अगोदर आषाढपाटी आल्याखेरीज श्रावणपाटी जाणार नाहीं हें ठरलेलेंच. तेव्हां आषाढपाटी येणार त्यांत विटीदांडू, लगोरी, चेंडू, साधा भोंवरा, जंगी भोंवरा, सोंगट्या, बुद्धिबळें, कलमदान, लेखण्या ठेवण्याचें नळकांडें वगैरे सटर फटर सामान यावयाचें, याचा काय उपयोग ? " हातपाय लुले तोंड चुरचुरा बोले " याप्रमाणें यांची शरीरसंपत्ती ! चेंडूबरोबर उडावें कोणी; भोंवऱ्याबरोबर धांवावें कोणी; चेंडूसाठीं पळणार कोणीकडे, कुईल पेन, टांक, आणि पेन्सल यांच्यासाठीं " शेट सवाशेर व लिंग अडीचशेर ,' प्रमाणें नळकांडें बाळगावें कोणी ? जुगदानांत हें थोडेंच मावणार आहे ! एक

चिनी मातीची दौत, घातला बूच कीं टाकली पोतडींत ! आतां-च्या कांचेच्या दौतीपुढें या तांब्याच्या दौतींची काय मातबरी ! टिपकागद असल्यावर या वाळूचा केर पाहिजे कशाला ? आणि एवढ्याकरितां कलमदानाचें लोढणें कोण व काय म्हणून गळ्यांत बाळगील ? हे सर्व श्रीमंती चोचले आहेत. आपल्यास त्याची काय गरज आहे ? घरांत रिकामी अडगळ मात्र.आपल्यास याची कांहीं गरज नाहीं. यापेक्षां याच किंमतींचीं पुस्तकें घेतल्यास काय वाईट ? पण हें त्यांना सांगावें कोणी व कसें सांगावें ? हा प्रश्न पुढें येतांच त्याचें उत्तरही तयारच होतें. तें उत्तर ह्मणजे रुसणं. या उत्तराला खर्च नको, कोणाकडून आणावयास नको, घरांत कोठें शोधायास नको, जेव्हां पाहिजे तेव्हां तयार ! या उत्तरास शोभ-ण्यासारखें वय असलें म्हणजे काम तेव्हांच फत्ते व्हावयाचें ! **बळवंतरावानें** हीच ठेवणीची चीज या वेळीं पुढें केली. तो रुसला, नीट बोलेना, सरळ चालेना, आनंदानें जेवीना, असें कां ? म्हणून प्रश्न केल्यास सांगेना. घरांतील मनुष्यांकडून बरेंचसें आर्जव करून घेतलें तेव्हां मला आपाढपाटी नको, पण शंभर रुपयांचीं पुस्तकें पाहिजेत असें त्यानें सांगितलें. **बळवंतरावाचें** रुसणं विद्याभ्यासंगाचें द्योतक असल्यामुळें समंजस मनुष्यास त्याची समजी करणें अवघड वाटलें नाहीं, पण ज्यांचा जन-रूढीवर भर, ज्यांस आपाढपाटीचा आखाडा मांडून तो सर्वांस दाखविण्याची हौस, ज्यांस चार पैसे दक्षिणा व एक दिवस घृत-कुल्यामधुकुल्या मिळण्याचा संभव, त्यास **बळवंतरावाचा** हा हट्ट पोरकट व लाडिकपणाचा आहे असें वाटून, त्यांनीं आपा-पल्या बाजूचीं कारणें व उदाहरणें सांगून मोडता घालण्याचा प्रयत्न केल्यास अधिक तें काय ? अशा मोडण्याला **बळवंतराव** थोडाच मीठ घालणार ! व अशा प्रकारच्या समजीनें तो थोडाच समजणार ! त्यानें सर्वांस जागच्या जागींच चीप करून पाऊणशें



रा. रा. रावजी श्रीधर गोंधळेकर.

ऐशीं रुपयांचीं पुस्तकें घेऊन आपले रुसणें फुगणें आणखी केव्हां तरी उपयोगांत आणतां येईल म्हणून ठेवून दिलें. असो.


# नानांचा परलोकवास.

**बळवंतरावाचे** लग्नापूर्वीपासूनच **नानांचे** प्रकृतींत विकृति झाली होती. तथापि त्यांच्या तापट पण टापटिपीच्या वागणुकीमुळें ती समजण्यांत आली नाहीं. असें करण्यांत कसेंबसें सन १८७१ साल समाप्त झालें; बाहत्तरावे वर्षास प्रारंभ झाला, तों स्वामीमहाराज काशींतच समाधिस्थ झाले. **गंगाधरपंतांनाही** आपले पोटांतील रोग जाणवूं लागला आणि **बळवंतरावांची** कांहीं तरी तजवीज करून ठेवावी असें वाटूं लागलें. **काका, मामा, रावजी श्रीधर गोंधळेकर, नारायणभाई दांडेकर** वगैरे मित्र मंडळीस **बळवंतरावावर** नजर ठेवण्यास सांगूं लागले. तरी इतक्यांतच **बळवंतरावरील** पितृछत्रही मिटेल असें कोणास वाटलें नव्हतें. परंतु ईश्वरी संकेताचें ज्ञान महायोग्याखेरीज इतरांस असण्याचा संभवच नाहीं, हेंच खरें ठरण्याकरितां शके १७९४ श्रावण वद्य १३ अथवा सन १८७२ ता. ३१ आगष्ट रोजीं **गंगाधरपंतांनीं** इहलोक सोडला ! ! यावेळीं **बळवंतरावापुढें** या नश्वरजगांतील सर्व संकटें किती तरी उभीं राहिलीं असतील ! मातृसुख व पितृसुख यांची किंमत याच वेळीं चांगली कळली असेल, पण ती किंमत सांगावयाची कोणाला ? अर्थात मनाला !


**बळवंतरावाच्या** मनाच्या ओढताणीपेक्षां **गंगाधरपंताच्या** मनाची ओढताण अखेर अखेर किती विलक्षण प्रकारची झाली असली पाहिजे, याची कल्पना सहज होण्यासारखी आहे. **नानांच्या** मनापुढे पारलौकिक सुखाचे देखावे जसे उभे असतील तसेच जवळ बसलेल्या **बळवंतरायाच्या** भावी

आयुष्याचे देखावेही उभे राहिले असतील ! **बळवंतरायाची** बुद्धिमत्ता, ग्राहकशक्ति, आणि स्वाभिमान त्यांच्यासमोर उभे राहून त्यांस जसा व जितका संतोष देत असतील तशी व तितकीच काळजी त्याचें अल्पवय, एककल्ली वृत्ती आणि त्या वेळची समाजस्थिति उत्पन्न करीत असेल ! जर याची बुद्धिमत्ता अशी बळावत जाईल तर हा मोठमोठ्या पंडितांसही खालीं मान घालावयास लावील, जर याची ग्राहकशक्ति अशीच क्रमानें वाढेल तर हा चाहील त्या विषयास आपला बंदा करून सोडील, जर याचा स्वाभिमान असाच सतेज राहील तर आपले आणि आपले कुलाचे उद्धारास कारण होईल. अशी उमेद एका विचारानें पुढें येत असेल तर हा पोर, अवघ्या १६ वर्षांचा, याजवरचा दाब उडाल्यामुळें हा एकाद्या नाटककाराच्या नादीं लागल्यास भांगतंबाखूचा दास बनेल, अथवा एकाद्या बाटग्याच्या मोहजालांत सांपडून स्वधर्मकर्मास मुकेल, किंवा स्वत्वावर पाणी सोडून बहकलेल्या मूर्ख सुधारकांच्या नादीं लागून अभक्ष्यभक्षण, अपेयपान करून आणि चिरूट तोंडांत धरून छाकट्यासारखा रस्तोरस्तीं भटकत फिरेल ! न जाणो, सुधारणेचा भलताच अर्थ करून स्वजनाशीं भांडत बसेल. हल्लीं वाचाळता हीच कायती सुधारणा, पूर्वजांस मूर्ख म्हणणारा तोच कायतो खरा सुधारक, शास्त्रीपंडितांस तुच्छ करणारा तोच कायतो विद्वान, स्नान वर्ज, पाहिजे तेथें पाहिजे तें खाणें, चाहील तें पिणें, स्वपोषाख सोडून परपोशाखांत प्रतिष्ठा मानणें, जोड्यासह जेवण करणें, देवास न मानणें, स्वकीयांची व्यर्थ निंदा आणि परकीयांची अकारण स्तुति हीं विद्वत्तेचीं, सुधारणेचीं आणि सुशिक्षितपणाचीं लक्षणें मानलीं जात आहेत. अशा लक्षणांच्या जाळ्यांत माझा **बाळ** सांपडल्यास त्याच्या अपूर्व बुद्धिमत्तेची राखरांगोळी होऊन तो स्वकुलतिलकाचे बदला कुलकलंक बनेल आणि माझ्या आजपर्यंतच्या आशेवर आणि उद्योगावर पाणी पडेल. हा दुसरा

BALA GANGÁDHARA TILAKA




वहीवरील चित्र.




मुरजबंधोऽयं

इंदिरा भास्करा पद्म मंदिराधधरा पह्ना।। ह्नापराध ह्नरादस्या सापरा भास्करा हता




अष्टदल पद्मबन्ध


नाशितापत्तिनानाकसद्मादिनाऽ
नादिनेत्राधुना नाथिनीं विष्णुना
नापचारादिना नामयात्सज्जना
नावितुं माविना नाश्रया नार्थना ।।१।।

नंलयांश्रीं गिरां यानं

कविकल्प — नपाराध्य जना वन

लतायां — नुवनैाय नंवादीन

स्तवायगंगा — नंदीवारि नयातन ।।१।।




## चतुरस्रचक्रबंधोऽयं

मावता दम परमा आरप स्वाधि

कालिमा ॥


मालिका भिसमेतामा माता

मेविधुतावसा ॥१॥


| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | वे | | | | |
| | | | लि | क | षं | | | |
| | | वि | क | टा | श्र | भ | | |
| | दं | ण | त्रा | र्य | मा | र | ह | |
| वृ | षा | द्रो | त्वं | श्री | र | य | से | क |
| | ल | लि | पा | स | र | णा | रु | |
| | | लो | का | ह | र | स्य | | |
| | | | म | ह्ल | ज | | | |
| | | | | कं | | | | |

गवाक्षबंधः


वेषं कलि विकटा श्रभहर मार्य त्रापादं वृषाद्रो
श्रीरयसे करुणारस पालित लोकाहरस्यज।,



जे हि रेः तां रु र पू तां
भ म हं कां का ण्य स रि
वा य रां मं पं ला ह्रा णीं





माधेयत्सुरजबंधस्तल्लिख्यते ॥



अष्टदलपद्म.

सासारक्षा परस्यात्र नगगगनवत्या घुणस्वा-
स हे मामाहेश स्वास्थ्य नाकादि पददपदि-
त्यर्थयंती हतासा मातांह नीतिसूतिं रचित न-
ति चिरस्थानुकूल्या घनाना मानावल्या मकुलं
परम ममरण श्रीतिरक्षा रसामा ॥१॥

स्रग्धरा.




## सजातीय निरंतर यमकचित्रं

काकाननदेदेड़ति

त्रिस्वरं

लिव्यंजनं

एकस्वरं




## द्विचतुष्कचक्रबंधोऽयं

## अयुग्माक्षरश्लिष्ट गोमूत्रिकाबन्ध.

भजेमहि हरेः कांतां कारुण्यरसपूरितां ॥

भवामयहरां कामं कार्पण्यत्रासहारिणीं ॥१॥




## षोडशदलपद्म.

क्षमा समागमा भीमा रमाया मादि
मासभा ॥ क्षमा क्षेमा रमा नामा
प्रभास्वी मास्क भालिमा ॥१॥

अनुष्टुप्- कवि कमल०

भीस! कासंदम! श्रीमल! सोम! श्यामतम
उमासहित सूक्ष्मतम
नमस्ते महिम स्तोम धाम सोम समम १

ममयाहंभमत्वेपरुके

उम्रुमपरुकेतािलत्वघोमता -

विचार यांचे मनांत येत असेल. या दोन विचारांचे मागोमागच आणखी तिसरा असाही विचार त्यांच्या समोर उभा राहून सांगत असेल कीं, त्याच्या सर्व आयुष्याची हमी घेणारे आपण आहोंत काय ? त्याच्या पूर्वसंचिताची याद चित्रगुप्तानें आपले हवालीं केली आहे काय ? या दोन्ही गोष्टी जर आपल्या स्वाधीन नाहींत तर त्याच्या कर्तृत्वाप्रमाणें येणारे भोक्तृत्वाबद्दल आपणांस काळजी काय म्हणून ? त्याचे जन्मदाते आपण आहोंत हें तरी सत्य आहे काय ? नाहीं. आपण निमित्तमात्र आहोंत. या निमित्तमात्रतेपुरतें व निमित्तासंबंधानें जें कर्तव्य तें आपण योग्य प्रकारें आणि संतोषास्पद केलें आहे. आतां आपला भाग संपला. त्याचे कर्तृत्वाचा भाग राहिला आहे; तो, तो आपले पूर्वकर्माप्रमाणें करील. जो आपला कर्ता व करविता आहे तोच त्याचा आहे. तोच आपले इच्छेप्रमाणें स्वतः वागतो व दुसऱ्यांस वागवितो तर मग आपल्याला पुढची उठाठेव कशाला पाहिजे ! ही या तिसऱ्या विचाराची गोष्ट **गंगाधरपंतांस** मानवली. ते शांतपणें परमानंदीं मग्न झाले !! आत **बळवंतरावांनीं** आपल्या तीर्थरूपांची इच्छा कशी पूर्ण केली हें आपणांस पहावयाचें आहे तें पुढील प्रकरणापासून पाहूं.

---

# प्रकरण दुसरें.

## म्याट्रिक्युलेशन.

मागील प्रकरणांत ज्या गोष्टीं लिहिल्या आहेत त्यांत **बळवंतराव**जींची बुद्धिमता आणि अंगस्वभाव यांच्या दर्शक कांहीं गोष्टी आहेत, तथापि त्या त्यांच्या वडिलांच्या छायेखालीं असल्यावेळच्या आहेत. ते स्वतःसिद्ध झाल्यानंतरच्या नव्हत. स्वतः

सिद्ध झाल्यानंतरच्या गोष्टींस या प्रकरणापासून प्रारंभ व्हावयाचा आहे. असो, ही त्यांच्या परीक्षेची वेळ होती. ज्या परीक्षेचा अभ्यास करावा लागत नाहीं, ज्या परीक्षेबद्दल नवस करावे लागत नाहींत असेंच केवळ नाहीं, तर ज्या परीक्षेचा प्रसंगच पडूं नये अशाबद्दल सर्व लोकांचे अहर्निशीं प्रयत्न चालले असतात, ती परीक्षा परमेश्वरेच्छेनें द्यावी लागतेच. ती कधीं सुटत नाहीं, तिची वेळ अगोदर समजावयाची नाहीं. ती आयत्या वेळीं घेतली जाते. ह्या अनुभवानें सर्व जग भरलेलें आहे. या परीक्षेस दुर्दैवाची परीक्षा ह्मणतात. ती अवघ्या सोळावें वर्षी देण्याचा प्रसंग **बळवंतरावांस** आला, हें मागील प्रकरणांत सांगितलें आहेच. या परीक्षेंतून मोकळे झाले न झाले तोंच मॅट्रिकचे परीक्षेस जाण्याचा समय आला. **बळवंतराव**जींनीं या परीक्षेस यंदा जाऊं नये असें कित्येकांचें ह्मणणें पडलें. कारण संकटकाल आल्यानंतर सहा महिने स्वस्थ असावें, नंतर उद्योगास लागावें, असें वृद्धवचन आहे. संकटकालाची पहिली सहामाही उलटून गेल्यानंतर कामास लागल्यास पाहिजे इतकें यश आलें नाहीं तरी पूर्ण अपयश तरी यावयाचें नाहीं, अशी त्यांची समजूत होती. **बळवंतराव**जींची समजूत याहून भिन्न होती. ज्यावेळीं आपल्यास प्रतिकूल काल आला त्यावेळीं, त्याच्या दोनी कुशी बुलबुलीत भरतील एवढा जबर बळी, कोणाची इच्छा नसतां केवळ दरोडेखोरांप्रमाणें दरोडा घालून काळानें लुटून नेला आहे. आतां त्याच्या आजोबाचें काय लागतों ? या करितां यंदां परीक्षेस जाण्यास हरकत नाहीं, असा विचार ठरवून सन १८७२ चे दिसेंबरांत **बळवंतराव** मॅट्रिक्युलेशनच्या परीक्षेस बसले. पहिलेच दिवशीं गणिताचे प्रश्न झाले. तो प्रश्नाचा कागद यांनीं एकदां साग्र वाचला. त्यांत बरेचसे गुण मिळविण्यासारखे प्रश्न कोणते आहेत ते पाहून घेऊन स्वारी कपाळाच्या शिरा चांचपायास लागली. जणूं, सटवाईनें षष्ठीपूजनाचे दिवशीं या प्रश्नांचीं

उत्तरेंसुद्धां तेथेंच लिहून ठेविलीं होतीं. सुमारें एक तासभर एका हातानें मस्तक खाजवीत व दुसरे हातानें प्रश्न सोडवीत असतां गणिताचा कागद देऊन टाकून स्वारी चालती झाली. आपणांस प्रति केरूनाना समजणारे व दुसऱ्याची टवाळी करण्यांत आपली प्रतिष्ठा स्पष्ट करणारे **वामनराव चितळे**, **बळवंतरावापासून** थोडकेच अंतुरावर होते. त्यांचा व यांचा प्रत्यक्ष सामना जरी कधीं झाला नव्हता तरी यांस ते जाणत असत. असें असतांही त्यांनीं गणिती गळाठले ह्मणून इतक्या लवकर चालते झाले! असे उद्गार त्यांच्या मित्राजवळ काढले. फार तर काय, पण ज्यांच्या जवळ कागद दिला त्यांसही या राजश्रीनें कोरा कागद दिल्याचा संशय आला. संध्याकाळीं यांच्या मित्रमंडळींनींही असे उठून कां आलात? ह्मणून प्रश्न केला असतां यांनीं खरें तेंच उत्तर दिलें; तरी तें खरें वाटलें नाहीं. उत्तरें सांगितलीं तरी भरंवसा आला नाहीं. जेव्हां गणिताचा कागद तपासला गेला व त्यांत जरूरीपेक्षां दहा गुण जास्ती आहेत असें चवकसांना दिसलें. तेव्हां कांहींजणांचे प्रथम फुललेले चेहरे कोमेजले, व कांहीं कोमेजलेले फुलले. या प्रमाणें सर्व परीक्षा पुरी होऊन **बळवंतराव** पसंत झाल्यामुळें त्यांच्या खऱ्या स्नेहांस व आप्तइष्टांस आनंद झाला. **गोविंदरावकाका** आणि **रावजी श्रीधर गोंधळेकर** हे **नानां**चे मित्र असल्यामुळें **बळवंतरावाचें** नांव वाचतांच त्यांच्या नेत्रांतून जे आनंदाश्रु आले ते दुःखमिश्रित असल्यामुळें अधिक मोलाचे होते. " जर आज **नाना** असते तर त्यांना आपल्या श्रमाचें चीज झालें असें वाटलें असतें. " **काकांच्या** अंतःकरणांतील कढांचे उद्गारांचें मोल कशानें होणार? अशाच पण निराळे प्रकारच्या आनंदाचें आणखी एक स्थळ **नानांनीं** नुकतेंच जोडून ठेविलें होतें. तेथेंही " आमच्या **तापीचा** नवरा परीक्षेंत पास झाला " हे शब्द अंतःकरणांतून उचंबळणाऱ्या आनंदलहरींचें प्रत्यक्ष

सिद्ध झाल्यानंतरच्या गोष्टींस या प्रकरणापासून प्रारंभ व्हावयाचा आहे. असो, ही त्यांच्या परीक्षेची वेळ होती. ज्या परीक्षेचा अभ्यास करावा लागत नाहीं, ज्या परीक्षेबद्दल नवस करावे लागत नाहींत असेंच केवळ नाहीं, तर ज्या परीक्षेचा प्रसंगच पडूं नये अशाबद्दल सर्व लोकांचे अहर्निशीं प्रयत्न चालले असतात, ती परीक्षा परमेश्वरेच्छेनें द्यावी लागतेच. ती कधीं सुटत नाहीं. तिची वेळ अगोदर समजावयाची नाहीं. ती आयत्या वेळीं घेतली जाते. ह्या अनुभवानें सर्व जग भरलेलें आहे. या परीक्षेस दुर्दैवाची परीक्षा ह्मणतात. ती अवघ्या सोळावें वर्षीं देण्याचा प्रसंग **बळवंतरावांस** आला, हें मागील प्रकरणांत सांगितलें आहेच. या परीक्षेंतून मोकळे झाले न झाले तोंच मॅट्रिकचे परीक्षेस जाण्याचा समय आला. **बळवंतराव**जींनीं या परीक्षेस यंदा जाऊं नये असें कित्येकांचें ह्मणणें पडलें. कारण संकटकाल आल्यानंतर सहा महिने स्वस्थ असावें, नंतर उद्योगास लागावें, असें वृद्धवचन आहे. संकटकालाची पहिली सहामाही उलटून गेल्यानंतर कामास लागल्यास पाहिजे इतकें यश आलें नाहीं तरी पूर्ण अपयश तरी यावयाचें नाहीं, अशी त्यांची समजूत होती. **बळवंतराव**जींची समजून याहून भिन्न होती. ज्यावेळीं आपल्यास प्रतिकूल काल आला त्यावेळीं, त्याच्या दोनी कुशी दुलदुलीत भरतील एवढा जबर बळी, कोणाची इच्छा नसतां केवळ दरोडेखोरांप्रमाणें दरोडा घालून काळानें लुटून नेला आहे. आतां त्याच्या आजोबाचें काय लागतों ? या करितां यंदां परीक्षेस जाण्यास हरकत नाहीं, असा विचार ठरवून सन १८७२ चे दिसेंबरांत **बळवंतराव** मॅट्रिक्युलेशनच्या परीक्षेस बसले. पहिलेच दिवशीं गणिताचे प्रश्न झाले. तो प्रश्नाचा कागद यांनीं एकदां साग्र वाचला. त्यांत बरेचसे गुण मिळविण्यासारखे प्रश्न कोणते आहेत ते पाहून घेऊन स्वारी कपाळाच्या शिरा चांचपा-यास लागली. जणूं, सटवाईनें षष्ठीपूजनाचे दिवशीं या प्रश्नांचीं

उत्तरेंसुद्धां तेथेंच लिहून ठेविलीं होतीं. सुमारें एक तासभर एका हातानें मस्तक खाजवीत व दुसरे हातानें प्रश्न सोडवीत असतां गणिताचा कागद देऊन टाकून स्वारी चालती झाली. आपणांस प्रति केरूनाना समजणारे व दुसऱ्याची टवाळी करण्यांत आपली प्रतिष्ठा स्पष्ट करणारे **वामनराव चितळे, बळवंतरावापासून** थोडकेच अंतरावर होते. त्यांचा व यांचा प्रत्यक्ष सामना जरी कधीं झाला नव्हता तरी यांस ते जाणत असत. असें असतांही त्यांनीं गणिती गळाठले ह्मणून इतक्या लवकर चालते झाले ! असे उद्गार त्यांच्या मित्राजवळ काढले. फार तर काय, पण ज्यांच्या जवळ कागद दिला त्यांसही या राजश्रीनें कोरा कागद दिल्याचा संशय आला. संध्याकाळीं यांच्या मित्रमंडळींनींही असे लवकर कां आलात ? ह्मणून प्रश्न केला असतां यांनीं खरें तेंच उत्तर दिलें; तरी तें खरें वाटलें नाहीं. उत्तरें सांगितलीं तरी भरंवसा आला नाहीं. जेव्हां गणिताचा कागद तपासला गेला व त्यांत जरूरीपेक्षां दहा गुण जास्ती आहेत असें चवकसांना दिसलें तेव्हां कांहीजणांचे प्रथम फुललेले चेहरे कोमेजले, व कांहीं कोमेजलेले फुलले. या प्रमाणें सर्व परीक्षा पुरी होऊन **बळवंतराव** पसंत झाल्यामुळें त्यांच्या खऱ्या स्नेहांस व आप्तइष्टांस आनंद झाला. **गोविंदरावकाका** आणि **रावजी श्रीधर गोंधळेकर** हे **नानांचे** मित्र असल्यामुळें **बळवंतरावाचें** नांव वाचतांच त्यांच्या नेत्रांतून जे आनंदाश्रु आले ते दुःखमिश्रित असल्यामुळें अधिक मोलाचे होते. " जर आज **नाना** असते तर त्यांना आपल्या श्रमाचें चीज झालें असें वाटलें असतें. " **काकांच्या** अंतःकरणांतील कडांचे उद्गारांचें मोल कशानें होणार ? अशाच पण निराळे प्रकारच्या आनंदाचें आणखी एक स्थळ **नानांनीं** नुकतेंच जोडून ठेविलें होतें. तेथेंही " आमच्या **तापीचा** नवरा परीक्षेंत पास झाला " हे शब्द अंतःकरणांतून उचंबळणाऱ्या आनंदलहरींचें प्रत्यक्ष

रूपच होते. ! " बाकी कांहीं असो वा नसो, जांवई शहाणा आहे. तो सारे पांग फेडील. " हीं घरांतील वडिलांचीं वाक्यें, **बळवंतरावांच्या**; अल्पवयी ह्मणून अल्लड वृत्तीच्या कुटुंबाचे अंतःकरणांत किती डौलानें आणि झोंकानें मिरविलीं असतील, त्यांची प्रभा त्यांच्या मुखश्रीवर कशी झळकत असेल हें त्यांच्या बालमैत्रिणीखेरीज इतरांच्या लक्षांत येणें कठिण आहे.

# कालेजांत प्रवेश.

**नानांनीं बळवंतरावांस** जें शिक्षण दिलें तें विषयाचें दिलें होतें, परीक्षेचें दिलें नव्हतें. हेंच शिक्षण **बळवंतरावांचे** बुद्धिवर्धनास साधनीभूत झालें. आमच्या शाळांतून जें शिक्षण चालतें तें परीक्षेचें शिक्षण असतें यामुळें विद्यार्थ्यांच्या पाठशक्तीस जितकें काम पडतें तितकें बुद्धीस पडत नाहीं. अ. डे. ए. इन्स्पेक्टर अथवा डे. ए. इन्स्पेक्टर काय पहातात, तेवढ्यापुरती तयारी करविणें हेंच शिक्षकांचें काम. मॅट्रिक करितां कोणते विषयांतील कोणते भागावर अधिक लक्ष दिलें जातें, या धोरणावर हायस्कुलें चालावयाचीं. तेव्हां अर्थातच तेवढी घडी साफसूफ केली ह्मणजे आपलें कर्तव्य संपलें, असें जाणून जेथें शिक्षण मिळतें तेथें विद्यार्थी तयार होतात असें ह्मणण्यापेक्षां विषयांची पाखाळणी होते असें ह्मणणें बरें दिसतें. त्यांतून हल्लीं-निरुद्योग्यांस अल्पश्रमांत, अल्प उद्योगांत पुष्कळ पैसे मिळविण्याचीं साधनें तयार झाल्यामुळें परीक्षेस लागणाऱ्या विषयांची फोड अशी कांहीं केली असते कीं, ती विद्यार्थ्यांच्या मेंदूस अथवा बुद्धिमत्तेस जांवयापेक्षांही अधिक आळशी अथवा विलासी बनविते. बाजारांत पुरीवाल्याचे दुकानीं जसें सदा सर्वकाळ सारे पदार्थ तयार असतात, पैसा द्यावा कीं चाहील तो जिन्नस उचलून तोंडांत टाकावा, तद्वत खिशांत पैसे घालून

पुस्तकें विक्रीवाल्याचे दुकानीं गेलें कीं, पाहिजे त्या गणिताचीं पुस्तकें रीतिभातीसह तयार! इतिहासाची शकावली पाहिजे आहे, प्रत्येक राजाची कारकीर्द अलग पाहिजे आहे, एक आण्याला तयार! संस्कृताचे प्राकृत, अन्वय लावून, शब्दार्थ देऊन, समासांची गुंतागुंत असल्यास तीहि पिंजून तयार! परीक्षा सुरू झाल्यापासून आजपर्यंत जितके कागद निरनिराळ्या विषयांवर आले तितके सारे उत्तरासह पाहिजे असले तरी तयार! अशा कवठाबे.रांच्या बाजाराप्रमाणें जेथें माल भरला आहे, व अशा मालांचा खपही जेथें झपाट्यानें होत आहे, तेथील बुद्धिमत्ता भंडारली गेली तर त्यांत नवल काय? हा प्रकार कनिष्ठ प्रतीचे अथवा मध्यम प्रतीचे शिक्षणांतच होता आणि उच्च प्रतीचे शाळांत नव्हता असें नाहीं. कालेजचे नांवाप्रमाणें तेथेंही तोच नमुना! सारें ठरीव आणि घोकीव अध्ययन। यामुळें या शिक्षणापासून जो जोम विद्यार्थ्यांत उत्पन्न व्हावयाचा तो व्हावा कसा? जमीन सुफळ आहे, पाणी विपुल आहे, हवा उपयुक्त आहे, पण बीं सडकें असल्यास वरील सर्व साधनें व्यर्थ होत. तोच नमुना या शिक्षणाचा असल्यामुळें ज्याचा मूळचा अंकूरच-जोमदार तोच पुढें उदयास येई. बाकीचे कोठें तरी रे रे, रे रे, करीत आयुष्य कंठीत असावयाचे; व त्याप्रमाणें पुष्कळ आहेतही.

सन १८७३ सालीं हे डेक्कन कॉलेजांत गेले. तेव्हां ते तेथेंच राहत असत. इंग्रजी शिक्षणाचा विशेष कांहीं परिणाम घडला असेल ..र तो आमच्या चालीरीतींवर घडला आहे, असें त्यावेळीं ह्मणत असत व अद्यापिही तें ह्मणणें मागें पडलें नाहीं. या परिणामाचा प्रारंभ इंग्रजी पांचवे इयत्तेच्या अभ्यासास सुरवात झाल्यापासूनच होतो; यांत काय अर्थ आहे? त्यांत काय जीव आहे? हरभऱ्याच्या एका दाण्यानें जर एकादशी मोडते तर भुईमुगाच्या मुठभर दाण्यांनीं तरी ती कां होऊं नये? इत्यादि प्रश्न घरांतील बायकांसमोर काढण्यास आतांपासून सुरवात होते. ताम्हनी संध्या, द्व्याक्षरी संध्या,

तिटोली संध्या; "झाली" अथवा "केली" संध्या इत्यादि प्रकारच्या टोलवाटोलवीस इंग्रजी सहावी इयत्ता बस्स होतें. ही इयत्ता पूर्ण होऊन मॅट्रिक्युलेशन पसंत होतांच घरांतील कर्त्या पुरुषांचे धाकामुळें दबा धरून बसलेल्या संस्कारास उघड माथ्यानें बाहेर पडतां येतें. त्यांत दैवानें पिछेहाट घेऊन एक वर्ष जास्त रखडण्यास लाविलें तर हे संस्कार जरा ढिले पडतात. पण जर कां पहिले झपाट्यास परीक्षा पसंत होऊन कॉलेजचा संस्कार मिळाला, तर वरील कृतीस जोर येऊन ती एकदम मर्यादेच्या बाहेर जाते. कॉलेजच्या पहिल्या संस्काराबरोबर प्रथम मुकट्यासारख्या घरांतील ( Stupidity ) मूर्खपणाच्या चालीरीतीस फांटा मिळतो. नंतर इतर व्यवहार सुरू होतात. **बळवंतरावजी** कॉलेजांत गेले तेव्हां कोणी ओंवळ्यानें भोजनास बसले आहेत,"* तर कोणी अंगांत सदरा व जाकीट घालून भोजन करताहेत! कोणी श्मश्रू करवून अवघ्या मस्तकाच्या पाखाळणीनेंच स्नानविधी पूर्ण करिताहेत, तर कोणी यज्ञोपवीतास साबण लावून दगडावर चोळीत बसले आहेत, कोणाचीं यज्ञोपवीतें खुंटीवर वाळत आहेत, तर कोणाचीं सदऱ्यावर लोंबत आहेत! हा एकदम झालेला फरक पाहून कोणासही आश्चर्य वाटेल, मग **बळवंतरावजी** सारख्यांस वाटलें यांत नवल काय? **बळवंतराव** ह्मणत युगानुयुगें हाडामासांत खिळलेले व रक्तांत मुरलेले संस्कार अवघ्या एका अत्यल्प शिक्षणानें एकदम नाहींसे व्हावेत हें आपल्या देशाचें दुर्दैवच समजलें पाहिजे. आज इंग्रज आले आपण बाह्यतः इंग्रज बनलों, उद्यां फ्रेंच आले फ्रेंच बनलों, परवां रशियन आले रशियन बनलों, म्हणजे जो कोणी आमचा राजा बनेल त्याचें अनुकरण आम्हीं करणार! आमचें स्वतःचें असें आम्हांला कांहीच नाहीं असें ठरतें. आमची स्नानसंध्या सुटली तर तिचे मोबदला प्रार्थना आली म्हणावें तर तसेंही नाहीं; बरें नास्तिक बनलों म्हणावें तर

तसें बनण्याची कोणाची इच्छा नाहीं, धैर्य नाहीं,अथवा मानासिक शक्तिही नाहीं; असा विलक्षण प्रकार झाला ही स्थिति बरी नाहीं, समाजघातक आहे, असें **बळवंतरावांस** वाटत असल्यावरून त्यांनीं ओंवळ्याची बाजू सोडून देऊन सोंवळ्याची बाजू पत्करली.

सर्व गांवांतील लोक नग्न असतां त्यांत धोतर नेसलेला एकादा गेल्यास तो मूर्ख ठरावयाचा, अथवा ड्रिंकिंग क्लबांत चुकून एखादा एकादशीवाला गेला म्हणजे तो भ्रांतिष्ट, अर्थाडाक्स अथवा ढोंगी ठरतो तद्वत कॉलेजांत भस्म लावणारा, संध्या करणारा, सोंवळ्यांनीं भोजन करणारा, कपाळीं गंध लावणारा, बटलरी बॉल अथवा जावळ न ठेवणारा, बूट पाटलोण न वापरणारा, हे सर्व भ्रांतिष्ट अथवा ढोंगी या सदरांत घालण्याचा सांप्रदाय या कॉलेजांत असे. अशा ढोंग्याची संख्या या कालेजांत फारशी नसे; तरी जी असे तिचे अध्वर्युत्व कै. जिनसीवाले यांजकडे असे. यांच्या सारखे कर्मठ, कालेजांत तर हे एकच, पण कालेजच्या बाहेर सुद्धां फारच थोडे आढळावयाचे. असो, **बळवंतराव** इतक्या अस्सलांतही नव्हते आणि सुधारलेल्यांतही नव्हते. जितकी शुचिर्भूतता स्वगृहीं असतां होती तितकीच कालेजांतही असे. यामुळें यांची गणना ढोंग्याचे दुसरे वर्गांत होत असे.

**बळवंतरावांच्या** संबंधानें **काकांना** खात्री होती. तरी इहलोकची यात्रा संपवितांना **नानांस** जशी काळजी वाटत होती तशीच काळजी यांनाहि वाटत असे. कॉलेजांत मुलें बिघडतात ह्मणजे स्नानसंध्या सोडतात, सोंवळें ओंवळें मानीत नाहींत, केवळ नास्तिक बनतात असें नाहीं, तरी अस्तिकही नसतात. त्यांचा कोणत्याच देवावर आणि धर्मावर भरंवसा असत नाहीं. पाहिजे तेथें पाहिजे तें खाण्यास तयार होतात, मद्यप्राशनाची संवय लागते, घरचीं मनुष्यें मूर्ख दिसूं लागतात, इत्यादि कल्पना जुन्या मंडळींत दृढ होऊन बसल्या होत्या. त्या पूर्व अनुभवावरून खऱ्या होत्या व **बळवंतरावांचे** वेळेपर्यंतही खोट्या

ठरविण्या सारखीं साधनें नव्हतीं. घराहून आणिलेले मुक्टे भंडारून ठेवणारांची संख्या अधिक होती, तरी मुक्टे नेसणारे वाढत्या प्रमाणांत होते. येथें संध्येचें ताम्हन भरण्याचें अगत्य नव्हतें तरी पूर्ण संध्येच्या मानानें तिटोली संध्या करणारांची संख्या वाढत असे. ड्रिंकिंग क्लब जरी रोडावला नव्हता तरी त्याचे तेज कमी होत चालले होते. **बळवंतराव** कालेजमध्यें असतां " जिनसीवाले क्लब " व " नाशिक क्लब " हे दोन सोंवळ्याचे क्लब असत. जिनसीवाले क्लबांत शारंगपाणी, चेंगिरी, बेटिगिरी, ओक वगैरे मंडळी असत. ह्यांत कानडी सोंवळी मंडळी असे. बापू अबाजी खरे, व कुलकर्णी, भालचंद्र पुरुषोत्तम पटवर्धन वगैरे नाशिकाकडील लोक दुसरें क्लबांत अधिक असत. या दोन्ही क्लबाचे मेतकूट जमत असल्यामुळें एका क्लबांतील गृहस्थ दुसरे क्लबांत भोजनास जाण्यास प्रत्ययवाय नसे. **बळवंतराव** नाशिक क्लबांत असल्यामुळें व तो क्लब सोंवळ्या ओंवळ्यांत प्रसिद्ध असल्यामुळें **काकास** विशेष संतोष वाटत असे हें सांगणें नको.

**बळवंतराव** एफ. ए. चा अभ्यास करित असतां स्काटच्या कादंबरीपैकीं केनिर्थ ही कादंबरी वाचीत असत. ही कादंबरी त्यांच्या अभ्यासपुस्तकांपैकीं एक होती. या कादंबरींत ब्लंट ( Blunt ) म्हणून एक पात्र असे. या पात्राचे अंगचे गुणांत बेपर्वाई पण अंतःकरण शुद्ध; राव, रंक, विद्वान, अविद्वान, लहान थोर या सर्वांचा त्या त्या भागापुरता एकच दर याच्याजवळ लागावयाचा ! कोणाची घमेंड ह्मणून चालूं द्यावयाची नाहीं ! मनांत एक, जनांत दुसरें, आणि क्रिया तिसरी हा प्रकार यास ठाऊकच नाहीं. जें मनांत तेंच जनांत व तेंच आचरणांत. कित्येकांच्या नजरेनें हा गुण दिसे कित्येकांस हा अवगुण वाटे. जो तो आपापल्याविचाराप्रमाणें त्यास पहात असे. ब्लंटच्या अंगच्या सर्व गुणांचा प्रादुर्भाव **बळवंतरावांच्या** अंगचें गुणांत पूर्णपणें झाला आहे, असें जरी यांच्या सहाध्यायांस वाटत नसले, तरी

त्यांच्या निर्भिडतेवरून त्यांचे मित्र त्यास **ल्वंट** ह्मणूं लागले; व तें त्यांच्या मित्रमंडळाचे ह्मणणें कालेज सुटलें तरी कायम होते. **बळवंतरावांच्या** अंगच्या या गुणाचा उपयोग यांच्या पुढील आयुष्यक्रमांत कोणत्या प्रकारें झाला हें क्रमाक्रमानें कळेल.

**बळवंतराव** कालेजमध्यें गेले तेव्हां काडी पैलवानच होतें. तोलून अन्न, मोजून व्यायाम व संभाळून अभ्यास केल्याखेरीज यांस गत्यंतर नसे. पायाळू मनुष्यास जसें विजेचें भय असतें, तसें यांस वाऱ्याचें भय असावयाचें. त्यांतून सोसाट्याचा वारा, जोराचा पाऊस, आणि संरक्षणास छत्री असल्यावर मग तर काय घारी सारखे आकाश मंडळांतील तारांगणच पहावयाचें! ही स्थिति नीट नाहीं. लौकरच कधींतरी झोला बसेल. युरोपियन लोक प्रो. वर्डसवर्थ* साहेबांचा जसा विनोद करीत असत तसाच

* लार्ड रे साहेबांचे कारकीर्दींत प्रो. वर्डसवर्थ साहेब महाबळेश्वरीं आले होते. उन्हाळ्याचे दिवस, त्यांत इलाखाधिपतींची स्वारी थंड हवेवर आलेली असल्यामुळें या टापूंतील कमिशनरादि अष्ट उमराव, कोल्हापूर, सातारा, गुजराथ, वगैरे प्रांतांतील राजेरजवाडे व जहागीरदार आपल्या तत्पुरत्या लवाजम्यासह तेथें आले होते. आमचे कै० माधवरावजी रानडे व त्यांचे बरेच मित्रमंडळही या विलासशिखरावर आले होते. यामुळें जिकडे तिकडे एकच गर्दी आणि धांदल दिसत असे. नामदार साहेब तेथें असले म्हणजे इतर ठिकाणांपेक्षांही त्यांच्या देवालयास मोठी तेजी येत असते. ज्या चर्चमध्यें एरवीं पाद्रीबोवा, भाविक वृद्ध स्त्रिया आणि कांहीं बाबा लोक दिसत असत, तेंच देवालय नामदार साहेबांच्या आगमनानें भरचक्क भरत असे. आमच्या देवालयांची स्थितीही अशीच असते. प्रार्थनावाल्यास येथें स्वतंत्र जागा नसल्यामुळें ते आमच्या पुस्तकालयाचाच कधीं कधीं उपयोग करीत असत. या वर्षी येथें कांहीं उद्योगी गृहस्थांनीं व्याख्यानमाला सुरूं केली होती. त्या मालेंत प्रो. वर्डस्वर्थ साहेबास गुंतवावें असा उद्योग कै० रानडे यांच्या मार्फत सुरूं झाला. लार्ड रे साहेब इतिहासभक्त, वर्डस्व-

यांच्या संबंधानेंही विनोद करण्यास यांची शरीरसंपत्ती अनुकूलच होती; ही अनुकूलता नाहींशी करून आपण या कामांतही यांना लाजविलें पाहिजे या निश्चयानें त्यांनीं एक वर्ष सरस्वती-पूजन करून मल्लभूचें आवाहन केलें. त्यांत इतकें प्राविण्य संपादन केलें कीं, त्याबद्दलही लोक त्यांची स्तुतीच करूं लागले. ज्यास चोवीस नमस्कारांची मारामार ते आठशें जोर आणि आठशें बैठका सहज लीलेनें काढूं लागले. ज्यास साधारण गारठा सहन करण्याचीहि शक्ति नसे, ते दोन दोन तास पाण्यांत डुंबूं लागले व नागपूर सारखी थंडी सहन करूं लागले.

नागपूरसारख्या थंडींतही **बळवंतरावांनीं** आपले पाय बूटपाटलोणींनें जखडले नाहींत, शरीरावर जाकीटें चढविलीं नाहींत, आणि गळ्यास लोंकरीचा फांसही कधीं घातला नाहीं. सकाळचे वेळीं सदरा व फ्लयानेलची बंडी व अधिक थंडीचे वेळीं शालजोडी पांघरत असत. पुण्यास तर एक सदरा व टोपी इतकाच काय तो त्यांचा घरचा पोषाख असतो. बाहेर जातांना त्याच सदऱ्यावर अंगरखा. व टोपीचे ऐवजीं पागोटें उर्फ पगडी

---

र्थ साहेब इतिहासाचे भोक्ते आणि आमचे रानड्यादि मंडळीही इतिहासप्रिय असल्यामुळें, हा घाट जमून येण्यास फारसे प्रयास पडणार नाहींत असें वाटलें. यावेळीं डायलिंग साहेब ह्मणून एक असिस्टंट इंजिनियर येथें असत. आमच्या लोकांत मिसळून वागण्याची हौस त्यांस असल्यामुळें या उद्योगापैकीं एक प्रमुख काम त्यांच्याकडे सोंपविलें होतें. तेव्हां ते विनोदानें ह्मणाले कीं, वर्डस्वर्थ साहेबांच्या डोक्यांत सारें जग भरलें असल्यामुळें तें इतकें विशाळ आणि जड झालें आहे कीं, ते त्याच्या शरीरास तोलेनासें झालें आहे. या करितां त्यांच्या शरीरास धक्का न लागूं देतां जर त्यांस येथें आणिलें तर ते आपले डोक्यांतून अशा अमोलिक आणि भरपूर चिजा काढून देतील कीं, त्या पाहतांना अथवा ऐकतांना तहानभूक हरून जाईल!

असावयाची. इतका साधा व थोडा पोषाख असतांही त्यांनीं कधीं हुं हूं हूं केलें नाहीं, याचें कारण मीं त्यांना विचारलें असतां त्यांनीं आपला अनुभव मला सांगितला. तो असा कीं, " जसा आपण शाळेचा अभ्यास करतों, तसाच सोळा ते वीस पंचवीस वर्षांचे वयाचे दरम्यान जर शरीर कमावण्याचा अभ्यास केला, आणि पुढें जरी शरीरमेहनत सुटली, तरी खाण्यापिण्यांत आचरटपणा न करितां अथवा रात्रीं उगीच भटक्या मारीत न हिंडतां बेतावातानें राहिलें, तर वरील वयांत कमाविलेली शक्ति अभ्यासादि श्रमाचे कसास दाद न देतां पन्नास वर्षांचें वय होईपर्यंत उपयोगी पडेल यांत संशय नाहीं. अंगांत रक्त यथास्थित असल्यास आपल्या इकडील हवेस अधिक कपड्यांचें कारण आहे असें मला वाटत नाहीं. " खरें आहे. इंग्रजींतील नवें अनुकरण आमच्यांत शिरेपर्यंत आम्हांस हल्लीं इतकें कापड लागत नसे. कै. **गोपाळराव हरी देशमुख** यांनीं सन १८५३ सालीं साताऱ्यास बाराबंदी बंडी आणिली. तेव्हां तीस प्रेत आवळण्याची बंडी ह्मणत असत, हें मला चांगलें स्मरत आहे. मुंबईस पायमोजे प्रथम आले तेव्हां ते घालणारास शेणमार झाल्याचें ज्ञानोदयानें प्रसिद्ध केलें होतें; पुढें पुढें पायमोजेवाल्यास " कोड्या " ह्मणजे कोड भरलेला ह्मणत असत. त्याचे पूर्वीं अंगाबरोबर असणारा एक अंगरखा कचेरीकरितां घालावयाचा. मुलांच्या अंगांत एक साधी बंडी असे. त्यावेळीं जितका पर्जन्य पडे तितका आतां पडत नाहीं. श्रावण महिन्यांत तर पर्जन्यातिशयामुळें दोनदोन दिवस शाळा बंद राहावयाच्या. तसाहि प्रकार आतां नाहीं, असें असतां हल्लीं कपड्यांचें मान इतकें वाढलें आहे कीं, हें पाहून भाडेकऱ्यांची तट्टेंही खालीं पाहूं लागलीं. या कपड्यांचे अतिरेकाची दर्शक एक नक्कल येथें नमूद केल्यास अप्रासंगिक वाटणार नाहीं असें मला वाटतें.

श्री. रा. रा. **वामनराव तात्या** दिवाण आपल्या घोड्यावर साधें खोगीर ठेवून साताऱ्याहून माहुलीस जावयास निघाले. त्यावेळीं श्री. **आप्पासाहेब नातू, गणेश नारायण कोल्हटकर, कृष्णाजी वासुदेव जोशी, अमृत श्रीपत नागपूरकर** वगैरे मंडळी तेथें होती. तेव्हां जोशी सहज ह्मणाले, आज घोडा अगदीं साधाच सजविला आहे ! तेव्हां त्या मार्मिक गृहस्थानें उत्तर दिलें कीं, इंग्रजाचे संगतीनें आमची माणसें इतकीं सजूं लागलीं कीं, सारे मारवाडी, शिंपी व मोची यांना वर मान करण्यास फुरसत नाहींसें झालें, तेव्हां अर्थातच घोडीं उघडीं पडलीं !

असो. **बळवंतरावांनीं** मेहनतीस सुरुवात केली तरी पहिले सहा महिन्यांत विशेष पुष्टता दिसून आली नाहीं. दुसरे सहामाहींत यांचें शरीर चांगलें पुष्ट दिसूं लागलें.

जे **बळवंतराव** एका वर्षापूर्वी शरीरसंपत्तीनें सुदाम्याशीं स्पर्धा करण्यास तयार असत ते एका वर्षांत भिंतीशीं टकरा देऊं लागले; व आपल्यापेक्षां अधिक शक्तिवानाबरोबर दंड ठोकून उभे राहूं लागले. जेथें तूप भात अथवा दहींभात वांचून दुसरें कांहीं पचावयाचें नाहीं, तेथें जोंधळा, गहूं, हरबरा, उडीद इत्यादि पदार्थ पार फस्त होऊं लागले ! या वेळचे यांचे सहाध्यायी रा. सा. पळशीकर यांच्या बोलण्यावरून असें दिसतें कीं, यांच्या मंडळींत एक क्षयी गृहस्थ होते. ते आपले अंगांत ताकद यावी म्हणून नित्य एक चमचाभर हायो फास्पेट आफ लाइम घेत असत. या राजश्रींनीं ती बाटली पहाण्यास ह्मणून घेतली आणि पार झोंकून दिली ! हें पाहतांच मंडळींना वाटलें कीं, या आचरटपणाचें प्रायःश्चित्त त्यांना मिळेल. परंतु यांना त्यापासून कांहींसुद्धां झालें नाहीं; व या गोष्टीचें स्मरणही राहिलें नाहीं ! असा वज्रदेह एका वर्षांत बनविला. यांच्या याच कृतीवरून अंगिकारलेल्या विषयाचा पाठलाग करण्याची यांची शक्ति किती दांडगी आहे हेंही स्पष्ट होतें.

ज्या **बळवंतरावास** एक वर्षांपूर्वी वरणभात अथवा दहीं-भाताखेरीज इतर पदार्थ पचत नसत, ते **बळवंतराव** मुंबईच्या खाणावळवाल्यास यावेळीं पचेनासे झाले. मुंबईस ज्या खाणावळींत हे भोजनास जात असत, त्या खाणावळवाल्याच्या पोळ्या पारदर्शक असल्यामुळें यांनीं त्या उडविण्याचें माप डझनवर बसविलें. तेव्हां तो टेकीस येऊन ह्मणाला, अशानें मला लौकरच खाणावळ बंद करावी लागेल! तेव्हां उभयतांचा मक्ता ठरला. त्यांत असें ठरलें कीं, यांना लागतील तितक्या चपात्या त्यानें पुरवाव्या आणि त्या चपात्यांस लागेल तें तूप यांनीं आणावें! हा मक्ता खाणावळवाल्यानें पत्करला पण तोही त्यास मोठ्या नाखुषीनें पतकरावा लागला. खाणावळवाल्यास उलटी अंगाची आंदण देऊन चार खुंटांची जहागीर देणारे भोक्ते पुरुष अर्वाचीन मंडळांत किती असतील बरें? जो पचवील तो खाईल हें उघड आहे. **बळवंतरावजींचा** आहार या मानानें हल्लीं फारच कमी झाला आहे. याचीं कारणें अचाट श्रम, कारागृहाच्या वाऱ्या, चहा घेण्याचा सांप्रदाय आणि खाण्यापिण्याच्या वेळेचा अनियमितपणा हीं होत. इतर सर्व श्रम जरी यांना आणखी अधिक पडले असते तरी यांचें अन्न इतकें तुटलें नसतें. पण अगोदर पारतंत्र्य, त्यांतून देशाला योग्य व शक्य तितकें स्वातंत्र्य मिळवून देण्याची आशा व उमेद, त्यांतही नर्कवासाच्या एक नव्हे दोन नव्हे तीन वाऱ्या! यामुळें हे जास्त खंगले असें म्हणण्यास हरकत नाहीं. असो.

हा अभ्यास जसा केला तसाच पोहण्याचा अभ्यासही यांनीं केला. हें एकदा पाण्यांत शिरले म्हणजे कित्येक तास पाण्यांत पोहत असत यांत कांहीं अधिक नाहीं. पुष्कळ मुलें पाण्यांत प्रहर प्रहर डुंबत असतात, पण त्यांच्याबरोबर पोहणाऱ्यानें यांच्या पोहण्याच्यासंबंधानें एक गोष्ट अशी सांगितली कीं, पाण्यांत उताणें पडून पोहणाऱ्यांस फार वेळ दम निघत नाहीं पण हे उताणे पडून दशमी खराब न होऊं देतां ती सावकाशपणानें आणि पोट-

भर स्नात असत! बोट वल्हविणें हेंही शक्तीचें काम आहे. तें काम हे श्वास न सोडतां तास तासपर्यंत करीत असल्यामुळें यांची छाती चांगली भरून आली होती.

सन १८९७ सालीं यांच्यावर काहूर आणून यांना पुन्हां कारागृहांत टाकिलें, तो भाग क्रमानें येईलच. त्या कारागृहवासाचा यांच्या शरीरावर जो परिणाम घडला त्यानें यांच्या शक्तीस केवढा जबर धक्का दिला, तो यांच्या उभय वेळच्या चित्रावरून कोणास केव्हांही दिसण्यासारखा आहे. ही गेलेली शक्ति आतां यांना मिळणें नाहीं; तथापि यांनीं कमाविलेल्या-शक्तीचा अजमास ती गमावल्यानंतरही करण्यासारखी एक गोष्ट माझे अनुभवास आली. ती या स्थळीं नमूद करणें मला इष्ट दिसतें.

सन १८९९ सालचें शिवरात्रीस ते भागीरथीच्या स्नाना-करितां काशीस आले होते. त्यावेळीं दशाश्वमेधीजवळ गंगेचें पात्र सुमारें १३०० फूट रूंद होतें. या पात्रांतून कोण किती सरळ रेषेंत पैलतिरीं जातो, हें पाहण्याकरितां पांच गृहस्थांनीं गंगाप्रवेश केला. त्यापैकीं तिघे मध्याचे अगोदरच थकले, आणि **बळवंतराव** व **अगरकर** नांवाचे एक तरूण गृहस्थ पैल-तीरास गेले. गंगेचें पात्र विस्तीर्ण व खोल असल्यामुळें पाणी संथ असतें, या कारणानें सरळ रेषेकडे जास्त लक्ष जात नाहीं, तथापि हे दोघेही वीस बावीस फूट खालीं गेले असावे असें अनुमान ठरलें. तेराशें फूट रुंदीच्या पात्रांत वीस पंचवीस फुटांची रेषा चुकणें ह्मणजे कांहींच नाहीं असें ह्मटलें पाहिजे. येतांना यांच्यानें पोहवलें नाहीं. तथापि स्वत: नांव वल्हवीत ते ऐल-तीरास आले. हें स्वनजरेनें पाहिलेलें उदाहरण देण्याचें कारण एक वर्षांत यांनीं कमाविलेली शक्ति व्यवस्थितपणानें राखल्यामुळें यांनीं कालेज सोडल्यापासून दुसरे वेळीं कारागृहांत जाईपर्यं-

तच्या अचाट श्रमास, आणि कारागृह उर्फ नरकवासांतील घाणीस पुरून किती उरली हें वाचकांस कळावें हें होय.

वास्तविक पाहिलें असतां **बळवंतरावजींचे** व्यायामाची एवढी प्रौढी गाण्याचें अगत्य नव्हतें. मूल जन्मल्या पासून त्याचे व्यायामास सुरूवात होतें. मूल आठवर्षांचें होईपर्यंत त्यास यथेच्छ खेळूं देणें हाच त्याचा व्यायाम होय. आठ वर्षांपासून सोळावर्षांचा होईपर्यंत नमस्कार घालणें वगैरे प्रकारचा व्यायाम पुरे होतो. सोळा ते पंचवीस वर्षांचें वय होईपर्यंत सक्तमेहनतीचें व्यायाम असले तरच धातू व सर्व अवयव उत्तम प्रकारचे बनतात.या पुढें पन्नासवर्षें होईपर्यंत साधारण व नंतर अगदीं माफक तरी व्यायाम पाहिजे. हें पूर्वी कोणासही सांगावें लागत नसे. जोरजोडी, बैठका व कुस्ती मारणें हा सक्त व्यायाम होय. हा प्रत्येक तरुणानें केलाच पाहिजे. जोर काढण्यानें छाती, पाठ, व दंड यांतील " मसल्स " अथवा मांसपेशा भरून येतो. बैठकांनीं मांड्या व पायाचे पोटऱ्या वगैरे भाग चांगले तयार होतात. दौड मारण्यानें दमछाकी होऊन छाती भरदार होते व पायाच्या पोटऱ्या भरून येतात. कुस्ती करण्याचा व्यायाम सर्वांत उत्तम आहे. यापासून सर्व अवयवास सारखा व्यायाम होऊन एक प्रकारची कार्यक्षमता येते, अथवा, एक प्रकारचें शिक्षण मिळतें ह्मटलें तरी चालेल. पोहणें, घोड्यावर बसणें, दांडपट्टा आणि फरीगदगा हे खेळ करमणुकीचे, व्यायामाचे आणि पौरुषाचे होत. यापैकीं कोणता प्रकार प्रस्तुच्या मंडळांत आढळतो बरें ? हे सर्व खेळ जे पूर्वीच्या राजमंडळांत नांदत असत, ते हलकटपणाचे आहेत असा आमच्या अधुनिक पंडितांनीं अथवा आळशांनीं समज करून घेतल्यामुळें जिकडे तिकडे दुर्बलतेचें साम्राज्य होऊन गेलें आहे. आमच्या राजेबहाद्दुरांनीं आमच्यातील देशमुख देशपांड्यांपासून ते जाहागिरदारांपर्यंत सर्वांस संपुष्टांत आणिल्यामुळें अगोदर थोडीं अनुरूपांत आलीं त्यांत परमेश्वर-

कृपेनें ज्यांच्यापाशीं कांहीं थोडीं आहेत त्यांचा उपयोग तांग्या-कडे करण्याचा प्रघात पडल्यामुळें कोचमनचें काम यजमान करित असून कोचमन राजासारखा गादीस टेकून बसतो आणि कर्मधर्मसंयोगानें वाटेंत एखादे तांग्यांची प्रकृति बिघडल्यास आपण घोड्यावर स्वार होऊन पुढील व्यवस्थेस लागतो; आणि यजमानास पहारेकरी बनून मोडकें तोडकें सामान संभाळीत बसावें लागतें. अवघ्या पाऊणशें ऐशीं वर्षांत आमच्या पौरुषाची अशी धुळधाण होऊन गेली आहे. हल्लींचा व्यायाम ह्मणजे बाहेर फिरावयास जाणें. तो व्यायाम तरी इतका जबर कीं, एक सबंध मैल ! अथवा मोठा व्यायामी ह्मणजे दीड अथवा दोन मैल जाणारा ! ही व्यायामाची थट्टा होय. हा व्यायाम पन्नाशी उलटून गेलेल्याला योग्य होय. ही साध्या व्यायामाची तऱ्हा. मग खांद्यावर बंदुक टाकून हिंस्र पशूंचा, घोड्यावरून अथवा पायांनीं पाठलाग करणें, दिवसाचे दिवस उन्हांतून हिंडणें, लहान-मोठ्या दऱ्या ओलांडून जाणें, वानरी कृतीनें डोंगरांचे कडेच्या-कडे पार करणें इत्यादि पौरुषाच्या गोष्टींचें अवाक्षर तरी कशाला ! व्यायामाचा खरा फायदा तो हाच व खरा हेतु तरी यापासूनच साधावयाचा आहे. नाहींपेक्षां युरोपियन लोकांच्या शर्यती सुरू असतां, ते लोक घाम पुशीतच आहेत, एक घोडा दमला, दुसरा; दुसरा दमला, तिसरा; असे घोडे बदलीत पोलो खेळत आहेत व आम्ही त्यांच्या शिपुर्ड्यांच्या छडीखालीं माना वांकवून त्यांच्या शक्तीचें वर्णन करीत आहोंत, त्यांच्या देशांतील थंड हवेचा अथवा त्यांच्या मांसाहाराचा हा परिणाम होय. या भ्रांतिमूलक, अप्रयोजक व काल्पनिक सिद्धांतावर भिस्त ठेवून समाधान करीत आहोंत. ते लोक सुट्टीचा वेळ शौर्याच्या कामांत खर्च करीत असतात. आज काय माथे-रानावर शिकार, तर उद्यां काय महाबळेश्वरावर शिकार ! आणि आम्ही एका सुटींत चहाचा व बिस्किटचा फन्ना उडविला, तर

दुसरे मुटींत नाटकांची गर्दी उसळली, अथवा गांवांतले गांवांत चार पांच व्याख्यानें झोडलीं, किंवा एका गाईस चिखलांतून काढण्याचा उद्योग करून भटाभिक्षुकांची खोडच मोडली ! अशा प्रकारचे विपरीत वर्तुणकीचा परिणाम समाजावर किती भयंकर प्रकारचा घडतो व घडत आहे याचा अनुभव येत असतां लोकांचे लक्ष्य तिकडे जात नाहीं म्हणून **बळवंतरावजींच्या** तालीमबाजांचें उदाहरण येथें देत आहोंत. एके दिवशीं त्यांचें स्नेही वज्रमुष्टीचा खेळ खेळत असतां हे तेथें होते. यांनीं खरी वज्रमुष्ट कोणती हे दाखविण्याकरितां तिचा प्रयोग भिंतीवर करून दाखविला तो इतका झपाट्यानें व जोरानें करून दाखविला कीं, तो पाहणारांस आश्चर्य वाटलें व त्यांचे स्नेही त्यांच्या आंगच्या इतर गुणांबरोबर या कृतीची अद्यापही तारीफ करीत आहेत.

शरीर कमविण्याकडे यांनीं बहुतेक लक्ष्य दिलें आणि तेंही पण परीक्षेस न जाण्याच्या इराद्यानें दिल्यामुळें कॉलेजांत हजेरी पेक्षां विशेष कांहीं केलें नाहीं. यांचे वेळीं प्रोफेसर जिनसीवाले हे कॉलेजांत फेलो होते. **जिनसीवाल्यांची** नजर इतिहासांतील बारीक सारीक रहस्य शोधण्यांत दक्ष असल्यामुळें वर्गांत विद्यार्थी आले किती, व वर्ग सोडून गेले किती हे त्यांचे ध्यानांत येत नसे. दुसरें, त्यांचा वर्ग लांबलचक बसलेला असे, यामुळें विद्यार्थ्यांनीं हजेरी देऊन पाय काढल्यास चटकन लक्षांत येण्यास अधिक दक्षता लागे. ही उणीव व्यर्थ न जाऊं देण्याकडे कांहीं विद्यार्थ्यांचें लक्ष्य असें, त्यांतच या वर्षीं **बळवंतराव** हे एक होते. प्रो. **जिनसीवाले** यांनीं " यस् सर " म्हणून घेतलें कीं, **बळवंतरावांनीं** जिन्याच्या पायऱ्या सुधारल्याच असा क्रम चालूं असतां एके दिवशीं हे आपल्या नित्यक्रमाप्रमाणेंच जिना उतरण्यास आणि **किलहॉर्न साहेबांनीं** त्या चढण्यास एकच गांठ पडली. त्यांनीं यास वर्गांत आणिले, व हे गृहस्थ कां गेले ? म्हणून प्रश्न केला असतां

**जिनसीवाल्यांनीं** आपल्या नजरेची उणीव सांगितली. तुम्हीं कां गेलात ? ह्मणून यांना प्रश्न केला तेव्हां यांनीं सांगितलें, मी यंदां परीक्षेस बसणार नाहीं म्हणून हजेरी देऊन जात होतों. न बसण्याचें कारण विचारलें तेव्हां तेंही कान कोंडेपणानें न सांगतां स्पष्टपणानें सांगितलें. तेव्हां साहेब मान हालवीत हालवित चालते झाले.

**बळवंतराव** उत्तम गणिती असल्याचें जितकें प्रसिद्ध होतें तितकें उत्तम वैय्याकरणी आहेत असें कोणास फारसें माहित नव्हतें. पण ज्यावेळीं तो प्रसंग आला आणि **दादोबांचे** जाडी व्याकरण, **गोडबोले** यांचें नुकतेच प्रसिद्ध होत असलेलें व्याकरण, आणि **कृष्णशास्त्री चिपळुणकरांनीं** शाला पत्रकांतील लिहिलेले व्याकरणावरील निबंध, यांची छान करण्याचा समय विद्यार्थी मंडळींनीं आणिला, त्यावेळीं **बळवंत रावांनीं** व्याकरणांतील नियमांची निवड इतकी सुरेख केली कीं, ती लिहून काढली असती तर एक निराळे व्याकरणच तयार झालें असतें. परंतु विद्यार्थी स्थितींतील प्रकार जेथें उत्पन्न व्हावयाचें तेथेंच अल्पकाल राहून विराम पावावयाचे ! त्याप्रमाणेंच या चर्चेचेही झाले.

या वेळीं कै॰ **वामनराव आपट्यांची** संस्कृतज्ञांत गणना होती. **बळवंतरावाची** नव्हती. **बळवंतराव** उत्तम संस्कृत कवि आहेत अथवा ते कॉलेजांत असतां सुंदर कविता करीत असत, व प्रसंगोपात हल्लींही करतात असें सांगण्यास आज संकोच वाटत नाहीं. कारण ते कवि आज हजर आहेत, व जर ते आपल्या बुद्धिमत्तेस थोडीशी कलाटणी देतील तर ताजी सुंदर कविता सालंकार आपणांपुढें उभी करतील असें म्हणण्यास साधन आहे. दुसरें सन १८७३ सालीं ज्यांनीं यांच्याकडून कविता करविल्या ते प्रोफेसर **जिनसीवाले** जरी आज नाहींत, तरी त्यांचे शेरे

दिलेल्या वह्या आज आहेत तसेंच ज्यांनीं यांच्या त्या वेळच्या कविता उतरून ठेविल्या आहेत. तेही आहेत. **बळवंतराव** हे सुंदर इंजिनियर, चांगले शिल्पी, उत्तम रसायनशास्त्री, तत्वज्ञानी व वैद्य आहेत हें प्रसंगोपात दाखविण्यांत येईलच. हे त्यांच्या अंगचे गुण यांच्या पश्चात कोणी वर्णन करितां तर त्यास " फाजील स्तुतिपाठक " हें विशेषण मिळण्याचा संभव होता, परंतु माझ्या अथवा सर्व राष्ट्राच्या पूर्ण सुदैवानें **बळवंतराव** वेळ आल्यास ते करून दाखविण्यास आहेत, व त्यांच्या कविता उतरून घेतलेले मास्तर आणि त्यांच्यांतील ते ते गुण पाहिलेले लोकही आहेत म्हणून अधिक लिहिण्यास संकोच वाटत नाहीं.

**बळवंतराव** संस्कृत कविता चांगल्या करितात असें मी ऐकिलें तेव्हां मला तें खरें वाटलें नाहीं, पण मी सोलापूर जिल्ह्यांतील माढे येथील मास्तरांच्या जवळचा उतारा पाहिला, तेव्हां मला बरेंच खरें वाटलें. आणि त्यामुळें त्यांच्या कवितांचा अधिक शोध लावण्याची जिज्ञासाही उत्पन्न झाली. त्या जिज्ञासेची तृप्ति करून घेण्याकरितां उद्योग केला. तेव्हां **बळवंतरावांनीं** केलेल्या कवितांची लहानशी चोपडी, त्यावर प्रो० **जिनसीवाले** यांचा तपास व अभिप्रायही आयतेंच पाहण्यास मिळालें. तें सर्व या स्थलीं देऊन भाग फुगविण्याचे भरीस पडत नाहीं. तथापि प्रो० **जिनसीवाल्यांनीं** ज्या कवितेखालीं विशेष शेरा दिला आहे, ती व आणखी एक दोन कविता येथें देतों.

## मातृविलाप.

प्रसमीक्ष्य सुतं गुणालयं, विधिना संहृतजीवितं पुरा ।
जननी निपपात दुःखिता, धरणौ मोहवशं गता भृशं ॥ १ ॥
अथ सा जननी विमूर्छीता, प्रकृतिं प्राप्तवती यथा-
यथा । सुत-जीवित-नाशहेतुर्भिर्विषमोहैरभवत्तथाकुला ॥ २ ॥

बत ! हास्मि हता विधे त्वया, तनयस्यासुहृता न मे पुनः । रविणा सरसि प्रशोषिते, ननु जीवेच्छफरी तदाश्रया ॥ ३ ॥

पितरौ प्रथमं ततः सुतौ, हननस्य क्रम एष भो विधे । तनयः प्रथमं कथं त्वया, मम नीतः प्रतिकूल चारिणा ॥ ४ ॥

बहुकालमहो ! न संस्थितिं सुत चाप्त्वा न कलासु वर्धनं । सकलैः सुजनैर्मुदेक्षितः प्रतिपच्चंद्र इवासि निर्गतः ॥ ५ ॥

उपचारशतैर्विवर्धितः, प्रथम सूचितभाविवैभवः । सहसैव दवाग्निना हतः, सुत बीजांकुरवद्गतो भवान् ॥ ६ ॥

न भवान् भवनाद्बहिर्गतोऽनुमतिं प्राप्य कदापि नो मम । अधुना परिहाय मां कथं, सुत ! नापृच्छ्य दिवं प्रयास्यसि ॥ ७ ॥

पदवी त्रिदशालयस्य सा, विषमा भूतगणादिसंकुला । सुगताद्य कथं सुत ! त्वया, गमनेऽल्पाध्वन एव सीदता ॥ ८ ॥

न कृतं करणीयमस्ति यदनुभूतानि सुखानि न त्वया । विततं विमलं यशो न ते, परलोकं कथमद्य गम्यते ॥ ९ ॥

वचनं न ममावधारितं, शिशुतायामपि जातक! त्वया । विफलीकुरुषेऽद्य मे कथं, गिरमुत्थाय सुभाषयेति माम् ॥ १० ॥

नयने मम बाष्पपूरिते, सुत कृत्वाप्यपहृत्य जीवितं ।

तव देहविलोकरोधनं कुरुतेऽनृप इवैतददंतकः॥ ११ ॥

तव दूयत एव कोमलं, मृदु शय्या–विनिवेशितं वपुः प्रसहेत तदेव हा कथं, अधुना तात चितोधिरोहणे॥१२॥

हृतपंकजकांतिलोचने, वदनं चैव सदेन्दुदर्शनं । मधुरं वचनं वपुस्तव, सुभगं मन्मथगर्वहारि च ॥ १३ ॥

अनुचिंत्य च तानगुणांस्तव, तनयातीव भवामि विव्हला । भ्रमरी हिमवृष्टिनाहतं, ननु शोचेदवलोक्य पंकजं ॥ १४ ॥

खलु किं नु न दत्तमर्थितं, सुत! निर्बंधपरेण यत्त्वया । प्रतिवाक्षि न मां यतोऽबलां कुपितोऽकारणमेव नंदन॥१५॥

गृहकर्मणि रक्तमानसामशितव्यं न विलंब्य देहि मे । अयि पुत्रक ! कोवदेदिदं, वचनं संप्रति मां गते त्वयि ॥ १६ ॥

भवनं तनयेन शोभते, न वृथेत्थं विबुधैर्निगद्यते । भुवनं हि विभाति मे वनं, सुरलोकं तनये गते द्रुतम् ॥ १७ ॥

इति सा बहुशो व्यचिन्तयत्, तनयं चाप पुनर्विमूर्छितां । अवलोक्य हि मूर्छितां सुतो व्यपनीतो दहनाय बांधवैः ॥ १८ ॥

अथ बंधुभिरग्निसात्कृतः, सुत इत्याद्यवगम्य विव्हला । विससर्ज हि शोकपावके गुणित स्नेहरसेन सा वपुः ॥ १९ ॥

बाष्पोदकेन नितरामभिषिच्यमान ।
स्तस्या न शोकदहनो निरतो हृदिस्थः ॥
प्रावर्तताधिकतरं स पुनः प्रदीप्तो ।
निक्षेपितो जलनिधाविव वाडवाग्निः ॥ २० ॥

या कवितेंतील ३ व १६ ह्या कवितांवर Good व ४, ५, ७ व ८ ह्या कवितांवर Very Good असे शेरे प्रोफेसर साहेबांच्या हातचे आहेत. या शिवाय प्रोफेसर साहेबांनीं खालीं एक शेरा दिला आहे तो असाः—

Very excellent. ( Though some of your ideas are borrowed, ) Still I must give you the credit of having very suitably adapted them to your present purpose. you have much facility in writing verses as it seems from this. I hope You will not discontinue it in future.

( Sd. ) S. G. Jinciwally.

**बळवंतरावांचा** आवडता विषय जर संस्कृत भाषा हा असता, तर **प्रोफेसर जिनसीवाल्यांच्या** वरील शेऱ्याची विशेषशी मातबरी वाटली नसती. परंतु यांनीं गणितासारखा रुक्ष विषय आपलासा केला असतां, आणि अशा रुक्ष विषयाचें व रसिकतेचें कधींच पटावयाचें नाहीं, असें ठरलें असतां, **राहीलखेड देशपांडे**, व **महादेव शिवराम आपटे** यांच्या सारखे संस्कृतज्ञ याच विषयांत ह्यांचे प्रति स्पर्धी असतां, **बळवंतरावांनीं** वरील प्रकारचा शेरा मिळविला आहे हें विशेष आहे, व म्हणूनच यांची तारीफ करावयाची आहे. यांनीं

**प्रो. जिनसीवाल्यांची** इच्छा पूर्ण करण्याकरितां कवितेचा व्यासंग वाढविला असतां तर ते जसे प्रसिद्ध राजकारणी, प्रसिद्ध फिलॉसफर ह्मणून गर्जत आहेत तसेच प्रसिद्ध कवींतही गणले गेले असते. कविता करण्याचा व्यासंग जरि यांनीं वाढविला नाहीं, तरी यांची कविताशक्ति कमी झाली नाहीं, हें यांच्या सन १९०२ सालच्या मे महिन्यांतील कवितेवरून स्पष्ट होतें. ती कविता ही.

## अश्वधाटी.

लोका**म**ध्यें फिरुनि जो **का** करी नर विलो**का** चमत्कृतिरसा ।
ज्या**शीं** स्वबंधु गुणरा**शीं** समर्पि रविभा **सीत** रश्मिस जसा ।
ना**ना** कलांनिपुण मा**ना** समग्र अभिमा**नार्ह** मेळवितया ।
ना**था** असो सुखद पं**था** प्रभो विनवि मा**था** नदीं रचुनिया ॥

ही कविता माझे समक्ष केली आहे. याचें कारण असें कीं, प्रोफेसर **काशीनाथपंत छत्रे** हे आपली घोड्यांची सर्कस घेऊन जपानांत जाणार असें ठरलें, तेव्हां त्यास सोन्याचें पदक आणि मानपत्र देण्याचा समारंभ पुण्यांतील लोकांनीं केला. हें मानपत्र कवितावद्ध असावें असें ठरल्यावरून एका गृहस्थानें कांहीं कविता करून त्या **बळवंतरावजींकडे** पसंतीकरितां आणिल्या होत्या. त्या कवितेंत रा. रा. **नरसिंह चिंतामण केळकर** यांनीं केलेलीही कविता होती. पण तिचे पहिले दोन चरण केळकरांचे व दुसरे दोन चरण यांनीं केले ती कविता ही.

## स्रग्धरा.

झाला जीच्या सुयोगें प्रिय अरुण जरी व्यंग तो भास्करास । केलें जीच्या प्रसादें परगृहीं नकुलें आपल्या निन्हवास । ऐसी ही अश्वविद्या प्रचुर गुणवती जी नला कार्यवाही । येथें द्वीपांतरीं हो सुखफलद तुम्हां, आमची प्रार्थनाही ॥ १ ॥

या सर्व कविता **बळवंतरावजींनीं** नीटनेटक्या केल्या तथापि **काशीनाथ पंताचा** प्रधान विषय घोडा आहे. त्या घोड्याच्या पावलांच्या "टपटप" आवाजास साजेल आणि त्यांत **काशीनाथपंताचा** नाम निर्देश होईल तर मानपत्रास अधिक शोभा येईल, असें **बळवंतरावजींस** वाटल्यावरून त्यांनीं या समारंभाचें दिवशीं दोन प्रहरीं ही वरील अष्टधारी करून छापून दिली. या "चक्षुर्वैसत्यं" कवितेवरून यांची कविताशक्ति स्पष्ट होत आहे हें तर खरेंच; पण यांची प्रसंगावधानशक्तीहि व्यक्त झाली आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. असो.

यांच्या वडिलांच्या कविता प्रथम प्रकरणांत दिल्या आहेत व वरील कविता यांनीं केल्या आहेत. त्यांच्या कविता प्राकृत आहेत व यांच्या संस्कृत व प्राकृत आहेत. त्यांच्या व यांच्या कवितेचा विषय निराळा आहे. त्यांचा व यांचा छंद निराळा आहे तरी त्यांच्यापुढें यांचे पाऊल आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

**बळवंतरावांचे** अभ्यासाची पद्धत परीक्षेपुरती नसल्यामुळें ठराविक पुस्तकांतलि, ठराविक गोष्टींपैकीं ठराविक भाग वाचण्याकडे यांचें लक्ष्य नसे. परीक्षेकरितां जो विषय असेल तो सांगोपांग पुरा करावयाचा, असा यांचा पाठ असे. एफ्. ए. च्या परीक्षेकरितां मेरी व इलिझाबेथ या दोन राण्यांची कारकीर्द होती. यांच्या सहाध्यायांनीं एक पुस्तक घेऊन त्यावरून त्यांचे कारकीर्दीचें टिप्पण काढून तें घोकून काढलें. यांचे समाधान त्यानें झालें नाहीं. यांनीं निरनिराळ्या ग्रंथकारांनीं लिहीलेले बारा ग्रंथ वाचून टाकून, त्यावरून आपलें टांचण तयार केलें. या टांचणाचा उपयोग यानांच केवळ झाला असें नाहीं, तर यांची परीक्षा झाल्यानंतरही कित्येक दिवसपर्यंत अनेक विद्यार्थी त्याचा उपयोग करीत असत. मेरी आणि इलिझाबेथ हीं नांवें जितकीं लहान आहेत त्याच्या कित्येक सहस्रपट त्यांच्या कारकिर्दी मोठ्या आहेत.


मॉरेस साहेबांनीं आमच्या " **शिवाजी** " या छोट्याश्या नांवास अनुसरून त्याचे कारकीर्दीचें स्वरूप दरोडेखोर, चोर, लुटारू, इत्यादि विशेषणांनीं गौरवण्यांत दाखविलें, व आपलें बुद्धि सर्वस्व, कल्पनाचातुर्य आणि भाषासौंदर्य खर्च करून आह्मां हिंदुस्थानवासियांस अवघ्या साडेतेरा ओळीच्या कलमानें जसें तृप्त करून सोडलें, तशी तृप्ति इंग्रजी इतिहासकारांनीं इलिझाबेथ आणि मेरी राणीच्या संबंधानें इंग्रजांची केली असती, तर अशा इतिहासकारांची किती शोभा झाली असती ! हिंदुस्थानच्या इतिहासांत **शिवाजीची** कारकीर्द जशी अत्यंत महत्वाची आणि इतिहासाचें स्वरूप एकदम बदलणारी आहे, तशीच या दोघी राण्यांची कारकीर्द महत्वाची आहे.

यांच्या कारकीर्दींत इंग्रजी राष्ट्राचें स्वरूप अगदीं बदलून गेलें होतें. पण या अदला बदलीचा परिणाम युरोपांतील अनेक राष्ट्रांवर थोडा बहुत तरी घडला असल्यामुळें इतिहासकारांच्या बुद्धिवैभवास हें एक बोनेंच सांपडलें होतें, व म्हणून इतिहासकारही अनेक झाले होते. इतक्यांच्या लेखाचें परिशीलन अथवा घुसळण करून त्यांतील नवनीत आणि पाणी अलग करण्या इतकी गरज असलेले विद्यार्थी यांच्या सारखे हेच, असें म्हटल्यास दोषास्पद व्हावयाचें नाहीं. हीच यांची कृती पुढेंही जागोजाग आढळून येईल.

सन १८७५ सालीं हे एफ. ए. ची परीक्षा देऊन बी. ए. च्या अभ्यासास लागले; व तेथेंही त्यांच्या बुद्धिमत्तेचा ओघ वाढत चालला होता. तथापि, स्कालरशीप वगैरे मिळवून आपलें नांव करावें असा त्यांच्या मनाचा कल नसल्यामुळें ते पुढें होत नसत. **गोविंदरावकाका** वगैरे मंडळीस हें बरें वाटत नसे. आपला **बळवंतराव** मोठा बुद्धिवान व गणित आणि संस्कृत विषयांत तयार आहे. या दोन्ही विषयांच्या स्कालरशिपा त्याला मिळणें अशक्य

नाहीं; निदान गणिताची तरी हटकून मिळाली पाहिजे असें काकांस पूर्वपरीक्षेपासूनच वाटत असे. परीक्षा संपून निकालाची यादी प्रसिद्ध झाली आणि त्यांत दुसऱ्याचे मुलास स्कालरशिप मिळालेली वाचलें, म्हणजे यांच्या आशेचा थरमामेटर एकदम शून्यावर येई. यासंबंधानें ते **बळवंतरावास** वारंवार म्हणत, व बळवंतरावही ऐकून घेत, परंतु उत्तर देत नसत. असें दोन चार वेळ झालें तेव्हां एक वेळ **काका** असेंच म्हणाले असतां **बळवंतरावांनीं** सांगितलें कीं, "स्कालरशिप मिळण्यास अवध्या विद्वत्तेची गरज आहे, ही जी लोकांची समजूत आहे ती पुष्कळ अंशीं चुकीची आहे. विद्वत्तेच्याबरोबर अथवा दोन पावलें पुढेंच आणखी कांहीं गुण संपादावे लागतात. ते गुण प्रोफेसर साहेबांच्या कृपेचीं साधनें. तीं साधनें मजजवळ नाहींत व तीं संपादून "स्कॉलरशिप" मिळवावी अशी माझी इच्छाही नाहीं. दुसरें, "स्कॉलरशिप" करितां विद्या नाहीं, विद्येकरितां "स्कॉलरशिप" आहे असा माझा समज आहे. असा समज ती देवविणारांचा होईल त्या दिवशीं ती आपोआप मिळेल. तसें जोंपर्यंत नाहीं तोंपर्यंत मी घनपाठी आहे, मी जटापाठी आहे असें घरोघर सांगत फिरून पैसे मागणाऱ्या भिक्षुकांप्रमाणें मी कधीं करणार नाहीं. अथवा स्कॉलरशिपचे आशेनें मी विनाकारण कोणास हां साच, जी साच, रेडा गाभणा, तर नववा महिना, असें कधींही ह्मणणार नाहीं." अशा अर्थाचें उत्तर मिळाल्यानंतर पुन्हां **काकांनीं** स्कॉलरशिपचें संबंधानें अवाक्षरही काढलें नाहीं.

बी. ए. च्या परीक्षेचे वेळीं ज्या विषयांची गरज लागते त्यांत इंग्रजी भाषा हा एक विषय आहेच. हा विषय यांचा अगदीं कच्चा नव्हता, तरी यांचे स्वतःचें समाधान होण्यासारखा नव्हताय व डेक्कन कालेजांतील इंग्रजी शिक्षण जितकें चांगलें मिळावयास पाहिजे तसे मिळत नव्हतें. ह्मणून ज्या ठिकाणीं आपलें समाधान होणें शक्य नाहीं, तेथेंच राहून घोस्या मारित बसण्यांत अर्थ



कै. गोविंद रामचंद्र टिळक.

जन्म. सन १८३५ मृ. १८९४

नाहीं, असें वाटून **बळवंतराव** डेक्कन कॉलेज सोडून सुमारें सहा महिने मुंबईच्या एलफिन्स्टन कॉलेजांत गेले. तेथें **वर्ड-स्वर्थ साहेब** हें इं[illegible]ीचे अध्यापक होते. इंग्रजी शिकविण्याचे कामांत त्यांची विशेप प्रख्याती होती. यांच्या शिकविण्याकडे जो मनःपूर्वक लक्ष्य देई त्याचा चांगला फायदा होई. खेरीज या साहे-बांच्या तीर्थरूपांनीं केलेल्या पुस्तकांपैकीं दोन पुस्तकें तेथील विद्यार्थ्यांस ते मोठ्या आस्थेनें शिकवीत असत. भारतामध्यें मोठमोठ्या नांमांकित गुरूंची नांवें जशीं अनेक आहेत तशींच प्रसिद्ध शिष्यांचींही आहेत. परंतु **परशुरामाच्या** गुरुत्वास **भीष्म** जसे शोभले गेले तसें दुसरें थोडेच शोभले असते! तद्वत **वर्डस्वर्थ** साहेबांचे हाताखालीं तयार होऊन सरकारच्या मोठमोठ्या हुद्यावर असलेले अनेक विद्यार्थी सर्व इलाखाभर आहेत. परंतु **वर्डस्वर्थ** साहेबांनीं जें शिकविलें त्याचें चीज करून दाखविणारे विद्यार्थी फारच थोडे. त्या थोड्यांतील थोड्या पैकीं **बळवंतराव** हे एक होत असें त्यांनीं त्याच वेळीं आपले वर्तनानें त्यांस दाखविलें. परीक्षेची वेळ येतांच **बळवंतराव डेक्कन कॉलेजचे** विद्यार्थी ह्मणून परीक्षेस बसले. त्यावेळीं त्यांनीं **वर्डस्वर्थ** साहेबांकडे पाहिलें नाहीं, अथवा माश्यानें गिळलेलें माणिक कोणत्या प्रकारच्या औदार्यानें पचवावें हें शिकविणाऱ्या **एलफिन्स्टन** साहेबांच्या नांवांकडेही पाहिलें नाहीं. ज्या शाळेंत आपण अधिक दिवस राहून ज्ञान संपादन केलें त्या शाळेस आपल्या परीक्षेचा गौरव दिला पाहिजे, अशा हेतूनें ते **डेक्कन कालेजांतील** विद्यार्थी म्हणून परीक्षेस बसले. तेथील गणितशास्त्राचे प्रो. **हॅथार्नवेट** साहेब यांनीं आपल्या सर्व शिष्यांस गणिताचें एक बाड तयार करण्यास लाविलें होतें. या वेळेपर्यंत **बळवंतरावांचें** मस्तक हेंच प्रमुख विषयांचें संग्रहस्थान होतें. परंतु विलायती सुधारलेल्या पद्धतीस अनुसरून त्यांस तेथें गणिताकरितां चोपडी घालावी लागली. हे साहेब बीज-

गणिताचें पुस्तक छानून त्यांतून कांहीं उदाहरणें काढीत असत, आणि तीं विद्यार्थ्यांस सांगत असत. साहेबांचे मर्जीखातर **बळवंतरावांनीं** चोपडी घातली; परंतु त्यांच्या सांगण्याप्रमाणें पंक्तिप्रपंच न करितां सारेंच बीजगणित त्यांत सोडवून ठेविलें. एकदां अशी मौज झाली कीं, साहेब आपले बंगल्यांत गणित सोडवित असतां पुस्तकांतील उत्तराशीं साहेबांचें उत्तर मिळेना. साहेबांस वाटलें गणित करणारा चुकला तरि असावा अथवा पुस्तक छापतेवेळीं ही चूक तरी झाली असावी. या समजावर त्यांनीं दुसरें दिवशीं वर्गांत आल्यावर सर्व विद्यार्थ्यांस त्यांच्याजवळ असलेलीं पुस्तकें दुरुस्त करण्यास सांगितलें. जे नेहमीं "सर सर" करण्यामुळें साहेबांचे प्रीतिपात्र बनले होते त्यांनीं चटकन् दुरुस्ती करून साहेबांस दाखविली. जे शोध करून काय तें करूं ह्मणणारे होते ते "यस् सर" ह्मणाले, पण कांहीं न करतां स्वस्थ राहिले. **बळवंत**रावांनीं दुरुस्ती केली नाहीं व स्वस्थही बसले नाहींत. त्यांनीं पुस्तक बरोबर आहे, साहेब चुकले आहेत असें स्पष्टपणानें सांगितलें. बिन मिशाचें पोर नुकतेंच या शाळेंत आले असतां आपणांस एकदम चुकलें ह्मणालें याचा साहेबांस खूप घुस्सा आला. त्यांचा चेहरा अधिक लाल झाला, डोक्याचे केंस तरारले. तथापि **बळवंत**रावांस अधिक न बोलतां उभे राहण्यास सांगून आपण स्वतः आणखी उदाहरण तपासून पाहूं लागले तरी चूक सांपडली नाहीं. या उदाहरणासंबंधानें **बळवंत**रावांची खात्री असल्यामुळें, व साहेब कोणतें ठिकाणीं चुकण्याचा संभव आहे हें यांच्या लक्षांत येऊन चुकलें असल्यामुळें, ते धिटाईनें उभे होते. इतरांचे लक्ष मात्र साहेब आणि **बळवंतराव** यांच्या दरम्यान लागलें होतें. साहेबांनीं आतां जरी तडफड केली तरी पहिले पाडे पंचावनच आले! तेव्हां ते **बळवंत**रावाकडे पाहून ह्मणालें फळ्यावर उदाहरण सोडीवें आणि नंतर प्रथम उच्चारलेले शब्द पुन्हां उच्चार. साहेबाच्या रागाकडे **बळवंत**रावांनीं लक्षच दिलें

नाहीं. साहेबांनीं सांगतांच ते फळ्याजवळ गेले, आणि साग्र उदाहरण मांडून दाखविलें. हें पाहतांच साहेबांच्या चुकांची खूण पटली व क्रोधाचा वाहुटा खालीं पडून आनंदाचें निशाण चेहऱ्यावर स्पष्ट दिसलें, तथापि तें व्यक्त न करितां साहेब आपले उद्योगास लागले.

याच गणित विषयांत याच प्रोफेसर साहेबांस आश्चर्य वाटविण्यासारखा आणखी एक प्रसंग घडून आला. तो असा कीं, एका विद्यार्थ्यानें, साहेबांनीं दिलेल्या यादी पैकींच पण पूर्वी करून न ठेविलेल्या उदाहरणांतील एका उदाहरणाची रीत विचारली. परंतु साहेबांची पूर्ण तयारी नसल्यामुळें विचारलेल्या प्रश्नाचें उत्तर त्यांनीं दुसरे दिवसावर ठेविलें. **बळवंतराव**,स ऱ्या उदाहरणांत अवघडपणा वाटला नाहीं, तथापि " बिचमे मेरा चांदभाई " करणें यास नको असल्यामुळें त्यांनीं त्यावेळीं भाषणही केलें नाहीं. तरी सुट्टीचे वेळीं साहेब गेल्यानंतर तेंच उदाहरण फळ्यावर लिहून ठेविलें आणि चालते झाले. दुसरे दिवशीं विद्यार्थी वर्गांत आले तों फळ्यावर उदाहरण आहे तेव्हां त्यांची आपापसांत वाटाघाट चालली होती. इतक्यांत साहेब पुढें आणि त्यांच्या पाठोपाठ **बळवंतराव** येऊन आपले जागीं बसले. साहेबांनीं हातरुमालानें चेहऱ्याची साफसुफी करून अभ्यासास सुरवात करावयाची तों त्यांची नजर फळ्यावरील उदाहरणाकडे गेली. ज्या उदाहरणांकरितां साहेबास सकाळीं बरीच माथेफोड करावी लागली, तें आपल्या छात्रवर्गांपैकीं कोणी तरी पूर्वीच सोडवून ठेविलें आहे याबद्दल साहेबांना वैषम्य वाटावयाचें. पण तें न वाटतां आपल्या विद्यार्थ्यांत कोणी तरी विद्यार्थी असा आहे कीं, तो आपणांस गणित विषयांत गप्प बसवितो; असें त्यांस वाटून त्यांनीं हें उदाहरण कोणी सोडविलें ह्मणून प्रश्न केला. तेव्हां प्रथमपासून नकारास सुरवात झाली ती **बळवंतरावां**पर्यंत येतांच यांनीं रुकार दिला. तेव्हां साहेब ह्मणाले

नाहीं, असें वाटून **बळवंतराव** डेक्कन कॉलेज सोडून सुमारें सहा महिने मुंबईच्या एलफिन्स्टन कॉलेजांत गेले. तेथें **वर्डस्वर्थ साहेब** हे त्यांचे अध्यापक होते. इंग्रजी शिकविण्याचे कामांत त्यांची विशेष प्रख्याती होती. यांच्या शिकविण्याकडे जो मनःपूर्वक लक्ष्य देई त्याचा चांगला फायदा होई. खेरीज या साहेबांच्या तीर्थरूपांनीं केलेल्या पुस्तकांपैकीं दोन पुस्तकें तेथील विद्यार्थ्यांस ते मोठ्या आस्थेनें शिकवीत असत. भारतामध्यें मोठमोठ्या नांमांकित गुरूंची नांवें जशीं अनेक आहेत तशींच प्रसिद्ध शिष्यांचींही आहेत. परंतु **परशुरामाच्या** गुरुत्वास **भीष्म** जसे शोभले गेले तसें दुसरें थोडेच शोभले असते ! तद्वत **वर्डस्वर्थ** साहेबांचे हाताखालीं तयार होऊन सरकारच्या मोठमोठ्या हुद्यावर असलेले अनेक विद्यार्थी सर्व इलाखाभर आहेत. परंतु **वर्डस्वर्थ** साहेबांनीं जें शिकविलें त्याचें चीज करून दाखविणारे विद्यार्थी फारच थोडे. त्या थोड्यांतील थोड्यापैकीं **बळवंतराव** हे एक होत असें त्यांनीं त्याच वेळीं आपले वर्तनानें त्यांस दाखविलें. परीक्षेची वेळ येतांच **बळवंतराव डेक्कन कॉलेजचे** विद्यार्थी ह्मणून परीक्षेस बसले. त्यावेळीं त्यांनीं **वर्डस्वर्थ** साहेबांकडे पाहिलें नाहीं, अथवा माश्यानें गिळलेलें माणिक कोणत्या प्रकारच्या औदार्यानें पचवावें हें शिकविणाऱ्या **एलफिन्स्टन** साहेबांच्या नांवांकडेही पाहिलें नाहीं. ज्या शाळेंत आपण अधिक दिवस राहून ज्ञान संपादन केलें त्या शाळेस आपल्या परीक्षेचा गौरव दिला पाहिजे, अशा हेतूनें ते **डेक्कन कालेजांतील** विद्यार्थी म्हणून परीक्षेस बसले. तेथील गणितशास्त्राचे प्रो. **हॅथार्नवेट** साहेब यांनीं आपल्या सर्व शिष्यांस गणिताचें एक बाड तयार करण्यास लाविलें होतें. या वेळपर्यंत **बळवंतरावांचें** मस्तक हेंच प्रमुख विषयांचें संग्रहस्थान होतें. परंतु विलायती सुधारलेल्या पद्धतीस अनुसरून त्यांस तेथें गणिताकरितां चोपडी घालावी लागली. हे साहेब बीज-

गणिताचें पुस्तक छानून त्यांतून कांहीं उदाहरणें काढीत असत, आणि तीं विद्यार्थ्यांस सांगत असत. साहेबांचे मर्जीखातर **बळवंतरावांनीं** चोपडी घातली; परंतु त्यांच्या सांगण्याप्रमाणें पंक्तिप्रपंच न करितां सारेंच बीजगणित त्यांत सोडवून ठेविलें. एकदां अशी मौज झाली कीं, साहेब आपले बंगल्यांत गणित सोडवित असतां पुस्तकांतील उत्तराशीं साहेबांचें उत्तर मिळेना. साहेबांस वाटलें गणित करणारा चुकला तरि असावा अथवा पुस्तक छापतेवेळीं ही चूक तरी झाली असावी. या समजावर त्यांनीं दुसरें दिवशीं वर्गांत आल्यावर सर्व विद्यार्थ्यांस त्यांच्याजवळ असलेलीं पुस्तकें दुरुस्त करण्यास सांगितलें. जे नेहमीं "सर सर" करण्यामुळें साहेबांचे प्रीतिपात्र बनले होते त्यांनीं चटकन् दुरुस्ती करून साहेबांस दाखविली. जे शोध करून काय तें करूं ह्मणणारे होते ते "यस् सर" ह्मणाले, पण कांहीं न करतां स्वस्थ राहिले. **बळवंत**रावांनीं दुरुस्ती केली नाहीं व स्वस्थही बसले नाहींत. त्यांनीं पुस्तक बरोबर आहे, साहेब चुकले आहेत असें स्पष्टपणानें सांगितलें. चिन मिशाचें पोर नुकतेंच या शाळेंत आले असतां आपणांस एकदम चुकलें ह्मणालें याचा साहेबांस खूप घुस्सा आला. त्यांचा चेहरा अधिक लाल झाला, डोक्याचे केंस तरारले. तथापि **बळवंत**रावांस अधिक न बोलतां उभे राहण्यास सांगून आपण स्वतः आणखी उदाहरण तपासून पाहूं लागले तरी चूक सांपडली नाहीं. या उदाहरणासंबंधानें **बळवंत**रावांची खात्री असल्यामुळें, व साहेब कोणतें ठिकाणीं चुकण्याचा संभव आहे हें यांच्या लक्षांत येऊन चुकलें असल्यामुळें, ते धिटाईनें उभे होते. इतरांचे लक्ष मात्र साहेब आणि **बळवंतराव** यांच्या दरम्यान लागलें होतें. साहेबांनीं आतां जरी तडफड केली तरी पहिले पाडे पंचावनच आले! तेव्हां ते **बळवंत**रावाकडे पाहून ह्मणालें फळ्यावर उदाहरण सोडीवें आणि नंतर प्रथम उच्चारलेले शब्द पुन्हां उच्चार. साहेबाच्या रागाकडे **बळवंत**रावांनीं लक्षच दिलें

नाहीं. साहेबांनीं सांगतांच ते फळ्याजवळ गेले, आणि सर्व उदाहरण मांडून दाखविलें. हें पाहतांच साहेबांच्या चुकीची खूण पटली व क्रोधाचा वाहुटा खालीं पडून आनंदाचें निशाण चेहऱ्यावर स्पष्ट दिसलें, तथापि तें व्यक्त न करितां साहेब आपले उद्योगास लागले.

याच गणित विषयांत याच प्रोफेसर साहेबांस आश्चर्य वाटविण्यासारखा आणखी एक प्रसंग घडून आला. तो असा कीं, एका विद्यार्थ्यानें, साहेबांनीं दिलेल्या यादी पैकींच पण पूर्वी करून न ठेविलेल्या उदाहरणांतील एका उदाहरणाची रीत विचारली. परंतु साहेबांची पूर्ण तयारी नसल्यामुळें विचारलेल्या प्रश्नाचें उत्तर त्यांनीं दुसरे दिवसावर ठेविलें. **बळवंतराव**,स त्या उदाहरणांत अवघडपणा वाटला नाहीं, तथापि " बिचमे मेरा चांद्भाई " करणें यास नको असल्यामुळें त्यांनीं त्यावेळीं भाषणही केलें नाहीं. तरी सुट्टीचे वेळीं साहेब गेल्यानंतर तेंच उदाहरण फळ्यावर लिहून ठेविलें आणि चालते झाले. दुसरे दिवशीं विद्यार्थी वर्गांत आले तों फळ्यावर उदाहरण आहे तेव्हां त्यांची आपापसांत वाटाघाट चालली होती. इतक्यांत साहेब पुढें आणि त्यांच्या पाठोपाठ **बळवंतराव** येऊन आपले जागीं बसले. साहेबांनीं हातरुमालानें चेहऱ्याची साफसुफी करून अभ्यासास सुरवात करावयाची तों त्यांची नजर फळ्यावरील उदाहरणाकडे गेली. ज्या उदाहरणांकरितां साहेबास सकाळीं बरीच माथेफोड करावी लागली, तें आपल्या छात्रवर्गांपैकीं कोणी तरी पूर्वीच सोडवून ठेविलें आहे याबद्दल साहेबांना वैषम्य वाटावयाचें. पण तें न वाटतां आपल्या विद्यार्थ्यांत कोणी तरी विद्यार्थी असा आहे कीं, तो आपणांस गणित विषयांत गप्प बसवितो; असें त्यांस वाटून त्यांनीं हें उदाहरण कोणी सोडविलें म्हणून प्रश्न केला. तेव्हां प्रथमपासून नकारास सुरवात झाली ती **बळवंतरावां**पर्यंत येतांच यांनीं रुकार दिला. तेव्हां साहेब म्हणाले

हीं पुढचीं उदाहरणें तुह्मीं केव्हां सोडविलीं ? यांनीं सांगितलें कीं, असल्या साध्या उदाहरणांना आधि आणि मगची गरज नाहीं. हें साफ, ह्मणून गर्वोक्तिचें दिसणारें उत्तर साहेबांना न आवडणें सरळच आहे, पण येथें तरी त्यांच्या रागलोभाची पर्वा नसताचीच असल्यामुळें त्यांनीहीं तिकडे लक्ष दिलें नाहीं. या बेपर्वाईमुळें त्यांची खरी योग्यता समजून घेणारास कळे. इतरास कळत नसे.

मनु पालटला, स्थळ पालटलें आणि जन्मजागा पालटली तरी षष्ठीपूजनांतील सटवाईची बदली जोंपर्यंत झाली नाहीं तों पर्यंत स्वभावांत अंतर पडणें कठिण आहे, असें वृद्ध लोक ह्मणत असत. त्याचा अनुभव अन्यत्र जरी कमी असला तरी **बळवंतरावांच्या** घराण्यांत तो पूर्ण येतो असें ह्मणतां येतें. पणजे **केशवराव** यांचा जन्मकाळ, जन्मस्थळ व जन्ममनू; पणतू **केशवराव** उर्फ **बळवंतराव** यांच्या वेळीं अगदीं पालटला होता. ते पूर्ण स्वातंत्र्याच्या काळांत व स्थलांत जन्मले असून त्यांच्या आयुष्यांतील बहुतेक कर्तबगारी स्वातंत्र्यांत झाली होती. आजे **रामचंद्रपंत** स्वातंत्र्य व पारतंत्र्याच्या सरहद्दींत होते. **गंगाधरपंत** पूर्ण पारतंत्र्यांत जन्मले असून अखेरपर्यंत रुपेरी शृंखळेनें बद्ध होते, तरी तो बंद आतां इतका अवळला गेला नव्हता. स्वातंत्र्यांतील स्वाभिमान, स्पष्टवक्तेपणा, करारी वृत्ति वगैरे गुण जसे वडिलांचे अंगीं होते तसें हल्लींच्या पूर्ण अंधेरांतही यांच्या अंगीं चमकत असल्यामुळें यांचे व यांच्या सहाध्यायांचे फारच थोड्या स्थळीं जमत असे. इतकेंच नाहीं पण यांच्या गुरूंचे व यांचेंही फारसें पटलें नाहीं. अकारणी स्तुति, स्वलाभार्थ हांजी हांजी करणाराबरोबर कुरापत काढून हे जरी भांडत बसत नसत, तथापि वेळ पडल्यास अशांची शिक्षक तात्काल पूज्य करण्यास चुकत नसत. यामुळें यांच्याशीं वाकून असणारे व साहेबापुढें गोंडा घोळणारे कांहीं असत व साहेब त्यांच्यावर

मेहरबानी करीत असत. परंतु त्या मेहरबानीचा दुष्परिणाम घडला नाहीं. प्रति मासिक परीक्षेंत कडुवृंदावनासारखे भासणारे **बळवंतरावच** वर येत असत.

या वेळीं **बळवंतरावांचे** वर्गांत अगाशे नांवाचे एक विद्यार्थी असत, त्यांचा गणित विषयांत मोठा लौकिक असे. इतका लौकिक **बळवंतरावजींचा** नव्हता. हे गणितांत बरे आहेत इतकेंच त्यांच्या सहाध्यायांस वाटत असे. एका परीक्षेचे वेळीं असें झालें कीं ,गणिताचे जे प्रश्न सोडविण्यास आले होते ते बरेच कठिण असून वेळेच्या मानानें जास्तच होते. हे सारे प्रश्न **बळवंतरावजींनीं** सोडल्यामुळें यांस शंभरापैकीं ६९ गुण मिळाले, व रा. अगाशे यांस फक्त ४८ मिळाले. हें मोठें अंतर पाहून प्रोफेसर साहेबांस आश्चर्य वाटलें. अशीं बरींच प्रत्यंतरें आल्यामुळें प्रोफेसर **हॅथॉर्नवेट** साहेबांचे प्रशंसनीय विद्यार्थ्यांत **बळवंतरावजीही** सामील झाले. बीजगणितांत अशीं कांहीं चिकट उदाहरणें असत कीं, त्यास काट देऊन पुढें गेल्यास नडत नसें. अशा विषयांची एक यादी करून ती विद्यार्थ्यांस सांगावयाची व विद्यार्थ्यांनीं ती वजा करून बाकीचीं उदाहरणें सोडविण्याचा उद्योग करावयाचा, असा सांप्रदाय असे. हें फड मारण्याचें काम **बळवंतराव** करीत नसत. त्यांनीं अथपासून इतिपर्यंत सर्व उदाहरणें पूर्वींच पिंजून ठेविलीं असल्यामुळें त्यांस त्यांत अवघड असें कांहींच वाटत नसे. प्रोफेसर साहेबांनीं इतकी व्यवस्था केली असतांही एकाद्या विद्यार्थ्यास कांहीं उदाहरणें सोडवितांना अडचण वाटली, व तो प्रोफेसर साहेबाकडे गेला तर ते आपल्या माथ्यास श्रम न देतां **बळवंतरावांकडे** बोट दाखवीत असत; आणि **बळवंतराव** तें दाखविणें व्यर्थ जाऊं देत नसत. इतका भरंवसा तत्कालीन विद्यार्थ्यांपैकीं फारच थोड्यावर असे. हें एक कारण **बळवंतरावजींच्या** अधिक प्रसिद्धीस,

विद्यार्थ्यांच्या उपयोगास आणि **हेथानवेट** साहेबांच्या विश्रांतीस झालें होतें, असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

सन १८७६ सालीं **बळवंतराव** बी. ए. च्या गडावरील पहिले मैदानांत जाऊन उभे राहिले व त्यांनीं तो काबीजही केला. याचा आनंद **काकास** व **आकास** झाला तसाच सासुरवाडीच्या मंडळींतील जिव्हाळ्यासही झाला हें सांगण्याची गरज नाहीं. **काकांस** वाटे **बळवंतराव** मुनसफीचा अभ्यास करील तर एकदम दोन अडीचशें रुपयांचा मुनसफ होईल. **आकास** वाटे आपला भाऊ **मामलेदार** झाला ह्मणजे शेंकडों लोक त्याच्या घोड्यापुढें धांवतील. मोठमोठाले खोत लोकही त्याच्यासमोर नमून वागतील. माझा भाऊ, भाऊबीजेस माझ्या घरीं आला असतां गांवांतील लोक "**रावसाहेब**" आले ह्मणून त्यांना भेटावयाला येतील. मला विचारतील आणि मी आपली धन्यता त्यांना सांगेन. परीक्षेस जाणें व्हावयाचें त्यांत यश यावें ह्मणून मी नवस केले आहेत, ते मी "**मामलेदारीण**" होतांच फेडीन. "**मामलेदारीण**" नाहीं झालें "**मास्तरीण**" झालें तरी ठेवावयाची नाहीं; व नवस फिटल्याखेरीज मी मोठा दागिनाही करावयाची नाहीं; इत्यादि प्रकारचे विचार **सत्यभामाबाईचे** मनांत घोळत असल्यास त्यांत अधिक तें काय ! **बळवंत**रावजींचे विचार यावेळीं अगदीं निराळे होते. त्यांचे पुढें तीन निशाणें उभीं होतीं. एका निशाणाचे फराऱ्यावर एम. ए. अशीं अक्षरें लिहीलीं होतीं. दुसरें निशाणावर एल. एल. बी, व तिसऱ्यावर असि. मास्तरी अथवा खजीनदारी अशीं अक्षरें होतीं. यांच्याच मागले बाजूस आणखी एक निशाण होतें. त्यावर रामनाक, सोमनाक, गेननाक, राजनाक, दगड, कोळशे, इंजिनें, दुर्भिण दांडे, सिंध, कराची, कारवार इत्यादिकांची अक्षरें, चित्रें व नकाशे असून त्यांचे समोर एल. सी. इ. अशीं अक्षरें होतीं. या चौथ्या निशाणाकडे **बळवंत**रावांनीं मुळीं लक्षच दिलें



रा. सा. श्रीधर बाळकृष्ण उपासनी.

नाहीं असें नाहीं. गणिताचा विषय आवडता प्यारा आहे, व एल. सी. इ. च्या परीक्षेला त्याचीच गरज आहे, तेव्हां आपण तिकडे वळावें असेंही **बळवंत**रावांचे मनांत एकदां आले होते व त्यांनीं त्याबद्दल कांहीं जणांची सल्लाही घेतली होती. परंतु यांच्या विचारास ती न पटल्यामुळें यांनीं ती दिशा सोडून दिली. तिसऱ्याचा विचार मग पाहतां येईल म्हणून तें बाजूस सारिलें. बाकी राहीलीं दोन. यांपैकी पहिले निशाणावर शिस्त धरली आणि मध्येंच एकाद्या प्रोफेसराचे व आपले सूत तुटलें, तर वर्षभर घोंटाळा होण्याचा संभव आहे हें एक ( हा संभव हे एम. ए. च्या परीक्षेस गेले असतां नंतोतंत खरा ठरला. ) व दुसरें कदाचित् पहिले झपाट्यास निशाण साधलें तरी पुन्हां तिसऱ्याकडेच वळावें लागेल तसा प्रकार दुसरें निशाणाचा नाहीं. तें आपलें मर्जीवर आहे असा विचार मनांत आणून व **दाजी आबाजी खरे, श्रीधर बाळकृष्ण उपासनी** हे याच निशाणावर नेम धरणार आहेत असें ठरल्यावरून यांनींही आपला मोर्चा तिकडेच फिरविला.

**बळवंतरावजी** एल. एल. बीचा अभ्यास करण्याकरितां मुंबईस होते. यांच्या क्लबमध्यें रा. रा. **दाजी आबाजी खरे, श्रीधर बाळकृष्ण उपासनी** वगैरे मंडळी याच परीक्षेचा अभ्यास करीत असून रा. रा. **सखाराम अमृत पळशीकर** हे वकीलीचा अभ्यास करीत असत. एकदां याच आळीचे तळमजल्यांत कर्नाटकचे एक मामलेदार आपल्या अंगवस्त्रासह येऊन राहिले होते. **बळवंतरावजींस** या गोष्टीची चीड असे पण उपयोग काय ! तेथें यांना आणि दुसरे कोणास तरी कोण विचारतो. अशी स्थिति असल्यामुळें तेथील स्त्रियांस या जोडप्याची मोठी उपाधी वाटे. दुसरें, अशा स्त्रियांस असलें एकादें फक्कड कूळ सांपडलें ह्मणजे तारा, सीता, मंदोदरीपेक्षां आपण मोठ्या पतिव्रता असून एकाद्या राजाचे राणीसाहेबापेक्षां मोठ्या

अधिकाराच्या आहोंत, असें वाटून त्या मोठ्या तोऱ्यांतच दुसं-ऱ्यास तुच्छ मानीत असतात. असाच प्रकार या रावसाहेबांच्या प्रकर्णाचा असल्यामुळें या चाळींतील स्त्रियांस मोठी जिकीर झाली. राणीपणाच्या मोठ्या डौलामुळें, टवाळ मंडळीस एक नवा विषय झाला; आणि **बळवंतरावजीं**सारख्या मंडळींस तिरस्कार उत्पन्न होईल अशा नव्या नव्या गोष्टी नित्य ऐकूं येऊं लागल्या. यामुळें ही पीडा टाळण्याची युक्ति लोक योजितच होते. तों एके दिवशीं त्या बयाचे हातांतील हिऱ्याची आंगठी शौचकुपांत राहिली, ती **बळवंतरावजींस** सांपडली. ही संधी साधून **बळ-वंतरावांनीं** एक जाहिरात काढिली. तींत असे लिहिलें होतें कीं, जर कोणाचा कांहीं जिन्नस गमावला असेल तर त्यांनीं तो जिन्नस आपलाच आहे अशी खात्री होण्यासारखा पुरावा व बक्षीसीची रक्कम घेऊन खालीं सही करणारास भेटावें. ही जाहि-रांत तळमजल्यांत आणून लावली. ही लावण्यांत आणखी एक हेतू असा होता कीं, ही बुरख्यांतील चांदणी किती चटकदार आहे हें सर्वांस दिसावें व तिजवर फिदा असलेल्या रावांस सांगून त्यांच्या संबंधानें चाळींतील लोकांस होत असलेला त्रास चुक-वावा. हे दोन्ही हेतु या जाहिरातीनें सिद्धीस गेले. यजमान आंगठी मागावयास आले पण हे त्यावेळीं वाचीत असलेल्या पुराव्याचे कायद्या प्रमाणें सांपडलेल्या आंगठीचे खरे मालक ठरत नव्हते, ह्मणून त्यास आंगठी मिळाली नाहीं. मालकीण आली, तिनें हात पुढें करून ती बोटांत बरोबर बसली असें दाखविलें, तेव्हां ती आंगठी त्या बाईस मिळाली व तिनें एक रुपया बक्षिस दिला. त्या रुपयाचे पेढे आणून त्या चाळींतील सर्व मुलांस वाटून दिले. पुढें एकदोन दिवसांनींच ते रावसाहेब आपले बिऱ्हाड घेऊन निघून गेले.

असो यांचा **एल. एल. बी. चा** अभ्यास सुरू झाला तरी पुढील व्यवसायाचे विचार मार्गे पडले नव्हते. प्रस्तुतची शिक्षण-

पद्धात ही आपणास अपायकारक आहे, ही आपले देशास डोकें वर करण्यास साधनीभूत होणार नाहीं, पण त्यास उद्ध्वस्त करण्यास साधन होत आहे व आणखी होईल यांत संशय नाहीं. या करितां " मूले कुठारः " या न्यायानें या शिक्षणांतील दूषित भाग अजीबात काढून टाकण्याचा प्रयत्न झाला पाहिजे व असा प्रयत्न करण्याची वेळ आलीच आहे, इत्यादि विचार त्यांच्या वयाच्या मित्रमंडळींच्या मनांत घोळू लागले होते. या विचारांत **श्रीधर बाळकृष्ण** उपासनी हे एक होते. आपणांस महाराष्ट्रांत पैशाची कुमक न मिळाल्यास आपण वऱ्हाडांत जाऊं, व तिकडे एक लक्ष रुपये गोळा-करून तेथेंच टोलेजंग इमारत उभारून, आपला हेतू पुरा करूं; अथवा तिकडून रक्कम आणून इकडे शुद्ध शिक्षणाचा पाया घालूं, इत्यादि अनेक विचार ठरविण्यांत आले होते. त्यांनी वऱ्हाडप्रांतीच जाण्याचा विचार यांनीं व **उपासनींनीं** कायम करावा असा बेत केला.

यावेळीं अथवा वर्ष दोन वर्षे आधींच पुण्यग्रामीं यांच्याच बुद्धीचा आणि यांच्याच स्वभावाचा एक रोपा जोमांत आला असून, त्याचें कर्तृत्व मोहरास आले असल्यामुळें अनेक भ्रमर त्याच्या सुवासांत दंग झाले होते. अनेक काक त्याच्या सुवासाच्या दर्पानें दिपून जाऊन काव काव करूं लागले होते. ज्या वर्षी **बळवंतरावांचा** कोंकणांत जन्म, त्याच वर्षी कृष्णातटाकीं जन्म पावून कृष्णाकोयनेच्या संगमांत वाढत वाढत दुसरा एक रोपा यांच्या बरोबरीस आला होता. या **बाळगोपाळांचा** जोम जोरांत होता, तरी त्यास बाहेर येण्यास अवकाश असल्यामुळें यांच्या अंगच्या सुवासाचा परिमळ फार पसरला नव्हता. या वेळची देशस्थिति यांच्या स्वभावास अनुरूप अशीच बनत चालली होती. राजकीय विचारांत बराच बदल झाला होता. आकाशांतून खालीं आलेले अथवा पाण्यांतून वर आलेले

देवदूत आमच्या देशाचें कल्याण करतील आणि आह्मी शहाणे झालों म्हणजे आमचें राज्य आमच्या स्वाधीन करून ते निजधामास जातील, हिंदुस्थानचे लोक शहाणे झाले आणि त्यांचें राज्य त्यांच्या स्वाधीन केलें हीं अक्षरें जगाच्या इतिहासांत सोन्याचीं नव्हे, हिऱ्याचीं नव्हे, कोहीनूरपेक्षांही अत्यंत प्रकाशमान होतील, व हें सारें वैभव हिंदुस्थानच्या कोट्यवधि रुपयांच्या सोन्यारुप्याच्या, अथवा हिरेमाणकांच्या खाणींपेक्षां इंग्लंडास अधिक किंमतीचें आहे, इत्यादि प्रकारच्या इंग्रजांच्या वल्गना चालत व त्यांवर हुरळून जाऊन आमच्या कल्पना चालत असत, त्या भ्रामक आहेत असें वाटूं लागण्यास नुकतीच सुरवात झाली होती.

थोडक्याच इंग्रजी अभ्यासांत हव्या तेवढ्या पगाराची जागा मिळण्याची आशा क्षयास जाऊन बी. ए. मामलेदारी कडून खजीनदारीवर आले होते. एल. सी. ई असिस्टंट इंजिनियरी वरून घसरत घसरत ओव्हरसियर थर्ड ग्रेडपर्यंत येण्याचे पंथास लागले होते. कॉलेज शिक्षणांतील मंडळी शाळाखात्याखेरीज इतर खात्यांतील मोठ्या जागांस उपयोगी पडत नाहींत, असा ध्वनी रेव्हिन्यु खात्यांतून उत्पन्न होऊं लागला होता. प्रत्येक खात्यांत विलायतचे भरताड भरूं लागलें असून त्यांच्या वागणुकींत अरेरावीपणा उत्पन्न झाला होता व तो बऱ्याच खालचे वर्गापर्यंत जाणवूं लागला होता. लोकांवरील करांचें ओझें दिवसेंदिवस जड होऊं लागलें होतें. भोजनावरील करासारखे प्रत्यक्ष कर कमी करण्यांत आल्यासारखें भासे, पण मीठ आणि दारू यांच्या संबधानें जुलूम, अन्याय व अनीति वाढत्या प्रमाणावर आहेत हें बऱ्याच खालचे वर्गास कळूं लागलें होतें. बडोदें, ह्मैसूर सारखीं प्रकरणें, लखनौ, कानपूर, मुंबई इत्यादि ठिकाणां सारखे बडे दरबार, त्यांतील जंगी भाषणें, आणि तेथें आलेल्या राजेरजवाड्यांकडील नजराणे इत्यादि देखावे दिखाऊ असून

त्यांत बिलकूल राम नाहीं असें वाटूं लागलें होतें. सुशिक्षित ह्मणून कायद्याचे राज्यांत वायद्यावर येऊन मागणी करणें अशिक्षितपणाचें ठरेल याकरितां ईस्ट इंडिया असोसिएशन, बाँबे असोसिएशन, सार्वजनिक सभा आणि तिच्या पोटशाखा ह्मणून निरनिराळ्या जिल्ह्यांत, निरनिराळ्या तालुक्यांतही अध्यक्ष उपाध्यक्ष, चिटणीस इत्यादि दर्शनी मूर्तींच्या स्थापना होत असून इंग्रजी अनुकरणांचे चिन्हांत हुबेहुबपणा आणण्याकरितां कांहीं वाचस्पतींचा उद्योग चालू झाला होता व आपल्या रडकथा कोणत्या धोरणानें राज्यकर्त्यांच्या कानावर घालाव्या, हें सांगण्यांत येऊं लागलें होतें.

इतक्यावरच समाजाचा गाडा थांबला नव्हता, तर ब्राह्मणांच्या चिखलांत रुतलेल्या गाईस वर काढण्याकरितां व वर्तमानपत्रांचें वळण पालटण्याकरितां इंदुप्रकाशाचा अवतार होऊन त्याच्या शीतल छायेंत के० गाडगीळ, पंडित, रानडे, हळवे इत्यादि मंडळी काम करूं लागली होती. त्यांनीं गंगाभागीरथी वेणूबाईस सौभाग्यवती बनवून " रुप्याचें ताटांत भरलें बत्तासे, पुनर्विवाहाचें थाटांत विनायकराव खासे " असा उखाणा घेण्यास लाविलें होते. यास प्रतिबंध करणाऱ्या माळवणकरादि जुन्या खोडांची खांडोळी करून त्यांस पुन्हां नवा अंकूर न फुटूं देण्याकरितां त्यांस आरोपी बनवून हायकोर्टासमोर उभे करण्यांत व श्रीमत् शंकराचार्यास साक्षीदारांच्या पिंजऱ्यांत उभें करून ही नेहमींची पिरपिर काढून टाकून आपलें धर्माचें व्यासत्व इंग्रजी न्यायाधिशांचें स्वाधीन करण्यांत अखंड सौभाग्याचें महत्पुण्य आहे असा अज्ञ समाजाचा ग्रह करण्याची खटपट झाली होती.

इतक्या खटाटोपानेंही या मठ्ठ समाजाचें कल्याण व्हावयाचें नाहीं असें वाटून कीं काय कोण जाणें, उत्तरेस उदय पावलेल्या स्वामीस दक्षिणेंत आणून त्यांच्याकडून आमच्या पुराण-

मियांची खोड मोडण्याकरितां कांहीं वीरांनीं प्रयाण करून त्यांस इकडे आणिले, व स्वामीमहाराजांनींही घीशर्करेच्या चरव्यांचे चरव्यांचा फन्ना उडवित उडवित आमच्या तेहतीस कोटी देवांची तारंबळ उडविण्यास प्रारंभ केला. मुसलमानांचे धाकानें, काशीविश्वेश्वर, बिंदुमाधव इत्यादिकांच्या मूर्तींची त्यांच्या भक्तांनीं जशी व्यवस्था केली तशी व्यवस्था करण्याचा प्रसंग जुन्या कर्मठांवर येण्याच्या पूर्वीच स्वामींच्या होतकरू चेल्यांनीं कित्येक मूर्तींस वाटेस लाविलें; आणि या ताज्या व साजूक गुरूपासून उपदेश घेऊन डळमळीत झालेल्या प्रार्थनासमाजास बाजूस सारून आर्यसमाजाची त्या ठिकाणीं योजना केली. या परमहंस महाराजांचा मोर्चा फिरत फिरत पुण्यावर आला. पुण्यास स्वारीच्या ऐन रंगाच्यावेळीं एका गर्दभाचार्यांची स्वारी अवतीर्ण होऊन त्यांनीं या यतीश्वरास पुण्याहून साताऱ्यास नेले. तेथेंही त्यांनीं खुळ्या लोकांची खोड काढण्यास प्रारंभ केला. परत स्वामींची मात्रा न चालतां त्यांच्या सत्शिष्यास स्वामींचा चरिंदा आपापसांत वाटून घेऊन स्वामीमहाराजांची कशी बशी पाठवणी करावी लागली! तथापि शालिग्रामास कंदर्परूपी शालिग्रामासन्निध ठेववणोर शिष्यांची वाढती संख्या तयार करण्याकरितां थोडे दिवस आधीं हिंदू रिफॉर्मर वर्तमानपत्र उदयास आल. त्यानें कांहीं दिवस आमच्या तेहतीस कोटी देवांचा हजेरी घेण्यास सुरुवात केली. पण बिचारे हजेरी घेतां घेतां तें लवकरच थकलें. तेव्हां त्यानें मित्रोदयास मदतीस बोलाविलें. मग दोघांनीं मिळून या जुन्या समाजावर हल्ला करण्यास सुरुवात केली. पाण्यांत बुडणारा मनुष्य दुसऱ्याचे गळ्यास मिठी मारून आपण व तो दोघे जसें बुडतात तद्वत् हीं दोन्हीं पत्रें लवकरच थकलीं, आणि शेवटीं त्यांनीं राम म्हटलें. याच समयास पाद्र्यांचे कंपूंतून बाहेर पडलेले एक गारोडी आपले पोत्यांतून बळीस पाताळीं घालणाऱ्या वामनाच्या स्वरूपाचें एक एक लक्षण परीक्षणार्थ बाहेर काढून, त्यावर सत्यासत्यतेचें ओबड धोबड

अलंकार घालू लागले, तरी तें बरें दिसेना. तेव्हां तो नाद सोडून देऊन सत्यशोधनाचें गाळणें हातीं घेतलें. या गाळण्यांतून जे सत्याचें शुद्ध सत्व खालीं गळेल, त्यानें दिनांचें दैन्य हरेल या समजुतीनें ते खटपट करूं लागले. या सुधारणा कंपूंतील पहिलें पथकांत **वामन आबाजी** सारखीं जाडीं जाडीं प्रकरणें होतीं. अशा लोकांचें व निस्पृही गृहस्थांचें कधीं पटावयाचें नाहीं.त्याप्रमाणेंच इंदुप्रकाशांत कधीं कधीं लिहिणाऱ्या कै० **विश्वनाथ नारायण** मंडलिकांचें आणि प्रकाशकारांचें न पटल्यामुळें त्यांनीं **नेटिव्ह ओपिनियन** नांवाचें पत्र सुरू करून त्यांत राजकीय गोष्टींचें सत्यस्वरूप बरेंच जोरानें पुढें आणण्याचा क्रम वाढवीत आणला होता. तशाच जागोजाग वक्तृत्वोत्तेजक मंडळ्यांची स्थापना होऊन त्यांत निरनिराळ्या विषयांवर चर्चा होऊं लागली होती. एकंदरींत राजकीय मोठमोठ्या राजकारस्थानापासून तों आमच्या जोडे वापरणाऱ्या शाळेंतील विद्यार्थ्यांपर्यंत अनेक प्रकारची चर्चा सुरूं असल्यामुळें समाजांतील थंडोसा कमी कमी होत आला होता. तथापि फांसेपारधी आपल्या पसरलेल्या जाळ्याचा मणी हातीं धरून बाजूस उभा राहतो आणि जाळ्यांत सांपडलेलीं हरणें पारध्यास न ओळखतां कांहीं या बाजूस, कांहीं त्या बाजूस सैरावैरा धांवत असतात, तद्वत इंग्रजी शिक्षणानें तरारलेली मंडळी भडकली होती. बराचसा वक्तृत्वपटू आणि चौचाल गृहस्थ असला कीं तो समाजाचा पुढारी म्हणून मिरवीत असे. मग तो पुढाकार धर्माचे संबंधाचा असला आणि याला स्वधर्माची हवा लागली नसली तरी चिंता नाहीं. तो भाषा विषयाचा पुढारी होण्यास कचरत नसे. ज्योतिष असो, इतिहास असो, हा स्वतः परद्वाररत असो, अथवा बाटलीभक्त असला तरी नीतिमीमांसेचा पुढाकार खुशालपणें घेण्यास त्यांच्याकडून मनाई नव्हती. मात्र त्यास थोड्याशा अधिकाराची गरज असे तेवढी भागली असली म्हणजे झालें ! हेंच कारण समाजांत दुही माजून विस्कळीतपणा आणण्यास झालें होतें.

अशा अनेक बाबतींत विस्कळीत झालेल्या समाजास मध्यावर आणण्याच्या इच्छेनें एक तरुण पुढें सरसावून तो आपल्या आंगच्या धैर्यानें, बुद्धिमत्तेनें आणि निस्पृहतेनें सर्वांस थक्क करावयास लागला होता. जो रोपा मोहरास आला असून त्याच्या परिमलानें व दर्पानें भुंगे व काक गुंजारव व कावकाव शब्द करूं लागले होते, ह्मणून मागें सांगितलें आहे ते गृहस्थ कै. **विष्णू कृष्ण चिपळूणकर** हे होत. यांनीं हातीं घेतलेल्या निबंधरूपी मालेच्या परिमलानें कित्येकांचे नेत्र उघडे केले, कित्येकांचीं अंतःकरणें शुद्ध केलीं, कित्येकांचीं मनें क्षुब्ध करून सोडलीं, आणि कित्येकांस सजीव केलें. त्यांतून इतिहास, वक्तृत्व, इंग्रजी भाषा, जॉनसनचें चरित्र, आमच्या देशाची स्थिति, मोरोपंत, लोकहितवादी इ. विषयांवरील पुष्पांनीं तर समाजांत इतकी खळबळ करून सोडलीं कीं, आमच्या **बळवंतराव टिळका**-सारखीं नव्हे–पण घोकी मंडळी–कीं, जी सदा सर्वकाळ आपल्या अभ्यासांत दंग असावयाची, ज्यांच्यापुढें मुनसफी मामलेदारी, वकीलीसारखीं सद्यःफलदायिनीं पात्रें तयार, तीही निबंधमालेंत आलेल्या विषयासंबंधानें व समाजांत चालत आलेल्या खडबडीच्या संबंधानें नित्य चर्चा करूं लागली. इतकेंच नाहीं तर आपल्या आयुष्यांतील कर्तव्याची दिशा ठाम ठरविण्यास लागली. निबंधमालेच्या संबंधानें कोणा इंग्रजानें तिरस्कारबुद्धि दाखविल्यास तें त्यास शोभेल, निबंधमालेच्या संबंधानें पाद्र्यांनीं बोटें मोडल्यास तें त्यास वावगें दिसणार नाहीं. ज्यांची कल्पना इंग्रजमय झाली आहे, ज्यांस इंग्रजी खेरीज दुसरें कांहींच दिसत नाहीं अथवा दिसावयाचें नाहीं, ज्यांच्या गोष्टी इंग्रजांच्या, ज्यांच्या कल्पना इंग्रजी, ज्यांचे दृष्टांत देणें इंग्रजी, ज्यांचे वसिष्ठ वामदेव इंग्रज, अथवा ज्यांचे अंतिम दैवत इंग्रज, फारतर काय, पण ज्यांना इंग्रजी शिवाय वैतरणी तरून जातां येईल किंवा नाहीं हा संशय ! अशास निबंधमाला बाष्कळ

302

वाटली तरी त्यांत मोठेंसें नवल नाहीं. पण ज्यांना " स्व " म्हणून कांहीं होतें पण त्यावर अनेक पुटें बसल्यामुळें ( त्याचें रूप सर्वस्वी पालटून गेलें असें वाटत असे, त्यांस किंवा ज्यांस आपपर ही कल्पनाच नव्हती, ज्यांचीं आयुष्यें, श्वानसूकरांप्रमाणें जात असत, जे " श्व " वृत्ती-माणें वागून उदरें भरीत असत, जे धड ना गाढव ना ब्रम्हचारी ह्याप्रमाणें वागत त्यांजवर निबंधमालेनें आपला योग्य परिणाम केला हें अनेकांस कबूल करावें लागेल. निबंधमालेनें आळशांस वाचनाची गोडी लाविली, साधारण वाचकांत शोधकबुद्धि उत्पन्न केली, कित्येकांस सुंदर लेखक बनविले, अनेकांच्या भ्रामक कल्पनांचा ऱ्हास केला, व मनुष्यांचें मनुष्यत्व कशांत आहे हें दाखविलें, राजाचें विष्णुरूप काढून टाकलें, ढोंग्याच्या ढोंगांचा स्फोट केला. मिथ्या स्तुति व वृथा निंदा करणारांचा तिरस्कार कसा करावा हें सांगितलें, आणि " स्वत्वाचें " थोरपण अनुभवास आणून दिलें, तीच निबंधमाला सन १८७३ चे ऐवजीं १८५३ त उत्पन्न झाली असती तर आमच्या पुष्कळ गटारवसीयांस त्यांचे गृह दिसलें असतें; त्यांचा संसार दिसला असता अथवा राष्ट्राचा संसार समजूं लागला असता. **शास्त्री बोवांनीं** जें मोठें काम केलें तें हेंच होय. असो.

**बळवंतराव** आणि त्यांचे जोडीदार यांच्यासमोर असलेल्या विषयास निबंधमालेनें दुजोरा दिला. निबंधमालेच्या प्रतिपक्ष्यांनीं तिचें जीवित क्षणभंगूर करण्याकरितां त्रयी स्मरून जो उद्योग केला, त्या त्यांच्या उद्योगास दाद न देण्याइतकी आपली हिम्मत व कर्तबगारी, आहे हें दाखविण्याचें जें साहस मालाकारांनीं केलें त्याचा परिणाम **बळवंतरावांच्या** विचारावर व उपजत स्वभावावर घडून त्यांचे विचार अगदीं बदलले असें म्हणण्यास हरकत नाहीं. एल. एल. बी. चे परीक्षेकरितां लागणाऱ्या कायद्यापेक्षां इंग्रजांनीं सन १८२७ पासून या वेळेपर्यंत केलेल्या कायद्यांचें वाचन केल्यास

अधिक फायदेशीर आहे. आपलें धर्मशास्त्र इंग्रजींतून वाचण्यापेक्षां मनु, वाल्मीकि व पराशर इत्यादिकांचे द्वारें अवलोकन करणें फार फायदेशीर व आपलेपणा राखणारें आहे, या धोरणानें त्यांनीं अध्ययन केलें. अपाक्रियाशास्त्र, पोलीटिकल एकॉनामी, हायकोर्टाचे निवाडे, त्रोटक पहिल्यापेक्षां अव्वल अखेर पार करावे हेच योग्य आहे. अशा धोरणानेंच यांचा अभ्यास चालू होता, तथापि, परीक्षा संपल्यावर काय करावयाचें याची वाटाघाट बंद पडली नव्हती. आपल्या समाजांत जें उणें आहे तें भरून काढण्याचा उद्योग केला पाहिजे, हा त्यांचे वाटाघाटींचा प्रमुख विषय झाला होता.

कृष्णेच्या पैलतीरीं रुजून कृष्णा कोयनेच्या प्रीतिसंगमाजवळ वाढलेला पण अनेक प्रकारच्या दृश्यादृश्य वादळानें हेलपाटत व टक्केटोणपे खात आलेला रोपा ह्मणून मागें ह्मटलें आहे ते कै० **गोपाळ गणेश आगरकर** हे होत.

यांचें व **बळवंतरावजींचें** स्वभावऐक्य जितकें निकट आहे तितकाच व्यवसायसंबंधही निकट आहे. याकरितां कै० **गोपाळरावांचें** संबंधानें थोडेसें अधिक लिहिल्यास विषयांतर होईल असें मला वाटत नाहीं. **बळवंतरावांचें** अभ्यासास जितकीं अनकूल साधनें होतीं, त्यापेक्षां अधिक प्रतिकूल साधनें **गोपाळरावांच्या** अभ्यासास होतीं. घरचें बहुतेक यथास्थितच असल्यामुळें वयाचीं दहाबारा वर्षें अजोळीं गेलीं. तेथें इंग्रजी अवघ्या तीन इयत्ता झाल्या. पुढें वडील मामानें साहाय्य केलें असतें तर होणें अशक्य नव्हतें. कारण या मामाचा वकीलीचा धंदा चांगल्या प्रकारें चालत होता. दुसरें **गोपाळराव** हे केलेल्या सहाय्याचे चीज करण्यासारखे आहेत अशी सर्वांची खात्री होऊन चुकली होती. तेव्हां त्यास वेळेवर सहाय्य दिलें असतें तर दोन वर्षें अगोदर ते उदयास आले असते. तसेंच **गोपाळरावजींचें**

चुलते **वामनराव** आगरकर हे रत्नागिरीस डे. ए. इन्स्पेक्टर होते. ते आपणास आश्रय देतील असें वाटून हे तिकडे गेले. परंतु **वामनरावजी** हे तखलोपी विद्वानांपैकीं असल्यामुळें त्यांस आपले वडिलांबरोबर भाषण करणें, त्यांच्या पंक्तीस भोजनास बसणें, हे आपले तीर्थरूप ह्मणून एखाद्यास सांगणें कमी योग्यतेचें वाटत असे. जेथें प्रत्यक्ष वडिलांची अशी व्यवस्था तेथें हाता खालील शिक्षकांस दोन दोन तास उभें रहावें लागल्यास त्यांत आश्चर्य कसलें? **वामनरावजींच्या** विद्वत्तेचा व व अधिकाराचा दर्प अशा प्रकारचा आहे हें **गोपाळरावांस** पूर्वी कळण्याचा संभव नव्हता. कारण त्यावेळीं ते सातान्यांस होते. त्यावेळीं **गोपाळराव** अल्पवयी होते. **गोपाळरावांस** काकांचें स्वरूप पूर्वींच समजतें तर ते त्यांचें नांवही घेतेना. परंतु परमेश्वराचे मनांत **गोपाळरावजींचें** धैर्य व हिम्मत वाढवावयाची असल्यामुळें ते **रत्नागिरीस** गेले. तेथें **वामनरावांनीं** त्यांस विचारलें सुद्धां नाहीं, तेव्हां त्यांना उलट्या अंचारीच्या आश्रयानें तेथें कांहीं दिवस काढावें लागले. आपले धाकट मामा दत्तोपंत, सहाध्यायी पांडुरंगपंत पाठक आणि विठ्ठलराव सुपनेकर हें पुढें चालले व आपणास पुढें जाण्यास साधन नाहीं, तरी निराश न होतां "काशीस जावें नित्य वदावें" या ह्मणीप्रमाणें यांनीं अभ्यासाचा ध्यास घेतला. एकीकडे नाहीं दुसरीकडे, दुसरीकडे नाहीं, तिसरीकडे, असे प्रयत्न करतां करतां अखेर म्याट्रिक्युलेशन पार पडली, आणि तीही पण मामाचे बरोबर. हा एक हप्ता झाला. असेंच पुढील हप्तेही पार पाडावयाचे अशा निश्चयानें कंबर कसली. ती बी. ए. ची परीक्षा दिली तरीही सोडली नाहीं.

या सर्वांवरून यांच्या आंगच्या अनेक गुणांचें दर्शन होतें. त्यांत ही "सत्य संकल्पाचा दाता भगवान सर्व करी पूर्ण मनोरथ" या वाक्याचें स्पष्टीकरण अधिक होतें. आमच्या देशांतील लोकांनीं सदोदित निश्चयी स्वाभिमानी, आणि निष्ठावंत असावें व

अधिक फायदेशीर आहे. आपलें धर्मशास्त्र इंग्रजींतून वाचण्यापेक्षां मनु, वाल्मीकि व पराशर इत्यादिकांचे द्वारें अवलोकन करणें फार फायदेशीर व आपलेपणा राखणारें आहे, या धोरणानें त्यांनीं अध्ययन केलें. अपक्रियाशास्त्र, पोलीटिकल एकॉनामी, हायकोर्टाचे निवाडे, त्रोटक पहिल्यापेक्षां अव्वल अखेर पार करावे हेंच योग्य आहे. अशा धोरणानेंच यांचा अभ्यास चालू होता, तथापि, परीक्षा संपल्यावर काय करावयाचें याची वाटाघाट बंद पडली नव्हती. आपल्या समाजांत जें उणें आहे तें भरून काढण्याचा उद्योग केला पाहिजे, हा त्यांचे वाटाघाटीचा प्रमुख विषय झाला होता.

कृष्णेच्या पैलतीरीं रुजून कृष्णा कोयनेच्या प्रीतिसंगमाजवळ वाढलेला पण अनेक प्रकारच्या दृश्यादृश्य वादळानें हेलपाटत व टक्केटोणपे खात आलेला रोपा ह्मणून मागें ह्मटलें आहे ते कै० **गोपाळ गणेश आगरकर** हे होत.

यांचें व **बळवंतरावजींचें** स्वभावऐक्य जितकें निकट आहे तितकाच व्यवसायसंबंधही निकट आहे. याकरितां कै० **गोपाळरावांचें** संबंधानें थोडेसें अधिक लिहिल्यास विषयांतर होईल असें मला वाटत नाहीं. **बळवंतरावांचें** अभ्यासास जितकीं अनकूल साधनें होतीं, त्यापेक्षां अधिक प्रतिकूल साधनें **गोपाळरावांच्या** अभ्यासास होतीं. घरचें बहुतेक यथास्थितच असल्यामुळें वयाचीं दहाबारा वर्षें अजोळीं गेलीं. तेथें इंग्रजी अवघ्या तीन इयत्ता झाल्या. पुढें वडील मामानें साहाय्य केलें असतें तर होणें अशक्य नव्हतें. कारण या मामाचा वकीलीचा धंदा चांगल्या प्रकारें चालत होता. दुसरें **गोपाळराव** हे केलेल्या सहाय्याचे चीज करण्यासारखे आहेत अशी सर्वांची खात्री होऊन चुकली होती. तेव्हां त्यास वेळेवर सहाय्य दिलें असतें तर दोन वर्षें अगोदर ते उदयास आले असते. तसेंच **गोपाळरावजींचें**

चुलते **वामनराव** आगरकर हे रत्नागिरीस डे. ए. इन्स्पेक्टर होते. ते आपणास आश्रय देतील असें वाटून हे तिकडे गेले. परंतु **वामनरावजी** हे तखलोपी विद्वानांपैकीं असल्यामुळें त्यांस आपले वडिलांबरोबर भाषण करणें, त्यांच्या पंक्तीस भोजनास बसणें, हे आपले तीर्थरूप ह्मणून एखाद्यास सांगणें कमी योग्यतेचें वाटत असे. जेथें प्रत्यक्ष वडिलांची अशी व्यवस्था तेथें हाता खालील शिक्षकांस दोन दोन तास उभें रहावें लागल्यास त्यांत आश्चर्य कसले? **वामनरावजींच्या** विद्वत्तेचा व व अधिकाराचा दर्प अशा प्रकारचा आहे हें **गोपाळरावांस** पूर्वी कळण्याचा संभव नव्हता. कारण त्यावेळीं ते सातान्यांस होते. त्यावेळीं **गोपाळराव** अल्पवयी होते. **गोपाळरावांस** काकांचें स्वरूप पूर्वीच समजतें तर ते त्यांचें नांवही घेतेना. परंतु परमेश्वराचे मनांत **गोपाळरावजींचें** धैर्य व हिम्मत वाढवावयाची असल्यामुळें ते **रत्नागिरीस** गेले. तेथें **वामनरावांनीं** त्यांस विचारलें सुद्धां नाहीं, तेव्हां त्यांना उलट्या अंचारीच्या आश्रयानें तेथें कांहीं दिवस काढावें लागले. आपले धाकट मामा दत्तोपंत, सहाध्यायी पांडुरंगपंत पाठक आणि विठ्ठलराव सुपनेकर हें पुढें चालले व आपणास पुढें जाण्यास साधन नाहीं, तरी निराश न होतां "काशीस जावें नित्य वदावें" या ह्मणीप्रमाणें यांनीं अभ्यासाचा ध्यास घेतला. एकीकडे नाहीं दुसरीकडे, दुसरीकडे नाहीं, तिसरीकडे, असे प्रयत्न करतां करतां अखेर म्याट्रिक्युलेशन पार पडली, आणि तीही पण मामाचे बरोबर. हा एक टप्पा झाला. असेंच पुढील टप्पेही पार पाडावयाचे अशा निश्चयानें कंबर कसली. ती बी. ए. ची परीक्षा दिली तरीही सोडली नाहीं.

या सर्वांवरून यांच्या अंगच्या अनेक गुणांचें दर्शन होतें. त्यांत ही "सत्य संकल्पाचा दाता भगवान सर्व करी पूर्ण मनोरथ" या वाक्याचें स्पष्टीकरण अधिक होतें. आमच्या देशांतील लोकांनीं सदोदित निश्चयी स्वाभिमानी, आणि निष्ठावंत असावें व

त्यांनीं आपलीं कर्तव्यें योग्य प्रकारें करून स्वदेशास भूषण व्हावें ह्मणून परशुराम, श्रीराम, भीष्म, कर्णार्जुन, वसिष्ठ, विश्वामित्र, इत्यादिकांचे इतिहास मोठ्या रसभरित वाणीनें लिहून ठेविलें आहेत. पण दैवयोगाचा चमत्कार असा कांहीं विलक्षण आहे कीं, तो आम्हांस त्याकडे पाहणेंसुद्धां कंटाळवाणें करून सोडतो. बरें ज्या राज्यकर्त्यांचे पोंवाडे आम्ही रात्रंदिवस गातों, त्यांच्यांतही कर्णार्जुनासारखे निश्चयी असतां, त्यांचें अनुकरण न करितां नुसते पोंवाडे गाण्यावरच आम्हीं आयुष्य गमावतों. आम्हीं इतके अंध राहूं नये म्हणून **गणेश वासुदेव जोशी, विष्णु कृष्ण चिपळुणकर** ह्यांच्यासारखीं रत्नें मधून मधून तो उत्पन्न करतो. **गोपाळराव** तरी अशा रत्नापैकींच एक स्वयंप्रकाश रत्न होय. इतकीं संकटें इतकें साहस व इतके आयास सोसून यांनीं इतकी मजल मारली असतांही त्यांचें लक्ष स्वसुखाकडे वळलें नाहीं. त्यांचें, सारें लक्ष लोकोपयोगीं कृत्यांकडे लागलें होतें. यांच्या बोलण्यांत चर्चेंत आणि वादविवादांत मुख्य विषय हाच असे.

हे एम. ए. चा अभ्यास करीत असतां कऱ्हाडास आले होते. त्यावेळीं त्यांचे व माझे बोलण्याचे अनेक प्रसंग आले. त्यांत असेच विषय निघत असत. ज्यांना स्वाभिमान शद्वाची किंमत माहीत नाहीं, अर्थ समजत नाहीं, पिछे आईसे आगे चली अशा धोरणानें जे आहेत, त्यांची वागणूक हाच काय तो धर्म, इतकींच ज्यांची धर्मकल्पना, इतकेंच ज्यांचें धर्म संबंधाचें ज्ञान, अशा भटभिक्षुक लोकांत, अथवा आमच्या गृहांतील स्त्रियांत जो स्वाभिमान जी करारी वृत्ति, जी तत्परता आणि जें औदार्य आढळतें, त्याचें सहस्रांशानेंही आमच्या आधुनिक शिकलेल्या लोकांत सांपडत नाहीं ! त्यांचे पहाटे उठणें, स्तोत्रें ह्मणणें, स्नानें करणें, उपोषणें करणें, भांडण झाल्यास अबोला धरणें, संकटसमयींही न डगमगणें, प्राण द्यावयाचा पण बोल सहन करावयाचा नाहीं

प्राण घ्यावयाचा पण धरलेलें व्रत सोडावयाचें नाहीं, इत्यादि अनेक प्रकार सर्व काळ रेखल्याप्रमाणें चालावें, आणि आमच्या टाईम टेबलाची आणि वागणुकीची कपिलाषष्ठी कधींच येऊं देऊं नये याचा अर्थ काय? याचा विचार करून सुधारणा करणें जरूर आहे, व या सुधारणेचा प्रारंभ आपणच कां करूं नये? असें ते ह्मणत असत!

त्यावेळीं त्यांचा पक्का निश्चय झाला नव्हता, तरी त्यांच्या मनाचा ओढा लोकोपयोगार्थ आयुष्य खर्चण्याकडे विशेष असे- हें उघड होत आहे. यांच्या घरच्या एका प्रसंगाचें मला चांगलें स्मरण आहे. तो प्रसंग असा होता कीं, यांचे मामा **रामभाऊ** भागवत हे गांवांतील चांगल्या वकीलांपैकीं एक असत. सार्वजनिक कामाकडेही भाऊंचें लक्ष्य असें. संस्कृत भाषेचें आंग चांगलें असून भागवतावर त्यांची भक्ति विशेष असे. वेदांत विषयांतही ते चांगलें बोलत असून वक्तृत्वाचें आंगही बरेंच चांगलें होतें म्युनिसिपाल कमेटीचे चेअरमन असल्यामुळें कऱ्हाडांत त्यांचे वजनही चांगलें होतें. सर्व विषयांत थोडी बहुत गति होती या मुळें असो, अथवा केलेल्या अध्ययनाचा अंतःकरणावर पूर्ण संस्कार झाल्यामुळें असो, किंवा उपजत अंग स्वभावावर अम्मल बसविण्या- इतकें वेदांताचें परिशीलन झालेलें नसो, अथवा प्रौढ वय आणि संपत्तिमुळें आलेला अधिकार असो; कारण कांहींही असो त्यांच्या इच्छेविरुद्ध कोणी भाषण केल्यास ते तात्काळ संतापत. तें इतकें कीं, त्याचा क्रोध त्यांना आवरत नसे.

एके दिवशीं **गोपाळराव, कोंडो केशव** मास्तर, मी व आणखी कांहीं मंडळी भाऊंचे वाड्यांत फराळ करीत बसलों असतां, **कोंडो केशवांनीं गोपाळरावांस** विचारलें आप- ण पुढें काय करण्याचा विचार ठरविला आहे? **रामभाऊ** ह्मणाले सबजज्जची जागा याला योग्य आहे. कारण याला

लिहिण्याची तशीच बोलण्याची हौस आहे, या साऱ्या होशी या जाग्यावर आल्यानें साधणार आहेत. मामलेदारींत साधणार नाहीं. शाळाखात्यांत कोठें प्रोफेसर अथवा हेडमास्तर झाल्यास मात्र साधतील पण तें काय रडवें खातें. त्यास विचारतो कोण ? **रामभाऊचें** अखेरचें वाक्य **गोपाळरावांस** रुचलें नाहीं, तथापि तसें दाखवितां ते हांसत हांसत म्हणाले " कर्णाला छपरावर ठेवून रुपणाचें दातृत्व वर्णन करण्यासारखेंच भाऊ ह्मणत आहेत. ज्यांच्यापासून चांगलें चांगलें मुन्सीफ, मामलेदार वकील, बॅरिस्टर निपजावयाचे तेंच जर रडवें खातें, तर मग माळावर उंस लावण्यास काय हरकत आहे ? जातिवंत व जिवंत झरा आणि पर्जन्यानें सांठलेलें डबकें कधींही एक व्हावयाचें नाहीं. **भाऊंना** हें खातें रडवें दिसत आहे, पण तें खातें रडवें नाहीं .त्यांतील व्यवस्था आम्हांस जितकी अनुकूल पाहिजे तितकी नाहीं व ती परकीयांकडून अनुकूल होणें शक्य नाहीं इतकेंच काय तें. ती अनुकूलता स्वतः करून घेतली पाहिजे. माझी इच्छा शिक्षक होण्याची आहे, पण ती हल्लीं चालू असलेल्या रमण्यांत शिरून दक्षिणा उपटण्याकरितां होण्याची नाहीं. लोकांत स्वतंत्र विचार उत्पन्न होऊन स्वोन्नतीचे मार्ग लोकांना दिसूं लागतील अशा प्रकारच्या शिक्षकाचें काम करावयाचें आहे. " **भाऊसाहेब** ह्मणाले " हें मनीं मांडे खाण्यासारखेंच शुष्क आहे ज्याचे जवळ अडका नाहीं, दांतही धडका नाहीं, त्यानें बाजारांत जाऊन करावयाचें काय ? याचा विचार या तरुण मंडळीच्या मनांत येत नाहीं, ' कांहां राजा भोज व कांहां गंगा तेली " अशांतील व्यवस्था आहे झाले." असें म्हणत ह्मणत **भाऊ**साहेब उठले. तेव्हां **गोपाळराव** म्हणाले "माझें ह्मणणें **भाऊंना** पसंत पडलें नाहीं. यांत आश्चर्य नाहीं. **औरंगजेबाचे** कारकीर्दींत **शिवाजीस** लोक प्रथम असेंच म्हणत असत. **बाळाजी विश्वनाथ** पडशी खांद्यावर टाकून कोंकणांतून घाटावर आले, त्यावेळीं त्यांच्या

३०

हांतून अशा गोष्टी घडतील असें कोणास वाटलें होतें काय ? त्यां. च्याच वेळीं इंग्रज आमचे राजे होतील, आम्हांस आवळा दाखवून आमचा कोहळा उपटतील, आमच्या घरांतील मुतळीच्या तोड्यापर्यंत आपली मालकी स्थापन करतील, आम्हांस पाळीव कुत्र्याप्रमाणें तुकडा टाकतील तो खाऊन आम्हीं वांकडें शेंपूट करून त्यांच्या पुढें गोंडा घोळूं, असें तरी कोणास वाटलें असेल काय ? मी ज्यावेळीं मुन्सीफ कोर्टांत उमेद्वार होतों किंवा हॉस्पिटलमध्यें औषधें ढवळींत होतों, त्यावेळीं एम. ए. होण्याच्या गोष्टी काढल्या असत्या तर भाऊप्रमाणेंच त्या ऐकणाऱ्यांसही असंभाव्य वाटलें असतें. माझे विचार असंभवनीय आहेत असें मला वाटत नाहीं. जर योगायोग तसा आला तर मी करून दाखवीन"

**गोपाळरावांची** ही उमेद लक्ष्यांत घेण्यासारखी आहे. मी **गोपाळरावांच्या** आंगच्या गुणांत जे विशेष आहे म्हणतों तें हेंच. नाहीं अभ्यासाला पैसा, नाहीं पोटास अन्न, अशा स्थितींत असलें महागाईचें शिक्षण शिकून तयार व्हावयाचें, आणि या शिक्षणाची फलश्रुति करणारीं साधनें जवळ आलीं असतां आजपर्यंत केलेल्या कष्टांचें व भोगलेल्या तापत्रयांचें पार निरसन करून 'सुखं च मे शयनं च मे' करण्याची आयती तयारी असतां, ती झुगारून देऊन आपली कष्टमय स्थिति मागील अंकावरून पुढें चालूं ठेवावयाची, व प्रस्तुतचे शिक्षणांतील केर कचरा काढीत बसावयाचे आणि निर्मळ ज्ञानार्जन लोकांस मिळावें म्हणून आपल्या स्वतःच्या पोटास चिमटा बसला तरी तो सोसून, तें स्वस्थाईनें मिळवून द्यावयाचें, हें साहस सामान्य मनुष्यांकडून होईल काय ? या आंतबस्याचें व्यापारास प्रस्तुतच्या मन्वंतराप्रमाणें अव्यापारेषु व्यापार कोणी म्हटलें तर त्यांत दोष कोणाचा ? **बळवंतरावां**पेक्षां **गोपाळरावांत** कांहीं विशेष असलें तर तें हेंच होय. हें दाखविण्याकरितांच ही गोष्ट येथें देणें योग्य वाटल्यावरून दिली आहे.

असो. आतां यापुढें आपला आयुष्यक्रम कसा सुरू करावयाचा, "युअर मोस्ट ओबीडियन्ट सरवंट " प्रमाणें लांगूलचालन वृत्तींत आयुष्य दवडावयाचें, आपलें राज्यकर्ते जें जें करतील त्यास नेहमीं मान डोलावीत राहून राजनिष्ठा दाखवावयाची, इंग्रज ग्रंथकारांच्या अथवा लेखकांच्या पेनांतून अथवा मुखांतून जें जें बाहेर पडेल, तें तें शिरसा वंद्य मानून सत्यनिष्ठा प्रगट करावयाची, त्यांचे पाद्री साहेब जें जें सांगतील त्यास "तथास्तु" ( आमेन ) या एकया पदानेंच उत्तर देऊन शकून गांठ मारावयाची आणि धर्मनिष्ठा व्यक्त करावयाची, किंवा माणुसकीचें खरें स्वरूप, यापेक्षां दिव्य आहे व कर्तृत्व शक्तीचें अधिष्ठान आहे, हें दाखविण्याचा प्रयत्न करावयाचा ? या प्रश्नानें **बळवंतरावांचें** डोकें जसें भरून गेलें होतें त्याप्रमाणेंच **गोपाळरावांचें** मनांतही हाच प्रश्न घोळत असल्यामुळें कधीं यांच्या, कधीं त्यांच्या, कधीं तिसरे एखादे खोलींत बसून या प्रश्नांची वाटाघाट सुरू झाली. या वाटाघाटीचे वेळीं हे उभयतांच असत असें नाहीं. बी. ए. चा अभ्यास करणारे कांहीं विद्यार्थी तेथें येऊन बसत असत. **बळवंतरावांचा** व **गोपाळरावांचा** जो परिचय झाला तो याच वेळीं **बळवंतराव** एल. एल. बी. चा व **गोपाळराव** एम. ए. चा अभ्यास करीत असत. हे **बाळगोपाळ** बुद्धिवान, धैर्याचे, निश्चयाचें, सालस वृत्तीचें, निस्पृही, व अंतःकरणाच्या कळकळीचें असल्यामुळें यांच्या उदात्त विचारांचा फायदा घेण्यास बरेच विद्यार्थी झटत असत. यांचे कधीं राजकीय विषयांवर कधीं सामाजिक विषयांवर व कधीं कधीं धर्मविषयांवर विचार चालत असत. पहिले विषयांवर दोघांचें जितकें एकमत होत असे तितकें दुसऱ्या दोन्ही विषयावर होत नसे. याचें कारण **गोपाळराव** असें सांगत कीं, त्यांचें बहुतेक वाचन इंग्रजीचें द्वारें झाले असल्यामुळें त्यांच्या विचारांची ओढ व कल्पनांची वाढ त्या दिशेनें वाढत चालली

होती. तसा प्रकार **बळवंतरावांचा** नव्हता. **बळवंतरावांच्या** अध्ययनांत स्वशास्त्रग्रंथांची भर अधिक असल्यामुळें यांचा ओढा इकडे अधिक असे. दोघांनाही समाज सुधारणा पाहिजे, राजकीय सुधारणा पाहिजे व धर्म सुधारणाही पाहिजे होती; परंतु उभयतांचे मार्ग निराळे असल्यामुळें यांच्या वादास एक प्रकारचें रूप येत असें व तें मनोहरही दिसें. तथापि यांच्या या वादाचा परिणाम अखेर शिक्षणावर येई, व हें शिक्षण स्वार्थत्यागाखेरीज देतां यावयाचें नाहीं असें ठरें.

यांच्या वादविवादपद्धतीचे संबंधानें एका गृहस्थानें असें सांगितलें कीं, एकदां **बळवंतरावांचा** आणि मंडळींचा इंग्रजी शिक्षणासंबंधानें वाद चालला असतां इंग्रजी शिक्षणामुळें आमचा स्वाभिमान नष्ट झाला व त्यामुळें विलायती व्यापाऱ्यांचें उखळ पांढरें झालें, धर्मतत्वांची हानी झाली, धैर्यहीनता आली. यामुळें त्यांच्यांतील यःकश्चित मनुष्यही आम्हांस तुच्छ लेखूं लागला आणि त्यांची अरेरावी वाढत चालली. आमच्या बुद्धिमत्तेचा, कल्पनेचा आणि उमेदीचा कोंब जळून गेला. यापेक्षां हा सारा खटारखाना मोडून सारे विषय मराठी भाषेंत सांगून त्यांची फक्त भाषा आली म्हणजे पुरें आहे. मुसलमानी राज्यांत ही खस-खस नसतांही आम्ही मोठमोठ्या राजांच्या दिवाणगिऱ्या केल्या आहेत आणि हल्लीं इतका आटापिटा करून व पदव्या मिळवूनही म्युनिसिपालिट्यांची व्यवस्था करण्याचें कामसुद्धां मिळणें कठीण झालें आहे. विषयज्ञानाकरितां परभाषेची गरज आतां उरली नाहीं; एक भाषा चांगली असली ह्मणजे बस्स झालें. इंग्रजी भाषेंतच स्वातंत्र्य, स्वाभिमान अथवा राज्यकर्तृत्वशक्ति असती तर आज जर्मन, फ्रेंच, रशियन वगैरे राष्ट्रें स्वभाषेंत आपले राष्ट्रांचा कारभार करणारीं आणि इंग्रजापेक्षांही शिरजोर दृष्टीस पडतींना. याकरितां हल्लीं आम्ही जी माथाकुटी करीत आहों तीच आमच्या शारीरिक व मानसिक दौर्बल्यास कारण आहे असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. अशी यांच्या वादाची दिशा हमेष असे.

यांचा हा वाद प्रथम शुष्कचर्चाप्रमाणेंच वाटे. परंतु पुढें पुढें जेव्हां त्यांच्या दिशा ठरूं लागल्या आणि त्या दिशांची अनुकरणाची मुदत ठरूं लागली व त्यास सहाय्य करणारांची निवड होऊं लागली तेव्हां सभासद मंडळींची पांगापांग होऊं लागली. कोणी आपले वडील, कोणी आपले काका, कोणी भाऊ कोणी मामा पुढें करून नन्नाचा पाडा ह्मणूं लागले, तर कोणी आपले मागें बरेंच लोंचाळें असल्यामुळें आपणांस सोय पाहिली पाहिजे असें म्हणूं लागले. राहतां राहिले **बाळाजी आबाजी भागवत** आणि **व्यंकटेश बाळाजी करंदीकर**.यांनीं मात्र आपण बी. ए. झाल्यानंतर आपणांस येऊन मिळतों असें सांगितलें. हा इतका प्रकार झाला तरी **बळवंतराव** एल. एल. बी. व्हावयाचे होते. **गोपाळरावजींचीही** एम. ए. व्हावयाची होती. व **भागवत** आणि **करंदीकर** बी. ए. व्हावयाचे होते. या परीक्षांस थोडा अवकाश होता. त्या पुऱ्या झाल्यानंतर इतर अनुकूल प्रतिकूल साधनें पाहून विचार कायम करावयाचा असें ठरलें.

यांच्या या विचारांस जोर आणण्यासारख्या दोन गोष्टी घडण्यास पूर्वींच प्रारंभ झाला होता. त्या गोष्टी ह्या कीं, **बळवंतरावजी** हायस्कुलांतून **बाबा गोखल्यांचे** शाळेंत गेले असतां त्या शाळेची स्थिती जरी चांगली नव्हती तरी **बळवंतराव** कॉलेजांत गेल्यानंतर पुढें त्या शाळेची जी स्थिति बनली त्यापेक्षां पूर्वस्थिति किती तरी पट चांगली होती. बाबास पूर्वी एका ‘ व ’ काराचा जोजार होता तो कायम असतां दुसरा वकिलातीचा रोजगार वाढत चालल्यामुळें त्यांची शाळा संपुष्टांत येतां येतां सन १८७६ सालीं ती अजीबात बंद झाली. व याच वेळीं रा० भावे यांनीं “ नेटिव्ह इन्स्टिट्यूशन ” ह्या नांवाची एक शाळा सुरू केली. या शाळेची दिशा डळमळीत असल्यामुळें या दोघांचें लक्ष तिकडे गेलें.

**बळवंतरावजींना** वाटे अशा धाकट्या शाळा चालविण्यांत काय मोठें आहे ! कॉलेजासारखी एकादी मोठी संस्था काढून ती चालवून दाखविली तरच शहामत. खाणींतून दगड काढण्याचें काम अडाणी वडारही करितो. पण त्यानें काढिलेल्या ओबडधोबड दगडाची मूर्ति बनविण्यास बुद्धि खर्चावी लागते. तीच स्थिति खाजगी शाळा आणि कॉलेज यांचीही आहे. सबब तेंच सुरूं करावें. अशा विचारांत आणि चर्चेत हे गुंतले आहेत, तों निबंधमालेच्या तिसाव्या अंकानें **विष्णुशास्त्री** यांस बराच त्रास दिला. या अंकांत शास्त्री मजकुरांनीं इंग्रज ग्रंथकारांचा खरपूस समाचार घेतला असल्यामुळें त्यांच्या समाजांत बरीच खळबळ झाली. या पेक्षांही अधिक खरपूस समाचार एखाद्या इंग्रज अथवा फ्रेंच ग्रंथकारानें घेतला असतां तर यांस क्षिणक्षिण्या येण्याचें कारण नव्हतें; परंतु एका नेटिवानें, नव्हे, एका बी. ए. व त्यांतून सरकारच्या नौकरींत असलेल्या गृहस्थानें, त्यांतही कामगारप्रियपुत्रानें घेतला ! हें केवढें साहस ! ज्या मुलानें हें अट्टल राजद्रोहात्मक काम केलें त्याचा बापही पण सरकारी नौकर ! तेव्हां हें सारेंच कृत्य पापमूलक होय ! अशा पापिष्ट मनुष्यांस प्रायश्चित्त देऊन पुनीत केलें पाहिजे. तेव्हां पुण्याच्या चटसाऱ्या ब्राह्मणांस आणि त्यांतून कोकणस्थांस व त्यांतल्यात्यांतही ग्राज्युएटांस आणि सार्वजनिक सभांस योग्य धडा देऊन सरळ केलें पाहिजे. अशा समजावर कोणी एकानें एलीफासाचें कातडें पांघरून आपल्या लंबायमान शुंडादंडांत मालेंतील निवडक पुष्पें आणि आंखुडशा पुच्छास मालाकारांच्या वंशावळीसह सारी मंडळी लोंबत ठेवून ती लांबलचक माला बॉंबे ग्याझिटच्या टेबलावर अचानक नेऊन ठेविली ! एलीफास साहेबांच्या या कृतींत किती व कसा खोडसाळपणा आहे तो **विष्णुशास्त्री** व त्यांचे सहाध्यायी ब्राह्मण यांनीं जगास दाखविला. तथापि त्याचा उपयोग सरकार बाजूनें कसा होणार ? जें सरकारानें केलें नाहीं तें लोकांनीं केलें.

ह्या पत्रव्यवहार कै० **शास्त्री**बोवांच्या चरित्रांत आला आहे. तथापि तो इंग्रजी भाषेंत असल्यामुळें मराठी वाचकांस त्याचा आस्वाद घेतां येणें कष्टसाध्य आहे. हें कष्ट वांचवावेंत म्हणून त्याचा गोषवारा येथें देतों. कै० **विष्णुशास्त्री** यांच्या पुढील कार्यास जोर आणण्यास व **बळवंतरावा**सारखीं नररत्नें उदयास येण्यास जीं कारणें झालीं आहेत त्यांत एलीफास साहेबांची करामत हें कारण असल्यामुळें तें वाचकांस अप्रिय वाटणार नाहीं.

## नेटिव वर्तमानपत्रें आणि ब्राह्मणांचीं कारस्थानें.

यांचे गॅझेट पत्राचे संपादक यांसः—

हिंदुस्थानामधल्या वर्तमानपत्रांमध्यें राजद्रोह कसा भरला आहे ह्याची माहिती कांहीं दिवसांपूर्वी एका सिव्हिल सर्वंटानें आपल्या पत्राच्या द्वारें चांगली करून दिली. ह्याच विषयाची आणखी मी कांहीं माहिती करून देणार आहें. राजनिष्ठ म्हणून मानलेल्या पुणें शहरांत निघणाऱ्या निबंधमाला मासिकपुस्तकासंबंधानें मी या पत्रांमध्यें लिहिणार आहें.

हें पुस्तक दर महिन्यास प्रसिद्ध व्हावयाचें, पण बरेंच मागें पडल्यामुळें जून महिन्याचा अंक नुकताच बाहेर पडला आहे. ह्या अंकामध्यें आशियाटिक ( म्हणजे हिंदुस्थानचा ) इतिहास युरोपियन लेखकांकडून कसा लिहिला जातो ह्याचें विवेचन एका लेखामध्यें केलें आहे. सदरहू लेखक म्हणतो कीं, युरोपियन इतिहासकारांस आमच्या भाषांचें आणि चालीरीतींचें यथार्थ ज्ञान नसल्यामुळें आमचा इतिहास लिहिण्यास ते अगदीं कुचकामाचे आहेत. भाषेच्या अज्ञानासंबंधानें सदरहू लेखक काय म्हणतो पहाः-

" आतां पहिल्या भाषाज्ञानाविषयीं जर पाहिलें तर सगळ्या युरोपभर व अमेरिकेंतही पूर्वेकडील भाषांचे विद्यागुरु जरी चोहोंकडे आहेत, तशाच 'एशियाटिक सोसायटी' नांवाच्या मंडळ्या जागोजाग आहेत, व आमच्या देशांत युनिव्हर्सिटींतील परीक्षक,

दक्षिणाप्राइज कमिटीचे सभासद वगैरे मंडळी पाश्चात्यांपैकीं अन-ल्याशिवाय जरी कधीं चालत नाहीं, तरी वरील साऱ्या पंडितांस इकडील भाषांची माहिती वस्तुतः कितपत असते ही गोष्ट अली-कडे लहान पोरापर्यंत सुद्धां ठाऊक होत चालली आहे. ”

अशा रीतीनें आमच्या भाषाज्ञानाची एकावाक्यांतच वाट लावून हा टीकाकार आम्हांस लोकांच्या रीतिभातींचें किंचितही ज्ञान नाहीं असें म्हणतो. आम्ही नेटिवांशीं तुटकपणानें वागतों असें त्याचें ह्मणणें आहे. पण त्याला एवढें समजत नाहीं कीं, ब्राम्हणच युरोपियनांशीं तुटकपणानें वागतात. युरोपियन आणि नेटिव त्यांच्यामध्यें असणाऱ्या तुटकपणाबद्दल हळहळणारे हे लोक मी म्हणतों त्या प्रश्नाकडे हटकून दुर्लक्ष करितात. युरो-पियनांशीं खाना खाल्ला म्हणजे अगदीं हलक्या प्रतीचा ब्राम्हण देखील बाटतो असें प्रतिपादन करणारा जातिभेद अगदीं विसरून जाऊन हे लोक इंग्रजांच्या माथीं खापर फोडतात. समर्पक पूर्वो-त्तरपक्ष करून आपलें मत सिद्ध करणें अशक्य असल्यामुळें हा लेखक शिव्यांची लाखोली कशी वाहतो हें पुढील उताऱ्यावरून दिसून येईल.

“ गेल्या सालीं हिंदुस्थानांतील एका मोठ्या अधिपतीची एखाद्या उचल्याप्रमाणें अटोकाट तयारीनें चौकशी झाली व त्याच्या पदोपदीं मानखंडना झाल्या, त्या प्रमाणेंच युवराजाच्या सन्मानरूप अग्नींत आमच्या शेंकडो सरदार मंडळींच्या मानांची जी पूर्णाहुति पडली, तसेंच आज काय कोणा डे० कलेक्टरास रेलवेवरील गार्डानें हात धरून गाडींतून बाहेर ओढून काढिलें, उद्यां काय कोणा ख्रिस्तपुत्रानें आकाशांतील बापाची भेट घे-ण्यापूर्वीं त्याकडे आपल्या घोडेवाल्यास मुष्टिमोदकाची चांगली भरपूर पथारी बरोबर देऊन तातडतोब रवाना केलें, अशा प्रका-रचे वृत्तांत जे वरचेवर घडत आहेत त्यावरून आमच्या राज्यक-र्त्यांच्या ठायीं आमच्याविषयीं किती गौरवाची बुद्धि वागत आहे व

मनुष्यमात्राचे हक्क किती ओळखतात तें अगदीं स्पष्ट दिसत आहे. ”

“ तसेंच ज्या त्या राष्ट्राच्या धर्मकृत्यांत डोकावण्याची मोठी इच्छा व निवळ मूर्खपणानें त्यांची टवाळी करण्याचीही मोठी मनापासून आवड. पण खिस्ताच्या देवालयांत कोणा परक्यास जाणें झालें तर त्यानें मुकाट्यानें एकीकडे चोरट्यासारखें बसलें पाहिजे व देवाच्या लाडक्या मंडळीबरोबर त्यास डोळेझांकही करावी लागते. डोळेझांक तर खरीच कारण डोळे उघडून ज्यानें पवित्रशास्त्र वाचलें आहे त्यांस त्यांतील पोरकटपणा, अप्रयोजकपणा, अज्ञान व दुष्टत्व हें ढळढळीत दिसल्यावांचून कधींही रहावयाचें नाहीं. तसेंच रस्तोरस्तीं निर्लज्ज, कोडग्या बाटे मंडळीनें एतद्देशीय धर्माविषयीं हवा तसा, व हवा तितका चारगटपणा केला तरी कांहीं हरकत नाहीं. त्यास पाठराखे पोलीस लोकही मिळतात, पण त्यांच्याच समोर एखाद्यानें त्यांचें खंडण चालाविलें तर भाविक खिस्त्यांच्या शुभवर्तनावरील भाव डळमळविल्याबद्दल त्या मनुष्यास सरकारांतून शिक्षा होते ! ”

“ टीप—दोन तीन वर्षांपूर्वी मेलविल नांवाच्या साहेबानें मुसलमानी धर्म स्वीकारल्याबद्दल त्याजवर केवढा गहजब गुदरला होता हें आमच्या वाचकांस स्मरत असेलच. या उदाहरणावरून मनाच्या स्वातंत्र्याबद्दल आमचे राज्यकर्ते जो एवढा दिमाख मिरवितात त्यांत तथ्य कितपत आहे हें सहज लक्षांत येतें. त्याप्रमाणें येथेंही धर्माच्या बाबतींत प्रजेवर बिलकुल सक्ती नाहीं असें जरी वरकांती पाहतां खरें वाटण्यासारखें आहे, तरी वास्तविक स्थिति फार निराळ्या तऱ्हेची आहे असें कोणाही विचारी मनुष्याच्या लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं. ”

या प्रमाणेंच इंग्रजी कटाचें सुद्धां महात्म्य आमचे राज्यकर्ते आपल्या मुलखांत चोंहोकडे वाढवीत आहेत, आमच्या जुन्या

वेडगळ जोड्यास सरकारी कचेरींत बिलकुल प्रवेश न होऊं देतां खुद्द कायदे कौन्सिलांत असणाऱ्या एतद्देशीय सरदारांसही त्या बद्दल सक्त ताकीद मिळते. "

राजनिष्ठ हिंदु कोणत्या तऱ्हेची भक्ति दाखवितात त्याचे हे चार पहिल्या प्रतीचे मासले नेक नामदार गव्हर्नर साहेबांना आपल्या द्वारें दाखविण्याची मी परवानगी घेतों.

आपल्या लेखाच्या भरांत येऊन आणि शक्य तितक्या निंदाप्रचुर शब्दांची योजना करून हा लेखक खालील भयंकर विचार प्रगट करितो—

" ज्या खंडांतील लोकांस एशियाची माहिती होईपर्यंत अगदीं सामान्य उपयोगाचे पदार्थही दुर्लभ होते, जेथील भुतांस उसाचे मळे पहिल्यानें दृष्टीस पडतांच अत्यंत हर्ष होऊन वनचरांप्रमाणें ज्यांनीं त्यांत चंगळ मांडली, हत्ती कसा तो मुळींच माहित नसून जे त्यास भिऊन पहिल्यानें पळूं लागले, जिकडील अत्यंत सुपीक देश सरासरी इकडच्या उखीर जमिनी बरोबर; जेथें बारा महिने अठरा काळ पाऊस, धुकें, बर्फ यांनीं पिच्छा पुरवून सूर्यदर्शनही कधीं चांगलेंसे होऊं देऊं नये, अशा लोकांस इकडच्या समृद्ध, व सुखकर देशांचें वैभव सहन न होऊन त्यांकडे नाक मुरडण्याचा त्यांनीं आव घालावा ही केवढी मौज आहे ! आणि त्यांतून ज्या वीतभर लांब व वीतभर रुंद देशांत सृष्टीची रचना इतकी ठेंगणी व तोकडी आहे कीं, तिकडचे मोठे गगनचुंबित पर्वत ह्मणजे इकडचीं टेंकडें व टेम्स सारख्या महाप्रचंड नद्या ह्मणजे इकडच्या एखाद्या ओहोळाबरोबर, जेथील खाणींतील मोठी अमोल्य संपत्ति ह्मटली म्हणजे शिसें व कथील, मोठीं स्वादिष्ट फळें म्हणजे इकडील रानफळांसारखीं व दारिद्र्याधिदेवतेची ज्या देशावर इतकीं पूर्ण रुपा कीं, इकडील संपत्तीचा एवढा पूर आज शेंकडो वर्षें तिकडे चालत असतां लक्षावधि लोकांस नुसते बटाटे फाकावे लागतात,

त्याच देशाच्या लोकांनीं खुद्द हिंदुस्थानाशीं संपत्तींत टक्कर मारूं पहावी ह्मणजे केवढें अचाट साहस आहे!

पहा बरें रोमन लोक साऱ्या जगास एवढे दुर्जय झाले असतां अरब लोकांनीं त्यांस किती लवकर जेर करून टाकलें व सारें युरोपखंड त्यांच्यापुढें कित्येक शतकें कसें थरथर कांपत होतें! जितका मुलूख काबीज करण्यास रोमन लोकांस आठशें वर्षें लागलीं तितका आमच्या प्राच्यवीरांनीं ऐंशीं वर्षांत काबीज केला. सिरिया, इराण, मिसर देश, स्पेन, फ्रान्स एवढाले देश त्यांनीं एक एका मोहिमेंत सर करून टाकले. पुढें कांहीं काळानें त्यांचे अनुयायी जे तुर्क लोक त्यांनीं तर एशिया मैनर जिंकून सन १४५३ सालीं कुस्तुंतुनिया शहरांतील खिस्ती देवळांवरचे क्रूस उपटून काढून त्याजागीं आपले अर्धचंद्र रोंवले! हे अर्धचंद्र आज चारशें वर्षें सारखे लकाकताहेत. युरोपांत धामधुमी होऊन राज्येंचीं राज्यें पालथीं झालीं व नवीं उदयास आलीं; पण हे कायमचे कायम! अकराव्या, बाराव्या व तेराव्या शतकांत तर खिस्ती प्रभूच्या जन्मभूमीच्या उद्धारार्थ लक्षावधि, कोट्यवधि युरोपियन वीर आपल्या पैगंबराची निशाणी दंडाला बांधून तुर्कस्थानांत येऊन थडकले; पण इतक्यांचाही समाचार खोट्या पैगंबरास भजणारे जे तुर्क लोक त्यांनीं एकट्यांनीं घेतला.

आमच्या पाश्चात्य राज्यकर्त्यांनीं टिपू सुलतान, बाजीराव, दौलतराव, यशवंतराव या सर्वांस एकामागून एक जिंकून आपलें निशाण उत्तरेस हिमालयापर्यंत, पूर्वेस ब्रह्मदेशापर्यंत, व पश्चिमेस अटक नदीपर्यंत जयघोषानें नाचवीत नेलें, व साऱ्या भरतखंडाचें प्रभुत्व फारा दिवसांनीं एका छत्राखालीं आणलें; पण इतकें असतांही आपल्या सामर्थ्याच्या जोरावर एकेचाळीस सालीं त्यांनीं आफगाणस्थानावर जेव्हां चाल केली, तेव्हां तद्देशीय इतिहास-

कारांनीं मोठ्या प्रेमानें गाईलेलें जें पाश्चिमात्यांचें शरीरबल व बुद्धिबल त्याची प्रतीति कशी खाशी आली ! इंग्रजी कवाईत व इंग्रजी शहाणपण हीं दोन्ही त्या कडवे लोकांच्या तडाक्यापुढें चुराडा होऊन गेलीं; आणि इंग्रजांच्या सवाई तुऱ्यांस पुरतेपणीं धुळींत लोळवून त्यांनीं साऱ्या जगास जाहीर करून दिलें कीं, मराठ्यांचाही ज्या राष्ट्रानें मोड केला तें कांहीं सामान्य नव्हे.

इंग्रजी राज्याची टोलेजंग इमारत केवळ त्यांनींच सावरली असून तिचें आधारस्तंभत्व त्यांकडे किती पूर्ण आहे याचा प्रत्यय सुमारें वीस वर्षांपूर्वी उत्कृष्ट आलेला आहे,तो कोणासही सांगायाला पाहिजे असें नाहीं. '

शारीरिक आणि लष्करी बाबतींमध्येंही आम्ही प्राच्य काळ्या लोकांपेक्षां वरचढ नाहीं, इतकेंच नव्हे तर खालच्या प्रतीचे आहों असें हा लेखक पुढील फडर्या उताऱ्यांत दाखवतो—

" वाः काय पण इस्लामाच्या अनुयायांच्या गुणांचें वर्णन ! हें वर्णन वाचून पुण्याच्या सभेनें तुर्क लोकांना—बल्गेरियन स्त्रियांची आणि मुलांची शूरपणानें कत्तल करणाऱ्या लोकांना—सहानुभूति दर्शविण्याकरितां मुंबईस डेप्युटेशन पाठवून दिलें ह्यांत कांहींच नवल नाहीं. खून, खुनाचा प्रयत्न व इतकें असूनही प्रजावत्सल अशा एका बड्या राजाला सामान्य खिसेकापू चोराप्रमाणें वागविलें, म्हणून हीच सभा गेल्या वर्षी रदबदली करण्यास आली होती ! "

पुण्यास काना कोपऱ्यांत पडलेल्या निबंधमालाकर्त्यांला सार्वजनिक चवाठ्यावर आणण्याचें काम मीं केलें. हा गृहस्थ ब्राम्हण आहे. सरकारी शाळांतून आणि कॉलेजांतून अर्धवट शिकून दरसाल बाहेर पडणाऱ्या ब्राम्हणांतलाच हा एक आहे. इंग्रजी हायस्कुलांतला हा मास्तर आहे हेंही लक्षांत ठेवण्यासारखें आहे. ह्या हा-

यस्कुलाचा हेड मास्तर कोण ! ब्राम्हणच. आपल्या ह्या मास्तराच्या पुस्तकाच्या ( जून व १८७४ च्या आगस्ट महिन्यांत निघालेल्या ) अंकांबद्दल हेडमास्तरानें डायरेक्टरांकडे रिपोर्ट केला आहे काय ! पुण्यांत नेटिव प्रेसवर रिपोर्टर कोणीच नाहीं काय ! आपल्या देशबांधवांना शिक्षण देणाऱ्या ब्राम्हण एडिटरांचा राजद्रोह सरकाराला कळविण्यास कोण नेमिला आहे? तर ब्राम्हणच. निबंधमालेचा ८ व्या अंकांतला मजकूर ह्यानें सरकारच्या कानावर घातला आहे काय !

पत्रकर्ते महाराज, ह्या देशांत बी. ए. आणि एम्. ए. काय करीत आहेत त्यांचें हें एक उदाहरण आहे. आणि अशा लोकांना परीक्षेवांचून सिविल सर्विसमध्यें घेण्याची वाटाघाट चालली आहे. ब्राम्हण जन्मतःच उलाढाल्या असतो, हें सरकारास कधीं कळणार ! ह्या इलाख्यांतल्या खालच्या प्रतीच्या सर्व जागा ब्राम्हणांनीं बळकाविल्या आहेत. युरोपांतल्या गुप्त मंडळ्यांमध्यें जीं एकीचीं बंधनें असतात त्यापेक्षां ब्राम्हणांमध्यें जास्ती आहेत. देशांतला असंतोष आणि राजद्रोह ह्यांच्या मुळाशीं ब्राम्हणच आहे.

ह्या लोकांत जातीचीं बंधनें पराकाष्ठेचीं आहेत. कांहीं महिन्यांमागें गुजराथच्या एका कामगाराला विलायतेंत पाठवावयाचा होता; पण जात बहिष्कार घालील म्हणून तो गेला नाहीं. परलोकवासी **विष्णु शास्त्री** ( पंडित ) आणि त्यांचे कांहीं मित्र विधवांच्या पुनर्विवाहाची बाजू घेऊन भांडत होते; पण त्यांच्या अक्षरशून्य शंकराचार्यानें संमति दिली नाहीं. पत्रकर्ते महाराज, ह्यावरून जातीच्या आग्रहावरून मुन्सफास बेकायदेशीर निकाल द्यावा लागणार नाहीं काय !

आपला,

२९ सप्टेंबर १८७६. **एलिफास.**

## निबंधमालाकारांचें प्रत्युत्तर.

रा. रा. ज्ञानप्रकाशकर्ते यांस—

निबंधमाला, पुणें आणि कारस्थानी ब्राह्मण, ह्यांवर एलिफासनें बांबे गॅझेटमध्यें जें पत्र प्रसिद्ध केलें आहे त्यावर उत्तर देणें भाग आहे.

सुधारलेल्या रागाच्या आवेशांत व खऱ्या गोष्टींचा विपर्यास करून एलिफासनें निबंधमाला, ब्राम्हणवर्ग आणि आपलें शहर ह्यांवर जी आग पाखडली आहे तीमधल्या मुद्यांना क्रमानें उत्तर देण्यापासून कांहीं फायदा नाहीं. एलिफास दुरभिमानानें अंध झाल्यामुळें सत्य म्हणजे काय ह्याची त्याला योग्य कल्पना नाहीं. अशा पत्रांतल्या मजकुराला सर्वच युरोपियन अनुकूल आहेत असें मला वाटत नाहीं. 'अर्धकच्चे शिकलेल्या तरुण आचरटांना, राजनिष्ठ म्हणून समजलेल्या पुणेकरांना, सार्वजनिक सभेला आणि अक्षर-शून्य शंकराचार्यांना' पायाखालीं चिरडण्याचा एलिफासचा संकल्प दिसतो. तसेंच मोठमोठ्या जाग्यांवर असलेल्या नेटिव हापिसरांवर देखील त्यानें तोंडसुख घेतलें आहे. हायस्कूलचे हेडमास्तर आणि नेटिव प्रेसचे रिपोर्टर ह्यांच्यावर ताशेरा झाडून त्यांनीं आपल्या अगोदर सरकारला राजद्रोह कळविला नाहीं ह्मणून कामामध्यें निष्काळजी दाखविल्याचा आरोप त्यांच्यावर लादला आहे. इतकेंच करून सदरहू गृहस्थ थांबले नाहींत. तर आपला जहांबाज सोबती ब्राम्हण आहे म्हणून त्यांनीं त्याच्या कृत्याकडे कानाडोळा केला असेंही म्हणण्यास सदरहू गृहस्थांनीं मागें पुढें पाहिलें नाहीं. त्या आरोपावर टीका करण्याची जरूरी मला नाहीं. शुद्ध माझ्याबद्दल जेवढा मजकूर आहे तेवढ्यापुरताच मी विचार करतों.

ज्या अंकावरून एवढा गवगवा झाला त्या अंकामध्यें "इंग्रजी भाषेवरच्या" लेखाचा तिसरा नंबर आहे. पहिल्या नंबरामध्यें इंग्रजी भाषेचें वैचित्र्य आणि पूर्णत्व ह्यांची माहिती सांगितली.

दुसऱ्या नंबरामध्यें युरोपाच्या इतिहासावर इंग्रजी भाषेंत जे ग्रंथ लिहिले आहेत त्यांचें विवेचन झालें आणि नंतर तिसऱ्या नंबरांत इंग्रजी भाषेंतल्या आशियासंबंधाच्या इतिहासाकडे वळलों. सदरहू विषयाच्या उपोद्घातामध्यें आशियाटिक राष्ट्रांसंबंधानें युरोपियन लोकांच्या ज्या भ्रामक समजुती आहेत व ज्यामुळें इतिहासकारांच्या श्रमांचा बऱ्याच प्रसंगीं विपर्यास होतो त्यांचें वर्णन केलें. ज्याबद्दल एवढा वाद उपस्थित झाला आहे तो भाग हाच. बेमुर्वत आणि दोषैकदृष्टि टीकाकारांच्या गैरसमजुतीला आणि विपर्यासाला जागा राहूं नये याकरितां प्रथमपासूनच तजवीज राखून मी आल्क्, बकल, के आणि मार्टिन ह्यांच्यासारख्या प्रसिद्ध इंग्रज इतिहासकारांच्या ग्रंथांमधून भरपूर उतारे दिले. ह्या तजविजीचा पुष्कळच उपयोग झाला. रागाच्या आवेशांत एलिफासनें माझ्या निबंधांतले मुख्य मुद्दे अजीबात गाळले आणि ज्यांचा विषयांशीं बिलकूल संबंध नाहीं अशा प्रश्नांवर अद्वा तद्वा लेखणी चालविली. मी केलेलें अरब लोकांच्या शौर्याचें वर्णन आणि सार्वजनिक सभेनें पाठविलेलें डेप्युटेशन ह्यांचा एलिफासनें बादरायण संबंध लावला आहे. मुसलमानांपेक्षां इंग्रजांचें शौर्य हटकून कमी आहे असें प्रतिपादन केल्याचा आरोप एलिफास आणतो, पण माझ्या अंकाचें नीट निरीक्षण केल्यास असा प्रकार मुळींच नाहीं हें त्यांच्याही लक्षांत येईल.

एलिफासचें म्हणणें अयोग्य व चुकीचें आहे. असें सिद्ध करण्यास एवढें समर्थन बस्स आहे असें मला वाटतें. बी. ए. आणि एम. ए व ब्राम्हण कारस्थानी ह्यांवर गहजब करून सोडणाऱ्या वरील लेखकाच्या धर्तीवरून तो लेख कोणासही पसंत पडणार नाहीं. एलिफास राजद्रोह कशाला म्हणतो त्याचें थोडेसें दिग्दर्शन करून मी आटपतें घेतों.

पाश्चात्य लोकांस प्राच्यभाषांचें अपुरें ज्ञान असतें असें मी

लिहिलें त्यांत राजद्रोह कोणता ? त्याला राजद्रोह म्हणावें तर मग सर अलेक्झ्यांडर ग्रॅन्ट, वुइलियम वर्डस्वर्थ आणि मार्टिन हॉग त्यांच्यासारख्या विद्वानांच्या शिक्षेखालीं तयार झालेल्या आमच्या सर्व शिकलेल्या लोकांस जो ' अर्धवट शिकलेले ' म्हणून शिक्का ठोकतो त्यास काय ह्मणावें ! अरब आणि तुर्क लोकांच्या पराक्रमांच्या वर्णनाला राजद्रोह म्हणावयाचें तर मग मराठी मासिक पुस्तक कर्त्यावर टीका करण्याच्या आधीं रोमन इतिहासकार ऑक्ले आणि गिबन त्यांना आधीं खेंचलें पाहिजे. आशियाच्या वैभवाचें व युरोपच्या दारिद्र्याचें मी वर्णन केलें; त्यांत राजद्रोह असल्यास नैसर्गिक देवतेस दोष दिला पाहिजे. बायबलाबद्दल मी फारसें अदबीनें बोललों नाहीं; त्यामध्यें राजद्रोह असल्यास माझ्या म्हणण्याच्या समर्थनार्थ खुद्द रेवरंड पाद्र्यांच्या पुस्तकांमधले देखील लागतील तितके उतारे मी काढून देईन. युवराजांच्या भेटीच्या प्रसंगीं आमच्या संस्थानिकांची संभावना आणि बडोद्याचें प्रकरण त्यांचा मी केवळ जातां जातां उल्लेख केला होता, व त्यामध्यें कोणताही राजकीय संबंध नाहीं. असो, पत्र इतकें वाढवावें अशी माझी इच्छा नव्हती. तथापि एलिफासच्या म्हणण्यांतलें तथ्य वाचकांस कळलें म्हणजे माझें काम झालें. "

एलिफास साहेबांच्या या अपूर्व करामतीकडे पाहून लोकांस मोठें कोडें पडलें; कारण निबंधमाला हें टाइम्स, ग्याझेट अथवा एतद्देशीय वर्तमान पत्रांसारखें पत्र नव्हे कीं, ज्यांतील तारा आणि इत्थंवृत्त वांचून तीं टाकून द्यावयाचीं. हें मासिक पुस्तकाप्रमाणेंही नव्हे कीं, ज्यांतील विषयांस एक दोन कलाटण्या दिल्या कीं पार ! पुन्हा त्याकडे पहाण्याची गरज नाहीं. निबंधमालेंतील भाषेवरच कित्येक लुब्ध होत असत, तर कित्येक त्यांतील विचार आणि त्या विचारांस दिलेल्या प्रमाणांत तल्लीन होऊन जातात. यामुळें हें मासिक पुस्तक एलिफास साहेबांची कृपा होईपर्यंत कोणी फारसें वाचलें नव्हतें; ज्या दिवशीं यांच्या मस्तकांतील म-

दानें बरेंच रान खवळून सोडलें, त्या दिवशीं मालेच्या वर्गणीदारांनीं ती हातीं घेतली. जे स्वतः वर्गणीदार नव्हते ते वर्गणीदार झाले. कित्येकांनीं आपलीं नांवें जुन्या वर्गणीदारांत दाखल करून यासह तीसही अंकांची मागणी केली ! मालेच्या आठव्या अंकानंतर वाचकांत थंडोसा उत्पन्न होतो न होतो तोंच इंग्रजी विद्येच्या संस्कारामुळें, सरकारचरणीं लीन होऊन ज्यांनीं आपणास " सुशिक्षित " हें भव्यसें नांव लावून घेतलें होतें, अशांच्या मस्तकीं आपला वरद हस्त ठेवून त्यास सच्छिष्य बनविल्याखेरीज त्यांचें नामसार्थक व्हावयाचें नाहीं आणि आज कित्येक युगें मूर्तिपूजेच्या बंडांनीं भंडावून सोडलेल्या आर्यभूची यांच्या कचाटींतून सुटकाही व्हावयाची नाहीं; या निश्चयानें आलेल्या स्वामी महाराजांच्या गळ्यांत मालाकारांनीं जेव्हां आपली माला अडकविली आणि ती अडकवीत असतां त्यांचे गजराज व त्यांच्या प्रतिपक्षाचें सोंवळें गर्दभराज यांचा बुधवार चौकांत समेट घातल्याचा सालंकृत विधि वाचकांचे नजरेसमोर आणिला तेव्हां समाजांतील गारठा असाच कांहीं दिवस मोडून गेला होता. त्याजवर एलिफास्त साहेबांच्या या करामतीनें लोकांचा बराच पुष्कळ फायदा झाला यांत संशय नाहीं.

हत्तींचें अवजड आणि राठ कातडें पांघरलेले राजश्री कोण असले पाहिजेत या संबंधानें बरीच चर्चा चालत असे—शालापत्रक बंद करण्यांत ज्यांनीं आपली पुण्याई खर्च करून आपल्या पितरांचा उद्धार केला त्यांच्याच कळपांतील हे सोंगाडे असावेत असाही तर्क होता. मालाकारांनीं " वक्तृत्व " या विषयाचें विवेचन करतांना आमच्या समाज धुरीणांवर जो प्रहार केला, त्या प्रहारानें घायाळ झालेल्यापैकीं कोणी तरी अश्वत्थाम्याप्रमाणें सूड उगविण्याकरितां हा प्रयोग केला असावा असा तर्कही कित्येक करीत असत. हे सारे तर्क बाजूस ठेवण्यांत मालाकारांनीं जें धैर्य, जो निश्चय, जो करारीपणा व जो स्वार्थत्याग स्पष्ट केला तोच वक्त-

लो० बाळ गंगाधर टिळक.



६१ वा वाढ दिवस



कै. विष्णुशास्त्री चिपळुणकर.

**वंतराव** आणि **बळवंतरावांच्या** स्वभावाचें मंडळ यांच्या विचारास, आचाराचे योग्यतेस आणण्यास कारण झाला असें म्हणावें लागतें.

**विष्णुशास्त्र्यांसही** अशा निर्माल्य स्थितींत राहण्यापेक्षा स्वतंत्रपणानें स्वतंत्र धंदा काढण्याची उमेद येऊन ते त्या विचारास लागले. ते ह्या विचारांत असतां **शंकर तुकाराम शाळिग्राम, काशीनाथ नारायण साने, जनार्दन बाळाजी मोडक, बाळकृष्ण वासुदेव जोशी** वगैरे मंडळी मे महिन्याचे सुट्टींत त्यांस भेटली. त्यांतील पहिल्या सर्वांनीं " काव्येतिहास संग्रह " नांवाचें मासिक पुस्तक आणि अखेरच्या **जोशी** बोवांनीं चित्रशाळा सुरू करण्याचें पत्करिलें. सन १८७८ सालीं या दोन्हीं कामास सुरवात करण्यास **शास्त्री**बोवा कारण आहेत हें **बळवंतराव** व **गोपाळराव** यांस समजतांच त्यांच्या विचारांस अधिक जोर आला. त्यांनीं आपले विचार कांहीं थोर गृहस्थास कळवून त्यांचा सल्ला घेतला. तो कोणाचा अनुकूल, कोणाचा पूर्ण प्रतिकूल तर कोणाचा हेंही ठीक व तेंही योग्य असा मिळाला. **विष्णुशास्त्र्यांचे** विचार ठाम ठरले आहेत व ते आपल्या शंभर रुपयांच्या नोकरीवर उदक सोडणार, हें समजतांच यांचा व त्यांचा पत्रव्यवहार सुरू झाला. त्यांत **आगरकरांची** उडी कॉलेजावर होती. **विष्णुशास्त्री** यांची प्राथमिक शिक्षणापासून वर चढण्याकडे धांव असे. कै० **आगरकर** आणि **टिळक, शास्त्रीबोवांस** भेटण्याकरितां १८७९ सालीं आले. **आगरकरांस** परत जाण्याची जरूरी होती. तेव्हां ते आपण कॉलेजच सुरूं करूं या, असें ह्मणाले व निघून गेले. या वेळीं कै० **नामजोशी**, रा. रा. **चिमणगांवकर, त्रिंबक सिताराम जोशी** वगैरे बरीच मंडळी तेथें होती. **आगरकर** निघून गेल्यानंतर **शास्त्रीबोवा** म्हणाले " स्तन पिणाऱ्या मुलानें बाप होण्याची इच्छा करण्यासारखीच **आगरकरांची** इच्छा

आहे. " हें **शास्त्री** बोवांचें ह्मणणें त्या वेळच्या स्थितीस अनुरूपच होतें यांत संशय नाहीं.

याच संधानांत आपलें संधान साधल्यास साधुन घ्यावें ह्मणून **भावे** यांनीं **विष्णुशास्त्र्यांसह** सर्वांस आपले कंपूंत ओढून घेण्याचा विचार केला. परंतु दोघांचीं तत्वें दोन प्रकारचीं होतीं. तेव्हां हें जुळणार कसें ? भाव्यांना बड्या बड्या साहेब लोकांच्या आश्रयावर शाळा चालवावयाची, आणि ह्यांना स्वतःचे हिम्मतीवर शाळा चालवावयाची. भाव्यांना यथास्थित फायदा मिळविण्याची चटक व यांना मिशनरी लोकांप्रमाणें कुटुंबाचा खर्च घेऊन जास्त राहील त्याचा फंड तयार करण्याची उमेद. भाव्यांचे शाळेंत सरकारी रीतीप्रमाणें शिक्षण चालवावयाचें व यांच्या मनांत सरकारी शिक्षणांतील दोष काढून टाकून ज्या शिक्षणानें स्वाभिमान, स्वदेशाभिमान, दृढनिश्चय इत्यादि उत्पन्न होईल असें शिक्षण द्यावयाचें. अशा परस्पर भिन्न दिशेनें जाणारे लोकांचें आणि यांचें न जुळणेंच योग्य होतें. तसेंच अखेर घडून आलें. यांचा स्वतंत्रपणें शाळा काढण्याचा विचार कायम ठरला. व त्यास **टिळक**, * **आगरकर**, **भाग-**

* विष्णुशास्त्री यांच्या चरित्रांत, विष्णुशास्त्री यांनीं आपले बंधूस पत्र लिहिलें त्यांत ही मंडळी आपले शाळेस आपण होऊन येऊन मिळत आहेत असें लिहिलें. या पत्राचा यांचे पुरताच भाग खालीं देतों.

" Mr. Agarkar ( going for M. A. ), Mr. Tilak ( going for LL. B. ) Mr. Bhagwat, Karandikar ( appearing for B. A. ) have tendered proposals for joining me in the enterprise. This they have done of their-own accord. We have settled 1 st January for the hoisting of the standard. Such a battery must carry the High School instantaneously before it."

**वत** व **करंदीकर** येऊन मिळणार, असा पुकारा होतांच पुण्यांत बरीच चळवळ सुरू झाली. **विष्णुशास्त्री** शिक्षक या नात्यानें जितके प्रसिद्ध होते त्यापेक्षां निबंधमालाकार या नात्यानें अधिक प्रसिद्ध झाले होते. त्यांत शंभर रुपयांची, सुखाची व वाढत्या अंगाची नोकरी सोडून देऊन सार्वजनिक उद्योगास लागल्याचें ग्राज्युएट मंडळींत यांचें हें पहिलेंच उदाहरण असल्यामुळें त्यांच्या प्रसिद्धींत अधिकच भर पडली. **गोपाळराव** हे **वक्तृत्व** आणि **निबंधलेखनांत** तयार असल्याचें त्यांनीं प्रसंगोपात अनेक ठिकाणीं दिलेल्या व्याख्यानांवरून व वाचलेल्या निबंधांवरून पुष्कळांस माहित होतें. तसा प्रकार **बळवंतरावांचा** नव्हता. ते बुद्धिवान, विद्वान, आणि निस्पृह आहेत इतकेंच कायतें त्यांच्य परिचयांतील लोकांस कळलें होतें. **भागवत** व **करंदीकर** हे बी. ए. झाले पण त्यांनीं पाय गाळले.

पाय गाळण्याचें कारण **आगरकरांचे** चरित्रकारांनीं असें दिलें आहे कीं, " या जुटीमध्यें शेवटीं फूट होऊन कलह होतील त्यापेक्षां आतांच नाहीं म्हटलेलें बरें. " असें त्यांस वाटलें. हा भविष्यवाद केवढ्या दूरदृष्टीचा आहे याचा विचार वाचणारांस सहज होण्यासारखा आहे. ज्यांचा मनाचा जोर कोता, ज्यांचे अंगांत स्वाभिमानाचें वारें भरविलेलें, ज्यांची आक्रम शक्ति बेताबाताची, ज्यांना जातिवंत धैर्याची पूर्ण हवा मिळाली नाहीं, त्यांच्या हातून झालें तेंच योग्य झालें, असें म्हटलें पाहिजे. ते जर या भानगडींत पडले असते तर कदाचित् आणखी एखादा नवा पंथ निर्माण झाला असता. पण आजची चैन, आजचे विलास, आजच्या घृतकल्या मधुकल्या व आजची पुष्टता कमी झाली असती कदाचित झालीही नसती. दुसरें, एकदम दोन बी. ए. एल. एल. बी. व एक एम. ए. एकाच संस्थेत शिरणें अजीर्णांशाचें होईल अशा दीर्घ दीर्घ विचारानें यांनीं आयत्यावेळीं अं हं म्हटलें असावें! असें एखाद्या निस्पृही गृहस्थानें म्हटलें तरी शोभण्यासारखें आहे. असो. आयत्या वेळीं हे दोघे डळमळल्यामुळें **आगरकर** व **टिळक** यांचे विचार द्विधा झाले तथापि

**टिळक** एल. एल. बी. चा डिप्लोमा घेण्यापूर्वी थोडे दिवस या मंडळींत हंगामीप्रमाणें आले, तेच पुढें कायम झाले. **आगरकर** एम. ए. त फसल्यामुळें लांबले, तरी **शास्त्रीबोवांचे** कल्पनेप्रमाणें आणखीही मंडळी भराभर मिळत चालली.

" शुद्ध बिजापोटीं फळें रसाळ गोमटीं " या साधूवाक्याप्रमाणें **बळवंतराव** असल्यामुळें त्यांच्या अध्ययनांत तत्कालीन लोकस्थितीचें भरण चांगलें पडलें होतें. मुंबई इलाख्यांत दुष्काळाचा कहर चालू असतां त्याकडे अवश्य तितकें लक्ष न देतां दिल्लीस माजविलेला बडा तमाशा, मल्हारराव गायकवाड यांच्यावरील विषप्रयोगाच्या खटल्याचें चालविलेलें नाटक, आणि त्यांची मद्रासेस केलेली रवानगी, प्रिन्स ऑफ वेल्स साहेबांची मिरवणूक, आणि त्यासंबंधानें राजेरजवाड्यांवर लादलेले खर्च, बुधवारचे वाड्याची होळी, व त्यासंबंधानें चाललेली धुमाळी, वासुदेव बळवंत फडके याचें बंड, व त्यासंबंधानें कोंकणस्थ, त्यांतून पुण्यांतील राहणारा यांची सरकारी कचेऱ्यांतून, शहरांतून आणि गांवांतून चाललेली चौकशी, इत्यादि अनेक राजकीय गोष्टींचें बरें वाईट चाललेलें चर्वण **बळवंतरावांच्या** अभ्यासाव्यतिरिक्त राहिलेल्या वेळांत बरेंच उपयोगी पडे. तसेंच सामाजिक सुधारणांच्यासंबंधानें चाललेले हमामे, पुनर्विवाहासारख्या धार्मिक प्रकरणांतही श्री. शंकराचार्यांचे वरच्या दर्ज्यावर विलायती मॅजिस्ट्रेट्स नेऊन बसविण्याचा सुधारकांचा हव्यास, श्री. शंकराचार्य, नारायणाचार्य गजेंद्रगडकर, विठोबा आण्णा कऱ्हाडकर इत्यादि जुन्या शास्त्री मंडळाची थट्टा उपहास अथवा निर्भत्सना करण्याची हौस, आपण शहाणे, आपण लूथरचा प्रति अवतार असें इंग्रज लोकांस दाखवून प्रतिष्ठा मिळविण्याकरितां टाईम्स, बांबे गॅझेट, इत्यादि इंग्रजी पत्रकारांच्या दारीं धरणें घेण्याची पद्धत, या व अशाच प्रकारच्या गुणांनीं समाजांत माजलेला बखेडा **बळवंतरावांसारख्या** तरतरीत आणि वर्डस्वर्थसारख्या विचारी व निस्पृह प्रोफेसर साहेबांच्या विचारपरिप्लुत ज्ञानसंग्रहानें तर झालेल्या हृदयांस झोंबून त्यांची

वृत्ति बदलण्यास कारण झालें* त्यांत के० **विष्णुशास्त्र्यांची** बाणेदार वर्तणुक, अतुल निस्पृहता, आणि त्यावेळच्या लोकांस

* मुंबईस ग्रंथ संपादक व प्रसारक या नांवाची मंडळी आहे या मंडळीनें "विश्वनिरीक्षण" या नांवाचें पुस्तक गत-वर्षी प्रसिद्ध केलें आहे. या पुस्तकांत आमच्या प्राचीन व अर्वाचीन मतांची एकवाक्यता कां व कोठें होत नाहीं यावर उत्कृष्ट विचार केला आहे. या पैकीं आमच्या वेदांतावर आधुनिक पंडितांनीं जो मारा उडविला आहे त्याचे विवरण अनेक दृष्टांतांनीं केलें आहे. हें प्रकरण मोठें आहे यांत आपल्या देशस्थितीचें चित्र चांगलें रेखलें आहे. तें सर्व जसेच्या तसेंच येथें देणें अशक्य आहे. तथापि माझें विधानास पुष्टी देणारा थोडासा चुटका येथें देतो.

"We are above all Superstitions अशा प्रकारची ऐकं ऐट आह्मी मारीत असतो. ती मारण्याचा उत्तम प्रसंग, अधिकारी वर्गाची खुषामत करितांना आम्हांस मिळतो. 'Will you take a cup of tea' अशा प्रकारच्या आदरार्थी प्रश्न होतांच, इंग्रजी न येणारे आपले समस्त देशबांधव पशुतुल्य अज्ञान असून आपण मात्र पुच्छविषाण-हीन आहों हें दाखविण्याकरितां आह्मी गाल फुगवून चटकन उत्तर देतो कीं, 'Oh yes, by all means, I have no Scruples in respect of eating and drinking!' ह्या उत्तरावर 'I congratulate you on your moral courage, we want men like you.' अशा प्रकारचें प्रत्युत्तर दैववशांत मिळाल्यास, 'अमृतं स्वामि गौरवं' ह्या न्यायानें आमचा आनंद, गगनांत मावेनासा होतो; आम्हाला धन्यता वाटते. जन्मसाफल्य झाल्यानें संतोष होतो; मातेच्या कुशीचा सर्व पांग फिटला असें वाटून तोंडावर आढ्यतेची टव टवी येते व छाती उंच होते. परंतु आमच्या या नैतिक धर्माची मजल अभक्ष्य भक्षण, अपेयपान व मनसोक्त अधर्माचरण यांच्या पलीकडे कधींच जात नाहीं. ती तरी **समर्थ रामदासस्वामी** किंवा **एकनाथ महाराजांप्रमाणें** विधिनिषेधांचें तत्व समजून? नाहीं, केवळ दांडगाईनें; उघडपणानें? नाहीं, चोरून मारून;

चकित करून सोडण्यासारखा स्वार्थत्याग यांनीं विशेष भर घालून यांस राजसेवेच्या मार्गावरून स्वजनसेवेच्या रस्त्यावर आणिलें असें ह्मटल्यास वावगें दिसणार नाहीं. असो.

कै० **विष्णुशास्त्री** यांच्या हेकड स्वभावास **बळवंत-रावांनीं** साह्य करण्यांत अविचार होत आहे असें ह्मणणारी बरीच मंडळी या वेळीं होती; परंतु **बळवंतरावांनीं शास्त्री**बोवांचे जें परीक्षण केलें आहे तें एका दिशेचेच द्योतक होतें असें कोणा-च्यानें म्हणवणार नाहीं. याला प्रमाण त्यांच्याच विचारांचें त्यांच्याच भाषेनें दिल्यास वाचकांस बराच उपयोग होईल ह्मणून शास्त्रीबोवांच्या संबंधानें १८९१ सालीं यांनीं वाचलेला निबंध खालीं देतों.

## "कै० विष्णुशास्त्री चिपळुणकर यांच्या वेळची स्थिति.

सन १८१८ सालीं इंग्रजांचा अंमल महाराष्ट्रांत बसल्यावर पेशवाईंत दक्षिणेकरितां जी रक्कम खर्च होत होती ती तशीच इंग्रजसरकारनें चालू ठेविली. पण पुढें दक्षिणेचा ब्राह्मण कमी कमी होत जाऊन जसजशी दक्षिणाफंडाची रक्कम शिल्लक पडूं लागली, तसतसा या फंडाचा विनियोग विश्रामबाग-संस्कृत-कॉलेज काढण्याकडे लवकरच करण्यांत आला. या कॉलेजांत सन १८३७ सालापर्यंत केवळ संस्कृतच शिकवीत असत. पण पुढें त्याच्या अभ्यासक्रमांत इंग्रजीचा समावेश होऊन वीस

---

उपदेशद्वारा कृतार्थ करण्याकरितां ? नाहीं, जिव्हेची शांति करण्याकरितां; भेदाभेद कल्पना निमाल्यामुळें ? नाहीं, इतरास चिडवून त्रास देण्याकरितां, दुही माजविण्याकरितां व, डा व ( ! ) धिंगाणा करण्याकरितां" या छोट्याशा उताऱ्यावरून "Divide and Rule" या इंग्रजी तत्वापासून झालेल्या नाशाकडे आमच्या पूर्व पिढींतील विद्वान मंडळीनीं किती दृष्टी दिली हें वाचकांचे लक्षांत येण्यास नड दिसत नाहीं.

वर्षांनीं म्हणजे १८५७ सालीं त्याचें डेक्कन कॉलेज बनलें. युनिव्हर्सिटीचा कायदा सन १८५७ सालीं पास झालेला आहे व त्या कायद्याप्रमाणें डेक्कन कॉलेज हें १८६० सालीं नव्या युनिव्हर्सिटींत सामिल करण्यांत आलें. सन १८६० पासून १८७४ पर्यंत या कॉलेजांतून बी. ए. किंवा एम. ए. झालेल्यांची संख्या पन्नाससाठाच्या पलीकडे जाईल असें वाटत नाहीं. तथापि, सन १८३७ सालीं सुरू झालेल्या इंग्रजी शिक्षणाचे पंचवीस तीस वर्षांत समाजावर जे परिणाम झाले ते इतके महत्वाचे आहेत कीं, त्यांची कल्पना डेक्कन कॉलेजांतील ग्रॅज्युएटच्या संख्येनें किंवा एक दोन व्यक्तींच्या चरित्रांवरून नीटपणें लक्षांत येणें अशक्य आहे.

हरएक समाजांत समाजाचे आधारस्तंभ म्हणजे त्यांतील विद्वान विचारी आणि संभावित गृहस्थ होत. कोणत्याही समाजांत पुढारीपणा प्राप्त होण्यास विद्वत्तेची नेहमींच अपेक्षा असते असें नाहीं. मानमान्यता, संपत्ति, चांगलें कुळ व वर्तन, आणि साधारण समजूनदारपणा व व्यवहारचातुर्य इतके गुण कोणाच्या आंगीं असले म्हणजे तो आंगीं हिंमत असल्यास आपापल्या वर्गांत पुढारीपणा घेऊं शकतो. पुणें शहरांत ब्राम्हणी-राज्य असल्यामुळें अशा प्रकारचे पुरुष पेशवाई अखेर प्रायः जुन्या सरदारमंडळींतच दृष्टीस पडत असत, व कांहीं वर्षेंपर्यंत नव्या सरकारानेंही त्यांचा तशा प्रकारें बोज ठेविला होता. पण पुढें लवकरच या पुढाऱ्यांचीं नखें व दांत काढून घेतल्यानें 'पिंजऱ्यामध्यें वाघ सांपडे बायकामुलें मारिती खडे' अशी त्यांची स्थिति झाली. नवीन राज्यपद्धतींत या जुन्या सरदारमंडळीस देण्यासारखें कांहीं काम नव्हतें असें नाहीं; पण "यथा राजा तथा प्रजा" या न्यायानें नवीन तऱ्हेच्या इंग्रजी शिक्षणानें तयार झालेली मंडळीच हातीं धरणें राज्यकर्त्यांस अधिक सोयीस्कर वाटून ती तयार करण्याचे कारखाने ऊर्फ शाळा काढण्यास त्यांनीं सुरवात केली. इंग्रजी

राज्यापासून आम्हांस जे पुष्कळ लाभ झाले आहेत त्यांतच शिक्षणाची गणना प्रमुखत्वानें करण्याचा प्रघात आहे. पण विचार केला असतां आपणांस असें आढळून येईल कीं, हें पाश्चिमात्य शिक्षण अगदीं एक आंगी असून त्या शिक्षणाचा परिणामही तसाच झाला. धर्म व नीति यांच्या बद्दल इंग्रजी धर्तीवर काढलेल्या शाळांतून चकारशब्दही काढावयाचा नाहीं अशी धर्मौदासिन्याची आमच्या सरकारनें शपथ घेतल्यामुळें पहिल्यापासूनच रीत पडली होती. यामुळें इंग्रजी शाळांतून पहिल्यापहिल्यानें जी मंडळी बाहेर पडली त्यांच्या मनाची स्थिति एक प्रकारें फारच भयंकर किंवा शोचनीय झालेली होती, स्वधर्माचें किंवा त्यांतील नीतितत्त्वांचें शिक्षण बिलकूल नाहीं आणि परधर्माचेंही नाहीं. समाजांच्या परंपरागत बंधनाबद्दल आदर असावयाचा तोही नाहींसा झालेला, आणि दोन चार बुकें झाल्यावरोबर बऱ्याच मोठ्या पगाराची जागा त्यावेळीं मिळत असल्यामुळें अधिकारमदाचाही बराच अंमल यांच्या मनावर बसलेला होता. युरोपांतील किंवा विलायतेंतील शाळांतून अशाच तऱ्हेचें शिक्षण मिळतें; पण स्वदेशप्रीति, स्वधर्मनिष्ठा, समाजाबद्दल आदर व प्रेम, सदाचरणाची गोडी वगैरे चांचल्य दोष घालविणाऱ्या अनेक गुणांच्या साहाय्यानें तें शिक्षण मनुष्यास बेहोष करीत नाहीं. आमच्याकडे या सर्व बंधनांचा अभाव असल्यामुळें त्याच शिक्षणापासून स्वल्प ज्ञानानें संतुष्ट, बेपर्वा, स्वहितापलीकडे लक्ष न देणारे आणि स्वतःसच विद्वान मानून इतर सर्व प्राचीन मतांचा उपहास करणारे असें नवें छोरपे या कारखान्यांतून प्रथमतः तयार झाले. परंतु याहीपेक्षां विशेष दुर्दैवाची गोष्ट म्हटली म्हणजे या लोकांचा सरकारांतून त्यावेळीं जो मान होत असे तो होय. राज्यकारभाराच्या नवीन पद्धतीस इंग्रजी जाणणाऱ्या माणसांची त्यावेळीं जरूर होती. यामुळें या अर्ध्याकच्च्या विद्वानास मोठ्या नौकऱ्या मिळून अधिकारामुळें त्यांस समाजांत एकप्रकारचा मोठेप-

णा प्राप्त झाला. तात्पर्य अव्वल पेशवाईत कुलशील, पराक्रम, सदाचरण संपत्ति वगैरे गुणांनीं ज्यांच्या पूर्वजांनीं लोकनायकत्व संपादन केलें होतें त्यांचें वंशज लवकरच भिकेस लागून त्यांचें स्थान समाजाच्या खालच्या वर्गांतील अर्धवट इंग्रजी शिकलेल्या या मंडळीस प्राप्त झालें. राज्यक्रांतीमुळें समाजाच्या पुढाऱ्यांत ही जी क्रांति झाली ती सामाजिकदृष्ट्या फार महत्त्वाची आहे. सन १८३७ पासून सन १८७४ पर्यंत म्हणजे सुमारें ३७ वर्षांत यानवीन पुढाऱ्यांच्या दोन किंवा तीन पिढ्या महाराष्ट्रांत झाल्या असें दिसून येतें. अगदीं पहिली पिढी म्हणजे कै० गोपाळराव हरी देशमुख यांच्या समकालिन किंवा पूर्वींच्या मंडळीची होय. त्यानंतरची पिढी म्हणजे कै० **कृष्णशास्त्री चिपळुणकर** व केरूनाना छत्रे यांच्या वेळच्या मंडळीची, आणि तिसरी पिढी कै० कुंटे व रानडे यांच्या वेळची होय. कुंटे व रानडे या दोघांचाही अभ्यास पुण्यास झाला नव्हता. तथापि त्यांनीं आपल्या आयुष्याचीं बरींच वर्षें येथें घालविलीं असल्यामुळें तत्कालीन पिढीचा उल्लेख त्यांच्याच नांवानें केला आहे. या तिन्ही पिढ्यांपूर्वीं विश्रामबाग पाठशाळेंतील कै० मोरशास्त्री साठे, त्र्यंबकशास्त्री शालिग्राम वगैरे मंडळीकडे पुण्यांतील समाजाचें कांहीं वर्षें पुढारीपण होतें; पण ही मंडळी इंग्रजी शिकली नसल्यामुळें त्यांच्या कालाचा सध्यां विचार करण्याची जरूर नाहीं. वर ज्या तीन पिढ्या सांगितल्या आहेत त्यांच्याच संबंधाचा विचार कर्तव्य आहे. पण तत्पूर्वीं एवढें सांगितलें पाहिजे कीं, त्यासंबंधानें मी जें कांहीं सांगणार आहे तें कोणाही विशेष व्यक्तीसंबंधानें नसून त्या त्या पिढीचें सामान्य वर्णन आहे.

वर सांगितलेल्या तीन पिढ्यांपैकीं पहिल्या पिढींतील लोकांस शाळेमध्यें जीं दहा पांच इंग्रजी पुस्तकें शिकवीत असत. त्या पलीकडे विद्येचा विशेषसा संस्कार झाल्याचें आढळून येत नाहीं, त्यांच्या पैकीं कै० गोपाळराव हरी यांनींच कायतो थोडा-

राज्यापासून आम्हांस जे पुष्कळ लाभ झाले आहेत त्यांतच शिक्षणाची गणना प्रमुखत्वानें करण्याचा प्रघात आहे. पण विचार केला असतां आपणांस असें आढळून येईल कीं, हें पाश्चिमात्य शिक्षण अगदीं एक आंगी असून त्या शिक्षणाचा परिणामही तसाच झाला. धर्म व नीति यांच्या बद्दल इंग्रजी धर्तीवर काढलेल्या शाळांतून चकारशब्दही काढावयाचा नाहीं अशी धर्मौदासिन्याची आमच्या सरकारनें शपथ घेतल्यामुळें पहिल्यापासूनच रीत पडली होती. यामुळें इंग्रजी शाळांतून पहिल्यापहिल्यानें जी मंडळी बाहेर पडली त्यांच्या मनाची स्थिति एक प्रकारें फारच भयंकर किंवा शोचनीय झालेली होती, स्वधर्माचें किंवा त्यांतलि नीतितत्वांचें शिक्षण बिलकूल नाहीं आणि परधर्माचेंही नाहीं. समाजांच्या परंपरागत बंधनाबद्दल आदर असावयाचा तोही नाहींसा झालेला, आणि दोन चार बुकें झाल्याबरोबर बऱ्याच मोठ्या पगाराची जागा त्यावेळीं मिळत असल्यामुळें अधिकारमदाचाही बराच अंमल यांच्या मनावर बसलेला होता. युरोपांतील किंवा विलायतेंतील शाळांतून अशाच तऱ्हेचें शिक्षण मिळतें; पण स्वदेशप्रीति, स्वधर्मनिष्ठा, समाजाबद्दल आदर व प्रेम, सदाचरणाची गोडी वगैरे चांचल्य दोष घालविणाऱ्या अनेक गुणांच्या साहाय्यानें तें शिक्षण मनुष्यास बेहोष करीत नाहीं. आमच्याकडे या सर्व बंधनांचा अभाव असल्यामुळें त्याच शिक्षणापासून स्वल्प ज्ञानानें संतुष्ट, बेपर्वा, स्वहितापलीकडे लक्ष न देणारे आणि स्वतःसच विद्वान मानून इतर सर्व प्राचीन मतांचा उपहास करणारे असें नवें छोरपे या कारखान्यांतून प्रथमतः तयार झाले. परंतु याहीपेक्षां विशेष दुर्दैवाची गोष्ट म्हटली म्हणजे या लोकांचा सरकारांतून त्यावेळीं जो मान होत असे तो होय. राज्यकारभाराच्या नवीन पद्धतीस इंग्रजी जाणणाऱ्या माणसांची त्यावेळीं जरूर होती. यामुळें या अर्ध्याकच्च्या विद्वानास मोठ्या नोकऱ्या मिळून अधिकारामुळें त्यांस समाजांत एकप्रकारचा मोठेप-

णा प्राप्त झाला. तात्पर्य अव्वल पेशवाईत कुळशील, पराक्रम, सदाचरण संपत्ति वगैरे गुणांनीं ज्यांच्या पूर्वजांनीं लोकनायकत्व संपादन केलें होतें त्यांचें वंशज लवकरच भिकेस लागून त्यांचें स्थान समाजाच्या खालच्या वर्गांतील अर्धवट इंग्रजी शिकलेल्या या मंडळीस प्राप्त झालें. राज्यक्रांतीमुळें समाजाच्या पुढाऱ्यांत ही जी क्रांति झाली ती सामाजिकदृष्ट्या फार महत्त्वाची आहे. सन १८३७ पासून सन १८७४ पर्यंत म्हणजे सुमारें ३७ वर्षांत यानवीन पुढाऱ्यांच्या दोन किंवा तीन पिढ्या महाराष्ट्रांत झाल्या असें दिसून येतें. अगदीं पहिली पिढी म्हणजे कै० गोपाळराव हरी देशमुख यांच्या समकालीन किंवा पूर्वींच्या मंडळीची होय. त्यानंतरची पिढी म्हणजे कै० **कृष्णशास्त्री चिपळुणकर** व केरूनाना छत्रे यांच्या वेळच्या मंडळीची, आणि तिसरी पिढी कै० कुंटे व रानडे यांच्या वेळची होय. कुंटे व रानडे या दोघांचाही अभ्यास पुण्यास झाला नव्हता. तथापि त्यांनीं आपल्या आयुष्याचीं बरींच वर्षें येथें घालविलीं असल्यामुळें तत्कालीन पिढीचा उल्लेख त्यांच्याच नांवानें केला आहे. या तिन्ही पिढ्यांपूर्वीं विश्रामबाग पाठशाळेंतील कै० मोरशास्त्री साठे, त्र्यंबकशास्त्री शालिग्राम वगैरे मंडळीकडे पुण्यांतील समाजाचें कांहीं वर्षें पुढारीपण होतें; पण ही मंडळी इंग्रजी शिकली नसल्यामुळें त्यांच्या कालाचा सध्यां विचार करण्याची जरूर नाहीं. वर ज्या तीन पिढ्या सांगितल्या आहेत त्यांच्याच संबंधाचा विचार कर्तव्य आहे. पण तत्पूर्वीं एवढें सांगितलें पाहिजे कीं, त्यासंबंधानें मी जें कांहीं सांगणार आहे तें कोणाही विशेष व्यक्तीसंबंधानें नसून त्या त्या पिढीचें सामान्य वर्णन आहे.

वर सांगितलेल्या तीन पिढ्यांपैकीं पहिल्या पिढींतील लोकांस शाळेमध्यें जीं दहा पांच इंग्रजी पुस्तकें शिकवीत असत. त्या पलीकडे विद्येचा विशेषसा संस्कार झाल्याचें आढळून येत नाहीं, त्यांच्या पैकीं कै० गोपाळराव हरी यांनींच कायतो थोडा-

बहुत विद्याव्यासंग शेवटपर्यंत कायम ठेविला होता. पण बाकी बहुतेक चुटपुटत्या ज्ञानाचेच अधिकारी होते. इंग्रजी राज्यांत या मंडळींस नवीन मिळालेल्या अधिकारानें हे बेपर्वा झालेले होते हें वर सांगितलेंच आहे. पण यांसेरीज यांच्या अट्टातट्टा विचार-आचाराचा व विशेषेंकरून पुढारी कुटुंबांच्या गृहस्थितीवर फारच वाईट परिणाम झालेला होता. सौम्य पण शिस्तवार गृहशिक्षणाचा व गृहस्थितीचा लहानपणीं मुलांच्या मनावर किती परिणाम होत असतो हें मीं येथें सांगावयास पाहिजे असें नाहीं; किंबहुना ज्या देशांतील पुढारी कुटुंबांची गृहव्यवस्था बिघडलेली असते त्यांत चांगले पुरुष निपजणें कठीण आहे असें ह्मटलें तरी चालेल. अशा दृष्टीनें पाहिलें म्हणजे इंग्रजी शिक्षणपद्धतीचा आमच्या समाजावर पहिला वाईट परिणाम म्हटला म्हणजे त्यामुळें झालेली आमच्या पुढाऱ्यांच्या मनाची अव्यवस्थित वृत्ति आणि सदर वृत्तीच्यायोगें बिघडलेली गृहव्यवस्था हा होय. पहिल्या पिढींतील लोकांस लहानपणीं तरी एक प्रकारचें जुन्या तऱ्हेचें गृहशिक्षण मिळालेलें होतें. पण दुसऱ्या व तिसऱ्या पिढींत त्याचाही लोप झालेला होता. या दुसऱ्या पिढींतील एका गृहस्थाचें व माझें कांहीं वर्षांपुर्वीं भाषण झालें होतें, तेव्हां त्यानें मला असा प्रश्न विचारला होता कीं, " कां हो, आह्मीं आतां स्नानसंध्या करीत नाहीं खरे, पण आमच्या लहानपणीं आह्मांस कांहीं एक प्रकारचा जुना आळा असल्यामुळें आम्ही त्यावेळीं मेहनत करून आज कांहीं तरी उदयास आलों. पण आमच्या मुलांनीं एव्हांपासून सर्व निर्बंध सोडून दिले तर त्यांची पुढें वाट काय होणार ! " हा प्रश्न मोठा मार्मिक होता. परंतु गृहशिक्षणाचें व गृहव्यवस्थेचें नुसतें महत्व कळून उपयोग काय ! ज्या वेळीं ही गोष्ट त्या गृहस्थांस कळली तेव्हां तो बहुतेक उतारवयांत आला होता व पुढें लवकरच त्याचा अंत झाला, कै० कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनीं मृत्युसमयीं काढलेले उद्गार विष्णुशास्त्री यांच्या चरित्रांत दिलेलेच आहेत. या बृह-

स्पतितुल्य विद्वानांच्या बुद्धिमत्तेबद्दल कोणाचाही पूज्यभाव असणें स्वाभाविक आहे; पण खासगी वर्तनाच्या दृष्टीनें पाहतां यांजबद्दल तीच बुद्धि कोणाही निःपक्षपाती मनुष्याच्या अंतःकरणाला उद्भवेल असें मला वाटत नाहीं. इतर विद्वानांचीही स्थिति बहुतेक अशाच प्रकारची होती. मद्यपान, वेश्यागमन वगैरे दुर्गुण बहुतेक संभावित गणले जात असत व मला तर असें आठवतें आहे कीं, त्या वेळच्या खासगी शाळेच्या एका मास्तरास सकाळची शाळा असतां शाळेंतील विद्यार्थी त्याच्या आंगवस्त्राच्या घरांतून कित्येक दां बोलावून आणीत असत ! अशा प्रकारच्या बिघडलेल्या वातावरणांत धर्मनिष्ठा, नीतिधैर्य किंवा सदाचरण यांचें बीजारोपण नवीन पिढीच्या मनांत कितपत होणें शक्य आहे याचा विचार करण्याचें काम मी आपणांकडेसच सोंपवितों. मुंबईंतील एका प्रसिद्ध पुढाऱ्याचें व माझें सुमारें वीस वर्षांपूर्वीं या विषयांवर बोलणें झालें होतें तेव्हां त्यांनीं जे शब्द उच्चारले त्यांची अद्याप मला आठवण आहे. ते म्हणाले कीं," They have made vice fashionable in Poona' आणि खरोखरच त्यावेळची पुण्याची स्थिति तशी होती.

विद्या, नीतिमत्ता, धर्मनिष्ठा, व्यवस्थित आचरण आणि गृहस्थिति यांचा एकमेकींशीं जो नित्य संबंध असावा लागतो, व जो असल्याखेरीज राष्ट्रांतील विद्वान लोक पुढारीपणा घेऊन जोरानें राष्ट्राचा उत्कर्ष करण्यास पात्र होत नाहींत तो संबंधच इंग्रजी शिक्षणानें पहिल्यानें तोडून टाकला. ही मोठ्या दुःखाची गोष्ट होय. नीतिदृष्ट्या याचा काय परिणाम झाला हें वर सांगितलेंच आहे, पण त्याखेरीज इतर बाबतींतही अशाप्रकारच्या एकपक्षीं शिक्षणापासून दुसरे अनेक वाईट परिणाम झाले. पाश्चिमात्य इंग्रजी विद्येनें दिपून जाऊन पहिल्या पिढीचे डोळे फिरले आणि आपल्या देशांतील सर्व कांहीं गोष्टी त्यांस वाईट दिसूं लागल्या असें म्हणण्याचा परिपाठ आहे. पण यांतील खरें बीज काय

हें पाहिलें असतां मी वर सांगितलेल्या गोष्टींकडेच वळावें लागेल. आपण अशी कल्पना करूं कीं, कोणत्या एखाद्या नवीन राष्ट्रांतील लोकांस आमच्या संस्कृतांतील न्याय, गणित आणि काव्यें एवढ्यांचेंच शिक्षण दिलें व वेदान्त किंवा धर्मशास्त्र वगैरे विषयांवरील ग्रंथ त्यांच्या नजरेसही पडूं दिले नाहींत, तर अशाप्रकारच्या शाळेंत तयार झालेल्या विद्यार्थ्यांच्या मनाची स्थिति काय होईल ? इंग्रजी शिक्षणाची गोष्ट अशाच प्रकारची होय. त्यांतून पेशवाईच्या अखेर आमच्या समाजास एकप्रकारची शिथिलता येऊन त्यांत दुर्गुणाचा बराच प्रसार झालेला होता. ही स्थिति आणि त्यानंतर दृष्टोत्पत्तीस येणारी नवीन राजकर्त्यांची व्यवस्था व टापटीप यांनीं चांगले लोकही दिपावून जाण्याचा संभव होता. मग ज्यांचें शिक्षण वर सांगितल्याप्रमाणें अगदीं एक अंगीं होतें, त्यांची गोष्ट तर बोलावयास नकोच. आमच्या समाजांत अमुक उणें आहे, तमुक उणें आहे हेंच कायतें रात्रंदिवस त्यांचे विचार चालावयाचे. त्यांतून मिशनरी लोकांनींही हिंदुधर्म व समाजव्यवस्था यांजवर हल्ला करण्यास सुरवात केलेली होती. पहिल्या पहिल्या कांहीं विद्वानांनीं या मिशनरी लोकांस उत्तरें देण्याचा प्रयत्न केला ही गोष्ट खरी आहे पण नुसत्या तार्किक वादानें मिशनरी लोकांशी भांडून आमच्या समाजाचें व्हावें तसें रक्षण होत नाहीं ही गोष्ट त्या वेळच्या पुढाऱ्यांस अगदींच कळली नव्हती असें नाहीं. परंतु त्यांनीं त्यासाठीं जे उपाय योजले ते मात्र उपहासास्पद होते. ख्रिस्ती धर्माचा प्रतिकार करावयाचा असल्यास तो त्याच धर्मांतील बाह्योपांगें घेऊन त्यास एकेश्वरी किंवा प्रार्थनासमाज असें नांव देऊन नवीन पंथ काढल्यानें होईल, हींच कायती त्या वेळच्या पुढाऱ्यांची प्रमुख कल्पना होती. व ही कल्पना तडीस नेण्यास आपण योग्य व लायक आहों असेंही त्यांस वाटत असे. परंतु लौकिकदृष्ट्या आणि तात्विक दृष्ट्याही हा समज चुकीचा होता. नवीन धर्मपंथ स्थापणारांच्या अंगीं कोणत्या प्रकारचे गुण असावे

लागतात याची इंग्रजी शिकलेल्या पहिल्या दोन पिढींच्या लोकांस बिलकूल कल्पना नव्हती. इंग्रजी दहा पांच बुकांचें अध्ययन झालें, मोठी नौकरी मिळाली किंवा अधिकार प्राप्त झाला म्हणजे तो मनुष्य सामाजिक किंवा धार्मिक बाबतींत पुढाकार घेण्यास नेहमींच योग्य असतो असें नाहीं. हे तत्त्व आमच्या मंडळीस पहिल्यानें कित्येक वर्षे बिलकूल समजलें नव्हतें. त्यामुळें असा परिणाम झाला कीं, इंग्रजी शिकलेली पहिल्या दोन पिढींतील मंडळी समाजास ज्या दिशेनें ओढण्याचा प्रयत्न करूं लागली त्याच्या उलट समाजाची प्रतिक्रिया सुरू होऊन दोघांचा बेबनाव सुरू झाला. कोणत्याही समाजाचा ज्यास पुढाकार घ्यावयाचा असेल त्यानें आपल्या एकनिष्ठपणानें, नीतिमत्तेनें, स्वार्थत्यागानें व समाजाबद्दलच्या खऱ्या कळकळीनें समाजाचा विश्वास पहिल्यानें संपादन केला पाहिजे. पण हे गुण वर सांगितलेल्या इंग्रजी शिकलेल्या नव्या पिढींतील लोकांच्या अंगांत दिसून येत नव्हते. यांच्यापैकीं काहीं मंडळी विद्वान होती खरी पण समाजाचे पुढारी होण्यास विद्वत्तेपेक्षां सदाचरण, धर्मनिष्ठा, आणि स्वार्थत्याग यांची अधिक जरूर लागत असते. ही गोष्ट या पिढ्यांतील विद्वान मंडळी अगदींच विसरली होती असें म्हटलें तरी चालेल. त्यांस असें वाटे कीं, आम्ही नवीन विद्या संपादन केली, सरकारांत आमचा मान झाला, तरी अद्याप आमचे लोक ऐकत नाहींत हें काय ? दुसऱ्या पक्षीं हा पक्ष अगदींच अडाणी होता असें नाहीं. लोकांस असें वाटे कीं, पाश्चिमात्य शिक्षणाचा थोडाबहुत लाभ झाल्यानें मनुष्य कांहीं सर्वज्ञ होतो असें नाहीं. त्यांतून या नवीन पिढीचे अद्वातद्वा आचार विचार, आहार मतें वगैरे लोकांच्या नेहमीं नजरेस पडत असल्यामुळें त्यांच्याबद्दल लोकांची चांगली बुद्धि राहिलेली नव्हती. हजारों वर्षे चालत असलेली समाजव्यवस्था व रचना आपण चुटकीसरशी उडवून देऊं असें मानणारा किंवा म्हणणारा मनुष्य उपहासास पात्र झाल्यास त्याचा दोष लोकांकडे देणें चुकीचें होय.

परंतु पाश्चिमात्य शिक्षणाच्या पहिल्या मदानें धुंद झालेल्या मंडळींच्या नजरेस ही विसंगतता आली नाहीं व स्वदेशकल्याण करण्याची मोठी हाव धरून कोणी धर्माच्या तर कोणी सामाजिक सुधारणेच्या मागें लागले. हिंदुराष्ट्राचें इंग्रजांच्या अमलापासून हित होत आहे कीं अहित होत आहे, लोकांच्या उपजीविकेचीं साधनें उत्तरोत्तर कमी होत आहेत कीं वाढत आहेत, संघशक्तीनें काम करण्याची संवय त्यास लागण्याचा कितपत संभव आहे, मनुष्याच्या अंगची बुद्धि, कर्तबगारी किंवा हुशारी दाखविण्यास नवीन राज्यव्यवस्थेंत अवकाश आहे कीं नाहीं इत्यादि ज्या गोष्टीचा सन १८७५ नंतर महाराष्ट्रांत खल होऊं लागला, त्याजकडे तत्पूर्वीच्या दोन तीन पिढ्यांनीं फारसें लक्ष दिलेलें दिसत नाहीं. यांचा भर कायतो धार्मिक आणि सामाजिक सुधारणेवर होता; आणि या दोन्ही बाबतींत पुढारीपणा घेण्यास ज्या गुणांची अवश्यकता असते त्यांचा बहुतेकांच्या अंगीं पूर्ण अभाव होता. परंतु ही नवीन शिकलेली मंडळी अधिकारारूढ असल्यामुळें समाजांतील इतर लोकांस यांचे स्वेच्छाचार ऐकून किंवा पाहूनच स्वस्थ बसावे लागे. समजास यांचे आचार विचार बिलकूल ग्राह्य नव्हते इतकेंच नव्हे, तर समाजास कोणत्याही प्रकारचें व्यवस्थित रूप देण्यास जे पुढाऱ्यांचे अंगीं गुण पाहिजेत ते यांच्या आंगीं नाहींत अशी समाजाची खात्री झालेली होती. सारांश उतावळ्या नवऱ्याप्रमाणें बाशिंग बांधून आपलें व आपल्याबरोबर समाजाचेंही आपण काढलेल्या नवीन संस्था व व्यवस्था यांशी लग्न लावून देण्यास ही मंडळी जरी तयार झाली होती, तरी यांच्या अद्वातद्वा आचरणानें आणि अव्यवस्थित गृहस्थितीनें समाजाचा यांच्यावर पूर्वीं कांहीं विश्वास असल्यास तो अगदीं उडून गेलेला होता, व यांचे पुढारीपण यांच्या परिवाराखेरीज समाजांतील इतर लोक कबूल करण्यास तयार नव्हते.

के० विष्णुशास्त्री यांचा विद्याभ्यास संपून लेखक या नात्यानें त्यांच्या कारकीर्दीस सुरुवात होण्याचे वेळीं मागें सांगितल्याप्रमाणें महाराष्ट्रांतील इंग्रजी शिकलेले विद्वान व समाज यांची स्थिति होती. विष्णुशास्त्री यास सर्वच जुनीं मतें ग्राह्य नव्हतीं, किंवा जुनी समाजव्यवस्था नवीन परिस्थितींत तशीच कायम ठेवितां येईल असें वाटत नव्हतें हें खरें आहे. पण त्याबरोबरच त्यांच्या पूर्वींच्या इंग्रजी शिकलेल्या दोन तीन पिढ्यांनीं सुधारणेच्या नांवावर जो हुतुतूचा खेळ सुरू केला होता तो अगदीं अप्रयोजक असून इंग्रजी शिकलेल्या पुढारी म्हणविणारांच्या अंगीं, खरोखर पुढाऱ्यांत जे गुण असावयास पाहिजेत ते नाहींत हेंही त्यांच्या लक्षांत येऊन चुकलें होतें. राजकर्त्यांच्या गुणांपैकीं पुष्कळ गुण आम्ही घेण्यासारखे आहेत ही गोष्ट त्यांनीं अनेक ठिकाणीं प्रांजलपणें कबूल केलेली आहे. पण पाश्चिमात्य समाजरचना युरोपांतील राष्ट्रांत चांगली चालत असली तरी ती आम्हांस तशीच श्रेयस्कर होईल असें पूर्वींच्या पिढीचें जें निःशंक मत होतें तें शास्त्रीबुवांस मान्य नव्हतें. शिवाय कोणत्याही समाजास किंवा राष्ट्रास जें एकप्रकारचें वैशिष्ट्य येतें तें कांहीं विशिष्ट समाजरचना, धर्मबंधनें वगैरे कारणांनींच आलेलें असतें. तशा प्रकारचें राष्ट्राचें वैशिष्ट्य होतां होईल तितकें कायम ठेवणें हें पुढाऱ्यांचें कर्तव्य होय. पण तिकडे शास्त्रीबुवांच्या पूर्वींच्या पिढींतील पुढाऱ्यांनीं कधींच लक्ष पुरविलें नव्हतें. फार लांब कशाला! हिंदुधर्माचीं खरीं तत्त्वें काय आहेत, त्यांतील ग्रंथसमूह कोणत्याप्रकारचा आहे, त्यांत धर्माच्या उदात्त तत्त्वांचा विचार केलेला आहे कीं नाहीं, वगैरे गोष्टींचा पुरा शोध एकेश्वरीवाल्यांनीं केलेला नव्हता. सारांश शास्त्रीबुवांच्या पूर्वींच्या पिढ्यांतील लोकांनीं ज्या ज्या चळवळी सुरू केल्या होत्या त्या सर्व केवळ नवीन पाश्चिमात्य शिक्षणास हुरळून जाऊन केल्या होत्या. पोक्त विचार, दृढ व सतत अभ्यास, सदाचरण, नीतिधैर्य किंवा स्वार्थत्याग हे गुण या चळवळींच्या

पुरस्कर्त्यांच्या अंगीं नजरेस येत नव्हते. उलट यांचें वर्तन व आचार यांत एकप्रकारची शिथिलता व आचरटपणा आढळून येत होता. जुनें तेवढें वाईट, असा आपल्या पुढील पिढीचा समज करण्याचा यांनीं प्रयत्न चालविला होता. आणि स्वतःच्या आचरणानें तरुण मंडळीस अव्यवस्थितपणाचा व नीतिदौर्बल्याचा हे कित्ता घालून देत होते. वृद्ध लोकांबद्दल अपूज्य भाव, अंगीकृत कार्य निश्चयानें पार पाडण्याविषयीं अनास्था, नीतिधैर्याचा किंवा आजन्म सतत व्यासंग करून कोणतीही गोष्ट स्वार्थाकडे लक्ष न देतां सिद्धीस नेण्याच्या हौसेचा अभाव, इत्यादि अवगुण जर आजमित्तीस इंग्रजी शिकलेल्या तरुण मंडळींत आढळून येत असले तर त्यांचें सर्व श्रेय विष्णुशास्त्री यांच्या पूर्वीच्या पिढ्यांनीं जो क्रम सुरू केला होता त्यांसच दिले पाहिजे. या विषवृक्षाचें बीं विष्णुशास्त्री यांच्यापूर्वीं फार दिवस लागलें होतें व शास्त्रीबुवांच्या लेखांचा जर कांहीं परिणाम झाला असला तर या विषवृक्षाची वाढ थोडीबहुत कमी करण्याकडेसच झाला असें ज्यांस पूर्वीची हकीकत माहीत आहे त्यांस तरी ह्मटलेंच पाहिजे. विष्णुशास्त्री यांनीं आपल्या वेळच्या कांहीं वड्या मंडळींची टर उडवून तरुण पिढीच्या मनांतील वृद्धांबद्दलची पूज्यबुद्धि घालविली असें कित्येकांचें ह्मणणें आहे पण तें चुकीचें आहे. खरा प्रकार असा आहे कीं, शास्त्रीबुवांच्या पूर्वीच्या दोन पिढ्यांतील मंडळी, प्राचीन आचार विचार किंवा सामाजिक व धार्मिक व्यवस्था यांच्या पूर्वप्रवर्तकांस मूर्ख ठरवून त्यांच्या जागीं आपण स्थानापन्न होण्याच्या तयारीस लागलेली होती; व त्यांचा असा भरंवसा होता कीं, आपल्या मागून आपल्या तालमींत तयार झालेली जी तरुण पिढी येईल ती आपलें गौरव करून आपल्यास अभिनव धर्मसंस्थापकांचें किंवा समाजरचना प्रवर्तन करणाऱ्यांचें अढळ स्थान प्राप्त करून देईल ! पण त्यांचें स्वतःचें आचरण अगदींच अव्यवस्थित असल्यामुळें हा त्यांचा भरंवसा तडीस न जातां त्यांच्या अविचाराचीं

फळें त्यांस भोगावीं लागलीं. ज्या लोकांनीं मनु, शंकराचार्य, रामदास किंवा तुकाराम इत्यादिकांसही मूर्ख ठरवून आचार, विचार, विहार व आहार यांच्या स्वच्छंदावर नवीन धर्माचें निशाण उभें केलें त्यांस त्यांच्या पुढच्या पिढीनें मूर्ख ठरविल्यास ती गोष्ट जगाच्या राहटीच्या फारशी विरुद्ध झाली असें ह्मणतां यावयाचें नाहीं.

विष्णुशास्त्री यांनीं आपल्या लेखांनीं काय कामगिरी बजावली हें समजण्यास वर दिलेल्या तत्पूर्वीच्या दोन तीन पिढ्यांची सामान्य हकीकत पुरे आहे. राष्ट्राच्या अभ्युदयास स्वभाषा, स्वधर्म याबद्दल योग्य अभिमान व प्रेम समाजाच्या पुढाऱ्यांच्या अंगीं असणें किती जरूर आहे वगैरे गोष्टींचा विचार न करितां अथवा आपली बलाबलता न पाहतां ज्यांनीं केवळ अभिनव शिक्षणाच्या जोरावर देश–सुधारण्याची पताका हातीं घेतली होती. त्यांस शास्त्रीबुवांसारखा पुरुष न निपजला असता तरीही अखेर अपयशाचेंच धनी व्हावें लागलें असतें. त्यांस जें महत्त्व आलें होतें तें आगंतुक होतें, आणि इंग्रजी ज्ञानाचा जास्त प्रसार होऊन विद्वानांचा दर पुढें लवकरच उतरणें अगदीं स्वाभाविक होतें व त्याप्रमाणें झालेंही. विष्णुशास्त्री हे या मंडळीच्या खऱ्या स्वरूपाचें आविष्करण करण्यास केवळ निमित्तमात्र झाले असें म्हटलें तरी चालेल. उतास गेलेलें दूध ज्याप्रमाणें केव्हांना केव्हां तरी अग्नींत पडून दग्ध व्हावयाचेंच तशीच या दोन तीन पिढ्यांतील पुरुषांनीं आरंभिलेल्या चळवळीची स्थिति होत चालली होती. शास्त्रीबुवांस सदर चळवळीवर व त्यांच्या पुरस्कर्त्यांवर हल्ला करून त्यांच्या खऱ्या स्वरूपाचें आविष्करण करण्याचा जो मान मिळाला तो ते ज्या कालीं जन्मले त्या कालाचें फल होय. शास्त्रीबुवांच्या इच्छेचें नव्हे. कारण शास्त्रीबुवा नसते तर दुसरा कोणी तरी पुरुष या कार्यास त्या कालीं खचित प्रवृत्त झाला असता. नुसत्या इंग्रजी शिक्षणानें दहापांच नव्या कल्पना मनांत शिरल्याबरोबर कोणताही पुरुष समाजाचा पुढाकार घेण्यास पात्र होतो ही कल्पनाच

चुकीची होय. व या कल्पनेच्या पायावर ज्या चळवळीची इमारत उभारली गेली होती त्या चळवळी केव्हांना केव्हां तरी खालीं पडणें अगदीं स्वाभाविक होतें. शास्त्रीबुवांनीं त्या पाडल्या असें म्हणण्यापेक्षां त्यांचे दिवस संपायची वेळ आणि शास्त्रीबुवांच्या कारकीर्दीचा आरंभ एक झाला हें ह्मणणें अधिक सयुक्तिक होय. शास्त्रीबुवांनीं या चळवळींतील पोचटपणा ताबडतोब ओळखून तिकडे आपल्या लेखाचा मोर्चा फिरविला, हें त्यांच्या मार्मिकपणाचें व प्रसंगावधानाचें फल आहे; व त्यांच्या ठिकाणीं त्या वेळीं दुसरा कोणीही पुरुष असता तरी त्यानें असेंच वर्तन केलें असतें.

वरील हकीकतीवरून सवंग लोकप्रियता मिळविण्याकरितां शास्त्रीबुवांनीं आपल्या वेळच्या चळवळीवर हल्ला केला असा जो कित्येकांचा आक्षेप आहे तो किती निरर्थक आहे हें सहज दिसून येईल. शास्त्रीबुवांनीं ज्या चळवळींवर हल्ला केला त्यांचा पोकळपणा व त्यांच्या पुरस्कर्त्यांच्या वर्तनाचा अव्यवस्थितपणा लोकांच्या नजरेस येऊन पुष्कळ दिवस झाले होते. परंतु या पुढारी ह्मणविणाऱ्या मंडळींच्या कळपांतून त्यांच्याच योग्यतेचा पुरुष अद्याप कोणी बाहेर पडला नसल्यामुळें पुष्कळांस जरी या चळवळी उतावळीच्या व अविचाराच्या वाटत तरी त्यासंबंधीं सोपपत्तिक लेख लिहून सदर चळवळींची अगर त्यांच्या पुरस्कर्त्यांची खरी स्थिति लोकांपुढें मांडण्यास कोणी तयार झाला नव्हता विष्णुशास्त्री हे अशा प्रकारचे पहिलेच टीकाकार होत. यांस मार्मिकपणाचा संस्कार पितृपरंपरेनें प्राप्त झाला होता, व मराठी आणि संस्कृत ग्रंथांशीं त्यांचा परिचयही इतरांपेक्षां सहजगत्या अधिक झालेला असून हिंदुस्थानच्या व पाश्चिमात्य राष्ट्रांच्या इतिहासाच्या वाचनानें व मननानें राष्ट्राच्या अभ्युदयास कोणत्या प्रकारचे पुढारी लागतात अथवा त्यांच्या अंगीं कोणते गुण असावे लागतात हें त्यांस जास्त चांगलें अवगत झालेलें होतें. इतके गुण असूनही ते कदा-

चित् पूर्वीच्या पिढीच्या विद्वानांच्या धर्तीवरच गेले असते. परंतु कालमानानें इंग्रजी शिक्षणाचें महत्व कमी होत गेलें होतें व त्यांतल्या त्यांत विशेष लक्षांत ठेवण्याजोगी गोष्ट ही कीं, विष्णुशास्त्री हे स्वभावतःच अल्पसंतुष्ट असल्यामुळें आपल्या विद्येचा व गुणांचा स्वतःच्या बढतीकडे उपयोग करून घेण्यापेक्षां लोकांत खऱ्या ज्ञानाचा व विचारांचा जेणेंकरून प्रसार होईल तें काम अधिक महत्त्वाचें आहे असें त्यांस वाटत असे. अशा स्थितींत त्यांनीं आपल्या कर्तव्याची जी दिशा ठरविली व ज्या दिशेनें काम करण्याचा आपला निश्चय तडीस नेण्यास त्यांनीं शेवटपर्यंत प्रयत्न केला, त्याबद्दल त्यांस नावें ठेवणें म्हणजे आपलें गाजरपारखेपण व्यक्त करणें होय. एकेश्वरीमताचे किंवा प्रार्थनासमाजाचे पोंवाडे शास्त्रीबोवांनीं गाइले नाहींत म्हणून तत्पक्षीय लोक त्यांस नांवें ठेवितात, पण ज्यांनीं या संस्था उभारल्या त्यांपैकीं एका तरी पुरुषानें या संस्थांचीं मतें सयुक्तिक असून सर्व पूर्वाचार सोडून लोकांनीं तीं घेण्यासारखीं आहेत असें प्रतिपादन करण्यांत आपलें सर्वस्व खर्च केलें आहे काय? नाहीं; मग शास्त्रीबुवांनीं त्यांचे पोंवाडे गाइले नाहींत म्हणून त्यांस दोष देणें ह्मणजे 'मी जें कांहीं भांगेच्या तारेंत बोललों तें दुसरा कोणी पंडित समर्थन करीत नाहीं म्हणून पंडितवर्गास दूषण देण्याइतकेंच असमंजस नव्हे काय? आपल्या पूर्वीच्या पिढीतिल लोकांनीं आरंभिलेल्या चळवळी निर्जीव व पोचट आहेत अशी मनाची एकदां खात्री झाल्यावर त्यांचें खरें स्वरूप लोकांपुढें मांडणें हें देशहितासाठीं झटणाऱ्या प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य नव्हे काय? आणि शास्त्रीबुवांनीं तें कर्तव्य केलें ह्मणून त्यांस कां नांवें ठेवावीं हें मला समजत नाहीं. या चळवळींचें खरें स्वरूप लोकांपुढें मांडण्यास ज्या साधनांची जरूर होती तीं सर्व साधनें शास्त्रीबुवांस उपलब्ध होतीं. पहिली गोष्ट अशी कीं, या चळवळी ज्यांनीं उभारल्या होत्या त्यांची नीतिदृष्ट्या, धर्मदृष्ट्या किंवा आचारदृष्ट्या योग्यता

किती होती हें त्यांस पूर्णपणें माहीत होतें. तसेंच दहावीस वर्षांच्या अनुभवानें या चळवळी लोकांस कितपत हितकारक होऊं शकतील याचाही त्यांस अदमास आलेला होता; व त्यांत काय काय दोष आहेत ते तावडतोब ओळखून लोकांपुढें त्या दोषांचें चित्र हुबेहुब वठविण्याइतका मार्मिकपणा व कल्पकताही त्यांचे अंगांत होती. अशा स्थितींत त्यांचे लेख चटकदार व लोकप्रिय झाले यांत कांहीं एक नवल नाहीं. लोकांस या गोष्टी हव्या होत्या, व तत्कालिन पुढारी मंडळीची कानउघाडणी करणारा पुरुष केव्हां पुढें येतो याची ते अगदीं वाट पाहत होते. अशा वेळीं शास्त्रीबुवांखेरीज दुसरें कोणी हें काम केलें असतें तर तेंही लोकप्रिय झालें असतें. पण शास्त्रीबुवांनीं तें केल्यामुळें त्यांच्या मार्मिकपणाची त्यांत अधिक भर पडून तेंच काम अधिक सफाईनें तडीस गेलें एवढाच काय तो विशेष होय.

विष्णुशास्त्री यांजवर त्यांच्या प्रतिपक्ष्यांचा दुसरा असा एक आक्षेप आहे कीं, सुधारकांचीं सर्व मतें त्याज्य नाहींत अशी त्यांची समजूत असतांही त्यांनीं आपली लेखणी सुधारकांविरुद्ध चालवून त्यांचा जूणूं काय सूड घेतला. माझ्या मतें हाही आक्षेप निरर्थक आहे. हिंदुसमाजाच्या आजपर्यंतच्या चालत आलेल्या रचनेंत देशकालमानानें कांहीं फेरफार झाले पाहिजेत एवढें कोणीही विचारी मनुष्य कबूल करील. पण हे फेरफार घडवून आणण्याकरितां ज्या व्यक्तींची किंवा उपायांची योजना करावयाची त्या व्यक्ति किंवा उपाय कोणत्या प्रकारचे पाहिजेत याबद्दल मतभेद असणें अगदीं शक्य आहे. शास्त्रीबुवांच्या पूर्वींच्या पिढींतील लोकांचें असें मत होतें कीं, इंग्रजी शिक्षणानें दहापांच नव्या गोष्टी करूं लागल्याबरोबर तो मनुष्य समाज सुधारण्याची ध्वजा हातीं घेण्यास योग्य झाला, इतकेंच नव्हे तर आचारस्वातंत्र्य व विचारस्वातंत्र्य यांचा पूर्णपणें उपयोग घेण्यास त्यास हक्क प्राप्त होऊन त्याची गणना परमहंसाच्या कोटींत लोकांनीं करावयास पाहिजे.

कोणास ही कदाचित थट्टा वाटेल; पण खरोखरच अशा तऱ्हेची 'परमहंस मंडळी' मुंबईत निघालेली होती, ही सुधारणा नव्हे, आचरटपणा होय. हें विचारस्वातंत्र्य नव्हे, अव्यवस्थितपणा होय. असें उघडपणें सांगणारा व प्रतिपादन करणारा गृहस्थ विष्णुशास्त्री यांच्यापूर्वी कोणी निघालेला नव्हता. समाजाचें मत पहिल्यादिवसापासूनच असें होतें, पण वर सांगितलेल्या कारणाकरितां तें प्रतिपादन करण्यास कोणी पुढें आले नव्हते. ते विष्णुशास्त्री आले एवढाच काय तो विशेष होय. हा आचरटपणा जगास व्यक्त करून दाखविणारा पुरुष प्राचीन आचाराविचारांचा सर्वांशीं भोक्ता असला पाहिजे ही कल्पना युक्तीच्या किंवा तर्कशास्त्राच्या कसोटीस टिकेल असें मला वाटत नाहीं. फार लांब कशाला ? उद्यां जर जुन्या पद्धतीनें शिकलेल्या शास्त्र्यांचीच सभा बोलाविली तरी त्यांत देखील देशकालानुरोधानें जुन्या समाजव्यवस्थेंत कांहीं फेरफार केले पाहिजेत असें ह्मणणारे कांहीं शास्त्री निघतील; पण तेवढ्याकरितां त्यांनीं नव्या मंडळीच्या आचरटपणाकडे किंवा अव्यवस्थितपणाकडे दुर्लक्ष केलें पाहिजे असें म्हणणें अगदीं वेडेपणाचें होय. समाजास कांहीं बंधनें पाहिजेत, आणि तीं बंधनें कायम राहण्यास प्राचीन संस्थांचा एक प्रकारचा अभिमानही समाजांत जागृत असला पाहिजे. हा अभिमान ज्यास नाहीं किंवा समाजाचीं बंधनें वाटेल तेव्हां तोडण्यास जे नेहमीं तयार असतात अशांनीं समाजसुधारणेची ध्वजा हातीं घेऊन लोकांचें पुढारी होण्याची हांव धरणें अत्यंत अप्रयोजक व उपहासास्पद होय. शास्त्रीबोवांची खरी लोकसेवा हीच कीं, त्यांनीं असल्या मंडळीची स्थिति लोकांपुढें मांडली इंग्लिश शिक्षणास सुरुवात होऊन तेव्हां कांहीं नाहीं तरी चाळीस वर्षें झालीं होतीं. इतक्या मुदतींत या नाचऱ्या चळवळींपेक्षां अधिक उपयुक्त व शाश्वत अशीं फारच थोडीं कामें या दोन तीन पिढींच्या लोकांच्या हातून झालेलीं आहेत, किंबहुना मुळींच नाहींत

ह्मटलें तरी चालेल. या मंडळींनीं आपल्या उदाहरणानें तरुण पिढीस जो एक प्रकारच्या अव्यवस्थितपणाचा कित्ता घालून दिला त्याचीं मात्र फळें आज आम्ही भोगीत आहों. समाजास किंवा देशास एक प्रकारची गति पाहिजे एवढें कोणा एकास कबूल असलें ह्मणजे समाजरूपी नौकेस आचरटपणाच्या व अव्यवस्थितपणाच्या वावटळींत भडकूं देण्यास त्यानें आपली संमति दिली पाहिजे असें कोणीही समंजस पुरुष ह्मणणार नाहीं व शास्त्रीबुवांसही तोच न्याय लागू केला पाहिजे भगवद्गीतेमध्यें " न बुद्धिभेदं जनयेदज्ञानां कर्मसंगिनाम् । जोषयेत्सर्वकर्माणि विद्वान्युक्तः समाचरन् ॥ असें जें सांगितलें आहे त्यांतील बीज हेंच होय. तुकारामासारख्या अंतर्बाह्य पांडुरंगमय झालेल्या साधूस न्हाव्याभटांची किंवा तीर्थांची निंदा करण्याचा किंवा प्रसंग-विशेषीं श्रीपांडुरंगासही टाकून बोलण्याचा जो अधिकार होता तोच आम्ही सांसारिकांनीं बजाविल्यास आम्ही आपल्यास किती उपहासास्पद करून घेऊं हें सांगावयास नकोच. नुसत्या 'बुद्धीनें अमुक एक गोष्ट बरी किंवा अमुक एक वाईट हें जाणणें सर्वांस जरी शक्य नसलें तरी तेवढ्यानेंच इष्ट सिद्धि होत नाहीं. लोकांत जर कोणत्याही विशिष्ट मताचा प्रचार करावयाचा असेल तर त्यास बुद्धिवादापेक्षां निराळ्या तऱ्हेचा अधिकार लागतो. तो अधिकार ज्यांस नाहीं त्यांनीं विनाकारण बडबड करून पुढारीपणाचें सोंग आणण्यापेक्षां आपल्या शक्त्यनुसार योग्य उद्योग केल्यास तो अधिक श्रेयस्कर होईल हें उघड आहे. शास्त्रीबुवांच्या लेखांतून व टीकेंतून जर कांहीं बोध घेण्यासारखा असला तर तो हाच होय, व त्याचकरितां त्यांच्या लेखास आम्ही इतकें महत्व देतों.

शास्त्रीबुवासंबंधानें शेवटला आक्षेप ह्मणजे कडक भाषेसंबंधाचा होय. पण हाही आक्षेप मागल्या इतकाच किंबहुना त्याहूनही अधिक अप्रयोजक आहे. एकदां लढाईस सुरुवात झाल्यावर

प्रतिपक्षानें आपलीं शस्त्रास्त्रें अधिक तीक्ष्ण करण्याची खबरदारी ठेविली होती अशी ओरड करीत बसणें, ह्मणजे आपल्या दौर्बल्याचा दोष विनाकारण लोकांच्या माथीं मारणें होय. मनुष्याचे विचार एकमेकांस कळविण्यास भाषा हें एकच साधन आहे; आणि त्या भाषेचा अपकर्ष करणारा मनुष्य सर्व वस्तु चोरणाऱ्या मनुष्यापेक्षांही जास्त निंद्य आहे असें मनुनें सांगितलें आहे. निंदेसंबंधानें हा जो न्याय आहे तोच उत्कर्षासंबंधानें लागू होतो. स्वभाषेच्या अंगीं नानातऱ्हेचे मनोविकार व्यक्त करण्याची शक्ति आणणाऱ्या पुरुषाचे लोकांवर जे उपकार होतात ते ज्यांनीं भाषेची प्रथमतः युक्ति काढून व्यवहारसौकर्य केलें त्याच्या उपकारापेक्षां फारसे कमी नाहींत. स्वभाषेची अभिवृद्धि व उत्कर्ष हें स्वराष्ट्राच्या उत्कर्षाचें एक प्रमुख साधन आहे व तें साधन विष्णुशास्त्री यांनीं जितकें परिपूर्णतेस आणिलें तितकें पूर्वीं कोणीच आणिलें नव्हतें ही गोष्ट सर्वमान्य आहे. आपल्या देशांतील लहानमोठ्या लोकांस आपले विचार कळवावे अशी ज्यास उत्कट इच्छा असेल त्यास स्वभाषेखेरीज दुसरें साधन नाहीं, हें इंग्रजी शिकलेल्या लोकांनीं पक्कें लक्ष्यांत ठेविलें पाहिजे व ज्यास लोकांबद्दल कळकळ नाहीं किंवा त्यास कांहीं ज्ञानाच्या गोष्टी सांगणें अवश्य आहे असें वाटत नाहीं, त्याच्या हातून स्वभाषेचा कधीं उत्कर्षही व्हावयाचा नाहीं. विष्णुशास्त्री यांच्या बरोबरीचे त्यावेळीं दुसरे विद्वान झाले नाहींत असें नाहीं, पण मराठी भाषा त्यांनीं हातीं न धरण्याचें कारण त्यांच्या अंगीं लोकांबद्दलच्या खऱ्या कळकळीचा अभाव हेंच होय. एखाद्या इंग्रजी बुकाचें साफ भाषांतर करणें किंवा साळुबाईची गोष्ट सजवून सांगणें यास मराठी भाषेचें ज्ञान लागत नाहीं असें नाहीं; पण मला लोकांच्या मनांत अमुक गोष्ट भरवून दिली पाहिजे अशा कळकळीनें ज्याचें अंतःकरण जळत नाहीं, त्याच्या हातून स्वभाषेची खरी सेवा होणें अशक्य होय.

रंगभूमीवर हावभाव किंवा अंगविकार यांच्या साहाय्यानें वक्त्यास किंवा नटास आपले मनोविकार सभाजनास कमजास्त प्रमाणानें व्यक्त करितां येतात, पण पांढऱ्यावर काळें करून तद्द्वारा लोकांचें चित्ताकर्षण करून घेणें अंतःकरणांत खरी कळकळ असल्याखेरीज शक्य नाहीं.' तेथें पाहिजे जातीचे येर गबाळाचें काम नोहे ' असें जें तुकारामबुवांनीं ह्मटलें आहे तें प्रस्तुत प्रकरणीं अगदीं बरोबर लागूं पडतें. कित्येक लोकांची अशी समजूत आहे कीं, चांगला लेख कोणता? तर ज्यांत दोहो पक्षाचा समतोलपणा राखून कोणास न दुखवितां दरबारी रीतीनें विषयाचें विवेचन केलेलें असतें. चांगल्या लेखाची ही व्याख्या दरबारी लोकांनीं पाहिजे तर लक्षांत ठेवावी. पण ज्यास आपल्या विचाराची लोकांवर छाप बसवावयाची असेल,किंवा वाग्देवीच्या प्रसादानें लोकांच्या मनोवृत्ति जागृत करावयाच्या असतील, त्यानें "अमर्षशून्येन जनस्य जंतुना न जातहार्देन न विद्विषादरः" हाच न्याय स्वीकारिला पाहिजे. इंग्रजीमध्यें जॉनसन, मेकाले वगैरे जे मोठमोठे ग्रंथकार झाले त्यांचीं मतें ह्मणजे सर्वांस सर्वांशीं ग्राह्य आहेत असें नाहीं; पण भाषेच्या अंगीं त्यांनीं जी मर्दुमकी दाखविली आहे तिचा राष्ट्राच्या अभिवृद्धीस जो उपयोग झाला तो लोक कधींही विसरणार नाहींत. भाषा हे राष्ट्राचें हत्यार होय; आणि हें हत्यार जो तयार करून देतो त्याचे राष्ट्रावर कांहीं लहानसान उपकार नाहींत. अशा रीतीनें पाहिलें ह्मणजे शास्त्रीबुवांचीं मतें कोणास ग्राह्य नसलीं तरीही त्यांनीं त्यांचे उपकारच मानिले पाहिजेत. चांगली भाषा लिहिण्यास किंवा वापरण्यास कांहीं तरी विषय पाहिजेच व तो विषय प्रत्येक ग्रंथकाराच्या वेळीं प्रचलित असलेल्या विषयांतूनच त्यानें निवडून घेतला पाहिजे. शास्त्रीबुवांनीं जो विषय घेतला तो त्यांच्या पूर्वींच्या पिढ्यांनीं जे उद्योग सुरू केले होते त्यामुळें ओघानेंच प्राप्त झालेला होता हें वर सांगितलेंच आहे. हा विषय एकदां हातीं घेतल्यावर स्वभावेंत निरनिराळे मनोविकार

हुबेहुब वठविण्याचें त्यांच्या अंगीं जें सामर्थ्य होतें व आपल्या देशबांधवांस आपले विचार कळवून त्यांस जागृत करण्याबद्दल जी त्यांच्या अंतःकरणांत कळकळ होती तीं सर्व या कार्याकडे त्यांनीं खर्च केली यांत कांहीं नवल नाहीं. त्याजकरितां त्यांस दोष देणें ह्मणजे " शंकराचार्यांनीं आपली विद्वत्ता तारायंत्र शोधून काढण्यांत कां खर्च केली नाहीं ? " असें ह्मणण्याइतकेंच अविचाराचें होय. त्यांनीं स्वभाषेची अभिवृद्धि करून आपल्या देशावर जे उपकार करून ठेविले आहेत त्यांच्या ऋणांतून मुक्त होण्यास आम्हांस पुष्कळ दिवस लागतील. हे उपकार न स्मरतां त्यांचे लेख कडक आहेत वगैरे कांहीं तरी सबबी काढून त्यांचें महत्त्व कमी करण्यास पाहणें माझ्यामतें अगदीं अक्षम्य आहे. शास्त्रीबुवांनीं जे कांहीं लेख लिहिले आहेत ते स्वतःच्या मोक्षप्राप्तीकरितां नव्हेत त्यांच्या वेळीं जीं ढोंगें प्रचारांत आलीं होतीं त्यांचा परिस्फोट करणें सार्वजनिकदृष्ट्या आपलें कर्तव्य आहे अशा समजुतीनें त्यांनीं हे लेख लिहिलेले आहेत; व ते लेख जितके चटकदार व मनोरंजक करतां येण्याचें त्यांच्या अंगीं सामर्थ्य होतें तितकें जर त्यांत त्यांनीं खर्च केलें नसतें तर आपलें कर्तव्य नीटपणें न केल्याचा दोष त्यांच्या माथीं येता. शास्त्रीबोवांच्या मताहून कोणाचीं मतें भिन्न असूं शकतील, नाहीं असें नाहीं; पण अमक्याच्या मताहून त्यांचीं मतें भिन्न होतीं ह्मणून कुत्सित बुद्धीनें शास्त्रीबुवांनीं कडक भाषा वापरली असें ह्मणणें म्हणजे घुबडानें आपल्या द्वेषानें सूर्य अधिक प्रखर तापतो असें म्हणण्या इतकेंच असमंजसपणाचें आहे.

अखेरीस शास्त्रीबुवांच्या स्वार्थत्यागासंबंधानें हल्लीं जो एक नवा आक्षेप निघाला आहे त्याबद्दल दोन शब्द लिहून हा लेख संपवितों. स्वार्थत्याग कशास म्हणावा आणि कशास ह्मणूं नये याबद्दल व्याख्या करीत बसण्यांत कांहीं हांशील नाहीं. शास्त्रीबुवांनीं सरकारी नोकरी सोडली ती पुढील अंदाज पाहून सोडली हा कांहीं त्यांचा दोष नव्हे. त्यांच्या वडिलांनीं त्यांस कांहीं जहागीर

ठेविलेली नव्हती. अर्थात आपलें व आपल्या कुटुंबाच्या निर्वाहाचें साधन पाहणें हें त्यांचें कर्तव्य होतें; पण आपणास पोट भरण्याची कांहीं पंचाईत नाहीं इतकी खात्री झाल्यावर अधिकाराच्या किंवा द्रव्याच्या लोभानें ते स्वकर्तव्यास पराङ्मुख झाले नाहींत हाच त्यांच्या अंगचा मोठा गुण होय. प्रत्येक मनुष्य आपापल्या हातून काय होईल याचा अदमास करूनच त्या कामांत पडत असतो, असा अदमास न करील तो मूर्ख होय; पण आपल्या आवडीप्रमाणें किंवा शक्तिप्रमाणें कर्तव्याची दिशा ठरविल्यानें तर उदरपोषणाकरितां नव्हे, तर द्रव्य व अधिकार यांच्या लालचीनें जो मनुष्य आपलें ठरविलेलें कर्तव्य सोडून देतो किंवा क्षणभर बाजूला ठेवतो तो पुढारी नव्हे आणि देशाचा हितकर्ताही नव्हे. अशा दृष्टीनें विचार केला असतां शास्त्रीबुवांनीं आपल्या कर्तव्याची जी दिशा ठरविलेली होती ती सरकारी नोकरीशीं विसंगत आहे असें आढळून आल्याबरोबर नोकरीपेक्षां कर्तव्याकडे त्यांनीं जास्त लक्ष दिलें हेंच त्यांच्या अंगच्या खऱ्या धैर्याचें लक्षण होय. मनुष्याच्या पारखेची खरी वेळ हीच असते. शास्त्रीबुवांच्या बरोबरीची मंडळी त्यांच्यापेक्षां कमी विद्वान होती असें नाहीं, पण शास्त्रीबुवांनीं स्वतंत्र रीतीनें अध्ययन, अध्यापन व ग्रंथलेखन अशी जी आपल्या कर्तव्याची दिशा ठरविली होती तशी दुसऱ्या कोणी ठरविली नसल्यामुळें ते प्रवाहानें प्राप्त झालेल्या परिस्थितींतच गढून गेले. शास्त्रीबुवांत व त्यांच्या बरोबरीच्या विद्वानांत जर कांहीं भेद असला तर तो हाच होय. देशस्थितीचा व आपल्या शक्तीचा विचार करून शास्त्रीबुवांनीं आपल्या कर्तव्याचें सुकाणू एका विवक्षित दिशेनें धरलें होतें; व इतर व्यवहार जेव्हां या दिशेच्या आड येऊं लागले, तेव्हां त्यांनीं आपली दिशा कायम ठेविली आणि इतर व्यवहार सोडून दिले. प्रत्येक सुशिक्षित मनुष्य हें उदाहरण डोळ्यापुढें ठेवून जर आपलें कर्तव्य बजावील तर देशाचें पुष्कळ कल्याण होणार आहे.

निर्वाहाचें साधन प्रत्येकास पाहिजेच पाहिजे. पण त्याची सोय झाल्यावर " शती दशशतं सोऽपीह लक्षं शतं " या न्यायानें आपली आशा अनावर वाढवून स्वकर्तव्यास विसरणारे पुष्कळ गृहस्थ आमच्यांत आहेत ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे. निर्वाहाच्या सोयीपेक्षां जास्त अपेक्षा न धरतां कर्तव्यास जागणें हेंच खऱ्या सुशिक्षिताचें काम होय. स्वार्थत्याग करा म्हणून कोणी करीत नाहीं, आणि करूं नका म्हणून सांगितल्यानें कोणी राहत नाहीं. कोणीही मनुष्य जी गोष्ट करतो ती त्यास प्रिय असते म्हणूनच करतो, व त्यास प्रिय नसतां ती त्यास करणें जरूर पडलें तर त्याच्या हातून ती चांगली वठतही नाहीं. या करितां स्वार्थापेक्षां कर्तव्य जास्त प्रिय वाटणारीं जितकी मंडळी देशांत निघेल तितकी चांगली. मला दोन लाख रुपये मिळाले म्हणजे मी अमुक करीन असें म्हणणारे पुष्कळ लोक असतात. अर्थात् त्यांची प्रीतिही कांहीं विशिष्ट कामापेक्षां दोन लाखांवर जास्त असते. अशा लोकांच्या हातून किंवा लोकांस दाखविण्याकरितां स्वार्थत्याग करणाऱ्या लोकांच्या हातून कांहींएक व्हावयाचें नाहीं. स्वार्थत्याग प्रत्येक माणसानें केला पाहिजे असें नाहीं; पण देशाची व आपली शक्ति मनांत आणून देशकार्याचा योग्य भाग उचलण्यास त्यानें नेहमीं तयार असलें पाहिजे. हा देशसेवेचा भाग करीत असतां स्वार्थत्याग आड न आल्यास उत्तमच होय. पण जेव्हां स्वार्थ त्यास आड येईल तेव्हां देशकार्याच्या भागाकडे जो पुरुष वळेल तोच खरा देशहितकर्ता होय. सरकारी नोकरींत शिरून किंवा द्रव्यार्जनाचे दुसरे मार्ग पतकरून फावल्या वेळांत होईल तितकें देशकार्य करणें हाही एक मार्ग आहे. पण भर्तृहरीनें म्हटल्याप्रमाणें स्वार्थाचा आणि परार्थाचा विरोध आला असतां स्वार्थाचा त्याग करून परार्थाकडे वळणारेच पुरुष उत्तम होत. हे पुरुष जाणून बुजून स्वार्थत्याग करतात असें म्हणण्यापेक्षां परार्थबुद्धीचा त्यांच्याठायीं उत्कर्ष असल्यामुळें ते स्वार्थाची मात-

घरीं ठेवीत नाहींत असें म्हणणें अधिक सयुक्तिक होय शास्त्रीबुवा या कोटींतील होते. एरव्हीं कायद्याचा अभ्यास करून अथवा सरकारी नोकरींतच राहून संसारिक दृष्ट्या मोठेपणा संपादन करणें त्यांस कांहीं अवघड नव्हतें, त्यांनीं नोकरी सोडली ती १०० ची होती कीं, ५० ची होती हा मुद्दा नाहीं. निबंधमाला बंद ठेवून किंवा मालेंत निव्वळ भाषाविषयक किंवा विनोदात्मक लेख लिहून त्यांच्या वेळच्या इतर विद्वानांप्रमाणें त्यांसही सबॉर्डिनेट सर्व्हिसच्या वरच्या पायरीस जातां आलें असतें पण त्यांच्या स्वभावास ही गोष्ट पसंत नसून त्यांच्या मनानें आपलें कर्तव्य निराळेंच आंखून ठेविलें होतें, त्यामुळें सरकारी नोकरीवर पाणी सोडून अखेरीस ते आपल्या आवडत्या कर्तव्याकडेसच वळले. अशा प्रकारचीं माणसें सुशिक्षित वर्गांत जितकीं जास्त निपजतील तितकीं पाहिजेच आहेत. शास्त्रीबुवांच्या चरित्रांत या प्रसंगापासून जर कांहीं बोध घ्यावयाचा असला तर हाच होय. पण आमच्यांतलि कांहीं मंडळी इतकी खमंग आहेत कीं, त्यास यांत देखील दोषच दृष्टीस पडतो. कां तर शास्त्रीबुवांनीं चाकरी सोडण्यापूर्वी आपल्या निर्वाहाची आधीं सोय लाविली म्हणून. अशा तऱ्हेच्या आक्षेपकांस उत्तर देण्यापेक्षां ' अरसिकेषु कवित्वनिवेदनं शिरसि मा लिख मा लिख मा लिख ' अशी विधात्याची प्रार्थना करूनच त्यांची रजा घेणें अधिक प्रशस्त होय.

असो शास्त्रीबुवांनीं काय कामगिरी केली याच्यासंबंधानें ऐतिहासिक दृष्ट्या विवेचन करण्याचा आतां काल आलेला आहे एवढेंच मात्र आतां विशेष करून सांगणें आहे. शास्त्रीबुवांस ज्या गोष्टींचें निराकरण करावें लागलें त्या गोष्टी कोणत्या हें समजून घेतल्या खेरीज त्यांच्या लेखाची योग्यता समजणें कठिण आहे. इंग्रजी शिकलेल्या पहिल्या पिढीची स्थिति जी वर वर्णन केली आहे तिचें बंड कमी होण्यास इंग्रजी शिकलेल्या लोकांची नोकरीच्या दर्शनें किंमत कमी होत चालली हें एक तर कारण खरेंच;

पण शास्त्रीबुवांचे लेख हें त्याहून बलवत्तर कारण आहे. समाजाचें व्यवस्थित रूप कायम ठेऊनच जी कांहीं सुधारणा करणें असेल ती केली पाहिजे; व इंग्रजी शिकल्यानें सर्वज्ञता येते असें न मानतां उद्योग, सदाचरण नियमितपणा, देशाभिमान वगैरे गुण संपादन करण्याचा सुशिक्षितांनीं प्रयत्न केला पाहिजे, अशी जर आज थोडी बहुत समजूत झाली असली तर तिचें प्रवर्तकत्व शास्त्रीबुवांकडेसच येतें. गेल्या पांच पंचवीस वर्षांत राष्ट्रीय सभेसारख्या ज्या चळवळी झाल्या त्यामुळें व इतर अनेक कारणांमुळें लोकांचे डोळे बरेच उघडत चालले आहेत हें खरें आहे; पण इंग्रजी शिक्षणाच्या पहिल्या घोटाबरोबर जो अव्यस्थितपणाचा मद आला होता तो शास्त्रीबुवांनीं दूर केला हें आपणास कबूल केलें पाहिजे. अशा प्रकारें एकदां एका बाजूस वळलेल्या ओघास केवळ आपल्या लेखणीनें अडवून धरून लोकप्रवृत्ति, सदाचार व खरा देशाभिमान यांजकडे वळविणें हें कांहीं लहानसान काम नव्हे व तें ज्यानें अवघ्या ३२ वर्षांच्या वयांत केलें त्याची योग्यताही सामान्य लोकांच्या योग्यतेपेक्षां पुष्कळच अधिक असली पाहिजे, हें कोणाही प्रांजल बुद्धीच्या मनुष्यास कबूल करावें लागेल. शास्त्रीबुवांच्या बरोबरीच्या व तदुत्तरकालीन लोकस्थितीचें ऐतिहासिक दृष्ट्या विवेचन करण्याची वेळ अद्याप आलेली नाहीं. पण ती येईल तेव्हां शास्त्रीबुवांच्या कर्तबगारीबद्दल त्यांस योग्य मान मिळून इंग्रजी शिक्षणानें आमच्या मंडळीच्या मनांत पहिल्यानें उत्पन्न झालेला चंचलपणा उत्तरोत्तर कमी होत जाऊन स्वधर्म, स्वभाषा, स्वदेश व विशेषतः करून आपल्या देशांतले व प्रांतांतले लोक यांच्यासंबंधानें सुशिक्षित मंडळी आपलें कर्तव्य ओळखण्यास लागली; व नीति, सदाचार आणि निश्चय यांच्या आश्रयानें तें कर्तव्य पार पाडूं लागली असें म्हणण्याची पाळी येईल अशी मला उमेद आहे. मी जें विवेचन केलें आहे तें अद्याप बरेंच अपूर्ण आहे. तथापि

तेवढ्यानें या विषयाची ऐतिहासिकदृष्ट्या चर्चा करण्याची लोकांची प्रवृत्ति होईल तर माझ्या अल्प श्रमाचें चीज झालें असें मी समजेन. "

असो या वेळीं **बळवंतरावांचें** मनाची, धैर्याची, कृतसंकल्पाची आणि सदिच्छेची परीक्षा घेणारी किती तरी मंडळी तयार असली पाहिजे याची कल्पना सहजी होण्यासारखी आहे. **बळवंतराव** एल. एल. बी. झाल्यानंतर मुनसिफ झाल्यास थैलींतून पगार आणील, वकील झाल्यास पैसा ठेवण्यास एक पेटीनें भागणार नाहीं, या करितां मोठी मजबूत "सेफच" घेतली पाहिजे. कोंकणांत स्ववृत्तिचें ठिकाणीं टोलेजंग इमारत उभारतां येईल पण आपणास पुण्यांतही सर्व सोईकर स्वतःचा वाडा बांधणें अवश्य आहे व त्याच्या योजनेस आतां पासून लागण्यास हरकत नाहीं; अशा विचारांत असलेले **काका**; माझा भाऊ श्रीमंत झाला, तो मुनसफ झाला ह्मणजे माझे **धोंडूची** विया कशी होईल, माझ्या **धोंडूस** कशी सोय लागेल, माझे **धोंडूनें** घरच्याघरींच लामणदिव्या सारखें लोंबत राहण्याचें कारण नाहीं, या आनंदांत **आका,** आपल्या स्नेहानें अंतकाळीं आपल्यावर हवालेला मुलगा, अशा वयांत, अशा सुधारणेच्या अगरांतून धुतल्या तांदुळासारखा बाहेर पडला आणि तोही लौकिकानें बाहेर पडला ही परमेश्वरानें आपणांस जोड दिली या आनंदांत असलेल्या **रावजी श्रीधर गोंधळेकरास, विष्णुशास्त्र्यासारख्या** हेकड, दांडग्या कोणासही न जुमानणाऱ्या, सोन्यासारखी शंभर रुपयांची नोकरी तीही पण पांचशें रुपये पर्यंत वाढणारी, सोडून देऊन हे नस्ते ढंग उभे करणाऱ्याच्या फंदांत **बळवंतरावा** सारखे तरूण, बुद्धिवान होतकरू जाऊन मिळणार हें समजतांच ह्या सर्वांस काय वाटलें असेल बरें ! नोकर लोकांना पूर्वीं जो दर होता तो **बळवंतरावजींचे** वेळीं कमी झाला होता, तरी त्यांच्या संबंधाच्या लोकांच्या कल्पना कमी झाल्या नव्हत्या.

वकील लोकांचा पूर्वी जो बोलबाला होता तोही या वेळीं वकीलांची संख्या वाढत असल्यामुळें उतरत्या बाजूवर होता. तरी बी. ए. एल. एल. बी. स मुन्सफ होण्यास फारशी मार्गप्रतीक्षा करण्याचें कारण अद्याप आलें नव्हतें. व जुन्या वकीलाच्या बसलेल्या घड्या विसकटून टाकून आपली घडी बसविण्याची वेळ ही पुरती आली नव्हती. अशा संधींत **बळवंतरावां**सारख्या स्वाभिमानी, कळकळीच्या व स्वदेशासंबधानें विचार करण्यास तयार झालेल्या गृहस्थानें आपल्या विचारांची एकदम कायमता करणें अवघड होते, व तसेंच ज्यांच्या कल्पना यांच्याही पूर्वी वीस वर्षांपलीकडील सुख शांतींत घोटाळल्या होत्या त्यांना **बळवंतरावांचें** करणें अप्रशस्त वाटणें साहाजिक होतें.

ज्या हुरुपानें **नानांनीं** लहानपणापासून इतकी खस्त घेतली, ज्या हुरुपानें यांस इतकी विद्या शिकविण्याची योजना केली, ज्याकरितां इतकें परिश्रम केले, ती सर्व दिशा बदलून **बळवंतराव तुकारामा**सारखें संत मालिकेंत शिरून व आपण 'परोपकाराय पुण्याय' करावयास लागून त्यांनीं सर्वांसच हरी विठ्ठल ! करावयास लाविलें !! याचें सर्वांस वैषम्य वाटलें, नव्हे, यांच्या विशेष कळकळीच्या मनुष्यास यांचा संतापही आला. **बळवंतरावांनीं** या फंदांत पडूं नये, आजपर्यंत असले फंद कोणी केले नाहींत, हीं कामें सरकारचीं सरकारानेंच केलीं पाहिजेत, आपल्या सारख्यांच्या हातून निभणारीं नाहींत, **बाबा गोखल्यांनीं**, शाळा घातली तींत त्यांना कितीसा फायदा झाला तो तुम्हाला होणार आहे ? असा फायदा असता तर आजपर्यंत कित्येकांनीं शाळा घातल्या असत्या, फलाणें अवघ्या चार वर्षांत चारशें रुपयांवर गेले, फलाण्याचे फलाणें झालें इत्यादि अनेक उपदेश स्वतः आणि हस्तें परहस्तें करून पाहिले, जितक्या अडचणीं आणवतील तितक्या आणून पाहिल्या, पण उपयोग झाला नाहीं. आम्हां उभयतांच्या खर्चास लागण्यापुरतेच पैसे घेऊन लोकशि-

क्षणाचें काम करावयाचें. स्वार्थत्याग केल्याखेरीज लोकशिक्षण देतां यावयाचें नाहीं व तें दिल्याखेरीज आपली सुधारणा व्हावयाची नाहीं. हा सिद्धांत बोलून सिद्ध करावयाचा नाहीं, कृतीनें सिद्ध करून दाखवावयाचा आहे. आजपर्यंत उभारलेल्या कामांत यश आलें नाहीं, याचें कारण 'क्रियेवीण वाचाळताच' फार होती हेंच होय. इत्यादि प्रकारचें सिद्धांत सिद्ध करून दाखवावयाचें, त्यांत येणाऱ्या अडचणी काढावयाच्याच, भोगावीं लागणारीं संकटें भोगावयाचींच; परंतु मनांत आणलेलें पुरें करावयाचें. हा निश्चय **बळवंतरावांनीं** हालूं दिला नाहीं. कै० विष्णू शास्त्रींत व यांत मोठें गुणैक्य होतें तें हेंच होय. म्हणून ते आज चरित्रास लायक झाले आहेत यांत संशय नाहीं. देशकार्यदृष्टीनें पाहिलें असतां **सन १८८० ता. १ जानेवारी** हा दिवस आमच्या महाराष्ट्रांत अत्यंत पवित्र होय. नष्टत्वाच्या अखेरच्या भागांत असलेल्या 'स्व' त्वांतील अत्यंत सूक्ष्म बीजास रुजत घालणारा दिवस हाच असल्यामुळें या दिवसाचें महत्व फार मोठें—पृथ्वींतील सर्व रत्नापेक्षां मोठ्या महत्त्वाचें—आहे व या महत्त्वाच्या दिवसाचे महाभागापैकीं **बळवंतराव** हे एक आहेत यांत संशय नाहीं.

काय त्या वेळचे यांचे विचार! केवढी उमेद! आणि केवढा धिप्पा! तो आज सांगू लागल्यास कोणास तरी मोठें हें सांगणें अतिशयोक्तीचें वाटेल यांत संशय नाहीं. कारण यांच्या संस्थेंत त्या वेळच्या विचारांतील अल्पसही हल्लीं दिसत नाहीं! जर आपल्या वडिलांनीं आमलीं लग्नें केलीं नसतीं तर रोमन क्याथलिक पंथांतील जेसूट जसे राहतात तसे राहून आपणास हवातसा उद्योग करतां आला असता, पण आतां त्यास उपाय इतकाच कीं, ते लोके आपले निर्वाहाकरतां लागेल तेवढाच पैसा घेऊन आपल्या संस्था जशा चालवितात तशी आपली संस्था चालवावयाची. या करितां या संस्थेंत दोन भाग ठरवावयाचे. एक लाईफ मेंबर व दुसरा नोकर. लाईफ मेंबरांनीं घरखर्चाकरितां अवघ्या तीस टिक-

त्या शाळेच्या उत्पन्नांतून घ्यावयाच्या व बाकीचे पैसे शिलकेंत टाकावयाचे ! हें जाडें वेतनही के० **विष्णुशास्त्री** आणि **टिळक** यांनीं दोन वर्षे घेतलें नाहीं. विद्यार्थ्यांचीं मनें पुस्तकी शिक्षणानें जशीं प्रफुल्लित करावयाचीं तशींच स्वसंरक्षणार्थ लागणारें शरीरशिक्षणांतही आपले विद्यार्थी तयार झाले पाहिजेत; म्हणून त्यास कवाईत, पोहणें, घोड्यावर बसणें आणि दांडही शिकवावयाचा ! एकंदरींत आपले शाळेंतील विद्यार्थी सरकारी शाळेंतील विद्यार्थ्यांपेक्षां आचारानें आणि विचारानें प्रौढ व समाजभूषण होईल असा तयार करावयाचा ! प्रसंगीं हरिबा नाइकासारख्याची एखाद्या अडरानांत गांठ पडल्यास त्यासही समजलें पाहिजे कीं, हा स्वसंरक्षणार्थ पिनलकोडचा आश्रय करणारा किंवा पोलीसाचा अथवा वकीलाच्या पाया पडणारा गृहस्थ नसून आपल्या मनगटाचे जोरानें दुसऱ्याची खुमखुम जिरविणारा गृहस्थ आहे. ही इतकी तयारी कोणा रावसाहेब अथवा रा. ब.राकडे खेटे घालून करावयाची नाहीं. अथवा कोणा साहेबबहाद्दरापुढें लांगूलचालन करून करावयाची नाहीं, किंवा सरकारचे द्वारीं तुकडा मागावयाचा नाहीं. जें कांहीं करावयाचें तें केवळ आपल्या कर्तृत्वशक्तीनें लोकांस अनुभव आणून देऊन करावयाचें ! हा बाणा पत्करण्यास **विष्णुशास्त्र्यांचे**बरोबर **महादेव बल्लाळ नामजोशी** हे तयार होतेच पण पदवीधरांपैकीं पहिले गृहस्थ कोणी असल्यास **बाळ गंगाधर टिळक** हे एकटेच होते. दुसरे **श्रीधर बाळकृष्ण उपासनी** तयारींत होते. परंतु त्यांची त्या वेळची गृहस्थिति त्यांच्या वृत्तीस फारच प्रतिकूल असल्यामुळें त्यास मंडळीनें नाकारिलें. या विजयाचा अंकूर कसा जोरावत चालला हें पुढील भागांत [illegible]

30 समाप्त.